शुक्रवार
९
जानेवारी २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३०५
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
अजिंक्य भारत

तिलक वर्मा न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतून बाहेर
- (पान ७ वर)

थोडक्यात

तीन पक्षांचे सरकार लचके तोडतेय - चव्हाण

पुणे : राज्यातील तीन पक्षांचे सरकार शहराचे लचके तोडत आहे, कोणाच्या वाटेला किती येईल एवढाच विचार केला जात आहे, समस्यांचा विचार इथे होत नाही, असा घणाघात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना शिंदे गट यांच्यावर केला. काँग्रेसशिवसेना आघाडीचा 'पुणे फर्स्ट' जाहीरनामा प्रसिद्ध करण्यासाठी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदे दरम्यान ते बोलत होते. यावेळी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. सत्ताधारी तीन पक्षांच्या कारभारामुळे शहरात भ्रष्टाचार वाढला असून उद्योग, वाहतूक व पर्यावरणाच्या समस्या गंभीर झाल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

ईडीची ममता बॅनर्जी यांच्याविरुद्ध हायकोर्टात धाव

दिल्ली : पश्चिम बंगालमध्ये राजकारण तापले आहे. ममता बॅनर्जी यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कारण ईडीने पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरुद्ध हायकोर्टात धाव घेतली आहे. आज ईडीने पश्चिम बंगालमध्ये - च्या कार्यालयावर छापेमारी केली आहे. त्यानंतर मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी त्या ठिकाणी जाऊन तपास यंत्रणेच्या कामात हस्तक्षेप केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला आहे. ईडीने - चे प्रतीक जैन यांच्या कार्यालयावर छापेमारी केली. छापेमारी सुरू असतानाच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी त्या ठिकाणी दाखल झाल्या. त्यानंतर ईडीने पश्चिम बंगाल सरकारवर आणि खुद्द मुख्यमंत्री पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर पुरावे नेल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर ईडीने हायकोर्टात धाव घेतली असून शुक्रवारी ईडीच्या याचिकेवर सुनावणी होणार आहे.

१५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर



मुंबई : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे. अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जनगणना २०२७ : १ एप्रिलपासून होणार सुरुवात!

मोबाईल ॲपमुळे घरबसल्या करता येणार माहितीची नोंद

नवी दिल्ली, दि. ८ वृत्तसंस्था

केंद्रीय गृह मंत्रालयाने २०२७ च्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, त्यांनी नियम आणि वेळापत्रक जाहीर केले आहे. घरांची यादी आणि गणना प्रक्रिया या वर्षी १ एप्रिल ते ३० सप्टेंबर दरम्यान सुरू होईल. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाला हे काम पूर्ण करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी दिला जाईल.

हे लक्षात घ्यावे की यावेळी, लोकांना स्वतःची स्वतःची गणना करण्याचा पर्याय देखील असेल, म्हणजेच ते त्यांची स्वतःची माहिती प्रविष्ट करू शकतात. ही सुविधा घरोघरी सर्वेक्षण सुरू होण्याच्या १५ दिवस आधी उपलब्ध करून दिली जाईल. सरकारने २०२० पासूनचा मागील आदेश रद्द करून नवीन नियमांनुसार या कामाला हिरवा कंदील दाखवला आहे. १ मार्च २०२७ च्या मध्यरात्री संपूर्ण देशासाठी अंतिम लोकसंख्या आकडेवारीसाठी संदर्भ वेळ मानली जाईल. तथापि, लडाख, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या बर्फाच्छादित किंवा दुर्गम भागांसाठी नियम आणि वेळापत्रकात थोडेफार फरक असू शकतात. गेल्या डिसेंबरमध्ये मोदी सरकारने या कामासाठी ११,७१८ कोटी रुपयांपेक्षा जास्त बजेट मंजूर केले. या जनगणनेत एक मोठा बदल म्हणजे लोकसंख्येच्या मोजणीसह जातीची माहिती समाविष्ट करणे. हे जगातील सर्वात मोठे प्रशासकीय काम आहे, ज्यासाठी सुमारे ३० लाख कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. ही भारतातील पहिली डिजिटल जनगणना असेल, जिथे पेन आणि कागदाऐवजी मोबाइल ॲप वापरून घरोघरी जाऊन माहिती गोळा केली जाईल. अचूकता सुनिश्चित करण्यासाठी आणि त्रुटी कमी करण्यासाठी एक समर्पित पोर्टल तयार करण्यात आले आहे. सरकार म्हणते की डेटा अशा प्रकारे संग्रहित केला जाईल की कोणत्याही नियोजनासाठी आवश्यक असलेला डेटा एका बटणाच्या क्लिकवर मिळू शकेल. (सेन्सस ॲज अ सर्व्हिस) नावाची एक नवीन सेवा सर्व सरकारी मंत्रालयांना स्वच्छ आणि व्यवस्थित डेटा प्रदान करेल. संपूर्ण प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी एक विशेष पोर्टल, सीएमएमएस, तयार करण्यात आले आहे, ज्यामुळे सरकारला जनगणनेची प्रगती रिअल टाइममध्ये ट्रॅक करता येईल. तुम्हाला प्रगणक येईपर्यंत वाट पाहण्याची गरज नाही. तुमच्या परिसरात जनगणना सुरू होण्याच्या १५ दिवस आधी तुम्ही जनगणना ॲप किंवा पोर्टल वापरून तुमची माहिती स्वतः प्रविष्ट करू शकता. ही प्रक्रिया डिजिटल असल्याने, संपूर्ण डेटा सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

२०२१ मध्ये जनगणना का पुढे ढकलण्यात आली? : २०२१ मध्ये होणारी जनगणना, जी कोविड-१९ साथीच्या आजारामुळे पुढे ढकलण्यात आली होती, ती आता पुन्हा सुरू केली जात आहे. ही जनगणना दोन टप्प्यात केली जाईल: पहिला टप्पा घरांची यादी असेल आणि दुसरा टप्पा लोकसंख्या मोजणी असेल. जनगणना १ एप्रिल २०२६ रोजी सुरू होईल आणि २८ फेब्रुवारी २०२७ पर्यंत चालेल.

संपूर्ण जनगणना प्रक्रिया कशी असेल?

जनगणना पथकातील प्रत्येक सदस्य तुमच्या घरी भेट देईल आणि तुम्हाला दोन वेगवेगळे प्रश्न विचारेल. पहिला संच तुमच्या घरातील सुविधांबद्दल विचारेल, तर दुसरा संच तुमच्या कुटुंबातील सदस्यांची माहिती गोळा करेल. सामान्यतः, तुमच्या क्षेत्रातील सरकारी शाळेतील शिक्षक हे काम करतील आणि राज्य सरकार त्यांना त्यांच्या नियमित कर्तव्यांव्यतिरिक्त ही जबाबदारी सोपवेल.

ब्रँड सांगणाऱ्यांचाच बँड वाजवू!

फडणवीसांचा ठाकरे बंधूंवर निशाणा

मुंबई, दि. ८ वृत्तसंस्था

मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. याच दरम्यान ठाकरे बंधूंची संयुक्त मुलाखत प्रसारित झाली. या मुलाखतीआधीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर अप्रत्यक्ष पण थेट शब्दांत निशाणा साधला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात एकच ब्रँड होता आणि तो म्हणजे हिंदू हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे. त्यानंतर महाराष्ट्रात कोणीही ब्रँड नाही. तसेच, स्वतःला ब्रँड म्हणवणाऱ्यांचा आम्ही निवडणुकीत ''बँड वाजवू'', असा इशाराही त्यांनी दिला.

महायुतीमध्ये कोणीही स्वतःला ब्रँड समजून जनतेसमोर येत असेल, तर त्याचा राजकीय बँड वाजवल्याशिवाय थांबणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. आगामी काळात शिवतीर्थावर ठाकरे गट, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेसची ऐतिहासिक सभा होणार असल्याचं चित्र आहे. तसेच, उल्हासनगरमध्ये गुंडाराज चालणार नाही, असा ठाम इशाराही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

करप्ट लोकांची स्क्रिप्टेड मुलाखत - डॉ. ज्योती वाघमारे

शिवसेना (शिंदे गट) प्रवक्त्या डॉ. ज्योती वाघमारे यांनी विरोधकांच्या तथाकथित मुलाखतीवर जोरदार टीका करत, ती ''करप्ट लोकांची स्क्रिप्टेड मुलाखत'' असल्याचा आरोप केला आहे. या टीकेदरम्यान उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे नाव न घेता त्यांनी थेट शब्दांत सांगितले की, एकनाथ शिंदे यांच्या राजकीय धसक्यानेच आज हे सगळे नाट्य रचले जात आहे. ठाकरे बंधूंच्या नावांचा थेट उल्लेख न करता डॉ. वाघमारे म्हणाल्या, ''ज्या दोन भावांनी वर्षानुवर्षे एकमेकांचे चेहरेही पाहिले नाहीत, ते आज एकाच सोफ्यावर बसले आहेत. ही एकता नाही, तर एकनाथ शिंदे नावाच्या वादळाने उडवलेली झोप आहे.'' त्यांच्या मते, जनतेला हे स्पष्ट दिसत आहे की सत्ता गेल्यावर अचानक आलेली 'एकजूट' ही केवळ राजकीय मजबुरी आहे. विरोधकांवर खोचक टीका करत त्या म्हणाल्या, ही 'टॉम अँड जेरी'ची जोडी कितीही प्रयत्न केले, तरी वाघाला म्हणजेच एकनाथ शिंदे साहेबांना आव्हान देऊ शकणार नाही. जनतेचा कौल आणि वास्तवातलं (पान २ वर)

लोकांचा राग मतदानातून व्यक्त होणे गरजेचे - राज ठाकरे

मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे त्यांच्या सडेतोड भूमिका व मिश्किल टोलेबाजीसाठी ओळखले जातात. ठाकरे गटाचे प्रवक्ते व खासदार संजय राऊत आणि अभिनेते-दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी घेतलेल्या मुलाखतीमध्ये राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासमवेत महाराष्ट्रीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर भाष्य केलं. सत्ताधाऱ्यांच्या राजकीय धोरणावरही दोघांनी सडकून टीका केली. (पान २ वर)

मुख्यमंत्री महाराष्ट्राचे नाहीत, भाजपाचे आहेत - उद्धव ठाकरे



आपल्या देशाला पंतप्रधान हवाय. पण आत्ता देशाला पंतप्रधान नाही, भाजपाचे पंतप्रधान आहेत. तसंच महाराष्ट्राला मुख्यमंत्री नाहीत, भाजपाचे मुख्यमंत्री आहेत. हे सगळेजण त्यांचा पक्ष आणि सत्ता एवढाच विचार करतात. हे एवढे सत्तांध झाले आहेत की लोक मेले तरी चालतील, त्यांची मुलंबाळं ड्रग्जच्या आहारी गेले तरी चालतील, तो धंदा करणारे सत्तेत आपल्या बाजूला बसले तरी चालतील पण सत्ता पाहिजे ही वृत्ती आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी टीका केल्यानंतर त्यावर राज ठाकरेंनी त्यांची भूमिका मांडली.

सत्यशोधक भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठानतर्फे 'राज्यस्तरीय कृषी गौरव पुरस्कार' जाहीर

संपादक तिक्ष्णगत वाघमारे यांना 'प्रसार माध्यम कृषी गौरव पत्रकारिता पुरस्कार'

उमरखेड, दि. ८ प्रतिनिधी

उमरखेड येथील सत्यशोधक भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठानने '२०२६ सालच्या राज्यस्तरीय कृषी गौरव पुरस्कारां'ची घोषणा केली असून, यावर्षी कृषी क्षेत्रातील दिग्गजांसह प्रसार माध्यमांतील योगदानाचाही सन्मान केला जाणार आहे. दैनिक 'अजिंक्य भारत'चे समूह संपादक तिक्ष्णगत वाघमारे (मुंबई) यांना 'प्रसार माध्यम कृषी गौरव पत्रकारिता पुरस्कार' जाहीर झाला आहे. सहकार महर्षी भाऊसाहेब माने यांच्या ३३ व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून या प्रतिष्ठानने कृषी, समाजकार्य, संशोधन आणि पत्रकारिता, आदी विविध क्षेत्रातील २२ मान्यवरांची या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड केली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही सत्यशोधक भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठानने शेती आणि शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी झटणाऱ्यांचा गौरव करण्याचा वसा जपला आहे. भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठानचे मार्गदर्शक डॉ. विजयराव माने आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष शेतीमित्र अशोकराव वानखेडे यांनी गुरुवारी निवड समितीने निवडलेल्या सत्कारमूर्तींच्या नावांची अधिकृत घोषणा केली. येत्या १ फेब्रुवारी २०२६ रोजी उमरखेड येथील कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात दुपारी १२ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत हा दिमाखदार सोहळा पार पडणार आहे. पुरस्कारार्थीमध्ये राज्यभरातील कृषी क्षेत्रातील 'रत्नां'चा समावेश आहे. यात प्रामुख्याने रेशीम उद्योगाचे शिल्पकार डॉ. महेंद्र ढवळे (नागपूर), कृषी पर्यटनाचे जनक पांडुरंग तावरे (बारामती), (पान २ वर)

३३ वर्षानंतर सेबीकडून स्टॉक ब्रोकर कायद्यात प्रथमच फेरबदल!

नवी मुंबई, दि. ८ वृत्तसंस्था

आज सेबी नियामक मंडळानी भांडवली बाजारातील कारभार सुव्यवस्थित करण्यासाठी नवा निर्णय घेतला आहे.सेबीच्या (स्टॉक ब्रोकर्स) नियमन १९९२ (१९९२) ची जागा सेबी (स्टॉक ब्रोकर्स) नियमन २०२६ (२०२६) ने घेतली आहे. सेबीने आपली क्लिष्ट भाषा वगळता सोपे नियमन करून आपली नियामक भाषा सोपी केली आहे.

व्यवसाय वाढीसह इज ऑफ डुईंग बिझनेससाठी १९९२ नंतर प्रथमच प्रस्तुत बदल केले असून, या बदलानुसार ब्रोकर्सना इतर वित्तीय नियामकांच्या चौकटी अंतर्गत अंतर्गत काम करण्याची परवानगी देण्यात आली आहे, असे सेबीने आपल्या नोटिफिकेशनमध्ये म्हटले आहे. काळाशी सुसंगत नसलेल्या कालबाह्य तरतुदी व शब्द सेबीने काढून टाकले आहे, असे सेबीने स्पष्ट केले आहे. सेबीने आपल्या तीन दशकांहून अधिक जुन्या स्टॉकब्रोकर नियमांमध्ये मोठे बदल केले आहेत. अनुपालनात सुलभता आणली आहे. सुलभतेचे प्रमाण अधोरेखित करताना, सेबीने म्हटले होते की, वाचन आणि समजण्यास सुलभता वाढवण्यासाठी मसुदा तयार करण्यात आला आहे, ज्यामुळे एकूण पानांची संख्या ५९ वरून २९ पर्यंत आणि शब्दांची संख्या १८८४६ वरून ९०७३ शब्दापर्यंत कमी झाली आहे. प्रथमच नव्या नियमानुसार, सेबीने बुधवारी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार एक स्टॉक ब्रोकर इतर वित्तीय क्षेत्रातील नियामक किंवा इतर (पान २ वर)

जळगावमध्ये तब्बल २७ जणांची भाजपकडून हकालपट्टी!

जळगाव, दि. ८ वृत्तसंस्था

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या काही इच्छुकांनी उमेदवारी मागे न घेता बंडखोरीचा मार्ग स्वीकारला. हे बंडखोर अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरले असताना मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करत असल्याचे निदर्शनास आले होते. या गंभीर प्रकाराची दखल घेत भाजप नेतृत्वाने पक्ष विरोधी कारवाया करणाऱ्या तब्बल २७ पदाधिकारी व कार्यकर्त्यांची तडकाफडकी हकालपट्टी करण्याचे पाऊल गुरूवारी उचलले. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून करण्यात आलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. भाजपच्या नावाचा आणि पक्षाच्या प्रतिमेचा गैरवापर करत काही अपक्ष उमेदवार हे मतदारांची दिशाभूल करत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला होता. प्रचारादरम्यान संबंधित सर्व अपक्ष उमेदवार आणि त्यांचे समर्थक स्वतःला भाजपशी संबंधित असल्याचे भासवत असल्याने मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकाराची गंभीर दखल घेत भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सुर्यवंशी यांनी बुधवारी प्रसिद्धीपत्रक जारी करून पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट केली होती. भाजपने ज्या उमेदवारांना अधिकृत उमेदवारी दिली आहे, त्यांच्या व्यतिरिक्त कोणताही उमेदवार पक्षाशी संबंधित नसल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले होते. तसेच, भाजपच्या नावाचा वापर करून प्रचार करणाऱ्या उमेदवारांनी दोन दिवसांच्या आत आपली भूमिका स्पष्ट करावी, अन्यथा कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही दिला होता.

अंबरनाथमध्ये काँग्रेसला धक्का; १२ नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश

अंबरनाथ : अंबरनाथ नगर परिषदेतील काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी आज नवी मुंबई येथे भाजप मध्ये प्रवेश केला. महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, संजीव नाईक ,दीपेश म्हात्रे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा प्रवेश झाला. एकाच वेळी काँग्रेसच्या १२ नगरसेवकांनी पक्षांतर केल्यामुळे अंबरनाथमध्ये भाजपाची राजकीय स्थिती अतिशय मजबूत झाली आहे. काँग्रेसच्या १) प्रदीप नाना पाटील २) दर्शना उमेश पाटील ३) अर्चना चरण पाटील ४) हर्षदा पंकज पाटील ५) तेजस्विनी मिलिंद पाटील (पान २ वर)

परिवर्तन — चलन निर्मितीत मोठा बदल

चलन कागद निर्मितीसाठी अत्याधुनिक तंत्र कार्यान्वयित!

मुंबई, दि. ७ वृत्तसंस्था

भारताच्या चलनात नाण्यांप्रमाणे कागदी नोटांनाही तितकेच महत्व आहे. दहा रुपयांपासून ते पाचशे रुपयांपर्यंत यांसारख्या अनेक नोटा आज चलनात आहेत. याच नोटांच्या कागदांना भारत सरकार आता खास सुरक्षा आणि योजना पुरवणार आहे. भारताच्या पायाभूत सुविधांद्यांना बळकटी देण्यासाठी आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी चाळणी नोटा छपाईसाठी वापरल्या जाणाऱ्या उच्च सुरक्षा कागदाचे उत्पादन वाढवण्यासाठी सरकारने १,८०० कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मध्य प्रदेशातील नर्मदापूरम येथील सिक्युरिटी पेपर मिलमध्ये हा कागद तयार केला जाणार आहे.

देशातील चलन कागदनिर्मिती व्यवस्थेत मोठा बदल होणार असून, सिक्युरिटी पेपर मिलमध्ये नवीन अत्याधुनिक उत्पादन लाईन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही लाईन केवळ चलनी नोटांसाठीच नव्हे, तर नॉन-ज्युडिशिअल स्टॅम्प पेपर्स आणि पासपोर्टसाठी आवश्यक असलेल्या उच्च-सुरक्षा कागदाच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणार आहे. नवीन प्रस्तावित लाईन १९७० पासून कार्यरत असलेल्या तीन जुन्या उत्पादन युनिटपैकी दोनची जागा घेणार आहे. हा निर्णय सुविधेच्या आधुनिकीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात असून, उत्पादन कार्यक्षमता आणि सुरक्षिततेत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे. सिक्युरिटी पेपर मिल ही सिक्युरिटी प्रिंटिंग अँड मिंटिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड अंतर्गत कार्यरत आहे. देशात चलन कागदाच्या निर्मितीची संपूर्ण जबाबदारी सध्या या संस्थेकडे असून, भारतातील या क्षेत्रातील मक्तेदारी कायम आहे. डिजिटल व्यवहारांचा वापर वाढत असतानाही देशात चलनाचे परिसंचरण सातत्याने वाढत असल्याने नोटांची मागणी अद्याप कमी झालेली नाही.

प्रगत वैशिष्ट्ये

तज्ज्ञांच्या मते, उच्च-सुरक्षा कागदामध्ये वॉटरमार्क, सुरक्षा धागे आणि विशेष तंतूंसारखी प्रगत वैशिष्ट्ये असतात, जी बनावट नोटा रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. नोटाबंदीनंतर चलनाच्या मागणीत झालेली वाढ पाहता, देशांतर्गत उत्पादन वाढवणे अपरिहार्य ठरले होते. या प्रकल्पामुळे परदेशातून आयात केल्या जाणाऱ्या कच्च्या साहित्यावरील अवलंबित्व कमी होणार असून, मध्य प्रदेशात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. हा उपक्रम केंद्र सरकारच्या 'आत्मनिर्भर भारत' धोरणाशी सुसंगत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

पाणंद रस्ते समितीत सह अध्यक्षांसह परिषद सदस्य अन पाच प्रगतशील शेतकरी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्णय

मुंबई, दि. ७ वृत्तसंस्था

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेचे संचालन जलदगतीने होण्यासाठी आता विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये सहअध्यक्ष आणि पाच प्रगतशील शेतकऱ्यांचा समावेश करण्यात येणार आहे. तसेच, पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमध्ये आता जिल्ह्यातील सर्व विधानपरिषद सदस्यांना देखील सदस्य म्हणून स्थान देण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी हा निर्णय घेऊन यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीवर नियुक्त केल्या जाणाऱ्या सहअध्यक्षाची निवड करण्याचे अधिकार थेट महसूल मंत्र्यांना देण्यात आले आहेत. तसेच, समितीमध्ये सहभागी होणाऱ्या पाच प्रगतशील शेतकऱ्यांची निवड करताना पारदर्शकता राखण्यासाठी उपविभागीय अधिकारी हे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांकडून नावांची यादी मागवतील आणि त्यानंतर जिल्हाधिकारी या निवडीला अंतिम मंजुरी देतील. एका विधानसभा क्षेत्रात एकापेक्षा जास्त उपविभागीय अधिकारी असल्यास सदस्य सचिवाच्या नियुक्तीचा निर्णय जिल्हाधिकारी घेणार असून, (पान २ वर)

शेतकऱ्यांचा विकास

जोपर्यंत शेतकऱ्याच्या बांधावर रस्ता पाणी आणि वीज जात नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचा विकास होणार नाही. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. नवीन सहभागामुळे योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यात यश येईल.

- चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री.

पान 1 वरून...

सत्यशोधक भाऊसाहेब माने ...

'अजिंक्य भारत'चे समूह संपादक तिक्ष्णगत वाघमारे (मुंबई), ज्येष्ठ पत्रकार संतोष मुंडे (संभाजीनगर), प्रगतशील शेतकरी पांडुरंग आव्हाड (धाराशिव), श्रीकृष्णकुमार राठी (अकोला), दिशा उदगीरकर (अकोला), अंकिता मोरे (जालना), आणि हळद संशोधक डॉ. मनोज माळी (सांगली) यांचा समावेश आहे. शिवाय, रवींद्र मेटकर (अमरावती), बाबाजी बांगर (जुन्नर), अजिंक्य कांबळे (इंदापूर), गोविंदराव पवार (हदगाव), श्रीपत राठोड (नागपूर), कृष्णराव देशट्टीवार (पांढरकवडा), पूजा संगनवार (घाटंजी), बापू देशमुख (अकोला), सुरेंद्र नारखेडे (अकोला), डॉ. मिलिंद देशमुख (पुणे), डॉ. नितीन कोंडे (अकोला), डॉ. आम्रपाली आखरे (अकोला) आणि डॉ. किशोर बिडवे (अकोला) आदींसह स्थानिकस्तरावर आदर्श शेतकरी प्रोत्साहन पुरस्कारासाठी वंदना सदानंद पांडे (खरबी), दत्ता भिमराव वानखेडे (सुकळी), सतीश दिगंबर जामकर (पोफाळी) आणि समाधान अशोकराव वानखेडे (खरूस) यांची निवड करण्यात आली आहे. या सोहळ्यात कृषी क्षेत्रातील नवनवीन आव्हाने, पूरक उद्योग आणि आधुनिक तंत्रज्ञानावर मंथन होणार आहे. दूध उत्पादन, रेशीम उद्योग, कुक्कुटपालन यांसारख्या पूरक व्यवसायांतून प्रगती साधणाऱ्या शेतकऱ्यांचे अनुभवकथन हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असेल. या उपक्रमाद्वारे गेल्या २० वर्षांपासून प्रतिष्ठानने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आणि कृषी विज्ञान मंचच्या सहकार्याने कृषी संस्कृतीचा वारसा जपला आहे. पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र, शाल आणि श्रीफळ देऊन गौरवण्यात येईल, असे प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब ओझलवार यांनी कळविले आहे.

ब्रँड सांगणाऱ्यांचाच बँड वाजवू!

प्रशासन यामध्ये जमीनअस्मानाचं अंतर असल्याचं त्यांनी ठामपणे सांगितले. डॉ. वाघमारे यांनी थेट सवाल केला, मुख्यमंत्री असताना अडीच वर्षे घराबाहेर न पडणाऱ्या उद्धव ठाकरे यांना आज अचानक जनतेच्या दुःखाची आठवण कशी झाली? तेव्हा प्रशासन कुठे होतं? शेतकरी, कामगार, सामान्य जनता त्रस्त असताना हे लोक काय करत होते? ही संपूर्ण मुलाखत म्हणजे राजकारण नव्हे तर सिनेमाचा सेट असल्याची टीका करत त्या म्हणाल्या, राजकारणाला सिनेमा समजून कितीही मोठे सेट उभे केले, मुलाखतींचे खेळ खेळले, तरी 'बडे मियाँ-छोटे मियाँ'ची ही जोडी आता पूर्णपणे आऊटडेटेड झाली आहे. शेवटी त्यांनी ठामपणे सांगितले की, ''स्क्रिप्टेड मुलाखती, बनावटी एकजूट आणि खोटा कळवळा महाराष्ट्राची जनता ओळखते. खरी स्क्रिप्ट आता जनता लिहिणार आहे आणि त्यात एकनाथ शिंदे यांचे काम बोलणार आहे.

लोकांचा राग मतदानातून व्यक्त ...

यावेळी मुलाखतीच्या आज प्रदर्शित झालेल्या पहिल्या भागाच्या शेवटी राज ठाकरेंनी एक प्रश्न उपस्थित केला आहे. महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय स्थितीवर बोलताना राज ठाकरेंनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. यावेळी त्यांनी मतदारांकडून फक्त तक्रारी होणार आणि मतं मिळणार नाहीत असं कसं? असा प्रश्नही उपस्थित केला. ही सर्व चर्चा सुरू झाली ती राज्यात ठिकठिकाणी उपस्थित झालेल्या भ्रष्टाचार व गुन्ह्यांच्या मुद्द्यापासून. गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रात काही ठिकाणी अंमली पदार्थांचे मोठे साठे सापडले आहेत. यावरून चर्चा सुरू असताना या मुद्द्यावर संजय राऊतांनी मुलाखतीमध्ये राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांना प्रश्न केला. त्यावर उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य करताना सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडलं. या प्रकारांना आवर घालण्यासाठी बंधनं घालणं गरजेचं असल्याचं राज ठाकरेंनी नमूद केलं. ही बंधनं घालण्याला सुरुवात होण्यासाठी महापालिका खूप महत्त्वाच्या आहेत. लोकांनी महाराष्ट्रात जे काही चाललंय त्यावरचा राग आत्ता मतदानादरम्यान व्यक्त करणं गरजेचं आहे. ही सत्ता आम्हाला आमच्यासाठी नको आहे. पण ज्या गोष्टी घडतायत, त्यांवर बंधनं आणायला सुरुवात करायची असेल तर महानगरपालिका महत्त्वाच्या आहेत. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, इतर महानगरपालिका इथे लोकांकडून राग व्यक्त होणं गरजेचं आहे. लोकांकडून त्यांनाच मतदान होत असेल, मतदानातून राग व्यक्त केला नाही तर मग राजानं मारलं काय पावसानं झोडलं काय, तक्रार कुणाकडे करणार? अशी गत होईल, असं राज ठाकरे म्हणाले.

३३ वर्षानंतर सेबीकडून स्टॉक ...

कोणत्याही निर्दिष्ट प्राधिकरणाच्या नियामक चौकटी अंतर्गत, मंडळाने निर्दिष्ट (सूचित) केल्यानुसार, एखादे कार्य करू शकतो. असे कार्य संबंधित वित्तीय क्षेत्रातील नियामक किंवा प्राधिकरणाच्या अखत्यारीत येईल. असे म्हटले आहे. तसेच एसबी नियमनांची रचना अकरा अध्यायांमध्ये करण्यात आली आहे ज्यात स्टॉकब्रोकर्ससाठीच्या नियामक प्रणालीच्या प्रमुख पैलूंचा सर्वसमावेशकपणे समावेश आहे असे म्हटले आहे. याशिवाय अनावश्यक तरतूदी यातून वगळण्यात आल्या आहेत. नव्या पुनर्रचनेचा भाग म्हणून सेबीने काही अनुसूची हटवल्या असून, ज्यांची आता आवश्यकताच नाही अशा नियमावली हटवल्या आहे व पुनर्रचना करून संबंधित अनुसूची थेट नियमांमध्ये अध्याय म्हणून समाविष्ट केल्या आहेत जेणेकरून वाचनीयता आणि समज सुधारावी असे सेबीने आपल्या अधिनियमात म्हटले आहे. याव्यतिरिक्त, पुनरावृत्ती होणाऱ्या तरतुदी काढून टाकून आणि अंडररायटिंग,आचारसंहिता आणि स्टॉकब्रोकर्सना परवानगी असलेल्या इतर कार्यांशी संबंधित विभागांचे एकत्रीकरण आणि पुनर्रचना करून संपूर्ण रचना सुव्यवस्थित करण्यात आली आहे. अधिक स्पष्टता आणण्यासाठी सेबीने क्लिअरिंग सदस्य, व्यावसायिक क्लिअरिंग सदस्य, मालकी हक्काचा व्यापार करणारा सदस्य, मालकी हक्काचा व्यापार आणि नियुक्त संचालक यांच्याशी संबंधित अनेक महत्त्वाच्या व्याख्यांमध्ये सुधारणा केल्या आहेत असेही सेबीने यावेळी स्पष्ट केले.

अंबरनाथमध्ये काँग्रेसला धक्का...

६) विपुल प्रदीप पाटील ७) मनीष म्हात्रे ८) धनलक्ष्मी जयशंकर ९) संजवणी राहुल देवडे १०) दिनेश गायकवाड ११) किरण बद्रीनाथ राठोड १२) कबीर नरेश गायकवाड या १२ नगरसेवकांच्या भाजप प्रवेशामुळे अंबरनाथमधील राजकारणाची दिशा बदलणार आहे. ज्या नगरसेवकांनी विरोधात निवडणूक लढवली, तेच आता भाजपच्या झेंड्याखाली येणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घेतलेल्या या भूमिकेनंतर आता स्थानिक पातळीवर काँग्रेसची ताकद किती उरणार आणि भाजपला या नगरसेवकांच्या प्रवेशाने किती फायदा होणार, हे आगामी काळात स्पष्ट होईल.

अजित पवार हे महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे आका- लांडगे

दरम्यान, भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप केले. अजित पवार हे महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे आका आहेत, असा आरोप करत, भ्रष्टाचार लपवण्यासाठीच ते भाजपसोबत आले का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावर प्रत्युत्तर देताना अजित पवार म्हणाले, १५ तारखेनंतर जनता ठरवेल कोण काय आहे.

पाणंद रस्ते समितीत सह ...

समिती गठीत करण्याचे संपूर्ण अधिकारही त्यांनाच प्रदान करण्यात आले आहेत. विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या कामकाजात मदतीसाठी एका सहअध्यक्षाची निवड महसूल मंत्री करतील. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी पाठवलेल्या नावांतून समिती ५ प्रगतशील शेतकऱ्यांची निवड करेल व त्याला जिल्हाधिकारी मंजुरी देतील. जिल्हास्तरीय समितीमध्ये आता जिल्ह्यातील सर्व विधानपरिषद सदस्यांचा सदस्य म्हणून समावेश असेल. विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती गठीत करण्याचे आणि सदस्य सचिवांची नियुक्ती करण्याचे अंतिम अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या योजनेमुळे ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे मजबूत होऊन शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ मिळणे सुलभ होईल.

नरनाळा महोत्सवाच्या तयारीला वेग ; समन्वयाने कामे करा

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे यंत्रणांना निर्देश

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : जिल्ह्यात नरनाळा महोत्सव दि. ३० जानेवारी ते दि. १ फेब्रुवारी दरम्यान होणार असून, महोत्सवाच्या यशस्वितेसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणांची बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.पर्यटक, निसर्गमित्र व वनप्रेमींच्या जिव्हाळ्याचा विषय असलेला नरनाळा पर्यटन महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. नौकाविहार, सफारी, आदिवासी नृत्यकला सादरीकरण, पक्षीनिरीक्षण, गड भटकंती, साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन याबरोबरच अनेकविध सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले जाणार आहे. महसूल, वनविभाग, पाटबंधारे विभाग यासह सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने महोत्सव यशस्वी करावा, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले. महोत्सवात वन्यजीवन माहितीपट, चित्रप्रदर्शन, साहसी खेळ, सफारी, मॅराथॉन आदी विविध बाबींचे अचूक नियोजन व्हावे. महोत्सवाचा कालावधी जवळ येत असून, आवश्यक कार्यवाही गतीने करावी, असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले. उपवनसंरक्षक राहूल तोलिया, अकोटचे उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे व इतर अधिकारी, तसेच समिती सदस्य उपस्थित होते.

रविवारी यवतमाळात मोफत आयुर्वेदिक महाआरोग्य शिबिर

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ८ : नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) यवतमाळ शाखा, निमा आयुर्वेद फोरम, वुमेन्स फोरम व श्री गुरुदेव सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी (दि. ११) सकाळी ९:३० ते दुपारी २ या वेळेत भव्य मोफत आयुर्वेदिक रोगनिदान व उपचार (महाआरोग्य) शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर आर्णी रोडवरील शिवनेरी सोसायटीतील मानवता मंदिर येथे पार पडणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लोकमतचे जिल्हा कार्यालय प्रमुख किशोर दर्डा उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निमाचे अध्यक्ष डॉ. विजय अग्रवाल तर प्रमुख अतिथी म्हणून निमाचे राज्य उपाध्यक्ष डॉ. मंगेश हातगावकर उपस्थित राहणार आहेत. या शिबिरात मुळव्याध, भगंदर, त्वचाविकार, वातविकार, बी.पी., मधुमेह, किडनी व लिव्हरचे विकार, नेत्रविकार, कान-नाक-घसा यांवर ३० नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांमाङ्र्खत मोफत उपचार व पंचकर्म, गर्भसंस्कार मार्गदर्शन केले जाईल. नागरिकानी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. विजय अग्रवाल, डॉ. नोव्हेश कोल्हे, डॉ. आदित्य अढाऊकर, डॉ. सूर्यप्रकाश जयस्वाल, डॉ. योगेश दुद्दलवार, डॉ. पंकज दिडपाये, डॉ. मंगला निकम, डॉ. कविता बोरकर, डॉ. शिप्रा राठोड, संजय भुयार, विजय इंगोले, डॉ. अशोक पूनसे, शिबिर प्रकल्पाधिकारी डॉ. आनंद बोरा, डॉ. सौरभ डोळे व डॉ. शितल डहाके यांनी केले आहे. ही माहिती जिल्हा संपर्कप्रमुख डॉ. प्रसाद पलिकुंडवार यांनी दिली.

समर्थ पब्लिक स्कुलच्या मुलांची क्रिकेट स्पर्धेत बाजी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : क्रीडा व युवक सेवा संचानालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा परिषद कार्यालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अकोला यांच्या आयुक्त विधमाणे आयोजित शालेय टेनिस क्रिकेट स्पर्धा मध्ये अकोल्यातील शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या श्री समर्थ पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज रीधोरा अकोला. च्या शालेय टेनिस क्रिकेट या स्पर्धेत मुले १७ वर्ष वयोगटत बाजी मारली आहे. संघा ची निवड विभागीय स्तरावर झाली आहे. जिल्हा स्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा वर्ष २०२५-२०२६ शास्त्री स्टेडियम अकोला येथे शालेय टेनिस क्रिकेट स्पर्धा ०८/०१/२०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते.

या शालेय टेनिस क्रिकेट स्पर्धेत श्री समर्थ पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज रिधोरा अकोला. १७ वर्षा मुले हा संघ यशस्वी होऊन विभागीय स्तरावर झेप घेतली आहे श्री समर्थ शिक्षण वा क्रीडा प्रसारक मंडळ समूहाचे अध्यक्ष प्रा.नितीन बाठे सर यांनी विजेत्या स्पर्धकांचे कौतुक करीत पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

खेळाडूंना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा शाळेतर्फे उपलब्ध करून दिल्या जातील असे त्यांनी यावेळी सांगितले. संस्थेचे उपाध्यक्ष राजेश बाठे सर, संचालिका जयश्री बाठे मॅडम, किशोर कोरपे सर, योगेश जोशी सर, डॉ. किशोर रत्नपारखी सर, मुख्याध्यापिका डॉ. उषालता वानखेडे मॅडम, उपमुख्यध्यापक प्रेमेंद्र पळसपगर सर यांनी ही यशस्वी खेळाडूंचे कौतुक केले आहे.या खेळाडूंना क्रीडा विभाग प्रमुख मयुर निंबाळकर, क्रीडा शिक्षिका आरती सोनावणे, अनिता गंगतीरे ,क्रीडा शिक्षक अंकुश ढोणे, यांचे मार्गदर्शन लाभले.

संघ: नैतिक आठवले ,अभय माळी , मंगेश अवतिरक, उत्कर्ष शिरसाट, रुद्र फेटे, वरद शर्मा, रुद्र लोढम, ग्रंथ शर्मा, हितेन तायडे, अवनीश भांड, अर्णव काशीद,आयुष पांडे, आदर्श अवतिरक,आयसान रिजव्ही ,करण देवकाते , उदय अवतिरक.

क्रांतीज्योती सावित्रीबाईंमुळेच महिला सक्षमीकरण शक्य-पूजा गायकवाड

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : प्राजक्ता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोलखेड, अकोला येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष शैला डाबेराव होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापिका प्रांजली जाधव, सौ.मीनाक्षी देशमुख व सौ.अंजली शेटे मॅडम उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांनी दीप प्रज्वलन करून क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन केले व त्यांच्या कार्यावर व चरित्रावर प्रकाश टाकला. तसेच वर्ग ९ ची मानसी इंगळे हिने क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांची वेशभूषा साकारली होती. त्या सावित्रीबाईंचे पूजन करण्यात आले आणि मानसी इंगळे हिने सावित्रीबाईच्या भूमिकेतून आपले मनोगत व्यक्त केले. वर्ग बारावीच्या पूजा गायकवाड सावित्रीबाई मुळेच महिलांना शिक्षण घेणे शक्य झाले व आज महिलांचे सक्षमीकरण झालेले दिसते ते क्रांतीज्योती सावित्रीबाई मुळेच असे मत व्यक्त करून सावित्रीबाईच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. वर्ग बारावीच्या प्रज्ञा मानकर, चंचल मुळे, किरण देशमुख, तेजस्विनी माने, सृष्टी खराटे यांनी आपले विचार मांडले. वर्ग नऊ च्या भक्ती आगाशे व जानवी इंगोले यांनी सावित्रीबाईंच्या कविता व गीत सादर केली. कार्यक्रमाला प्रा.नानकसिंग साबळे सर, दिव्या त्रिपाठी मॅडम, अपेक्षा तिडके मॅडम उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी अंजली शेटे व मीनाक्षी देशमुख मॅडम यांनी सावित्रीबाईंच्या कार्याचा गौरव करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात शैला डाबेराव यांनी आजच्या स्पर्धे च्या युगात मुलींनी स्वावलंबी बनून स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे असे आवाहन केले.

ईव्हीएम सुसज्ज करण्याच्या कामाची राज्य निवडणूक आयुक्तांकडून पाहणी

मुंबई, दि. ८ वृत्तसंस्था

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज विल्सन महाविद्यालयास भेट देऊन बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या मतदानासाठी सुरू असलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) सुसज्ज करण्याच्या कामाची पाहणी केली आणि उपस्थिती अधिकारी- कर्मचारी व उमेदवारांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली.

बृहन्मंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी एकूण २३ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी प्रभाग क्र. २०१४ ते २२२ चे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब वाघचौरे असून त्यांचे कार्यालय विल्सन महाविद्यालयात आहे. श्रीमती शीतल देसाई, श्रीमती यू. टी. मुल्ला, श्री. अमोल मेश्राम, श्री. प्रशांत पाठक आणि श्री. सचिन शिंदे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. या सर्व अधिकाऱ्यांसह विविध उमेदवारांचे प्रतिनिधीदेखील यावेळी उपस्थित होते. या सर्वांशी श्री. वाघमारे यांनी यावेळी चर्चा केली. प्रभाग क्र. २०१४ ते २२२ साठी एकूम ४६७ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी एकूण ६१० ईव्हीएम सूसज्ज करण्यात येत आहेत.

यवतमाळात ११ जानेवारीला बौद्ध वधू-वर परिचय मेळावा

महामानव चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम, भावे मंगल कार्यालय येथे आयोजन

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

यवतमाळ, दि. ८ : महामानव वधू-वर सूचक केंद्र आणि महामानव चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी बौद्ध समाजातील विवाह इच्छुक युवक-युवतींसाठी उपवर वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा सिव्हिल लाइन्स येथील समता मैदानाजवळील भावे मंगल कार्यालय येथे सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे.

या मेळाव्यात डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, बँक मॅनेजर, वकील, पोलीस, शासकीय व निमशासकीय कर्मचारी, व्यावसायिक तसेच शेतकरी आणि कुशल कारागीर सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे विधुर, विधवा आणि घटस्फोटीत विवाह इच्छुकांसाठीही हा मेळावा खुला आहे. हभागी होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आपला बायोडाटा आणि रंगीत फोटोसह वेळेवर उपस्थित राहून नावनोंदणी करावी. समाज बांधवांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन हर्षवर्धन ठमके, सत्यप्रकाश भगत, नानाजी शेंद्रे, संजय मानकर, रमेश कांबळे, कैलास गायकवाड आणि रेखा ठमके यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९७६५९९६३२५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

यवतमाळमध्ये २०० परिचारिकांसाठी 'संसर्ग नियंत्रण' विषयावर निशुल्क प्रशिक्षण

यवतमाळ : महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस असोसिएशन, यवतमाळ संलग्न महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस ङ्खेडरेशनच्या वतीने मंगळवारी (दि. ६) निरंतर परिचर्या प्रशिक्षण कार्यक्रङ्काचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत श्री वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सुमारे २०० परिचारिकांना 'क्लिनिकल नर्सिंगमधील संसर्ग नियंत्रण क्षमता बळकट करणे' या अत्यंत महत्वाच्या विषयावर निशुल्क प्रशिक्षण देण्यात आले. परिचारिकांच्या व्यावसायिक कौशल्यात वाढ करणे, त्यांना अद्ययावत वैद्यकीय ज्ञान देणे आणि त्याद्वारे रुग्णसेवेचा दर्जा उंचावणे, या उदात्त हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत उईके यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपअधिष्ठाता डॉ. आशिया, अधिसेविका माया मोरे आणि वंदना सयाम उईके यांची उपस्थिती होती. मान्यवरांनी प्रशिक्षणाचे महत्व विशद करताना अशा उपक्रमांमुळे परिचारिकांचा आत्मविश्वास वाढून रुग्णसेवा अधिक प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त केला.

घाटंजी तालुकाध्यक्षपदी प्रा. जितेंद्र जूनघरे

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

घाटंजी, दि. ८ : येथे ७ जानेवारी रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास व सन्मान समितीची महत्वपूर्ण सभा पार पडली. संस्थापक अध्यक्ष अँड. श्याम खंडारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत प्रा. जितेंद्र जूनघरे (एम.ए. संगीत) यांची घाटंजी तालुकाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. प्रा. जूनघरे हे संगीत विषयात उच्चविद्याविभूषित असून गायन, वादन आणि पत्रकारिता क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे. एक अभ्यासू आणि हरहुन्नरी व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख असल्याने, त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे. याच कार्यक्रमात ज्येष्ठ कलावंत अनंतराव कटकोजवार यांची शासकीय कलावंत मानधन निवड समितीवर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य उपाध्यक्ष सिद्धार्थ भवरे, महासचिव गंगाधर घोटेकर, पूर्व जिल्हाध्यक्ष राजेश मडावी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला अशोकराव निमसरकर, मनोज राठोड, सुधाकर रामटेके, अरुणराव मानकर, पुंडलिक सोनटक्के, रमेश ताटेवार, रवींद्र कावळे, सुभाषराव देवळे यांच्यासह बहुसंख्य प्रबोधनकार आणि भजन गायक उपस्थित होते.

समस्या | गिरीनगरवासीयांचे आरोग्य धोक्यात

पिण्याच्या पाण्यात आढळले विष्ठेचे जिवाणू!

नगरसेवक पिंटू बांगर यांची पाईपलाईन बदलवून देण्याची मागणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

यवतमाळ, दि.८ : शहरातील गिरीनगर परिसरात नाल्यातून गेलेली पाणीपुरवठ्याची जुनी पाईपलाईन ङ्खुटल्याने नागरिकांच्या घरांपर्यंत अत्यंत दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणी पोहोचत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. नव्हेतर प्रयोगशाळेकडून आलेल्या अहवालात विष्ठेचे अंश असल्याचे नङ्कूद आहे. या पाण्यामुळे सुमारे १०० घरांचे आरोग्य धोक्यात आले असून, प्रशासनाने तातडीने ही पाईपलाईन बदलावी, अशी मागणी नगरसेवक पिंटू बांगर यांनी जीवन प्राधिकरणाकडे केली आहे. गिरीनगर भागातील अनेक नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून पोटदुखी, जुलाब, उलटी आणि मळमळ यांसारख्या व्याधींनी ग्रासले होते. या गंभीर प्रकारामुळे येथील रहिवासी दिनकर कुंदोजवार यांनी पुढाकार घेत सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाण्याचा नमुना तपासणीसाठी दिला. या तपासणीत पाणी पिण्यास पूर्णतः अयोग्य असल्याचा निर्वाळा देण्यात आला आहे. अहवालानुसार पाण्यात कोलोफॉर्म्स १६ पेक्षा अधिक आढळले असून, तसेच थङ्कोटोलरंट कोलोफॉर्म्स ०३ आढळल्याची नोंद आहे. कोलोफॉर्म्स हे पाण्यात मलमूत्रजन्य दूषितता असल्याचे दर्शविणारे जिवाणू असून, थङ्कोटोलरंट कोलोफॉर्म्स हे थेट मानवी किंवा प्राण्यांच्या विष्ठेपासून निङ्कर्ाण होणारे जिवाणू असल्यामुळे पाणी आरोग्यास अतिशय घातक ठरते. या दुषित पाण्यामुळे लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींना संसर्गजन्य आजारांचा मोठा धोका निङ्कर्ाण झाला आहे.

पाईपलाईन तातडीने बदलवून द्या

सौरव राऊत आणि स्थानिक रहिवाशांनी हा प्रकार निदर्शनास आणून दिल्यानंतर स्थानिक नगरसेवक पिंटू बांगर यांनी याची गंभीर दखल घेतली. त्यांनी तत्काळ जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता प्रशांत उमप यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची कल्पना दिली. नागरिकांच्या जिवाशी खेळ न करता नाल्यातून गेलेली ती जुनी पाईपलाईन तातडीने बदलून द्यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

घोणस जातीचा अतिविषारी साप आढळला

झरी जामणी : मुकुटबन नजीक असलेल्या आर.सी.सी.पी.एल. कंपनीच्या मुख्य गेटकडे जाणाऱ्या मार्गावर अतिविषारी 'घोणस' जातीचा साप आढळल्याने खळबळ उडाली. सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास सिक्युरिटी गार्डला हा साप दिसला. त्यांनी तातडीने याची माहिती संघर्ष भगत यांना दिली. भगत यांनी क्षणाचाही विलंब न लावता सर्पमित्रांना पाचारण केले. सर्पमित्र कार्तिक नाईनवार, संकेत परचाके, गौरव दुर्गे, चंदन चिटलावार आणि ऋतुराज येंगुर्तीवार यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी सुमारे ४ ङ्खूट लांबीच्या या अतिविषारी सापाला शिताफीने पकडून सुरक्षितरीत्या पकडण्यात आले. परिसरात कुठेही साप आढळल्यास त्याला न मारता सर्पमित्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले आहे.

‘आम्ही भारतासोबत आहोत!’

अमेरिकेच्या ५००% कराच्या धमकीवर पोलंडने मांडली खंबीर भूमिका

नवी दिल्ली: दि. ८ वृत्तसंस्था

जागतिक राजकारणात भारत सध्या एका मोठ्या राजनैतिक चक्रव्यूहात अडकला असला, तरी त्याला युरोपमधून एक अनपेक्षित पण खंबीर साथ मिळाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर, विशेषतः भारतावर ५०० टक्क्यांपर्यंत कर लादण्याचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, पोलंडने भारताच्या बाजूने उभे राहत अमेरिकेच्या दबावावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पॅरिसमध्ये झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत पोलंडचे परराष्ट्र मंत्री राडोस्लाव सिकोर्स्की ( ) यांनी भारताच्या ऊर्जा धोरणाचे समर्थन केले.पोलंडचे परराष्ट्र मंत्री सिकोर्स्की यांनी स्पष्ट केले की, भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची आयात टप्प्याटप्प्याने कमी करण्यास सुरुवात केली आहे, ही एक सकारात्मक बाब आहे. ते म्हणाले, ''भारत आपले ऊर्जा स्रोत बदलत आहे आणि रशियन तेलावरील अवलंबित्व कमी करत आहे, जेणेकरून पुतिन यांच्या युद्धयंत्रणेला मिळणारी मदत थांबेल. आम्ही भारताच्या या निर्णयावर समाधानी आहोत.''

विशेष म्हणजे, ट्रम्प यांच्या धमकीनंतर भारताला अशा प्रकारे युरोपीय देशाकडून मिळालेला पाठिंबा हा अमेरिकेसाठी एक मोठा राजनैतिक धक्का मानला जात आहे.पॅरिसमध्ये पार पडलेली ही बैठक भारतासाठी अत्यंत ऐतिहासिक ठरली. वायमर ट्रँगल हा १९९१ मध्ये फ्रान्स, जर्मनी आणि पोलंड यांनी स्थापन केलेला एक शक्तिशाली प्रादेशिक गट आहे. इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या गैर-युरोपीय देशाला (भारत) या गटाच्या चर्चेत निमंत्रित करण्यात आले होते. भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी फ्रान्सचे परराष्ट्र मंत्री जीन-नोएल बॅरोट आणि पोलंडच्या सिकोर्स्की यांच्याशी सविस्तर चर्चा केली. या चर्चेचा मुख्य केंद्रबिंदू युक्रेन युद्ध, इंडो-पॅसिफिक सुरक्षा आणि अमेरिकेचे बदललेले व्यापार धोरण हा होता.ताजी आकडेवारी पाहिली तर भारताने अमेरिकेच्या दबावाखाली न झुकता, बाजारपेठेतील किमतीनुसार आपल्या धोरणात बदल केले आहेत. नोव्हेंबर २०२५ मध्ये भारताच्या एकूण तेल आयातीमध्ये रशियाचा वाटा ३४% होता, जो जानेवारी २०२६ च्या सुरुवातीला २५ टक्क्यांपेक्षा खाली आला आहे.

सेंटर फॉर रिसर्च ऑन एनर्जी अँड क्लीन एअर नुसार, रशियन तेलाची दैनिक खरेदी आता ७२.९ दशलक्ष युरोपर्यंत खाली आली आहे. भारताचा हा समतोल साधण्याचा प्रयत्न पोलंड आणि इतर युरोपीय देशांना योग्य वाटत आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी ‘सँक्शनिंग रशिया ॲक्ट २०२५’ ला पाठिंबा दिला आहे, ज्यामध्ये रशियन तेल किंवा युरेनियम खरेदी करणाऱ्या देशांवर ५००% कर लावण्याची तरतूद आहे. मात्र, पोलंडसारख्या देशांना भीती आहे की, जर अमेरिकेने भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशावर असे निर्बंध लादले, तर जागतिक अर्थव्यवस्था कोलमडू शकते. म्हणूनच युरोप आता भारताला जवळ करून अमेरिकेच्या एकतर्फी धोरणांविरुद्ध तिसरा पर्याय उभा करण्याचा प्रयत्न करत आहे.

अमेरिकेच्या धमकीवर इराणचे लष्करप्रमुख हतामी संतप्त

नवी दिल्ली: दि. ८ वृत्तसंस्था

कोणतीही परदेशी शक्ती इराणला धमकावू शकत नाही आणि जर कोणी हल्ला केला तर त्यांचा ''हात कापले जातील '', असा थेट इशारा इराणचे लष्करप्रमुख मेजर जनरल अमीर हतामी यांनी अमेरिकेला दिला आहे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीला उत्तर म्हणून इराणचे हे विधान आले आहे. ट्रम्प यांनी म्हटले होते की, जर इराणमधील निदर्शकांना हिंसाचाराचा सामना करावा लागला किंवा त्यांची हत्या झाली तर अमेरिका त्यांच्या मदतीला येईल. त्यांच्या ट्रुथ सोशल पोस्टमध्ये ट्रम्प यांनी , ''जर इराणने शांततापूर्ण निदर्शकांवर गोळीबार केला किंवा त्यांना हिंसकपणे मारले तर अमेरिका त्यांच्या मदतीला येईल. आम्ही तयार आहोत आणि आम्ही सज्ज आहोत.'' असे लिहिले होते. त्यांच्या या धमकीमुळेच इराण संतप्त झाल्याचे सांगण्यात येत आहे.

अमेरिकेच्या काँग्रेस सदस्य लिंडसे ग्राहम यांनी एका टीव्ही मुलाखतीदरम्यान इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी यांना उघड धमकी दिली. त्यांनी इराणला निदर्शकांविरुद्धच्या कारवाया त्वरित थांबवण्याचे आवाहन केले. इराणच्या सर्वोच्च धार्मिक नेतृत्वाला उद्देशून सिनेटर ग्राहम म्हणाले की, ''जर तुम्ही चांगले जीवन मागणाऱ्यांना मारत राहिलात तर डोनाल्ड ट्रम्प तुम्हाला मारतील. त्यांनी पुढे म्हटले की तेहरानच्या नेत्यांनी ट्रम्प यांना खूप गांभीर्याने घ्यावे.''गेल्या अनेक दिवसांपासून इराणमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने होत आहेत.

अमेरिकेच्या साल्ट लेक सिटीच्या चर्चबाहेर अंदाधुंद गोळीबार ; हल्ल्यात २ जणांचा मत्यू

वॉशिंग्टन : दि. ८ वृत्तसंस्था



अमेरिकेत पुन्हा एकदा गोळीबाराची घटना घडली आहे. अमेरिकेच्या युटा राज्याची राजधानी साल्ट लेक सिटीत ही घटना घडली असून द चर्च ऑफ जीझस क्राइस्ट ऑफ लॅटर-डे सेंटर्सच्या पार्किंगमध्ये अंदाधुंद गोळीबार करण्यात आला आहे. या गोळीबारात दोन जणांच्या मृत्यूचे वृत्त मिळाले आहे. तर सहा जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णलायता दाखल करण्यात आले असून संपूर्ण परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे.साल्ट लेक सिटीच्या पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसाप, ही घटना घडली त्यावेळी लोक चर्चमध्ये अंत्यसंस्कारासाठी जमले होते. या घटनेमुळे लोकांमध्ये घबराट पसरली आहे. तसेच जखमींपैती तीन जणांची प्रकृती गंभीर असल्याचे, तर इतर उर्वरित तिघांची प्रकृती अस्पष्ट असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

गोळीबारानंतर हल्लेखोरांनी तिथून पळ काढला होता. यामुळे सध्या या गोळीबारामागचे हेतू अद्याप समोर आलेला नाही. पंरतु या हल्लाचा तपास सुरु करण्यात आला आहे. सध्या हल्लेखोरांचा शोध घेणे आणि हल्ल्यामागच्या कारणाचा शोध घेण्याचे कार्य सुरु आहे.

यासाठी आसपासच्या परिसरात चौकशी केली जात आहे. तसेच घटना घडली त्या ठिकाणचा संपूर्ण परिसरात कडक बंदोबस्त करण्यात आला आहे.दरम्यान या घटनेनंतर साल्ट लेक सिटीच्या द चर्च ऑफ जीझस क्राइस्ट ऑफ लॅटर-डेने या घटनेबाबात दु:ख व्यक्त केले आहे. चर्चने निवदने जारी करत म्हटले आहे की, या दु:ख घटनेबद्दल आम्ही खूप चिंते आहोत. कोणत्याही पवित्र ठिकाणी अशा प्रकारचा हिंसाचार अस्वीकारार्ह आहे. कायदा आणि अंमलबजावमी संस्थाना आम्ही पूर्णपणे मदत करु असेही चर्चेने स्पष्ट केले आहे.

स्वदेशी ‘सुसाइड ड्रोन’ सैन्यात होणार दाखल

नवी दिल्ली: दि. ८ वृत्तसंस्था

भारतीय सेना स्वदेशी ‘सुसाइड ड्रोन’ म्हणजेच लोइटरिंग म्युनिशनची मोठी खेप खरेदी करण्याच्या तयारीत आहे. हे आत्मघाती ड्रोन स्फोटकांनी सज्ज असतील आणि शत्रूच्या हद्दीत घुसून त्यांच्या ठिकाणांचा पूर्णपणे नाश करतीलहे ड्रोन असे असतील की, जॅमिंग (रडार सिग्नल अडवणे) आणि स्पूफिंग (खोटे रडार सिग्नल पाठवणे) अशा परिस्थितीतही ते आपले लक्ष्य अचूकपणे साध्य करू शकतील. म्हणजेच शत्रूच्या सैन्याला याची चाहूलही लागणार नाही आणि ते पूर्णपणे उद्ध्वस्त केले जातील. या मोठ्या प्रकल्पासाठी लवकरच लष्कराकडून टेंडर जारी होण्याची शक्यता आहे.या कराराची माहिती असलेल्या सूत्रांनी सांगितले की, भारतीय कंपन्या देशातच डिझाइन व विकसित केलेल्या लोइटरिंग म्युनिशनचा पुरवठा करण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. सुरुवातीला हा करार सुमारे २,००० कोटी रुपयांचा असेल आणि पुढील काही वर्षांत त्यामध्ये अनेक पटींनी वाढ होण्याची शक्यता आहे.

कारण भारतीय सेना आपल्या विविध युनिट्सना ‘सुसाइड ड्रोन’ किंवा लोइटरिंग म्युनिशनने सुसज्ज करण्याच्या योजनेवर काम करत आहे, जेणेकरून कमी अंतरावर किंवा शत्रूच्या प्रदेशात खोलवर घुसून मोठ्या प्रमाणात नुकसान करता येईल.सूत्रांच्या माहितीनुसार, ही ऑर्डर पूर्ण करण्यासाठी अनेक भारतीय कंपन्या पुढे येणार आहेत. यामुळे परदेशी कंपन्यांवरील अवलंबित्व कमी होईल आणि आत्मनिर्भर भारत मोहिमेला मोठी चालना मिळेल.

या ऑर्डरमुळे एक मजबूत स्वदेशी औद्योगिक इकोसिस्टम तयार होईल, ज्यामुळे लष्कराला गरज भासल्यास भारतीय कंपन्या तात्काळ अशा प्रणाली विकसित करून पुरवू शकतील.

हे टेंडर फास्ट-ट्रॅक प्रक्रियेद्वारे जारी केले जातील, जेणेकरून काही महिन्यांतच ड्रोनच्या चाचण्या घेऊन सर्वोत्तम पर्याय निवडता येईल आणि ऑर्डरही देता येईल. पारंपरिक पद्धतीने ही संपूर्ण प्रक्रिया किमान दोन वर्षे लागली असती.या प्रकल्पात दोन भारतीय कंपन्यांची निवड केली जाईल आणि त्यांना ६०:४० या प्रमाणात ठेका दिला जाईल. ज्या कंपन्यांचे ड्रोन चाचण्यांमध्ये यशस्वी ठरतील, सर्व निकष पूर्ण करतील आणि ज्यांची बोली सर्वात कमी असेल, त्यांनाच हा ठेका मिळेल.संरक्षण उत्पादन क्षेत्रात कार्यरत असलेल्या काही मोठ्या भारतीय कंपन्यांनी यापूर्वीही लष्कराला अशा प्रणाली पुरवल्या आहेत. त्यामध्ये टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टिम्स, अदानी डिफेन्स, सोलर डिफेन्स अँड एअरोस्पेस लिमिटेड आणि न्यूस्पेस रिसर्च अँड टेक्नॉलॉजीज या कंपन्यांचा समावेश आहे. तसेच निबे डिफेन्स, ए व्हिजन आणि एसएमपीपी या कंपन्याही बोली प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात.

तेलासाठी पेटले आखात: युएई घेणार सौदी अरेबियाचा बदला

नवी दिल्ली: दि. ८ वृत्तसंस्था

एकेकाळी घनिष्ठ मित्र असलेले सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती आता एकमेकांचे कट्टर शत्रू बनण्याच्या मार्गावर आहेत. येमेनच्या तेल आणि वायू समृद्ध भागावरून सुरू झालेला हा संघर्ष आता केवळ येमेनपुरता मर्यादित राहिला नसून, थेट सौदीच्या सीमांपर्यंत पोहोचला आहे. सौदी अरेबियाने युएई समर्थित फुटीरतावादी संघटना ‘एसटीसी’ ला हद्रामौत प्रांतातून हाकलून लावल्यानंतर, युएईने आता सौदीच्या सुरक्षेला थेट आव्हान देणारी रणनीती आखली आहे.सौदी माध्यमांनी दिलेल्या खळबळजनक वृत्तानुसार, युएई आता सौदी अरेबियाच्या सीमेजवळील ‘अरादा’ प्रदेशात एक मोठा लष्करी तळ उभारण्याच्या तयारीत आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या तळावर युएईचे नाही तर ८०० इस्रायली सैनिक तैनात असण्याची शक्यता आहे. इस्रायलची गुप्तचर संस्था ‘मोसाद’ आणि युएई यांच्यातील वाढते सहकार्य हे सौदी अरेबियासाठी धोक्याची घंटा मानले जात आहे. जर हा तळ उभारला गेला, तर सौदीच्या अंगणात इस्रायलचा थेट शिरकाव होईल, जे रियाधला कधीही मान्य नसेल.येमेनमध्ये गुरुवारी एका नाट्यमय घटनेची नोंद झाली. दक्षिण संक्रमणकालीन परिषदेचे प्रमुख आयड्रोस अल-जुबैदी, ज्यांच्यावर येमेन सरकारने ‘देशद्रोहा’चा ठसा उमटवला आहे, ते सौदीच्या तावडीतून निसटून अबू धाबीला पोहोचले आहेत. सौदीच्या नेतृत्वाखालील युतीने दावा केला आहे की, जुबैदी बुधवारी रात्री एडन बंदरातून एका मालवाहू जहाजातून सोमालीलँडच्या बर्बेरा बंदरात पोहोचले. तिथून युएईच्या एका खास लष्करी विमानाने (-७६) त्यांची ओळख लपवून त्यांना अबू धाबीच्या अल-रीफ लष्करी तळावर नेण्यात आले. या पलायनामुळे सौदी अरेबिया प्रचंड संतापला असून त्यांनी युएईवर ‘गुन्हेगाराला आश्रय’ दिल्याचा आरोप केला आहे.

आधी तांदूळ मागितला अन् आता १८०,००० टन डिझेल हवे; बांगलादेशने पुन्हा भारतासमोर हात पसरले

नवी दिल्ली: दि. ८ वृत्तसंस्था

हिंदूंवर होणारे हल्ल्यामुळे भारत आणि बांगलादेशमधील संबंध गेल्या काही काळापासून बिघडले आहेत. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वातील कट्टरतावादी बांगलादेश सरकार पाकिस्तानच्या बाजूने झुकत आहे. एकीकडे ते भारतावर टीका-टिप्पणी करत आहेत, तर दुसरीकडे भारताकडूनच मदत मागत आहेत.बांगलादेशच्या अंतरिम सरकारने २०२६ या वर्षात भारताकडून १ लाख ८० हजार टन डिझेल आयात करणार आहे. हे डिझेल भारतातील सरकारी कंपनी कडून खरेदी केले जाईल. जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत डिझेल आयात करण्याचा हा निर्णय बांगलादेश सरकारच्या खरेदीविषयक सल्लागार समितीने मंजूर केला आहे. मंगळवारी (६ जानेवारी २०२६) सचिवालयात झालेल्या बैठकीत वित्त सल्लागार सालेहुद्दीन अहमद यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घेण्यात आला. याआधी ऑक्टोबर २०२५ मध्ये आर्थिक व्यवहारांवरील सल्लागार समितीने २०२६ साठी इंधन आयातीस तत्त्वतः मंजुरी दिली होती. त्यानंतर आता या कराराला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे.बांगलादेशी माध्यमांच्या माहितीनुसार, या डिझेल खरेदी कराराची एकूण किंमत ११९.१३ दशलक्ष अमेरिकी डॉलर, म्हणजेच सुमारे १४.६२ अब्ज बांगलादेशी टका इतकी आहे. करारानुसार प्रति बॅरल डिझेलचा मूळ दर ८३.२२ डॉलर निश्चित करण्यात आला आहे. हा दर आंतरराष्ट्रीय बाजारभावांवर आधारित असून, भविष्यात बाजारातील चढ-उतारानुसार त्यात बदल होऊ शकतो.

रशियन जहाज जप्त केल्याने पुतिन संतप्त

वॉशिंग्टन : दि. ८ वृत्तसंस्था

व्हेनेझुएला चे अध्यक्ष निकोलस मादुरो यांनी अटक केल्यानंतर जागतिक स्तरवार खळबळ उडाली आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या समुद्रात तेल टँकरवर कारवाई सुरु केली आहे. या कारवाई दरम्यान अमेरिकेने रशियाच्या मरिनेरा तेल टँकर जप्त केले आहे. यामुळे रशिया आणि अमेरिकेमधील तणाव पुन्हा वाढला आहे.

ही कारवाई अशा वेळी करण्यात आली आहे, जेव्हा रशियाने टँकराला वाचवण्यासाठी पाणबुड्या आणि युद्ध जहाजे टँकरभोवती तैनात केली होती. अमेरिकेच्या या कारवाईने जागतिक राजकारणात खळबळ उडाली आहे. रशियाचे हे जहाज पूर्व बेला -१ या नावाने ओळखले जायचे. पंरुत अमेरिकेच्या कारवाईच्या भितीने रशियाने याचे नाव मरिनेरा केले होते.

अमेरिकेच्या या कारवाईमुळे रशिया संतप्त झाला आहे. रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकेच्या या कारवाईला आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन म्हटले आहे. तसेच रशियाने अमेरिकेला इशारा दिला आहे की, जहाजावरील रशियन नागरिकांच्या जलद आणि सुरक्षितते कोणताही अडथळा निर्माण करु नये.

‘हाय अलर्ट’ विमानतळावर उतरली डझनभर सशस्त्र अमेरिकन विमाने

ब्रिटनच्या आकाशात ‘मृत्यूचे दूत’!

नवी दिल्ली: दि. ८ वृत्तसंस्था

अवघ्या काही दिवसांपूर्वी व्हेनेझुएलाची राजधानी कराकसमध्ये ‘सर्जिकल स्ट्राईक’ करून राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक केल्यानंतर आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपले लक्ष युरोप आणि उत्तर अटलांटिक क्षेत्राकडे वळवले आहे. ब्रिटनमधील ग्लॉस्टरशायर आणि सफोक येथील लष्करी तळांवर डझनभर सशस्त्र अमेरिकन विमाने उतरल्याने संपूर्ण युरोपमध्ये ‘हाय अलर्ट’ जारी करण्यात आला आहे. ही केवळ सरावाची प्रक्रिया आहे की एखाद्या मोठ्या युद्धाची नांदी, यावरून जागतिक राजकारणात चर्चेला उधाण आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ब्रिटनच्या ‘रॉयल एअर फोर्स’ फेअरफोर्ड तळावर किमान १४ -१७ ही अवाढव्य विमाने दाखल झाली आहेत. ही विमाने जड शस्त्रे आणि लष्करी टँक वाहून नेण्यास सक्षम आहेत. त्याहूनही भयानक म्हणजे, तिथे दोन -१३० '' गनशिप्स सुद्धा पाहिल्या गेल्या आहेत. या विमानाला ‘उडता किल्ला’ म्हटले जाते, कारण यात १०५ मिमीच्या तोफा आणि अचूक मारा करणारी क्षेपणास्त्रे तैनात असतात.

जमिनीवरील किंवा समुद्रातील लक्ष्याला सेकंदात उद्ध्वस्त करण्याची क्षमता या विमानात आहे.या लष्करी हालचालींचे मुख्य कारण म्हणजे ‘मॅरिनेरा’ नावाचा एक तेलवाहू टँकर. हा टँकर पूर्वी ‘बेला-१’ नावाने ओळखला जात होता आणि तो अमेरिकन नौदलाच्या नाकेबंदीतून निसटून रशियाच्या दिशेने जात आहे.

अमेरिकेचा आरोप आहे की, हा टँकर इराण आणि हिजबुल्लाह यांच्याशी संबंधित असून तो बेकायदेशीर निधी पुरवतोय. ब्रिटनचे संरक्षण मंत्री जॉन हिली यांनी स्पष्ट केले की, या टँकरला रोखण्यासाठी ब्रिटन अमेरिकेला सर्वतोपरी मदत करत असून, गरज पडल्यास अमेरिकन ‘स्पेशल फोर्सेस’ हेलिकॉप्टरद्वारे या जहाजावर ताबा मिळवू शकतात.

महत्त्वाचे

कौटुंबिक वादातून तरुणाची हत्या

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कौटुंबिक वादातून एका ३० वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी पोलिसांनी तब्बल १८०० किमी पाठलागानंतर एका अल्पवयीनांसह चार आरोपीना जालना येथून अटक केली आहे. हत्या झालेल्या तरुणाचे नाव अमोल एकनाथ बारे (३०) असे आहे. हत्येची घटना बकवालनगर येथे घडली होती.अमोल एकनाथ बारे (३०) याला आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय होता. त्यासाठी तो आपल्या पत्नीला घटस्फोट मागत होता. अमोलची पत्नी आणि युवराजची पत्नी चुलत बहिणी आहेत. त्यामुळे युवराज दाम्पत्याने आपल्या पत्नीला घटस्फोटासाठी राजी करावे असे अमोल त्यांना सांगत होते. मात्र अमोलच्या पत्नीने नकार दिल्याने दोन्ही कुटुंबांमध्ये वाद वाढत गेला.४ जानेवारीला रात्री अमोलने युवराजला फोन केले आणि फोन करून शिवीगाळ व धमकी दिली. यामुळे संतप्त झालेल्या युवराजने प्रमोद वाकचौरे आणि शुभम राठोड यांना बोलावून घेतले. अमोलला दुचाकीवर बसवून ओअॅसिस चौक परिसरात नेण्यात आले. तिथे त्याला बेदम मारहाण करण्यात आली. प्रमोदने धारदार चाकूने अमोलच्या छाती, गळा व पाठीत वार केले.

पत्नीनेच प्रियकरासोबत मिळून केली पतीची हत्या

धाराशिव: धाराशिव येथून एक धक्कदायक घटना समोर आली आहे. पत्नीनेच प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केल्याचे समोर आले आहे. आधी दारू पाजली नंतर त्याच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून दगडाने ठेचून निर्घृण हत्या केली. याप्रकरणाचा उलगडा पोलिसांनी अवघ्या १२ तासात केली. पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव शाहूराज महादू सूर्यवंशी (वय ३५) असे आहे.उमरगा शहर बायपासजवळील कोरेगाववाडी रस्त्यानजीक एका ३५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह नागरिकांना आढळून आला नागरिकांनी या घटनेची माहिती तात्काळ उमरगा पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा केला. मृतदेहाचा चेहरा आरोपींनी विद्रूप केला होता. त्यामुळे मृतांची ओळख पटवणे कठीण झाले होते. आपल्या अनुभवाच्या आधारे तपासाची सूत्रे हलवली. शेजारील शेतकरी, स्थानिक नागरिक यांच्याशी संपर्क साधून सखोल चौकशी करण्यात आली. अखेर चार तासांच्या प्रयत्नानंतर मृतांची ओळख पटवण्यात यश आले. पोलिसांनी तातडीने श्वान पथकाला पाचारण केले.

ट्रम्प यांचा निर्बंध विधेयकाला हिरवा कंदील

वॉशिंग्टन :युक्रेनमधील युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या धोरणात महत्त्वाचा बदल दिसून येत आहे. रिपब्लिकन सेनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी स्पष्ट केले आहे की, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियावर कडक आर्थिक निर्बंध लादणाऱ्या विधेयकाला आता हिरवा कंदील दिला आहे. या निर्बंधांचा उद्देश मॉस्कोला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करणे असून, त्याच वेळी ट्रम्प प्रशासन युद्ध संपवण्यासाठी शांतता करारावरही काम करत आहे. सेनेटर ग्रॅहम यांनी बुधवारी व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प यांची भेट घेतल्यानंतर ही माहिती दिली. अनेक महिन्यांपासून चर्चेत असलेल्या या विधेयकाला याआधी अडथळे येत होते. मात्र, व्हाईट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने राष्ट्राध्यक्ष या कायद्याला पाठिंबा देत असल्याची पुष्टी केली आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

संपादकीय...

वेट अँड वॉचची भारताची भूमिका

अमेरिकेच्या आर्थिक हितसंबंधांसाठी जगाच्या सगळ्या जबाबदाऱ्या झटकून टाकण्याची आणि अमेरिकेची प्रतिष्ठा जगात पुन्हा प्रस्थापित करण्याचा शब्द अमेरिकनांना देऊन निवडून आलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांची पावलं प्रत्यक्षात भलतीकडेच पडू लागली आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सध्या आपण विश्वाधिपती असल्याच्या गैरसमजुतीत आहेत. आपण कोणाच्याही घरात घुसू शकतो, ही जी गुर्मी ट्रम्प यांना आली आहे, ती अधिक घातक आहे. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला त्यांच्याच घरातून शिताफीने उचलून जेरबंद केल्यापासून ट्रम्प यांचा वाह्यात आत्मविश्वास भलताच वाढला आहे. आपल्या एकाच वक्तव्यात परवा त्यांनी निम्म्या जगाला धमकावलं; त्यात भारताचाही समावेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी एक वाक्य चांगलं बोलताना त्यांनी पुढे जी मुक्ताफळं उधळली, ती भारताच्या प्रतिष्ठेला आव्हान देणारी आहेत. ट्रम्प यांना खूश ठेवणं आवश्यक आहे, हे मोदी चांगलं जाणतात असं म्हणताना ट्रम्प यांनी पुढे रशियाकडून घेतलं जाणारे कच्चं तेल पूर्णपणे थांबवलं नाही, तर भारतावर आणखी कितीतरी पट आयात कर लादू, अशी धमकी दिली आहे. ट्रम्प आणि मोदी हे दोघेही दोन सार्वभौम राष्ट्रांचे प्रमुख आहेत. त्यांच्यातील संबंधांचे मुख्य कारणही तेच आहे. त्यामुळे, जे अत्यंत जबाबदारीचे संबंध आहेत, त्या संबंधांबद्दल बोलताना ट्रम्प यांनी त्यात ज्या प्रकारे दोन देशांची प्रतिष्ठा गुंफली, ते अत्यंत निषेधार्ह आहे. अर्थात ट्रम्प यांना अशा गोष्टींचा विधीनिषेध नाही. ते तो पाळत नाहीत, हे त्यांच्या यापूर्वीच्या असंख्य विधानांवरून (आणि वर्तणुकीतूनही) सिद्ध झालं आहेच. भारत आणि पाकिस्तानमधला ऑपरेशन सिंदूरवेळचा तणाव निवळवण्याचं श्रेय भारताने आपल्याला द्यावं, यासाठी त्यांनी यापूर्वी केलेले जाहीर प्रयत्न आणि विधानं म्हणजे बालिशपणाचा नमुना होता. मोदी यांनी अत्यंत परिपक्वपणे, मौन पाळून त्याला जो प्रतिसाद दिला, तो लाजवाब होता. यावेळीही तसेच घडेल, यात शंका नाही. प्रश्न अन्य देशांचा आहे. भारताने आपल्या होत हो मिसळावं यासाठी ट्रम्प यांनी भारत आणि अमेरिकेतली व्यापारी बोलणी रोखून ठेवली आहेत, हे न कळण्याएवढा भारत दुधखुळा नाही. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर यांनी आपल्या देशातल्या मौल्यवान खाणी ट्रम्प यांच्या हवाली करून त्यांची मर्जी संपादन केली. तशी गरज ना भारताला आहे, ना मोदींना. ट्रम्प यांना जितक्या लवकर हे समजेल, तेवढं ते त्यांच्याच हिताचे असेल! मादुरो यांना जेरबंद केल्यानंतर ट्रम्प यांनी इराण, लॅटिन अमेरिकन देशांसह युरोपलाही एका फटक्यात धमकावलं. डेन्मार्कच्या अखत्यारीत; पण स्वतंत्र अस्तित्व असलेल्या ग्रीनलँडचा ताबा ट्रम्पना हवा आहे. निवडून आल्या आल्या त्यांनी आपला हा मनसुबा जाहीर केला होता. तोच परवा पुन्हा अधिक आग्रहपूर्वक केला. त्याला डेन्मार्कचे पंतप्रधान मेट्टे फ्रेडरिक्सन आणि ग्रीनलँडचे पंतप्रधान जेम्स फ्रेडरीक नेल्सन या दोघांनीही कडक शब्दांत उत्तर दिलं. वास्तविक डेन्मार्क नाटो देशांचा भाग असल्याने त्याच्या संरक्षणाची जबाबदारी अमेरिकेचीच आहे. करारानुसार ज्याच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, त्याचाच घास घेण्याची ही अजब आंतरराष्ट्रीय नीती आहे! ट्रम्प यांच्या या धोरणाविरोधात त्यामुळेच नार्डिक, बाल्टिक देशांसह पूर्ण युरोपातून तत्काळ निषेधाचे सूर उमटले आहेत. ग्रीनलँड हे आर्क्टिक महासागरातील सर्वात मोठं बेट. ते खनिज संपत्तीने समृद्ध असल्याने ट्रम्प यांचा त्यावर डोळा असणं स्वाभाविक आहे. पण, त्याशिवाय ग्रीनलँड हे सुरक्षेच्या दृष्टीनेही अमेरिकेला महत्त्वाचं आहे. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने डेन्मार्कवर आक्रमण केल्या केल्या अमेरिकेने ग्रीनलँडवर चढाई करून ते ताब्यात घेतलं होतं. युद्धानंतरही बराच काळ अमेरिकन सैन्य तिथे होतं. तिथलं पिटूफ्फीक विमानतळाचं संचालन आजही अमेरिकेकडेच आहे. रशियाने अमेरिकेवर क्षेपणास्त्र डागलीच, तर त्याचा मुकाबला करण्यासाठी अमेरिकेला हा विमानतळ सर्वाधिक उपयोगी आहेच; पण चीन आणि रशियाच्या आर्क्टिक महासागरातील हालचालींना शह द्यायलाही अमेरिकेच्या दृष्टीने ग्रीनलँड महत्त्वाचं आहे. ग्रीनलँडचं हे महत्त्व खुद्द ग्रीनलँड-डेन्मार्कच काय, अख्खा युरोप जाणतो. अमेरिकेने गोडीत घेतलं तर काम सहज होण्यासारखं आहे. पण, ट्रम्प यांचा आपण विश्वाधिपती असल्याचा गैरसमज झाला आहे. त्यातून आपण कोणाच्याही घरात, कोणाच्याही खिशात कधीही हात घालू शकतो, ही जी गुर्मी आली आहे, ती अधिक घातक आहे. फ्रान्स, ब्रिटनसह सगळे युरोपियन देश त्यामुळेच एका दिवसात एकवटले आणि ग्रीनलँडच्या बाजूने उभे ठाकले. यात ट्रम्प यांनी अमेरिकेची प्रतिष्ठा कशी वाढवली, हे त्यांचे त्यांनाच माहीत! ट्रम्प यांनी पुढची दमदाटीची भाषा केली आहे, ती कोलंबिया, मेक्सिको, इराण आणि क्युबाला उद्देशून. इराण आणि अमेरिकेतलं हाडवैर जगजाहीर आहे. २०२० मध्ये जनरल कासिम सुलेमानी यांच्या हत्येसाठी झालेल्या अमेरिकेच्या हवाई हल्ल्यानंतर हे हाडवैर दोघांच्याही नसानसांत पोहोचलं. १९५९ मध्ये क्युबात फिडेल कॅस्ट्रो अंमल सुरू झाला. त्या काळात क्युबा रशियाच्या जवळ गेला, तो साम्यवादी विचारातल्या साम्यामुळे. त्याचा वाईट परिणाम अमेरिकेच्या व्यापारी हितसंबंधावर झाला. ते संबंध कॅस्ट्रोनंतरही न सुधारल्याने क्युबा सारखा पिटुकला देशही अमेरिकेला सुरक्षेच्या दृष्टीने धोका वाटतो आहे! मेक्सिको आणि कोलंबियावर अमेरिकेचा अमली पदार्थांचा व्यापार आणि तस्करीचा फार जुना आरोप आहे. त्याचाच वापर करून ट्रम्प आपलाही मादुरो करतील, अशी भीती तिथल्या राष्ट्रप्रमुखांना वाटू लागली आहे. दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी त्यामुळेच ट्रम्प यांना काल जाहीरपणे अधिकृत इशारा दिला. ट्रम्प त्याने बधतील, असं नाही. पण, येत्या काही दिवसांत जग त्यामुळे अधिक अशांत होण्याची चिन्हं आहेत. भारताची वेट अँड वॉचची भूमिका या सगळ्या गदारोळात सर्वाधिक शहाणपणाची ठरते आहे.

॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

दुःख दुःख दुःख
नका माळ जपू ।
नका ते दाखवू
जगास हो ॥

दुःख तेथे होई
दुबळा तू जेथे ।
खंबीर तू जेथे
दुःख नाही ॥

ऐसे ना कुठले
जगी संकट हो ।
मिळे त्यासी ना हो
निवारण ॥

दुःख हरवून
तू व्हावे प्रवीण ।
अभंग जीवन
जगण्या हो ॥

मराठी शाळा आणि मराठी भाषा वाचवा; देश घडवा...

विचारमंथन
प्रा. राहुल माहुरे
मो. 9822278925

भाषा मरते तेव्हा संस्कृती मरते, असे म्हटले जाते. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची, संत परंपरेची, महापुरुषांच्या त्यागाची आणि आपल्या अस्मितेची जननी आहे. मात्र आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी भाषा आणि प्रामुख्याने मराठी शाळा एका मोठ्या संकटातून जात आहेत. नुकताचं आदरणीय डॉ. तारा भवाळकर ज्या मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक आहेत.

त्यांचे मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. तसेचं मागच्या वर्षी दिल्ली येथे झालेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या. त्यांनी मराठी भाषा आणी मराठी शाळा याविषयी आपले विचार पुढील प्रमाणे व्यक्त करतांना सांगीतले की, प्राथमिक स्तरावर शिकणाऱ्या मुलांच्या कोवळ्या मनावर अन्य भाषांचे ओझे लादणे अयोग्य आहे.मुलांच्या नैसर्गिक विकासासाठी त्यांना मातृभाषेतूनचं शिक्षण मिळणे गरजेचे असून,अन्य भाषांची सक्ती त्यांच्यावर करु नका यावर्षी सातारा येथे संपन्न झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी मराठी शाळांच्या संदर्भात आपले विचार पुढील प्रमाणे व्यक्त केले. मी ज्या शाळेत शिकलो, त्या वर्गाचा पट केवळ पाच होता. जर आजच्यासारखे पटसंख्येचे जाचक नियम त्याकाळी असते तर माझी शाळा कधीच बंद झाली असती आणि मी इथपर्यंत पोहोचलोचं नसतो. इंग्रजी माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी शाळांची होणारी गळती थांबविणे ही केवळ सरकारचीचं नव्हे तर समाजाचीही नैतिक जबाबदारी आहे. मराठी शाळा चालायलाचं हवी, कारण उद्याचा सुजाण नागरिक याचं मराठी शाळांमधून घडणार आहे.

चिन्मयी सुमित एक मराठी अभिनेत्री आहेत. गेल्या १५ वर्षापासून त्या सामाजीक तसेचं मराठी भाषा चळवळीत आहेत. मराठी अभ्यास केंद्रातर्फे त्या काम करत आहेत. सध्या त्या खुप चर्चेत आहेत कारण त्या त्यांच्या भाषणाची सुरुवात 'जय भीम' आणी नमस्कार म्हणून करतात. त्यांना अनेक प्रश्न विचारले जातात जसे तुम्ही त्यांच्यातल्या का? वगैरेआज डिजीटल युगात वावरतांना हा प्रश्न कितपत योग्य वाटतो? हा संशोधनाचा विषय आहे. आपल्याला सर्वांना आपल्या बुध्दीच्या आणि विचाराच्या कक्षा रुंदावणे गरजेचे आहे. मराठी भाषा टिकावी मराठी शाळा कायम राहाव्यात यासाठी त्या आंदोलने देखील करत आहेत. त्यानंतर मराठीतील प्रतिभावान अभिनेता आणि दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम या चित्रपटाद्वारे बंद होत असलेल्या मराठी शाळा या विषयावर प्रकाश टाकला आहे. त्या अनुषंगाने या विषयाला आणखी बळ मिळाले त्यानिमित्ताने हा लेखमराठी शाळा आणी मराठी भाषा हा विषय चं सध्या ज्वलंत विषय आहे. बर्निंग इश्यु ज्याला म्हणतात. आपल्या इथे फार चांगले आहे. लोक फार लवकर विसरतात परंतु सिनेमा द्वारे जेव्हा विषय मांडल्या जातो तेव्हा त्याचा जाताच प्रभाव जनतेवर पडतो हे एक प्रकारे चांगलं चं आहे. जागतिकीकरणानंतर इंग्रजीच्या वाढत्या प्रभावाने मराठी माध्यमांच्या शाळांना ओहोटी लागली आहे. इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतले की, मुलांचे करिअर चांगले घडते, त्यांना लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळतात अशी अंधश्रद्धा समाजात सर्वदूर पसरली आहे. आपण लक्षात घेतले पाहीजे की, इंग्रजी ही भाषा आहे ज्ञान नव्हे ती शिकणे म्हणजे कौशल्य हस्तगत करणे होय. त्यामुळे गरीबातले गरीब पालक पोटाला चिमटा काढून इंग्रजी शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेतात. त्यामुळे अनेक राजकारणातल्या शिक्षणसम्राटांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा बाजार सुरू केला. पदवी स्तरावर देखील आज विद्यार्थी मराठी माध्यमाला कमी लेखतात आणी इंग्रजी च्या मागे लागतात. इंग्रजी चा 'ई' देखील कळत नसलेला विद्यार्थी इंग्रजी माध्यम घेतो आणी पोपटपंची करुन विद्यापीठाचे पेपर सोडवतो. याठिकाणी फक्त त्याला गुण मिळतात कारण आमचे पेपर तपासणारे विद्यापीठातील परीक्षक इंग्रजी माध्यम आहे. म्हणजे पोरगा हुशार आहे असं समजुन सढळ हाताने गुणदान करतात. अशी असतांना असलेली परिस्थिती आहे.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण एक उत्तम लेखक होते. त्यांनी उच्च शिक्षण मातृभाषेतुन चं असावे यासाठी आग्रह धरला होता. परंतु आजची परिस्थिती वेगळी चं आहे. एखादी प्राथमिक शाळा बंद पडते तेव्हा एक संस्कारपीठ लुप्त होते. मराठी शाळांनी पिढ्या घडवल्या. मानवाला सुसंस्कारित केले. जीवनात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्यास सक्षम तर बनवलेचं शिवाय आपल्या देशाशी, आपल्या मातीशी त्यांची घट्ट नाळ जोडली. कला, साहित्य, संगीत आणि संस्कृतीची जोपासना केली. आज मात्र मराठी माध्यमांच्या शाळांवर एकामागून एक घाला पडतो आहे आणि कोणाला त्याचे काही घेणेदेणे नाही अशी अवस्था झालेली आहे. स्वतःला भाषाप्रेमी म्हणवणारे, मराठीचा टेंभा मिरवणारे स्वतःच्या मुलांना आणि नातवंडांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकवतात. आणि वर हेचं महाभाग 'आता ह्या शाळा बंद पडणारचं असे सांगत आपली जबाबदारी झटकतांना दिसत आहेत.

मराठी शाळांमधील शिक्षणाच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्या सुधारण्यासाठी २००६ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'माधवराव कामत समिती' नियुक्त केली होती, तिने आपला अहवालही सरकारला सादर केला होता. त्यानंतरही शाळा बंद पडण्याचे सत्र सुरूच राहिले. गावोगावच्या मराठी शाळा शाळा बंद पडतात त्यांचे खापर केवळ इंग्रजी माध्यमाकडे मुलांना वळवणाऱ्या पालकांवर न फोडता मुळात ह्या पालकांना इंग्रजी माध्यमाकडे का जावेसे वाटते याची कारणमिमांसा देखील तपासली पाहीजे..ती पुढीलप्रमाणे १. राज्यातील प्राथमिक शिक्षणाची घसरलेली गुणवत्ता, २. साधनसुविधांचा अभाव, ३. मुलांच्या तुलनेत शिक्षकांची अल्प संख्या, ४. प्राथमिक शिक्षकांना नियमित प्रशिक्षणाचा अभाव, ५. शैक्षणिक साधनांचा अभाव ६. शिक्षकांतील गुणवत्तेचा अभाव. ७. अप्रशिक्षित मराठी प्राथमिक शिक्षकांकडून दिले जाणारे इंग्रजी शिक्षण. हे सगळे सरकारनेचं नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल आहे. ''मराठी शाळा वाचवा'' ही सामाजिक मोहीम मराठी माध्यमाच्या शाळांची घटती संख्या आणि विद्यार्थ्यांची संख्या वाचवण्यासाठी चालवली जात आहे. ज्यात इंग्रजी माध्यमाकडे वाढणारा कल, सरकारकडून अपुरे अनुदान आणि शिक्षणाचे खाजगीकरण यांसारख्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून मराठी शिक्षण टिकवण्यासाठी जनजागृती, आंदोलने आणि सोशल मीडियाद्वारे लोकांपर्यंत पोहोचवून मराठी शाळांना पाठिंबा देण्याचे आवाहन करत आहे.

मराठी शाळा वाचविण्यासाठी महाराष्ट्रातील पुढील संस्था एकत्र येऊन लढा देतांना आपल्याला दिसत आहेत जसे मराठी अभ्यास केंद्र, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण समिती, शिक्षण विकास मंच यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई, राज्य मुख्याध्यापक महामंडळ, महामुंबई शिक्षण संस्था, ॲक्टीव्ह टीचर्स फोरम, शिक्षक भरती, महाराष्ट्र राज्य नपा व मनपा शिक्षण संघ, महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित व अनुदानित शाळा कृती समिती, महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ, महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना, कायद्याने वागा लोकचळवळ, महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय मराठी विषय शिक्षक महासंघ, सर फाऊंडेशन, महाराष्ट्र छत्र प्रतिष्ठान, मी मराठी एकीकरण समिती, रात्रशाळा प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघ, सक्षम फाऊंडेशन, स्पर्धा परीक्षा समन्वय **(पान ५ वर...)**

आलं की लोटा

हिंद्यान
चंद्रशेखर अ. महाजन
मो. ९६२३२३८०९६

'' काय दिनेस , झाली काय पार्टी काल .'' '' कायची पार्टी हो तात्या .''
'' काय लेका , कायची पार्टी म्हनतं ? .'' '' मलेच तं काही माहित नाई हो तात्या .''
'' आता मी काय तुले पार्टी थोळीच मांगनार हाव गळ्या .''
'' अहो बावा, पार्टी द्याले काही कारन तं पाह्यजे ना हो.''
'' घ्या. येवळं मोठं कारन असल्यावर अजून काय पायजे तुले.''
'' सांगा तं खरी राजा, तुमाले काय म्हन्याचं हाये तं..''
'' तुया वाढदिवस होता ना रे भौ काल .''
'' तुमाले कोनं सांगतलं हो ?''
'' कोन कायले सांगील. आपल्या येटायात पोट्टे गोष्टी करत होते ना .''
'' घ्या . म्हनजे कालचा किस्सा तुमालेही मालूम झाला वाटते ? ''
'' तुह्या वाढदिवस होता येवळं समजलं बॉ मले. बाकी तं काही मालूम नाही झालं .''
'' कायचा वाढदिवस अन् कायचं काय'' '' काहून रे.. असं कसं म्हनतं .''
'' अहो तात्यासगळा लोटा लोटीचा कारेक्रम होता तो.''
'' म्हनजे रे, जरा सपष्ट सांगनं .''
'' काल त्या गोल्याचा अन् वैभवचा वाढदिवस होता. '' '' तुह्या वाढदिवसाचं काय झालं ते सांग पह्ले '' '' हाव ना आयकातं खरी , मंग पोट्टेईनं गावच्या व्हाटस्अप ग्रुपवर तेईचे फोटो टाकले. त्यात मंग म्याही शुभेच्छा देल्या .''
'' मंग चांगलंच काम केलं ना तुया .'' '' हाव तं पन त्या शुभेच्छा देताखेपी म्यँ माह्या मोबाईलात एक बॅनर बनोलं. त्याच्यात त्या दोघईचे फोटो वरते टाकले अन् शुभेच्छुक म्हनून माला फोटो खाली टाकला. अन् ते बॅनर त्या ग्रुपवर टाकलं .''
'' हे तं लय खास केलतं गळ्या तुया'' '' अतीच तं खरा घोर झाला ना मंग.''
'' घोर..? तो कसा काय झाला .''
'' त्या माथ्यावरच्या किसनानं त्या बॅनरवरचे फोटे पायले. त्याले वाटलं मालाही वाढदिवस हाये. मंग काय , त्याच्या खाली देल्या ना त्यानं मलेही वाढदिवसाच्या शुभेच्छा .''
'' घेरे बॉ . हे त खतराच झालं मंग .'' '' खतरा तं पुळे झालं. त्याचा मॅसेज पाहून बाकीचेईनही मले शुभेच्छा देनं सुरु केल्या. धळाल मॅसेजवर मेसेज . ईमोजी , स्टीकर , फुलं . काय ईचारता मंग .'' '' बुऱ्हाटच झालं रे बावा मंग तं .''
'' आजकाल सोताचं डोक्स लाव्याले कोनालेच टाईम नाई तात्या. निरा कॉपी पेस्ट चा जमाना होयेल हाये. ज्याले त्याले निरा फॉरवर्ड कऱ्याचीच घाई असते .
तिकळून आला की लोटलाच होय ईकळे. असच सुरु हाये सगळं.'' '' तू काही म्हन गळ्या, पन मोबाईलनं लय ऐदी केलं आपल्याले.'' '' खरं हाये तात्या,पन जमाना लय झटपटचा आला ना.''
'' पायजा म्हना बावा एखांद्याच्या श्रद्धांजलीले वाढदिवसाचा अन् वाढदिवसाले श्रद्धांजलीचा मेसेज नोका टाकू की झालंपन् आता तू काहून हासून रायला ? ''
'' त्या चोकातल्या सुजल चा मॅसेज हाये.'' '' काय म्हनते तो आता .''
'' तो म्हनते की , हॅप्पी बर्थडे दिनेसदादा अन् खाली लिहिते, सॉरी फॉर लेट .'' '' बरं हाये गळ्या. चालू द्या तुमचं. आलं की लोटा! ''

'नगरसेवक' : केवळ सत्तेचा सोपान की जनसेवेचे व्रत?

चर्चा
सुनील गोहर
(वृक्षमित्र)

आपला देश जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. या लोकशाहीचा डोलारा संसद आणि विधानसभांवर उभा असला, तरी त्याचा खरा पाया स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, म्हणजेच आपल्या नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये आहे. आपल्या रोजच्या जगण्याशी, सुख-दुःखाशी आणि मूलभूत गरजांशी थेट संबंध येणारा लोकप्रतिनिधी कोण असेल, तर तो म्हणजे आपला 'नगरसेवक'. दुर्दैवाने, आजच्या काळात नगरसेवक पदाची व्याख्या आणि व्याप्ती काहीशी संकुचित झाली आहे. निवडणुका आल्या की आश्वासनांचा पाऊस पडतो आणि निवडून आले की पाच वर्षे जनता वाऱ्यावर, असे चित्र अनेक ठिकाणी दिसते. या पार्श्वभूमीवर, ''खरा नगरसेवक कसा असावा?'' या विषयावर सामाजिक कार्यकर्ते आणि वृक्षमित्र सुनील गोहर यांनी मांडलेले विचार अत्यंत महत्त्वाचे आणि आत्मचिंतन करायला लावणारे आहेत. हा लेख केवळ एका पदाचा उहापोह नाही, तर एका आदर्श लोकप्रतिनिधीची आणि जागृत समाजाची रूपरेषा आहे. नगरसेवक हा केवळ प्रभागाचा प्रतिनिधी नसतो, तर तो त्या भागाचा 'पालक' असतो. अनेकदा नागरिकांचा असा समज होतो की, नाल्या साफ करणे, रस्त्यावरचे दिवे लावणे आणि कचरा उचलणे एवढेच नगरसेवकाचे काम आहे. नक्कीच, ही कामे महत्त्वाची आहेतच; पण नगरसेवकाची जबाबदारी यापेक्षा खूप मोठी आहे. सुनील गोहर यांच्या मते, नगरसेवक हा शासनाच्या योजना आणि सामान्य जनता यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. प्रभागाचा सर्वांगीण विकास कसा करायचा, शिक्षणाचा दर्जा कसा सुधारायचा, आरोग्याच्या सोयी कशा उपलब्ध करायच्या आणि शहराचे पर्यावरण कसे जपायचे, याचे 'व्हिजन' ज्याच्याकडे आहे, तोच खरा नगरसेवक.

नगरसेवक हा 'ऑफिस'मध्ये बसून कारभार हाकणारा अधिकारी नसावा. तो २४ तास जनतेसाठी उपलब्ध असावा. अर्ध्या रात्री प्रभागातील एखाद्या गरिबाच्या घरात आजारपण आले, किंवा पावसाळ्यात पाणी तुंबले, तर ''मी आहे, काळजी करू नका,'' असा धीर देणारा तो असावा. ज्याचे पाय जमिनीवर आहेत आणि ज्याला गल्लीबोळातील समस्यांची खडानखडा माहिती आहे, तोच योग्य न्याय देऊ शकतो. सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या व्यक्तीचे चारित्र्य हे पाण्यासारखे स्वच्छ असावे लागते. व्यसनाच्या आहारी गेलेला किंवा

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला व्यक्ती समाजाचे काय भले करणार? नगरसेवक हा तरुणांसमोर एक 'आदर्श' असावा. त्याचे वागणे, बोलणे आणि जगणे सुसंस्कृत असावे. भ्रष्टाचाराला थारा न देणारा आणि पारदर्शक कारभार करणारा प्रतिनिधीच प्रभागाचा कायापालट करू शकतो.

महानगरपालिकेच्या सभागृहात जेव्हा बजेट मांडले जाते किंवा शहराच्या विकासाचे ठराव येतात, तेव्हा तिथे अभ्यासपूर्ण भाषण करणारा नगरसेवक हवा. केवळ गोंधळ घालणारा नव्हे, तर प्रशासकीय नियमांचा (जीआर) अभ्यास करून, आपल्या प्रभागासाठी जास्तीत जास्त निधी कसा खेचून आणता येईल, याचे कसब त्याच्याकडे असावे लागते. केवळ रस्ते आणि इमारती म्हणजे विकास नव्हे; त्या रस्त्यावरून चालणाऱ्या माणसांच्या वेदना ज्याला कळतात, तो खरा नेता. विधवा महिलांचे प्रश्न, दिव्यांगांच्या समस्या, ज्येष्ठ नागरिकांचे विरंगुळा केंद्र यांसारख्या सामाजिक प्रश्नांवर ज्याची संवेदनशीलता जागी आहे, तोच नगरसेवक पदास पात्र ठरतो.

आज आपण बघतोय की शहरांचे 'काँक्रीटची जंगले' होत आहेत. तापमान वाढत आहे, भूजल पातळी खालावत आहे. अशा वेळी, नगरसेवक असा हवा जो केवळ पेव्हर ब्लॉक बसवण्यात रस घेणार नाही, तर झाडे लावण्यात आणि ती जगवण्यात रस घेईल. उद्याच्या पिढीला आपण शुद्ध हवा आणि पाणी देऊ शकलो नाही, तर त्या स्मार्ट सिटीचा काय उपयोग? हा प्रश्न गोहर उपस्थित करतात. त्यामुळे प्रभागात उद्याने विकसित करणे, रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे, प्लास्टिकमुक्तीसाठी आग्रही राहणे आणि जुन्या वृक्षांचे जतन करणे, हे एका आदर्श नगरसेवकाचे आद्यकर्तव्य असायला हवे. विकासाच्या नावाखाली झाडांची कत्तल करणाऱ्या ठेकेदारांना जो रोखू शकतो, तोच खरा पर्यावरणाचा रक्षक आणि जनतेचा प्रतिनिधी. नगरसेवक कसा असावा, यावर चर्चा करताना आपण हे विसरता कामा नये की, नगरसेवक आकाशातून पडत नाहीत; ते आपल्यातूनच निवडले जातात. सुनील गोहर या ठिकाणी नागरिकांनाही आरसा दाखवतात. ते म्हणतात, जर आपण पैसे, दारू किंवा साडी-चोळीसाठी आपले मत विकले, तर आपण प्रामाणिक नेत्याची अपेक्षा कशी करू शकतो? लोकशाहीत मतदार हा राजा असतो, पण हा राजा जेव्हा आपल्या मताची किंमत करतो, तेव्हा लोकशाहीचा बाजार मांडला जातो. ५०० किंवा १००० रुपयांसाठी मत विकणे म्हणजे स्वतःच्या भविष्याची राखरांगोळी करण्यासारखे आहे. ज्या उमेदवाराने पैसे वाटून निवडणूक जिंकली आहे, तो निवडून आल्यावर विकासकामे करणार नाही, तर तो आधी आपला खर्च वसूल करेल, हे साधे गणित मतदारांनी समजून घेणे गरजेचे आहे. आज गरज आहे ती 'जागृत मतदारांची'. जो मतदार प्रश्न विचारतो, जो माहितीच्या अधिकाराचा वापर करतो आणि जो चुकीच्या कामाला विरोध करतो, तोच सक्षम लोकप्रतिनिधी घडवू शकतो.

शहराचा विकास हा केवळ एका व्यक्तीच्या किंवा एका पक्षाच्या हातात नसून तो सामूहिक जबाबदारीचा भाग आहे. पण या समूहाचे नेतृत्व करणारा 'नगरसेवक' जर दूरदृष्टीचा, सेवाभावी आणि स्वच्छ प्रतिमेचा असेल, तर शहराचे नंदनवन व्हायला वेळ लागत नाही. सुनील गोहर यांच्या शब्दांत सांगायचे तर आपल्याला 'साहेब' नकोय, आपल्याला 'सेवक' हवाय. आपल्याला केवळ आश्वासने देणारा नकोय, तर कृती करणारा हवाय.

येणाऱ्या काळात जेव्हा आपण मतदानाचा हक्क बजावाल, तेव्हा उमेदवाराची जात, धर्म किंवा पक्ष बघण्यापेक्षा त्याचे काम, त्याचे चारित्र्य आणि त्याची समाजाप्रती असलेली तळमळ बघा. कारण, आपल्या एका मतावर आपल्या प्रभागाचे आणि आपल्या मुला-बाळांचे पुढील पाच वर्षांचे भविष्य अवलंबून आहे. चला, एक सुजाण नागरिक म्हणून प्रतिज्ञा करूया आपण विकले जाणार नाही आणि जो समाजहितासाठी झटतो, जो पर्यावरणाचे रक्षण करतो आणि जो २४ तास सेवेसाठी तत्पर असतो, अशाच 'सच्च्या' कार्यकर्त्याला आपण नगरसेवक म्हणून संधी देऊया. जागृत नागरिकच, समर्थ भारत घडवू शकतात!

कर्मयोगी भाऊसाहेब माने...

स्मृती दिन
अशोक वानखेडे
मो. 9403493100

कार्यातून तुमच्या उजळेल,
भविष्याची ही नवी दिशा...'

उमरखेडची ही पावन भूमी. या मातीत अनेक रत्ने घडली. त्यातीलच एक कोहिनूर म्हणजे शंकरराव माने. लोक त्यांना 'भाऊसाहेब'म्हणत. त्यांचे जीवन एक संघर्षगाथा आहे. ती सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. समाजसेवेचा वसा त्यांनी घेतला. तो शेवटपर्यंत जपला.

बालपण आणि जडणघडण

भाऊसाहेबांचा जन्म १९११ साली झाला. तारीख होती ६ ऑक्टोबर. त्यांचे बालपण साधे होते. शरीरबांध्याने मजबूत होते. ते नामांकित पैलवान होते. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम' हे त्यांनी जाणले. १९३१ ते १९३५ ते शिक्षक होते. गुरुजी म्हणून कार्य केले. पण ध्येय मोठे होते.

देश पारतंत्र्यात होता. रक्ताचे पाणी होत होते. भाऊसाहेब स्वस्थ बसले नाहीत. महात्मा फुलेंचा विचार घेतला. सत्यशोधक चळवळ राबवली. हैदराबाद मुक्तीसंग्राम पेटला होता. त्यात त्यांनी उडी घेतली. क्रांतिसिंह नाना पाटलांची साथ लाभली. स्वातंत्र्याची पहाट उगवली. त्यांचा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. १९५२ मध्ये ते सरपंच झाले. चातारी गावचे नंदनवन केले. पुढे १९५५ मध्ये जनपद सदस्य झाले. १९६२ ला पंचायत समिती आली. ते पहिले सभापती झाले. जनतेने त्यांच्यावर प्रेम केले. १९६७ ला आमदार झाले. सलग दोनदा निवडून आले. १० वर्षे

विधानसभेत गाजवली. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. शेतकरी सुखी तर जग सुखी. हे भाऊसाहेबांनी ओळखले होते. जिल्हा पतपेढी स्थापन केली. १९६४ ला जिनिंग फॅक्टरी काढली. 'आपला जीन प्रेस' उभा केला. कापूस उत्पादकांना आधार दिला. वसंत सहकारी साखर कारखाना उभारला. त्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. ते कारखान्याचे अध्यक्षही झाले.

शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन. त्यांनी १९५६ मध्ये वसतिगृह काढले. गरीब मुलांना आश्रय दिला. शिवाजी शिक्षण संस्था उभारली. अमरावती संस्थेचे ते आजीवन सदस्य होते. पुसदमध्ये शिक्षणाचे काम केले. चातारीला शाळा काढली. ब्राह्मणगावला कृषी विद्यालय दिले. दुर्गम भागातील मुले शिकली. अकोल्याला कृषी विद्

फक्त घरच्या जेवणावर किर्ती सुरेश राहते अगदी फिट

निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी नेहमीच तासन्तास जिममध्ये घाम गाळावा लागतो किंवा आवडत्या पदार्थांचा पूर्णपणे त्याग करावा लागतो, असं नाही. अनेक वेळा सोप्या आणि सहज पद्धतीच जास्त प्रभावी ठरतात, याचं उत्तम उदाहरण म्हणजे अभिनेत्री किर्ती सुरेशचा फिटनेस प्रवास. अभिनेत्री किर्ती सुरेशने यावर तोडगा काढला आहे. इतरांप्रमाणेच तिचा फिटनेस प्रवास सुरुवातीपासून परफेक्ट नव्हता. या प्रवासात तिने काही चुका केल्या, पण हळूहळू तिच्या शरीरासाठी काय योग्य आहे हे तिला समजलं. तिचा हा फिटनेसचा प्रवास कसा होता, २०१८-१९ च्या सुमारास किर्ती सुरेशने झपाट्याने वजन कमी केलं होतं. केवळ कार्डिओ व्यायाम करून तिने सुमारे ९ किलो वजन घटवलं. मुलाखतीत तिने सांगितलेलं की, लहानपणापासून ती सडपातळ होती आणि फारसा व्यायाम करत नव्हती. ती म्हणाली, ''मी आधीपासूनच बारीक होते आणि कधीच नियमित व्यायाम केला नव्हता. वयाच्या १८व्या वर्षापर्यंत मी जिम तर सोडाच, खेळही खेळले नव्हते. शाळेत थोडं टेनिस खेळायचे. अभिनय सुरू झाल्यानंतर मात्र फक्त काम, झोप आणि खाणं एवढंच आयुष्य होतं. सुरुवातीला मी खूप जास्त कार्डिओ केला आणि त्यामुळे माझं वजन तर कमी झालं, पण स्नायूही खूप कमी झाले. मी खूपच बारीक दिसायला लागले.

मराठी शाळा आणि मराठी भाषा वाचवा; देश घडवा...

पान ०४ वरून.. समिती अशा विविध संघटना आहेत.एकीकडे मराठी भाषेचे जतन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात असताना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा सुरु असताना दुसरीकडे आपुल्या घरात हाल सोसते मराठी असाच काहीसा प्रकार समोर येतांना दिसतो. 'एबीपी माझा'या वाहीनीने देखील या संदर्भात आपला विशेष अहवाल जनतेसमोर सादर केला आहे. त्याचप्रमाणे सर्वच राजकीय पक्ष मराठीच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त करत असतांना दिसत आहे. एकीकडे सीबीएसई, आयसीएसई आणि केंब्रिज बोर्डाच्या शाळांकडे मराठी विद्यार्थी पालकांचा ओढा वाढतोय.परिणामी या शाळांच्या तुलनेत मराठी शाळा मात्र या स्पर्धेत बंद पडायला लागल्याचं चित्र आहे.

मराठी शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी खरंच पावले उचलली जात आहेत का? की मराठी शाळा अशाच बंद होत राहतील? असे अनेक प्रश्न आज 'आ'वासुन उभे आहेत. मराठी शाळांमध्ये पटसंख्या कमी होण्यामागचे नेमकी कारणे काय? या प्रश्नांच्या उत्तरात ढोबळमानाने खालील बाबी प्रकर्षाने आढळून येतात १.पालकांचा इंग्रजी शाळांकडे वाढता ओढा २.इतर शाळांच्या तुलनेत मराठी शाळांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह ३.शिक्षकांना दिलेले जाणारे इतर कामे व त्यामुळे वर्गात शिकवायला मिळणारा कमी वेळ ४. मराठी शाळांसाठी येणारे प्रकल्प आणि त्याची होणारी प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील अडचणीशेवटी सगळचं राजकारण्यांवर सोडून उपयोग नाही. त्यासाठी जनतेने ठोस भूमिका घेणं गरजेचे आहे.

महाराष्ट्रात आज मराठी भाषा अभिजात झाली आहे. याचा अभिमान महाराष्ट्रात मिरवला जातो. पण त्याच वेळी राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळा एकामागोमाग एक बंद पडत चालल्या आहेत. हे समाज वास्तव आहे. शिक्षण बाजारू झालं आहे, मराठी शाळांवर चाललेला बुलडोझर थांबणार कधी?, मराठी भाषा अभिजात झाली; पण मराठी शाळा अभिजात कधी होणार? हे आजच्या महाराष्ट्राच्या शैक्षणिक वास्तव आहे. प्रशासन, राज्य सरकार, पालक आणि समाज एकमेकांकडे बोट दाखवत असताना मराठी माध्यमाच्या शाळांच्या अस्तित्वावरचं प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. अशी परिस्थिती आहे. मराठी शाळा संपणार की पुन्हा भरणार? हा प्रश्न प्रत्येक मराठी माणसाच्या मनात घर करतो. कारण याचं उत्तर राज्यकर्ते प्रशासनाच्या खुर्चीइतकंच आपल्या प्रत्येकाच्या कृतीत आहे. कारण मराठीतून शिक्षण घेऊन घडलेली पिढी किती सक्षम, हुशार आणि विविध क्षेत्रांत यशस्वी होऊ शकते हे आपल्या सर्वांना चांगलं ठाऊक आहे. गेल्या २ वर्षात ३० ते ४० मराठी शाळा बंद पडल्या जवळपास ३९४ मराठी शाळांमध्ये शिकण्यासाठी विद्यार्थीच नाही आहेत आणि ८००० शाळांमध्ये तर प्रत्येकी १० पेक्षा कमी विद्यार्थी शिकत आहेत ''मराठी भाषा अभिजात झाली, पण मग मराठी शाळांचं काय? कारखाना आणि छापखाना यात अंतर असतं आणि मराठी शाळा या कारखाना आहेत'' म्हणजे चांगला सुजाण नागरिक घडविण्याचा जो राष्ट्राचा विकास करेल..मराठी भाषा टिकवण्यासाठी मराठी शाळा टिकवल्या गेल्या पाहिजेत हा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. डॉ. प्रकाश बाबा आमटे यांचे मराठी शाळा आणी मराठी भाषा यावर फार मौलिक विचार आहेत ते पुढीलप्रमाणे ते म्हणतात आम्ही आमच्या कुटुंबातील सर्वजण मराठी माध्यमातून शिकलो. आता नातवंडेदेखील मराठी माध्यमातून शिकत आहेत. आणि आम्हाला याचा अजिबात पश्चाताप नाही उलट अभिमान आहे. हे इंग्रजी आहे काय हो? इंग्रजी बोलता, लिहिता आलं पाहिजे जगाबरोबर वावरायचं तर इंग्रजी भाषा महत्वाची आहे. हे सगळ मान्य आहे याचा अर्थ असा होत नाही की, आम्ही आपल्या संस्कृतीवर, बोली भाषेवर घाला घालायचा मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. पाल्यांना मराठी शाळेत घालण्याचा पालकांचाचं कल नाही. असं चित्र सध्या समाजात पाहायला मिळते. स्पर्धेत टिकायचे असेल तर इंग्रजी शाळांवाचून पर्याय नाही या गैरसमजातून आता पालकांना बाहेर काढणे एक दिव्य चं आहे.

आज इंग्रजीचा एक वेगळाच ट्रेंड निर्माण झाला आहे. गाव, खेड्यात ही पालक मुलांना इंग्रजी शाळेत टाकत आहेत. आपल्या मुलांना ते झेपते का? त्यासाठी तो तयार आहे का? याकडे देखील त्यांचे लक्ष नसते. फक्त शाळा इंग्रजी माध्यमाची पाहिजे. त्या शाळेत काय चालतं ? कस शिकवलं जात? याकडे विशेष लक्ष दिल्या जात नाही. त्यामुळे ह्या शाळा पालकांच्या भावनिकतेचा फायदा घेऊन भरमसाट ॲडमीशन फी घेतात. आजकाल सोशल स्टेटस हे खुळ फार प्रचलित झाले आहे. तुमचा पोरगा कोणत्या शाळेत जातो यावरुन आपले सोशल स्टेटस ठरते. ह्या फी कधी कधी सामान्य माणसाला मेताकुटीला आणतात. यामध्ये मात्र सामान्य माणूस पुरता कोलमडतो. राष्ट्रपिता महात्मा फुलेंपासून ते शिक्षणमहर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ पंजाबराव देशमुख यांच्या पर्यंत सर्वच समाजसुधारकांनी रक्ताचं पाणी करून उभारलेल्या शाळा आज ओस पडण्याच्या स्थितीत आहेत. त्याबद्दल सकारात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक शिक्षण व्यवस्थेच्या आधारे त्या सर्व शैक्षणिक सुविधांनी सुसज्ज करणे काळाची गरज आहे. आज आपण सर्वांनी खाजगी शाळांच्या मनमानीवर अंकुश ठेवला नाही तर शिक्षण क्षेत्राचा बट्याबोळ झाल्याशिवाय राहणार नाही. हे निश्चितग्रामीण भागातील गरीब शेतकरी कष्टकरी आधीचं निसर्गाच्या तसेचं राज्यकर्त्यांच्या शोषणाच्या धोरणांमुळे आधीचं बेहाल असतांना त्याला परवडेल असं शिक्षण फक्त मराठी शाळाचं देवू शकतात हे त्रिकालाबाधीत सत्य आहे. ग्रामीण भागातील पालकांच्या मनातील मराठी शिक्षणाबद्दलचा झालेला समज आपण सर्वांनी मिळून दूर केला पाहिजे. आपल्या मुलांना मराठी शाळेत टाका. त्यांना तिथेच योग्य शिक्षण मिळेल. हे त्यांना पटवून सांगणे गरजेचे आहे. आपल्या मुलाला इंग्रजी बोलता व शिकता आले पाहीजे तरचं त्याला चांगली नोकरी मिळेल. आपल्यासारखं कष्टाचे जीवन त्याच्या वाट्याला नाही यावे या काळजीने तो ग्रस्त असतो हि त्याच्या मनातील काळजी हा न्यूनगंड आपण त्याच्या मनातुन पुसून टाकला पाहिजे.भविष्यातील इंग्रजी शाळांच्या मनमानीचा धोका ओळखून आजच यावर उपाययोजना आखली पाहिजे, यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने पुढाकार घेणे अपेक्षित आहे. कारण आपल्या मराठी शाळेत देखील दर्जेदार इंग्रजी शिकवणारे शिक्षक नेमून विद्यार्थ्यांना घडवले पाहीजे. इंग्रजी भाषा शिकणे हे फक्त एक कौशल्य आहे. ज्ञान मिळवणे नाही. कारण आंतरराष्ट्रीय स्तरावर आपण कमी पडायला नको हाचं उद्देश आहे. आणी कौशल्य आत्मसात करणे कठीण नसते. त्याचप्रमाणे आपल्या मराठी शाळेला आधुनिकतेची जोड त्याचप्रमाणे शिक्षण पद्धतीत सुधारणा करून शाळा सर्वांगीण सक्षम करणे हा पर्यायचं मराठी शाळेला वाचवू शकतो.

थंडीच्या दिवसात शेकोटीवरच्या गप्पा !

ललित
कुशल पा राऊत
मो. 9371166781

रात्रीचा प्रहर, हातापायांना झोंबणारा तो कडाक्याचा गारठा आणि अंगणात पेटलेली ती एकुलती एक शेकोटी. या शेकोटीभोवती जमा होणं म्हणजे केवळ ऊब मिळवणं नसतं, तर ते मनांची दारं उघडण्याचं एक निमित्त असतं. लाकडाच्या ओंडक्यातून बाहेर पडणाऱ्या त्या केशरी-तांबूस ज्वाळांकडे पाहत बसलं की माणसाला जगाचा विसर पडतो. कुणीतरी दोन वाळलेली लाकडं सरकवतं, त्यातून ठिणग्यांचं एक कारंजं आभाळाच्या दिशेने झेप घेतं आणि त्याच उजेडात समोर बसलेल्या माणसांचे चेहरे अधिकच स्पष्ट होऊ लागतात. शेकोटीवरच्या गप्पांना कसलाच नियम नसतो. त्या गप्पांना ना सुरुवात असते ना शेवट. कधी गप्पांची सुरुवात एखाद्या जुन्या आठवणीने होते, तर कधी गावातल्या कोणाबद्दलच्या मिश्किल टिप्पणीने. थंडीचा कडाका जसा वाढतो, तसा गप्पांचा ओघही अधिक खोल होत जातो. सुरुवातीला हसण्या-खिदळण्यात रमलेलं मन हळूहळू गंभीर विषयांकडे वळतं. कुणीतरी आपल्या बालपणातल्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या सांगतं, तर कुणीतरी आयुष्यात सोसलेल्या संघर्षाचा एखादा पदर उलगडून दाखवतं. तो पेटलेला जाळ साक्ष असतो त्या विश्वासाची, जो केवळ अशा एकांत वेळी आणि त्या ऊबेच्या सहवासातच निर्माण होऊ शकतो. त्या जाळाच्या प्रकाशात सावल्यांची एक वेगळीच दुनिया भिंतीवर किंवा जमिनीवर नाचत असते. वारा आला की ज्वाळा थरथरतात आणि त्यासोबत गप्पांचा सूरही थोडा वर-खाली होतो. कधीतरी मधूनच एखादा शांततेचा क्षण येतो, जेव्हा फक्त लाकडं जळण्याचा तो चट-चट असा आवाज येतो. तो आवाजही किती आश्वासक वाटतो! शहरातल्या झगमगाटात आणि एसीच्या बंद खोल्यांमध्ये ही ऊब कधीच मिळत नाही. इथे शब्दांना धार नसते, तर ओलावा असतो. एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होताना ती शेकोटी नुसती शरीराला नाही, तर नात्यांनाही शेकत असते. रात्र जसजशी पुढे सरकते, तशी लाकडं संपत येतात, जाळ कमी होतो आणि लाल निखारे उरतात. पण त्या निखाऱ्यांमध्येही एक जबरदस्त धग असते. गप्पाही आता मंदावलेल्या असतात, पण मनामध्ये एक वेगळीच तृप्तता दाटून येते. निखाऱ्यांच्या त्या मंद प्रकाशात झालेली ती निरभ्र चर्चा माणसाला रिचार्ज करून जाते. शेवटी उठताना प्रत्येकजण ती ऊब आपल्या काळजात साठवून घेतो. पुन्हा उद्याच्या दिवसाला सामोरं जाण्यासाठीची ताकद त्या शेकोटीवरच्या दोन घटकांच्या गप्पांमधूनच मिळालेली असते. ती शेकोटी विझते, पण त्यातल्या गप्पांचे पडसाद मात्र मनात खूप काळ रेंगाळत राहतात...!

आकाशात स्पेस स्टेशन दर्शन

अकोला: दररोज पृथ्वीला पंधरा प्रदक्षिणा पूर्ण करतांना ज्या मार्गाने आंतरराष्ट्रीय अंतराळ संशोधन केंद्र फिरते त्या भागातील लोकांना हे महाकाय आकाराचे इंटरनॅशनल स्पेस स्टेशन नुसत्या डोळ्यांनी सहज पाहता येते.

नववर्षाच्या प्रारंभी दि.८ व ९ या दोन दिवशी संध्याकाळी ही फिरती चांदणी आपल्या नजरेत भरण्याचे आवाहन विश्वभारती विज्ञान केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले आहे. मुंबई ते नागपूर हे अंतर केवळ दीड मिनिटात पूर्ण करेल एवढा वेग असुन यावेळी आपणास ते सुमारे तीन हजार कि.मी.अंतर पूर्ण होईपर्यंत अनुभवता येईल. विशेष म्हणजे यावेळी आकाशात चंद्र नसल्याने हा आकाश नजारा अधिक अंधारातून अधिक सुंदर दिसेल.

दि.८ रोजी सायंकाळी ७-०७ ते ७-१२ या वेळी नैऋत्येकडून ईशान्येस जाताना शनी ग्रहा जवळून जाईल.

दि.९ रोजी सायंकाळी ६-१९ ते ६-२५ या वेळेस त्याच मार्गाने जाईल. पहिल्या नजरेत येताना ते सुमारे तेराशे कि.मी अंतरावर तर पुढे कमी होत जाऊन ४२५ कि.मी. नंतर पुन्हा दूर जात बघता येईल. अधिक वरुन व अधिक दूरुन होणाऱ्या या खगोलीय संधीचा लाभ आणि नव्या वर्षातील या पहिल्या आकाश भेटीचा आनंद अवश्य घ्यायला हवा.

राशी-भविष्य

मेष: रागाचे वातावरण असेल. तुम्हाला जुने मित्र भेटू शकतात. तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत प्रवासात वेळ घालवू शकता. विद्यार्थ्यांसाठी हा चांगला काळ आहे.

वृषभ: तुम्हाला वरिष्ठांकडून पाठिंबा मिळेल. तुमचे आरोग्य थोडेसे बिघडू शकते. तुमचे बोलणे, राग आणि चिडचिडेपणा नियंत्रित करा. कामावर वाद होऊ शकतात.

मिथुन: तुम्ही धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ शकता. व्यवसाय किंवा कार्यालयीन कामासाठी तुम्ही प्रवास करू शकता. तुमच्या आरोग्याची काळजी घ्या.

कर्क: अनावश्यक खर्च वाढू शकतात, ज्यामुळे तुमची आर्थिक परिस्थिती कमकुवत होऊ शकते. तुम्ही जितके जास्त काम कराल तितके जास्त बक्षीस मिळेल. तुम्ही नवीन कपडे आणि दागिने घेऊ शकता.

सिंह: मालमत्तेत गुंतवणूक करणे फायदेशीर ठरेल. जर तुम्ही किरकोळ अडचणींवर मात केली तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल. प्रवास यशस्वी होईल.

कन्या: काही कामांवर अनावश्यक पैसे खर्च होऊ शकतात. जास्त रागामुळे समस्या निर्माण होऊ शकतात. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत चांगला वेळ घालवाल. विद्यार्थ्यांना चांगला वेळ मिळेल.

तूळ: नवीन योजना फायदेशीर ठरतील. घाईघाईने घेतलेले निर्णय नुकसानास कारणीभूत ठरू शकतात. कुटुंबातील सदस्यांसोबत कौटुंबिक वाद आणि वाद होण्याची शक्यता आहे.

वृश्चिक: कामाच्या ठिकाणी परिस्थिती चांगली राहणार नाही. कौटुंबिक समस्या देखील असतील. भागीदारी व्यवसायात लक्षणीय नफा मिळण्याची शक्यता आहे. तुम्हाला हलक्या विषयांचा अभ्यास करण्यात रस असेल. विद्यार्थ्यांना चांगले यश मिळू शकते.

धनु: मालमत्तेशी संबंधित काम फायदेशीर ठरेल. विद्यार्थ्यांना चांगला वेळ मिळेल, परंतु मानसिक ताण येऊ शकतो. प्रेमप्रकरण अनुकूल राहतील.

मकर: तुमच्या जोडीदाराच्या मदतीने आर्थिक लाभ होऊ शकतो. नोकरीत असलेल्यांना विरोधक त्रास देतील. विद्यार्थ्यांना चांगला वेळ मिळेल. आरोग्यही काही प्रमाणात सुधारेल. जुनाट आजार बरे होतील.

कुंभ: तुमच्या जोडीदाराकडून सहकार्य मिळेल. कौटुंबिक वातावरण आनंददायी असेल. तुमचा राग आणि बोलण्यावर नियंत्रण ठेवा. तुमच्या आरोग्याची काळजी घ्या. कायदेशीर अडचणी दूर होतील.

मीन: कोणाशीही अनावश्यक वाद टाळा, अन्यथा तुम्ही वादात अडकू शकता. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. तुमच्या जोडीदाराकडून सहकार्य आनंद देईल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 273



रमणीय
राजकन्या
विपरीत
शेतसारा
षटकार
षटकोन
समशेर

पाच अक्षरी
आदिमानव
कालहरण
भराडी गौर
गौरीशंकर
चलबिचल
दिनविशेष

नटमल्हार
नवसागर
रक्तबंबाळ
लामणदिवा
लोहपुरूष
शीरगणती
सहनशील
साबरमती
सावधानता

अन्य अक्षरी
तपशीलवार
न देवाय न धर्माय
तहान लाडू भूक लाडू

(उत्तर पुढील अंकी)

संकेत शब्दः–

दोन अक्षरी
कळा
काळ
कोड
खांदा
तीन
दार
दिल
दिवा
धार
नव
पथ
पर
पात
पावा
पोळा
भव
भूमी
माह
मौन
यथा
रज
रस
रुक्ष
लस
लक्ष
लाच
वडी
वश
वार
वारी
सत्य
साय
स्थल
स्वार्थ
हर
हेवा
ऋणी

तीन अक्षरी
मौलवी
गुणक
गुमान
डुलकी
तटस्थ
तालीम
धमाल
नवस
न्याहारी
भगिनी
भरारी
मनन
महान
मारक
मारूती
मौलवी
रजक
वानर
विशेष
साशंक
हाजिरी

चार अक्षरी
अवकळा
आचमन
आपुलकी
काडवात
गजगति
गुणवान
गुप्तदान
तरतरी
दिलगिरी
देशभक्त
परलोक
प्रतिहारी
मतदान
मलखांब

मागील महाशब्दकोडेचे उत्तर



महाशब्दकोडे 654



–: आडवी विधाने :–
1) न कळत, दुर्लक्ष
4) मुलांना भय दाखविण्यासाठी उभा केलेला पुतळा
8) वायू, वारा
11) हरीण
12) वेगळा असलेला, संबंध नसलेला
13) श्रीरामाचे सासरे
15) विध्वंस, नाश
16) महिनाभराच्या कामाच्या मोबदल्यात मिळणारे पैसे
17) आतील बाजूतील काही दिसू नये म्हणून लावलेला पडदा
20) वृत्तांत, बातमी
22) झाड, वृक्ष
23) मनातली गोष्ट मनातल्या मनात दाबून ठेवणे
24) घातपात, अनिष्ट प्राप्त होण्याची भीतीकारक संभावना
25) कोणत्याही चांगल्या कार्याची सुरुवात
28) मेघ, नभ
30) मरण पावलेला
31) त्वचा, चर्म
32) आंग्ल भाषेत नशीब
34) जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध
36) देण्याची ऐपत असणे
37) धोबी
39) आजी–आजोबांचे घर
40) अभिनेता
43) हिंदीत क्षण
44) लहान पागोटे
46) सुवर्ण, सोने
48) सभोवतालचे वातावरण
50) अंगरख्याचा बंद
52) औषधाचा द्रवरुप सत्वांश
53) दिवस
54) कलाबुतीकरिता असलेली एक चमकदार वस्तू
56) सुख–दुःख जाणणारे इंद्रिय
57) आग विझविणारे
60) बेतास बेत
62) दूध, साखर–लोणी इ. घालून तयार केलेला पक्वान्न
63) थंडीत अंगावर घेण्याचे ऊनी वस्त्र
66) इच्छा, लालसा
67) बायको
68) संभावितपणा, माणुसकी
70) मृदू, कोमल 71) भाषांतर
72) एकदम उलटा बदल घडून येणे
74) मेहंदी
75) प्रतिपदा
78) जोरात धावल्याने वाढलेली श्वासोच्छवासाची गती
79) लाकूड कापण्याचे हत्यार
81) चांगल्या गोष्टीत हीन दर्जाच्या गोष्टी टाकून तयार केलेले मिश्रण
82) मांसाहारी, मांस सेवन करणारा.
85) हस्त, हात 86) प्रथा, चाल
87) मूल्य, भाव
90) प्राणीसंग्रहालय (इं.)
91) कठिण, त्रासदायक
92) एक शब्दालंकार

–: उभी विधाने :–
1) सुवर्णमंदिराकरीता प्रसिद्ध असलेले एक शहर
2) पर्वत, दागिना
3) दरारा, भीती
4) पोरकट, लहान मुलांसारखे वागणे
5) उघडकीस न आलेले, लपवून ठेवलेले
6) पशूपक्ष्यांना भय दाखविण्यासाठी उभे केलेले बाहुले
7) माक.
9) लग्न–मुंजीकरिता जमलेली पाहुणे मंडळी.
10) देणगी, आशीर्वाद
12) करंगळीच्या शेजारचे बोट
14) सुज्ञ, विचार करणारा
17) चढून बसलेला, स्वार
18) पाऊल, अधिकार
19) कोलकात्याचे विमानतळ
21) आश्रयास असलेला
24) पुरुषांनी नेसावयाचे एक वस्त्र
26) घरकाम करणारा मजूर
27) शालीचा जोड
29) जाणे
30) दिवसभराची रोजची राहणी
31) कंठमणी, गळ्याच्या पुढे आलेला भाग
33) दुःखाची तिडीक
35) लकब, तऱ्हा
38) देवाच्या नावाचा वारंवार उच्चार.
39) पेठा या मिठाई करीता प्रसिद्ध असलेले शहर
41) कावळ्याचा आवाज
42) अभिनेत्री जयाप्रदाचा पहिला चित्रपट
45) त्राटिका, कजाग, कर्णकठोर आवाजाची स्त्री
47) नवीन
48) शिलकीत ठेवलेले पैसे खर्च करणे
49) बुद्धिबळातील एक मोहरे
51) एखाद्याला आपल्या बाजूने अनुकूल करण्याचे चार उपाय
52) आग, विस्तव
55) ज्याला मर्यादा नाही असे
57) फार मोठा लाभ 58) मोठा
59) शारीरिक व्यायाम
61) महिना, मास 63) शासन करणारे, सरकार
65) अयोध्येचा राजा 67) ग्रंथाचा सारांश
69) जेवण्याचे उथळ पसरट पात्र
71) पुतळ्याला बांधलेला कपडा समारंभपूर्वक काढणे
73) क्रोध, राग
74) हीरा 76) दिवस, वार
77) एक राशी 78) दरारा, जरब
80) शिजविलेले तांदूळ
83) इंग्रजीत उन्हाळा
84) योद्धा, लढणारी जात
86) मध्यप्रदेशातील एक जिल्हा
88) डोंगरावरील किल्ला
89) अज्ञातवासातील युधिष्ठिराने धारण केलेले नाव (उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

Uday Munde - 8446302691

मुंबईवर वाईट नजर असल्यामुळेच पंतप्रधान व गृहमंत्री महापालिकेच्या प्रचारात

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

आ.वडेट्टीवार यांची परखड टीका

चंद्रपूर, दि.८ :स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत याआधी देशाचे पंतप्रधान प्रचारासाठी आले नव्हते, किंवा गृहमंत्री देखील प्रचारात सहभागी झाले नाही. पंतप्रधान व गृहमंत्री यांची नजर मुंबईवर आहे. यांना महाराष्ट्र उध्वस्त करण्यासाठी मुंबईला लुटायचे आहे, मुंबईला महारष्ट्रापासून तोडायचे आहे. यांची वाईट नजर मुंबईवर आहे अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केली. चंद्रपुरातील भाजपचा अंतर्गत वाद सुधीर कमळ बघ, किशोर कमळ बघ, हंसराज कमळ बघ इथपासून आता प्रचार फलकावर शेण फेकण्यापर्यंत पोहचला आहे असेही वडेट्टीवार म्हणाले.

काँग्रेस विधीमंडह नेते विजय वडेट्टीवार यांनी आज प्रथमच महापालिका निवडणुक प्रचारात उडी घेत काँग्रेस उमेदवारच्या प्रचार कार्यालयाचे उदघाटन केले. याप्रसंगी माध्यमांशी बोलतांना वडेट्टीवार म्हणाले, चंद्रपुरात भाजपमध्ये जे चित्र आहे ते बघता अतिशय वाईट वाटते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगावे लागत आहे की, सुधीर कमळ बघ, किशोर कमळ बघ. मात्र तरीही हे कमळ बघत नाही. सुधीर कमळ बघण्याऐवजी किशोर बघतात आहे तर किशोर देखील सुधीर बघतात म्हणून आम्ही सांगतो नांदा सौख्य भरे असेही वडेट्टीवार म्हणाले.

भाजपने महाराष्ट्रात गुन्हेगारांचा अड्डा केला आहे. निवडणुका जिंकण्यासाठी वाट्टेल ते करत आहे. पोलिस यंत्रणा वापरली जाते आणि त्यापलीकडे जाऊन दहशत माजवण्यासाठी गुंडाना वापरले जात आहे ठरवून दहशत पसरवली जाते. महाराष्ट्राची अधःपतन करण्याची संस्कृती निर्माण झाली. निवडणुका निःपक्षपातीपणे झाल्या पाहिजे. निवडणूक आयोग सरकारचा नोकर म्हणून वागत असेल तर निवडणूक आयोगाचा उपयोग काय? खुलेआम मारामारी सुरू आहे,पैसे वाटप सुरू आहे आणि तरीही कारवाई होत नाही. आता तुरुंगातील गुन्हेगार पण बाहेर काढा सत्ताधाऱ्यांना ते निवडणूक जिंकण्यासाठी मदत करतील असेही वडेट्टीवार म्हणाले.

भाजप पदाधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचारामुळे जनता संतप्त

चंद्रपूर महापालिकेत भाजपची साडेसात वर्ष सत्ता होती. या सत्ताकाळात भाजप पदाधिकाऱ्यांनी मोठा भ्रष्टाचार केला. त्यामुळे आता जनता त्यांना आरसा दाखवत आहे. जनतेचा उद्रेक दिसत आहे. विकासाचा पत्ता नाही. शहरात दीड हजार कोटींपेक्षा अधिकची विकास कामे झाली आहे. मात्र शहरात विकास कुठेच दिसत नाही. भाजप महापौरांनी टक्केवारी घेऊन आपली घर भरली लोकांची काम केली नाही. जनतेने इशारा दिला आहे. त्यामुळेच आता शहरातील जनता भाजप नेत्यांच्या प्रचार फलकावर शेण फेकत आहे अशीही टीका वडेट्टीवार यांनी यावेळी केली.

महत्त्वाचे

शिवसेना महिला आघाडीची शहर कार्यकारिणी जाहीर

वर्धा : शिवसेना प्रणित महिला आघाडीची शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. शिवसेना विभागीय कार्यालयात दि.७ जानेवारी रोजी महिला आघाडी जिल्हाप्रमुख शुभांगी ठमेकर यांचे अध्यक्षतेत महिला आघाडी ची बैठक पार पडली.या बैठकीला प्रमुख उपस्थिती जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांची होती.या बैठकीत वर्धा शहर व ग्रामीण भागातील महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या खालीलप्रमाणे नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. शहर प्रमुख-मयुरी गांधी,उप-शहर प्रमुख* रंजना पट्टेवार,अगस्ता शेंडे,वर्षा वंजारी,सुनीता सोनवणे,सुनीता पांढरे,शहर समन्वयक कोमल मुरमे,धनश्री थोरात प्रभाग प्रमुख कविता भूतडा,स्नेहल काचोलिया,लिना जमणारे,कविता घवघवे ,सुनीता शुक्ला,नलिनी आत्राम,कविता जोशी ममता दुबे,उप-तालुका प्रमुख सीमा कोटनाके,सेवाग्राम जिल्हा परिषद सर्कल प्रमुख शुभांगी खपली यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.बैठकीला उपजिल्हा प्रमुख मिलन गांधी,शहर समन्वयक धरम शेंडे,कान्हा यादव, बाळा थोरात सहित शिवसेनेचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

पत्नीला जिवंत जाळले, उपचारादरम्यान मृत्यू

चंद्रपूर:महाकाली प्रभागातील गौतम नगर येथे पती शुभम भडके (२८) याने पत्नी दीक्षा भडके (२७) हिला जिवंत जाळल्याची धक्कादायक घटना येथे घडली. दरम्यान दीक्षा हिचा उपचारादरम्यान मृत्यु झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शहर पोलीसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून पती शुभम भडके याला अटक केली आहे. शहर पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार कमला समय्या भडके (७०), रा गौतम नगर, चंद्रपूर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची नात दीक्षा शुभम भडके (२७) ही आजीसमवेत राहत होती. दीक्षाचा विवाह पाच वर्षांपूर्वी शुभम राजू भडके (२८) याच्याशी झाला होता. मात्र मागील सहा ते सात महिन्यांपासून पती-पत्नीमध्ये सतत वाद होत असल्याने शुभम हा आई-वडिलांकडे वेगळा राहत होता.

प्रा संध्या शेषराव येलेकर आधुनिक सावित्री पुरस्काराने सन्मानित

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

गडचिरोली, दि.८ : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि शारदाबाई पवार महिला आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शारदा नगर बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने ३ जानेवारी२०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जयंतीनिमित्त ''आधुनिक सावित्री पुरस्कार २०२६'' चा पुरस्कार वितरण सोहळा आप्पासाहेब पवार सभागृह शारदानगर बारामती येथे संपन्न झाला. यावेळी गडचिरोली सारख्या दुर्गम आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागात २६ वर्ष अखंडपणे शिक्षण, समाजसेवा, कला, क्रीडा आणि पत्रकारितेच्या माध्यमातून कार्य करणाऱ्या राणी दुर्गावती कन्या कनिष्ठ महाविद्यालय

गडचिरोलीच्या प्रा संध्या शेषराव येलेकर यांना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण संचालक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ शैलेंद्र देवलनकर आणि कार्यक्रमाचे उद्घाटक तथा अग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामतीचे अध्यक्ष श्री राजेंद्र पवार यांचे शुभहस्ते तसेच यशदा पुणे चे उपमहासंचालक डॉ शेखर गायकवाड, सोलर एनर्जी सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री प्रफुल पाठक, डीएआरपीजी चे संचालक डॉ तुषाबा शिंदे तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष डॉ यशवंत शितोळे यांचे प्रमुख उपस्थितीत ''आधुनिक सावित्री पुरस्कार २०२६'' ने सन्मानित करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजाला दिशा देऊन स्त्री शिक्षण आणि महिला सबलीकरणाचा दीपस्तंभ आपल्यासमोर उभा केलेला आहे. त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा आजच्या युगात अविरतपणे चालवून आधुनिक काळातील बदलत्या शैक्षणिक, सामाजिक, उद्योजकीय, प्रशासकीय आणि सांस्कृतिक प्रवाहाला अनुसरून समाजाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये भरीव कामगिरी करून आपल्या क्षेत्रामध्ये अत्यंत चांगले योगदान देणाऱ्या प्रतिभावान महिलांना दरवर्षी या विभागामार्फत आधुनिक सावित्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावेळी देशातील १९ महिलांना सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . आधुनिक सावित्री पुरस्कार हा केवळ माझ्या वैयक्तिक कार्याचा गौरव नाही तर गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येक संघर्षशील महिलेचा तो सन्मान आहे असे प्रा संध्या येलेकर यांनी म्हटले आहे.

सारफळीत रंगणार सव्वा दहा लाखांचा 'हिंदकेसरी शंकरपट'

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

बाभूळगाव, दि. ८ : यवतमाळ जिल्ह्याच्या क्रीडा इतिहासात पहिल्यांदाच बाभूळगाव तालुक्यातील सारफळी येथे भव्य 'हिंदकेसरी शंकरपटा'चे आयोजन करण्यात आले आहे. रिशान जय धवणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेला हा शर्यतीचा थरार ११, १२ व १३ तारखेला (रविवार ते मंगळवार) रंगणार आहे. या शंकरपटात तब्बल सव्वा दहा लाख रुपयांच्या बक्षिसांची जंगी लूट होणार असल्याने बैलजोडी मालकांमध्ये प्रचंड उत्साह संचारला आहे.

नितीन धवणे पाटील, जय धवणे पाटील व भारत कांबळे यांच्या आयोजनाखाली होणाऱ्या या स्पर्धेत 'अ' आणि 'क' असे दोन गट

करण्यात आले आहेत. ३५०० रुपये प्रवेश फी असलेल्या 'अ' गटात बक्षिसांची खैरात होणार आहे. यात पहिले बक्षीस रायभान धवणे यांच्यातर्फे रोख २ लाख १ हजार रुपये, दुसरे १ लाख १ हजार रुपये, तिसरे ७१ हजार रुपये, तर चौथे बक्षीस ६१ हजार रुपये असणार आहे. या गटात एकूण १५ आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. तसेच २५०० रुपये प्रवेश फी असलेल्या 'क' गटात सरपंच तेजस गावंडे यांच्यातर्फे पहिले ७१ हजार रुपयांचे बक्षीस, दुसरे ५१ हजार रुपये, तिसरे ४१ हजार रुपये, तर चौथे ३१ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. या गटातही ग्रामस्थ आणि विविध मंडळांच्या वतीने एकूण १५ बक्षिसे दिली जातील. या स्पर्धेचे उद्घाटन रायभान धवणे, गणेश धवणे, रवी धवणे आदींच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राम मुंदडा, डॉ. नेहा मुंदडा, विजय गुजर, अमोल कोल्हे, सोनू गावंडे यांच्यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेत अचूक निकालासाठी चरण खरासे व श्याम राठोड हे काम पाहणार आहेत. या ऐतिहासिक आणि भव्य हिंदकेसरी शंकरपटाचा आनंद घेण्यासाठी शौकिनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

'दर्पणकार' बाळशास्त्री जांभेकर जयंती साजरी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

खुलसावंगी, दि.८ : आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून खुलसावंगी येथे पत्रकार संघाच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. विशेष म्हणजे ग्रामपंचायतीची जुनी इमारत पत्रकार संघासाठी उपलब्ध करून देण्यात आली असून, तिथे हा सोहळा पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सारजाबाई वाघमारे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार गजानन पराते, सहायक पोलिस उपनिरीक्षक अमोल राठोड, ज्येष्ठ

पत्रकार गजानन वाघमारे, संजय भगत व गणेश भोयर उपस्थित होते. यावेळी गजानन पराते यांनी पत्रकारांनी समाजप्रबोधनाची भूमिका प्रामाणिकपणे बजावण्याचे आवाहन केले. या सोहळ्याला उपसरपंच कुणाल नाईक, विजयराव महाजन, जानी नवाब, डॉ. चंदन पांडे, दिनेश नाईक, हिरामण आडे, योगेश वाजपेयी, बाबू खान पठाण, नरेंद्र शिंदे, आरिफ लाला, शेख मजहर, अमरदिप दळवे, रविंद्र पांडे, गोधाजी कांबळे, वसंता भिसे, अजय देशपांडे, तंटामुक्त अध्यक्ष कयाम नवाब, डॉ. अब्दुल कुंदन, इमरान पठाण, बबन शेळके, आझम लाला, शमिम कुंदन, मोहम्मद युनूस, शेख फारुख, रमेश जाधव, रवी पटवे यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गोंदियात विविध घटनांमध्ये तीन तरुणांचा अपघाती मृत्यू

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

गोंदिया, दि.८ : आजचा दिवस गुरुवार ८ जानेवारी हा अर्जुनी-मोरगाव तालुका वासियांसाठी अत्यंत दुःखद आणि हादरवणारा ठरला. तालुक्यात तीन गावातील तीन तरुणांचा वेगवेगळ्या घटनेत एकाच दिवसी ८ जानेवारीला मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील ताडगांव येथील संदिप वसंत नाकाडे या ४२ वर्षीय तरुणाने अर्जुनी-मोरगाव रेल्वे स्टेशन परिसरात ८ जानेवारी रोजी सकाळी ९:३० वाजताच्या

सुमारास गोंदिया चंद्रपुर कडे जाणा-या मालवाहू रेल्वे गाडी समोर येवून आपले आयुष्य संपविले. संदिप नाकाडे हा विवाहीत युवक अर्जुनी-मोर येथे कृषी सेवा केंद्र चालवीत असल्याची माहिती आहे.

दुस-या एका घटनेत अर्जुनी-मोर. तालुक्यातील धाबेटेकडी / आदर्श येथील नंदेश्वर गजानन कापगते या ३५ वर्षीय विवाहित युवकाचा शेतातील विद्युत डिपी जवळ विद्युत प्रवाहाचा धक्का लागुन शेतात जागीच मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली. यामुळे धाबेटेकडी गावात शोककळा पसरली आहे. दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी अर्जुनी-मोर. ग्रामीण रुग्णालयात आणले असता. मृतकाचे नातेवाईक, कुटुंबीय यांनी मोठी गर्दी करुन शोक व्यक्त केला. या दोन्ही घटनेचा सखोल तपास अर्जुनी-मोर. पोलीस करीत आहेत.

तिसऱ्या एका घटनेत अर्जुनी-मोर तालुक्यातील मोरगांव येथील अविवाहित दुर्गेश वामन चौधरी वय २८ वर्षे हा युवक काही कामा निमित्त साकोली तालुक्यातील नातेवाईकाकडे दुचाकीने गेला होता. ८ जानेवारी रोजी साकोली तालुक्यातील चारगांव फाट्याजवळ दुपारी ३:३० वाजेच्या दरम्यान ट्रक व दुचाकीच्या अपघातात दुर्गेश चौधरी जागीच ठार झाला. अर्जुनी-मोर तालुक्यातील या तिन्ही घटनांमुळे संपुर्ण तालुका हादरुन गेला असुन संपुर्ण तालुक्यासह तिन्ही गावात शोककळा पसरली आहे.

झाडावर डिंक जमा करताना खाली पडून जखमी झालेल्या शेतकऱ्याचा मृत्यू झाला.

देऊळगाव राजा हायस्कूलच्या बाल वैज्ञानिक अगस्त्य तिडकेची राज्यस्तरावर भरारी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

देऊळगाव राजा, दि. ८ : दि.६ व ७ जानेवारी हिवरा आश्रम तालुका मेहकर येथे झालेल्या दोन दिवसीय जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये देऊळगावराजा हायस्कूलच्या अगस्त्य तिडके या विद्यार्थ्याने विजेतेपद पटकावत राज्यस्तरावर धडक मारली आहे. या चुरशीच्या स्पर्धेमध्ये यामध्ये देऊळगाव राजा हायस्कूलला बुलडाणा जिल्ह्यातून दोन बक्षिसे मिळाली तसेच चार सहभागाचे प्रमाणपत्रे सुद्धा मिळाली.

यामध्ये प्राथमिक गटामध्ये उपकरण निर्मिती स्पर्धेमध्ये अगस्त्य वैशाली बाळकृष्ण तिडके वर्ग ८ वा जिल्ह्यातून तिसरा

क्रमांक मिळाला त्याबद्दल त्याला ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले .तर प्रश्नमंजुषा मध्ये अपूर्वा भगवान खरात वर्ग १० जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक मिळाला.

त्याबद्दल तिला ट्रॉफी आणि प्रमाणपत्र मिळाले. ऋचा भगवान खरात वर्ग ६वा,प्रणवी संतोष चौधरी वर्ग ९ वा ,कल्याणी गणेश बुरकुल वर्ग १०वा ,हर्षदा सुभाष तिडके वर्ग ९वा या चौघांना जिल्हास्तरीय सहभागाचे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

जळालेली डीपी तात्काळ बसवा-शुभम घोंगटे

महावितरण अधिकाऱ्यांच्या खुर्चीवर टाकला वाळलेला चारा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

मोताळा, दि. ८ :जळालेला ट्रान्सफार्मर उद्याच्या उद्या देण्यात यावा या मागणीसाठी युवासेना उप जिल्हा प्रमुख शुभम घोंगटे पाटील आक्रमक होत मोताळा येथिल महावितरण कार्यालयात अधिकाऱ्याच्या खुर्चीवर वाळलेला चारा फेकुन आंदोलन करण्यात आले. जोपर्यंत डिपी मिळत नाही तो पर्यंत दालणातुन उठणार नाही असा आक्रमक पवित्रा घेत शुभम घोंगटे यांच्या सह शेतकरी तिथंच ठाण मांडून होते समंधीत अधिकाऱ्यांशी फोनवर चर्चा झाली त्यांनी उद्या सकाळीच ट्रान्सफार्मर बसवुन सुरु करुन देतो असे आश्वासन दिले त्यानंतर सदर आंदोलन मागे घेण्यात आले.

याबाबद सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील मौजे आव्हा येथील बस स्टॅन्ड जवळील आव्हा गावठान ट्रान्सफार्मर कित्येक दिवसापासून नादुरुस्त होता.कधी एक फ्युज नाही तर कधी दोन फ्युज नाही ही बाब शेतकऱ्यांनी समंधीत वायरमन यांच्या कानावर घातल्यानंतर उडवाउडवीचे उत्तरे आल्यामुळे निपाणा येथील सोळंके मॅडम यांच्या कानावर घातली मॅडम बरेच दिवस गैरहजर असतांना त्याच ट्रान्सफार्मरची केबल जळाली सगळे शेतकरी हतबल होत आधी सावरगाव सबस्टेशन नंतर महावितरण कार्यालय मोताळा, मलकापुर येथे जाऊन केबल साठी विंनंती केली त्यांनी केबल नाहीच असे सांगितल्यानंतर शेतकरी नाराज होत घरी परतले. त्यानंतर चार पाच दिवसांनी एका वायरमन ने साडेसहा हजाराला केबल विकत दिली.शेतकऱ्यांनी वर्गणी करुन ती केबल टाकली नंतर ट्रान्सफार्मर जळाला आता वायरमन लोकं परत पैसे गोळा करा सांगू लागले तेव्हा ही बाब गावातील सामाजिक कार्यकर्ते शुभम घोंगटे यांच्या कानावर टाकली त्यानंतर त्यांनी वाळलेला ज्वारीचा चारा सोबत घेऊन शेतकऱ्यांसह महावितरण कार्यालय गाठले तर तिथे साहेब नाही.तेव्हा शुभम

घोंगटे अमोल देशमुख आक्रमक होत समंधीत अधिकाऱ्यांच्या खुर्चीवर वाळलेला ज्वारीचा चारा टाकून रिकाम्या खुर्चीला निवेदन दिले. आणि जोपर्यंत ट्रान्सफार्मर मिळत नाही तोपर्यंत उठत नाही अशी आक्रमक भुमिका घेत ठिय्या आंदोलन केले आणि जर उद्या ट्रान्सफार्मर मिळाला नाही तर आज लोकशाही मार्गाने आलो उद्या भगतसिंगाच्या मार्गाने आल्या शिवाय रहाणार नाही अशी आक्रमक भुमिका घेतल्यानंतर स्थानिक अधिकाऱ्यांशी फोनवर चर्चा केली त्यांनी उद्याच ट्रान्सफार्मर देतो असे आश्वासन दिले त्यानंतर या आंदोलनाची सांगता करण्यात आली.त्यावळी युवासेना उप जिल्हाप्रमुख शुभम घोंगटे,नगरसेवक अमोल देशमुख,परमेश्वर सुरडकर,अशोक घोंगटे,कन्हैया सुर्यवंशी,श्रीकृष्ण गवळी,अमोल घोंगटे,दिपक घोंगटे,दिलीप कुकळे,अर्जुन सुरडकर आदिं शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

क्रीडा

मनोज की याद मे ६ वी राष्ट्रीय ओपन कराटे स्पर्धा संपन्न

खेळातून चांगले व्यक्तिमत्व घडते-डॉ.पंकज भोयर

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

वर्धा, दि. ८ : कोणतेही कार्य पूर्ण करण्यासाठी कृतिशीलता व तत्परतेची गरज असते. ही गरज कराटे सारख्या खेळातून व्यक्तिमत्व विकास होत असून एकात्मता, बंधुता यासारखी मूल्ये निर्माण होतात, असे मत महाराष्ट्र राज्याचे गृह ग्रामीण, गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री व वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केले.

ते मनोज की याद में ६ वी राष्ट्रीय ओपन कराटे स्पर्धेत दिनांक ४ जनवरी २०२६ ला स्थळ चर्खागृह सेवाग्राम रोड वरुड जिल्ह्य वर्धा येथे स्पर्धेचे उद्घाटक म्हणुन बोलत होते. सेल्फ डिफेंस वर्धा डिस्ट्रिक्ट मार्शल आर्ट कराटे

असोसिएशन वर्धा तथा ट्रॅडिशनल शितो रयू कराटे अँड कोबुड़ो ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया द्वारा आयोजित या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी सेवाग्राम एम. जी.आय. एम. एस. पॅथॉलॉजी विभागाच्या संचालक डॉ अनुपमा गुप्ता यानी कराटेखेळाडूना आत्मसुरक्षा विषयी संबोधित केले, तर प्रमुख पाहुने म्हणून मा. श्री. डॉ.दिलीप गुप्ता, ज्येष्ठ समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल, भाजपा जिल्हाध्यक्ष संजय गाते, नगर परिषद हिंगणघाटच्या नगराध्यक्षा नयना शिरभाते, ज्येष्ठ साहित्यिक इमरान राही, आंतरराष्ट्रीय खेळाडू (महाराष्ट्र पोलिस) सुनैना डोंगरे, संस्था अध्यक्ष शिहान शेख दत्तू, सीनियर कराटे प्रशिक्षक शिहान अनवर अली, नगरसेवक अभिषेक त्रिवेदी, वर्धा पंचायत समितीचे माजी उपसभापती संदेश कीटे, अजय वरटकर प्राध्यापक इमरान जमादार, हजार पंजावाल सोलापूर, , नितीन नगराळे , अतुल पांडेय संचालक एटीट्यूड अकादमी वर्धा, महादेव जोगे व इत्यादी मान्यवर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

स्पर्धेत सर्व तांत्रिक बाबी तथा तांत्रिक पंच समिती प्रमुख म्हणून स्पोर्ट शोतोकान कराटे - डो असोसिएशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा स्पोर्ट कराटे असोसिएशन वर्धा जिल्ह्याचे सचिव शिहान मंगेश भोंगाडे यांनी निष्पक्षपणे जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचे आयोजन संस्था महासचिव शिहान कृष्णा ढोबळे यांनी केले. संचालन महाराष्ट्राचे अध्यक्ष सेन्साई पराग पाटील यांनी केले तर आभार सेन्साई धनश्री धोटे यांनी व्यक्त केले. या स्पर्धे मधे सर्वाधिक खेळाडू प्रथम क्रमांक पारितोषिक प्राप्त सिहान गणेश लांजेवार ब्रम्हपुरी, द्वितीय क्रमांक सेंसेई लखन सिंग ठाकुर भोपाळ, तृतीय क्रमांक संतोष कड़पेवाले चन्द्रपुर यानी प्राप्त केले.स्पर्धा यशस्वीते करिता शिहान उल्हास वाघ वर्धा, शिहान शिहान सिहान संतोष कड़पेवाले चंद्रपूर, शिहान रमेश भगत वर्धा, शिहान गणेश लांजेवार ब्रह्मपुरी चंद्रपूर, सेन्साई रंजीत कथडे वाशिम, सेन्साई निलेश राऊत वर्धा, सेन्साई सुधीर रिंके बुटीबोरी नागपूर, सेन्साई विशाल चव्हाण चंद्रपूर, सेन्साई अभिजीत पारगांवकर, सेन्साई दिलीप कठाने, सेन्साई चेतन जाधव वर्धा, सेन्साई नागेश रामटेके वडसा गडचिरोली, सेन्साई गोपी कोटेवार, सेन्साई नदीम शेख, सेन्साई सोनाली भोंगाडे, सेन्साई माधुरी ढगे वासुदेव सोनटके, सेंसेई सौरभ भगत ,मिलिंद काम्बले, सुनील थूल व इत्यादी प्रशिक्षकांचे सहयोग लाभले.

भावाची हत्या करून मृतदेह रेल्वे रूळावर फेकला, अपघाताचा देखावा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

चंद्रपूर, दि. ८ :मद्यधुंद अवस्थेत घरात वाद झाल्याने राग अनावर होऊन मोठ्या भावाने धाकट्याची डोक्यावर लोखंडी वस्तूने वार करून निर्घृन हत्या केली. ही घटना बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथे बुधवार ७ डिसेंब रोजी रात्री ९.४५ वाजता घडली. दरम्यान या हत्याकांडातील पुरावे नष्ट करण्याच्या अनुषंगाने मृतकाचे शव रेल्वे रूळावर टाकून अपघातात भाऊ दगावल्याचे चित्र रंगविण्यात आले. मृत धाकट्या भावाचे नाव गणेश विश्वनाथ भोयर (२५) रा.इंदिरा नगर वार्ड विसापूर ता.बल्लारपूर असे आहे.

या घटनेतील प्रकरणात आरोपी भाऊ गुरूदास विश्वनाथ भोयर (२७), वडील विश्वनाथ झुंगा भोयर (७१) व आई कौशल्या विश्वनाथ भोयर (५५) यांना बल्लारपूर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विश्वनाथ भोयर यांची कौशल्या ही दुसरी पत्नी आहे. त्यांना पहिल्या पत्नीचे दोन मुले व दुसऱ्या पत्नीचे दोन मुले आहे. यातील पहिल्या पत्नीचे दोन्ही मुले वेगवेगळे राहत आहे. मात्र विश्वनाथ, कौशल्या,गुरूदास व गणेश एकत्र राहत होते. बुधवारी रात्री गणेश व गुरूदास या भावंडांत दारू पिऊन भांडण झाले. ते विकोपाला गेले.

रागाच्या भरात गुरूदासने गणेशच्या डोक्यावर लोखंडी वस्तूने प्रहार केला. रक्ताच्या थारोळ्यात गणेश जागीच कोसळला. तो मृत झाल्याची खात्री झाल्यावर घरातील तिघेही शांत झाले. विशेष म्हणजे घटनेची माहिती शेजाऱ्यांना देखील झाली नाही.

ऑस्ट्रेलियाचा ॲशेस मालिकेवर ४-१ ने कब्जा

सिडनी कसोटीतही इंग्लंडला लोळवले

सिडनी : दि.८ वृत्तसंस्था

क्रिकेट विश्वातील सर्वात मानाच्या आणि प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या ॲशेस २०२५-२६ मालिकेवर ऑस्ट्रेलियाने आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. सिडनी क्रिकेट ग्राउंडवर खेळल्या गेलेल्या पाचव्या आणि अंतिम कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचा ५ गडी राखून पराभव केला. या विजयासह कांगारूंनी पाच सामन्यांची ही मालिका ४-१ अशा दणदणीत फरकाने खिशात टाकली आहे. पाचव्या दिवसाच्या खेळाची सुरुवात झाली तेव्हा क्रिकेटप्रेमींना इंग्लंडकडून मोठ्या झुंजार खेळीची अपेक्षा होती. इंग्लंडने आपल्या दुसऱ्या डावात सर्वबाद ३४२ धावा केल्या. त्यांच्या खालच्या फळीतील फलंदाजांनी थोडा संघर्ष दाखवला, मात्र ऑस्ट्रेलियाच्या भेदक माऱ्यासमोर त्यांचा निभाव लागला नाही. पहिल्या डावातील पिछाडी भरून काढल्यानंतर ऑस्ट्रेलियाला विजयासाठी १६० धावांचे माफक आव्हान मिळाले होते.१६० धावांच्या लक्षाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी आक्रमक पवित्रा घेतला. मात्र, विजयाचा मार्ग तितकासा सोपा नव्हता. इंग्लंडच्या गोलंदाजांनी सुरुवातीला काही धक्के देत सामन्यात रंगत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अखेर ३१.२ षटकांत ५ गडी गमावून ऑस्ट्रेलियाने हे लक्ष्य साध्य केले. कांगारूंच्या या विजयामुळे सिडनीचे मैदान यलो आर्मीच्या जल्लोषाने न्हाऊन निघाले.संपूर्ण २०२५-२६ च्या ॲशेस मालिकेवर नजर टाकल्यास ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून येते. पहिल्या सामन्यापासूनच कांगारूंनी इंग्लंडला बॅकफूटवर ठेवले होते. फलंदाजी असो वा गोलंदाजी, ऑस्ट्रेलियन संघाने प्रत्येक क्षेत्रात इंग्लंडला मात दिली. इंग्लंडला केवळ एकाच सामन्यात विजय मिळवता आला, तर उर्वरित चार सामन्यांत त्यांना पत्कराव्या लागलेल्या पराभवामुळे ही मालिका त्यांच्यासाठी अत्यंत निराशाजनक ठरली. सिडनी क्रिकेट मैदानावर ऑस्ट्रेलियाने विजयावर शिक्कामोर्तब केला तेव्हा इंग्लिश संघ गमावलेल्या संधींचा विचार करत मैदानाबाहेर पडला. संपूर्ण दौऱ्याप्रमाणेच, या सामन्यातही इंग्लंडला आपल्या उणिवांची जाणीव झाली.

महत्त्वाचे

टेनिस क्रिकेटचा थरार; सुरतमध्ये रंगणार हाय-व्होल्टेज सामने

सुरत : 'इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग' आपल्या तिसऱ्या हंगामासह पुन्हा एकदा सज्ज झाली असून, यंदाचा हा मोसम आतापर्यंतचा सर्वात भव्य ठरणार आहे. येत्या ९ जानेवारी ते ६ फेब्रुवारी या कालावधीत सुरतमधील लालभाई कंत्राटदार स्टेडियमवर टेनिस-बॉल क्रिकेटचा महाकुंभ रंगणार आहे. भारतीय क्रिकेटच्या गजबजलेल्या वेळापत्रकात अत्यंत कमी वेळात या लीगने आपले अढळ स्थान निर्माण केले आहे.यावेळेस स्पर्धेची व्याप्ती आणि भव्यता वाढवत ने तब्बल ६ कोटी रुपयांच्या बक्षीस रकमेची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे, हंगामातील मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयरला (सर्वोत्कृष्ट खेळाडू) ब्रँड न्यू पोर्श ९११ (९११) ही आलिशान कार देऊन गौरविण्यात येणार आहे. फ्रँचायझींमध्ये विजेतेपदासाठी रंगणाऱ्या या चुरशीच्या लढतीत गोलंदाज निर्णायक भूमिका बजावण्याची शक्यता आहे. टी-१० सारख्या वेगवान फॉरमॅटमध्ये जिथे प्रत्येक चेंडू महत्त्वाचा असतो, तिथे गोलंदाज आपल्या अचूकतेने आणि कौशल्याने सामन्याचे पारडे फिरवण्यासाठी सज्ज झाले आहेत.

बुमराहच्या प्रोत्साहनामुळे दुखापतीतून सावरण्यात मदत-श्रेयंका

अष्टपैलू श्रेयंका पाटीललला असे वाटते की ती पुन्हा नव्याने सुरुवात करत आहे, दुखापतींमुळे एका वर्षापेक्षा जास्त काळ बाजूला राहिली होती. दुखापतींच्या मालिकेने २३ वर्षीय क्रिकेटपटूला तिच्या व्यावसायिक कारकिर्दीच्या सुरुवातीलाच मौल्यवान जीवनाचे धडे दिले. २०२४ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेनंतर श्रेयंकाच्या शिन स्प्लिंट्सचा त्रास झाला, त्यानंतर मनगटाची दुखापत झाली आणि गेल्या वर्षी मायदेशात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकापूर्वी राष्ट्रीय संघात परतण्याचा तिला विश्वास होता तेव्हाच तिला अंगठ्याला दुखापत झाली. मैदानावर परत येऊ न शकल्याने ती निराश झाली आणि तिच्या पुनर्प्राप्ती प्रक्रियेदरम्यान तिने स्वतःला तिच्या खोलीत कोंडून घेतले.बेंगळुरू सेंटर ऑफ एक्सलन्स येथे जसप्रीत बुमराहसह भारतीय क्रिकेटपटूंशी कौटुंबिक पाठिंबा आणि संवाद यामुळे तिला हे समजले की ती दुखापतींशी झुंजणारी एकटी नाही.

सरफराज खानची झंझावाती खेळी; १५ चेंडूत ठोकले अर्धशतक

मुंबई: दि.८ वृत्तसंस्था

विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईचा स्टार फलंदाज सरफराज खानची धमाकेदार खेळी पाहायला मिळत आहे. आज (दि. ८) पंजाबविरुद्धच्या सातव्या फेरीच्या सामन्यात त्याने केवळ १५ चेंडूत अर्धशतक झळकावले. विशेष म्हणजे, पंजाबचा कर्णधार अभिषेक शर्माच्या एकाच षटकात सरफराजने ३ षटकार आणि ३ चौकार लगावत तब्बल ३० धावा वसूल केल्या.नाणेफेक जिंकून मुंबईचा कर्णधार श्रेयस अय्यरने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पंजाबने दिलेल्या २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सरफराज खानने मैदानात येताच फटकेबाजीला सुरुवात केली. डावातील १० व्या षटकात अभिषेक शर्मा गोलंदाजीला आला असता सरफराजने ६,४,६,४,६,४ असा धावांचा पाऊस पाडला. सरफराजने अवघ्या २० चेंडूंत ७ चौकार आणि ५ गगनचुंबी षटकारांच्या मदतीने ६२ धावांची झंझावाती खेळी केली. त्याचा स्ट्राईक रेट ३१० इतका होता. अखेर मयंक मार्कंडेने त्याला पायचीत बाद केले.तत्पूर्वी, फलंदाजीसाठी उतरलेल्या पंजाबची सुरुवात अत्यंत खराब झाली. फॉर्मात असलेले सलामीवीर अभिषेक शर्मा (८) आणि प्रभसिमरन सिंह (११) स्वस्तात बाद झाले. मात्र, अनमोलप्रीत सिंह आणि रमणदीप सिंह यांच्या अर्धशतकी खेळींमुळे पंजाबला २१६ धावांपर्यंत मजल मारता आली. पंजाबचा संपूर्ण संघ ५० षटकेही खेळू शकला नाही.२१७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना अंगक्रिश रघुवंशी आणि मुशीर खान यांनी मुंबईला ५० धावांची आश्वासक सुरुवात करून दिली. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या सरफराजने सामन्याचे चित्रच पालटून टाकले.

न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी टीम इंडिया सज्ज

मुंबई: दि.८ वृत्तसंस्था

भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्याची वनडे मालिका ११ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. तर मालिकेतील पहिला सामना वडोदरा येथे खेळवण्यात येणार आहे. गेल्या मालिकेत रोहित आणि विराट कोहलीच्या जबरदस्त खेळीने भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २-१ असा विजय मिळवला. शुभमन गिलच्या दुखापतीमुळे टीम इंडियाचे कर्णधारपद केएल राहुलकडे देण्यात आले होते. पण या मालिकेतून गिल कर्णधारम्हणून पुनरागमन करणार आहे. त्यामुळे आता, टीम इंडियाला गिलच्या नेतृत्वात न्यूझीलंडचा सामना करावा लागणार आहे.भारत आणि न्यूझीलंडमध्ये एकूण १२० एकदिवसीय सामने खेळले गेले आहेत, त्यापैकी भारतीय संघाने ६२ जिंकले आहेत. न्यूझीलंडने ५० जिंकले आहेत. सात सामने अनिर्णीत राहिले आहेत, एक बरोबरीसह. वरील आकडेवारीनुसार, एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय संघाचा न्यूझीलंडविरुद्ध वरचष्मा आहे. गेल्या नऊ वर्षांपासून न्यूझीलंडने भारतीय भूमीवर भारताविरुद्ध एकदिवसीय सामना जिंकलेला नाही. न्यूझीलंडने भारताविरुद्ध शेवटचा एकदिवसीय सामना २०१७ मध्ये जिंकला होता. हा सामना वानखेडे क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला होता, जिथे किवींनी ६ विकेट्सने विजय मिळवला होता. तेव्हापासून, किवी संघ भारतीय भूमीवर भारताविरुद्ध जिंकण्यासाठी उत्सुक आहेत.आकडेवारी भारताच्या बाजूने असली तरी, भारत-न्यूझीलंड सामने कधीही एकतर्फी झाले नाहीत. न्यूझीलंडने अनेक वेळा भारतासमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

ऋतुराजचा वर्ल्ड रेकॉर्ड!

मुंबई: भारताचा स्टार फलंदाज ऋतुराज गायकवाडने क्रिकेट जगतात असा पराक्रम केला आहे, जो आतापर्यंत जगातील कोणत्याही फलंदाजाला जमलेला नाही. त्याने 'लिस्ट-ए' क्रिकेटमध्ये सर्वाधिक फलंदाजी सरासरीचा नवा जागतिक विक्रम प्रस्थापित करत ऑस्ट्रेलियाचा दिग्गज खेळाडू माइकल बेवनला मागे टाकले आहे. त्याने गोव्याविरुद्ध शतक झळकावत २२ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडण्याचा पराक्रम केला आहे.विजय हजारे ट्रॉफीमध्ये महाराष्ट्र संघाकडून खेळताना ऋतुराजने आपल्या बॅटने धावांचा पाऊस पाडला आहे. गुरुवारी खेळल्या गेलेल्या सामन्यानंतर रुतुराज गायकवाडची 'लिस्ट-ए' क्रिकेटमधील सरासरी ५८.८३ वर पोहोचली आहे. विशेष म्हणजे त्याने केवळ ९५ सामन्यांतच हे शिखर गाठले .

तिलक वर्मा न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतून बाहेर

मुंबई: दि.८ वृत्तसंस्था

न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेसाठी सज्ज होत असलेल्या भारतीय क्रिकेट संघाला एक मोठा धक्का बसला आहे. युवा आक्रमक फलंदाज तिलक वर्मा गंभीररित्या जखमी झाला असून, त्याच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. या दुखापतीमुळे तो केवळ न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेवरच नाही, तर आगामी टी-२० विश्वचषकातूनही बाहेर पडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.विजय हजारे करंडक स्पर्धेत हैदराबादचे प्रतिनिधित्व करताना राजकोटमध्ये तिलक वर्माला पोटात असह्य वेदना जाणवू लागल्या. बंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्स मधील तज्ज्ञ डॉक्टरांनी त्याला शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला आहे. शस्त्रक्रियेनंतर तिलकला पूर्णपणे सावरण्यासाठी किमान ३ ते ४ आठवड्यांचा कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत २१ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेत तो खेळणे अशक्य मानले जात आहे.भारतीय संघाचा विश्वचषकातील पहिला सामना ७ फेब्रुवारी रोजी अमेरिकेविरुद्ध होणार आहे. तिलक वर्माच्या रिकव्हरीसाठी लागणारा वेळ लक्षात घेता, तो विश्वचषकासाठी पूर्णपणे फिट होईल की नाही, याबाबत साशंकता आहे. गेल्या वर्षभरात तिलक हा भारतीय संघाच्या मधल्या फळीचा कणा ठरला आहे. विशेषतः गेल्या आशिया चषकात पाकिस्तानविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्याने साकारलेली अर्धशतकी जिगरबाज खेळी भारताच्या जेतेपदासाठी निर्णायक ठरली होती.तिलक वर्मा अनिश्चित काळासाठी बाहेर पडल्यामुळे निवड समितीला आता जुन्या योजनांवर पुन्हा विचार करावा लागणार आहे. मधल्या फळीतील पोकळी भरून काढण्यासाठी शुभमन गिल आणि श्रेयस अय्यर या अनुभवी खेळाडूंचे नाव पुन्हा चर्चेत आले आहे. तसेच, सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या रियान परागचाही संघात समावेश करण्याचा विचार होऊ शकतो.

सोने-चांदीच्या दरात मोठी घट!

गुरुवारी ८ जानेवारी २०२६ रोजी सराफा बाजारात सोने आणि चांदीच्या किमती घसरल्या आहेत. मल्टी कमोडिटी एक्सचेंज वर सकाळी ११ वाजता, सोन्याचा भाव मागील सत्राच्या तुलनेत ०.६८ टक्क्यांनी घसरून प्रति १० ग्रॅम १,३७,०६७ रु. झाला. चांदीच्या किमतीही १.६२ टक्क्यांनी घसरून प्रति किलो २,४६,५५० रू. झाल्या आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्याच्या किमती घसरल्या असून सोन्याचा भाव प्रति औंस सुमारे ४,४४० वर पोहोचला. गुंतवणूकदारांनी अमेरिकेतील मिश्र आर्थिक डेटा आणि भू-राजकीय घडामोडीमुळे ही घसरण झाली.भारतात आज सोने आणि चांदीच्या किमतीत घसरण झाली. २४ कॅरेट सोन्याचा भाव सकाळी प्रति १० ग्रॅम १,३८,८३० रुपयांवरून घसरून १,३८,२६० रुपयांवर आला. २२ कॅरेट सोन्याचा भावही प्रति १० ग्रॅम १,२६,७४० रुपयांवर घसरून १,२७,२६० रुपयांवर आला, जो काल प्रति १० ग्रॅम १,३७,०६७ रु. आहे. १८ कॅरेट सोन्याचा भावही प्रति १० ग्रॅम १,०३,७०० रुपयांवर घसरला, जो पूर्वी प्रति १० ग्रॅम १,०४,१३० रुपयांवरून घसरला. चांदीच्या किमतीतही घट झाली, एक किलो चांदीची किंमत आज २,५७,१०० रुपयांवर पोहोचली.भारतातील मोठ्या शहरांमध्ये सोन्याच्या किमती थोड्या वेगळ्या आहेत. ८ जानेवारी रोजी दिल्लीत २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति ग्रॅम १३,८१५ रूपये आहे. तर, २२ कॅरेट सोन्याचा दर प्रति ग्रॅम १२,६६५ रूपये आणि १८ कॅरेट सोन्याचा दर प्रति ग्रॅम १०,३६५ रूपये आहे.

निर्यात मंदावल्याने मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राच्या उत्पादकतेत घट

डिसेंबरमध्ये 'पीएमआय' निर्देशांक घसरला

नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था

गेल्या आठवड्यात भारताच्या मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राची उत्पादकता कमी झाल्याची आकडेवारी जाहीर झाली होती. मंगळवारी सेवा क्षेत्राची उत्पादकता कमी झाल्याची आकडेवारी जाहीर झाली आहे. निर्यात मंदावल्यामुळे या क्षेत्रावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.डिसेंबर महिन्यातील परचेसिंग मॅनेजर इंडेक्स कमी होऊन ५८ अंकावर आला आहे. नोव्हेंबर महिन्यामध्ये हा निर्देशांक ५९.८ अंकावर होता. मात्र हा निर्देशांक अजूनही ५० अंकाच्या कितीतरी जास्त आहे. निर्देशांक ५० अंकावर असल्यानंतर हे क्षेत्र विस्तारात असल्याचे समजले जाते.हा निर्देशांक तयार करणाऱ्या एस अँड पी ग्लोबल मार्केट इंटेलिजन्स या संस्थेच्या संचालक पॉलीना डी लिमा यांनी सांगितले की, आतापर्यंत सेवा क्षेत्र वेगाने वाढत होते. आता ते नवीन वर्षाच्या सुरुवातीला काही प्रमाणात मंदावत असल्याची लक्षणे दिसून येत आहेत. निर्यात वाढविण्यासाठी कंपन्या प्रयत्न करत आहेत. आशिया खंडातील देश, मध्य पूर्वेतील देश आणि ब्रिटनमधून निर्यातीच्या ऑर्डर मिळण्यात बऱ्याच प्रमाणात यश मिळते आहे.

समाधानाची बाब म्हणजे भारतातील महागाई रुपयाचे अवमूल्यन होऊनही बऱ्याच कमी पातळीवर आहे. त्याचा फायदा घेण्याचा देशातील उद्योग प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. मात्र गेल्या वर्षात कर्मचारी भरती ज्या प्रमाणात झाली त्या प्रमाणात ही भरती सध्या होताना दिसून येत नाही. त्यामुळे नजीकच्या भविष्यात परिस्थिती सुधारली नाही तर या क्षेत्रावर त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता नाकारत येत नाही.सेवा क्षेत्राचा आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राचा निर्देशांक घसरल्यामुळे या दोन्ही क्षेत्राचा संयुक्त निर्देशांक डिसेंबर महिन्यात कमी होऊन ५७.८ इतका नोंदला गेला आहे. नोव्हेंबर महिन्यामध्ये हा निर्देशांक ५९.७ इतका होता. एकूणच जागतिक व्यापार युद्धामुळे परिस्थिती नकारात्मक झाली आहे. त्याचा परिणाम भारतीय सेवा आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रावर होणे अपेक्षित आहे असे विश्लेषकांनी यासंदर्भात नमूद केले.

ग्रो म्युच्युअल फंडचा 'ग्रो स्मॉल कॅप फंड' सादर!

मुंबई :दि.८ वृत्तसंस्था

ग्रो म्युच्युअल फंडने ग्रो स्मॉल कॅप फंडच्या लाँचची घोषणा केली आहे. हा ओपन-एंडेड इक्विटी फंड असून, प्रामुख्याने स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करणार आहे. या फंडाचा न्यू फंड ऑफर (एनएफओ) ८ जानेवारी ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत खुला राहणार आहे. शिस्तबद्ध बॉटम-अप गुंतवणूक पद्धतीचा अवलंब करत, ग्रो म्युच्युअल फंडच्या क्यूजीएआरपी चौकटीवर वाजवी किमतीत गुणवत्ता आणि वाढ (क्वालिटी अँड ग्रोथ ॲट अ रिझनेबल प्राइस) आधारित धोरणानुसार, उच्च दर्जाच्या आणि विस्तारक्षम स्मॉल कॅप कंपन्यांमध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन भांडवली वाढ साध्य करण्याचा या योजनेचा उद्देश आहे.भारताची अर्थव्यवस्था सध्या सर्वांगीण परिवर्तनाच्या टप्प्यातून जात आहे. भौतिक पायाभूत सुविधा, वित्तीय व्यवस्था आणि तांत्रिक क्षमतांमध्ये होत असलेली लक्षणीय सुधारणा सर्व आकारांच्या उद्योगांसाठी नव्या संधी निर्माण करत आहे. पायाभूत सुविधांवरील वाढता खर्च, अधिक सखोल होत जाणारे भांडवली बाजार, औपचारिक कर्ज सुविधा पर्यंत सुधारलेली पोहोच आणि देशव्यापी डिजिटल प्लॅटफॉर्म्स यांमुळे लहान कंपन्यांना भेडसावणारे पारंपरिक तोटे हळूहळू कमी होत आहेत. परिणामी, आज अनेक लघुउद्योग आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी, नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी आणि अधिक प्रभावीपणे स्पर्धा करण्यासाठी सक्षम स्थितीत आहेत. इतिहास पाहता, स्मॉल कॅप शेअर्समध्ये दीर्घकालीन काळात लार्ज कॅप शेअर्सच्या तुलनेत अधिक परतावा देण्याची क्षमता दिसून आली आहे. तुलनेने लहान आधार आणि वाढीसाठी उपलब्ध असलेली मोठी संधी (हेडरूम) हे स्मॉल कॅप गुंतवणुकीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.स्मॉल कॅप शेअर्समधून गुंतवणूकदारांना विविध आणि व्यापक अशा निश, विशेषीकृत आणि उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये सहभागाची संधी मिळते, जी इतर सेगमेंटमध्ये तुलनेने कमी प्रमाणात किंवा मुळीच उपलब्ध नसते. या क्षेत्रांमध्ये रचनात्मक (स्ट्रक्चरल) बदलांचा फायदा घेणारे उद्योगही येतात, तसेच ज्या ठिकाणी केवळ व्यापक आर्थिक चक्रांपेक्षा कंपन्यांच्या स्वतःच्या अंमलबजावणी क्षमतेवरच वाढ अधिक अवलंबून असते, अशा क्षेत्रांचाही समावेश असतो.

जागतिक बाजारात खनिज तेलाचे दर घटण्याची शक्यता

नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था



अपुऱ्या पायाभूत सुविधामुळे व्हेनेझुएलातील क्रुड तेलाचे उत्पादन सध्या ८ लाख पिंप प्रति दिवस या पातळीवर आहे. जर अमेरिकेने या क्षेत्रातील पायाभूत सुविधा वाढविल्या तर या खनिज तेलाचे उत्पादन पुढील दशकात २५ लाख पिंप प्रति दिवस जाण्याची शक्यता आहे.अशा परिस्थितीत जागतिक बाजारात खनिज तेलाचा पुरवठा वाढून खनिज तेलाचे दर मर्यादित पातळीवर राहण्यास मदत होईल असे काही विश्लेषकांनी नमूद केले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलामधील तेल उत्पादनांचा व्हेनेझुएलातील जनतेला फायदा होत नाही असे म्हटले आहे.

आता लोकशाहीच्द्वारा नवीन प्रशासन आल्यानंतर आणि तेथील पायाभूत सुविधांमध्ये वाढ केल्यानंतर पुढील दोन वर्षात तेलाचे उत्पादन १४ लाख पिंप प्रती दिवस आणि पुढील दहा वर्षात २५ लाख पिंप जाण्याची शक्यता व्यक्त केली आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेतील तेल कंपन्यांना आणि व्हेनेझुएला सरकारला आणि जनतेला या वाढीव महसुलाचा लाभ होऊ शकतो. त्याचबरोबर जागतिक बाजारात जास्त पुरवठा होऊ शकते असे समजले जाते.

ट्रम्प यांनी मंगळवारी सांगितले की, व्हेनेझुएलातील तेल उत्पादन यावर्षी ३० ते ५० दशलक्ष पिंपापर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यावर अमेरिकेचे नियंत्रण राहील. बाजार भावाप्रमाणे हे तेल जागतिक बाजारात उपलब्ध केले जाईल. या तेल विक्रीवर अमेरिकेचे नियंत्रण राहील. या तेलाचा फायदा अमेरिकन जनतेला आणि व्हेनेझुएलाच्या जनतेला होईल असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे.अमेरिकेच्या तीन बलाढ्य कंपन्यांना पुन्हा ट्रम्प व्हेनेझुएलातील पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आणि तेलाचे उत्पादन अमेरिकेत पाठविण्यासाठी आग्रह करीत आहेत. मात्र व्हेनेझुएलाचे नागरिक ट्रम्प यांच्या या प्रस्तावाला कसा प्रतिसाद देतात यावर बरेच काही अवलंबून आहे. व्हेनेझुएलात जगातील एकूण तेलाच्या १७ टक्के म्हणजे ३०० अब्ज पिंप तेल असल्याचे समजले जाते.

थोडक्यात

प्रभावी तिकीट तपासणीमुळे २० कोटींचे उत्पन्न

नागपूर : मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने सघन तिकीट तपासणी मोहिमांच्या माध्यमातून जानेवारी ते डिसेंबर २०२५ या वर्षभराच्या कालावधीत राबविलेल्या प्रभावी तिकीट तपासणीमुळे नागपूर विभागाला कोटी ५७लाखांपेक्षा अधिक उत्पन्न मिळाले आहे. कालावधीत तिकीटविरहित प्रवासाची १ लाख ६१ हजार ९१४ प्रकरणे उघडकीस आली. या प्रकरणांतून ७ कोटी २२ लाख भाडे तसेच ४ कोटी ४४ लाख अतिरिक्त दंड वसूल करण्यात आला. याशिवाय अनियमित प्रवासाच्या १ लाख ५२ हजार २९२ प्रकरणांमध्ये ४ कोटी ८ लाख भाडे ३ कोटी ९१ लाख अतिरिक्त दंड़ वसूल करण्यात आला. बुकिंग न केलेल्या सामानाच्या २ हजार ३०१ प्रकरणांमध्ये ४ ८७ हजार इतकी रक्कम वसूल करण्यात आल्याचे रेल्वे सूत्राने सांगितले.

विधानभवनात वार्षिक पुष्प प्रदर्शन

नागपूर : उपवने व उद्याने सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग नागपूर कार्यालयाचे वतीने दरवर्षीप्रमाणे शासनाचा उपक्रम म्हणून यावर्षी सुद्धा २५ व २६ जानेवारी २०२६ रोजी विधान भवन नागपूर येथे ५१ व्या वार्षिक पुष्पप्रदर्शनाचे आयोजन केलेले आहे. यात भाग घेण्यासाठी प्रवेश फॉर्म १२ जानेवारी सोमवारपासून (शासकीय सुट्टीचे दिवस वगळता सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत) शासकीय रोपवाटिका, जुने सचिवालय परिसर, सिव्हिल लाइन, नागपूर येथे मिळू शकतील, तरी उद्यान प्रेमींनी जनतेने याची नोंद घ्यावी. उद्यान स्पधेर्साठी प्रवेश फॉर्म भरण्याची अंतिम तारीख १७ जानेवारी असून, पुष्पप्रदर्शनासाठी प्रवेश फॉर्म शुल्कासह भरण्याची अंतिम तारीख २२ जानेवारी आहे. अधिक महितीसाठी कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६१४२५ वर संबंधितांनी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा,असे सहाय्यक संचालक, उपवने व उद्याने संदीप जाधव यांनी कळविले आहे.

त्रैमासिक विवरणपत्र सादर करावे

नागपूर : जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापनांनी स्थानिक सेवायोजन कार्यालयाकडे, सक्तीने पदे अधिसूचित करणारा कायदा १९५९ नियमावली १९६० अन्वये आस्थापनांची ऑनलाईन माहिती कौशल्य, रोजगार व उद्योजकता नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर भरणे आवश्यक आहे. या कायदयातील कलम ५ प्रमाणे मनुष्यबळाचा सद्यास्थितीदर्शक अहवाल त्रैमासिक विवरणपत्र (ईआर-१) ऑनलाईन सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. याकरिता या विभागामार्फत देण्यात आलेला लॉगिन आयडी व पासवर्डचा वापर करण्यात यावा. या विभागाच्या सर्व सेवांचे विकेंद्रीकरण झाले असून, उमेदवारांसाठी व उद्योजकांसाठी सर्व सेवा ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत. सर्व उद्योजकांनी, कंपनीची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर (संस्थेचे नाव, ई-मेल आयडी, मोबाईल नंबर, पत्ता, कार्यालय प्रमुख, संस्थेमध्ये चालणारे कामकाज आदी माहिती) उद्योजकांनी तातडीने ऑनलाईन पद्धतीने भरावी/अद्यावत करावी.

हिंगणा एमआयडीसीला अतिक्रमणाचा विळखा

उद्योजकांनी केली कायमस्वरूपी कारवाईची मागणी ; 'अँटी-एनक्रोचमेंट सेल' स्थापन करा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : हिंगणा एमआयडीसी औद्योगिक क्षेत्र सध्या अतिक्रमणाच्या गंभीर विळख्यात अडकले आहे. अनधिकृत बांधकामे, रस्ते अडवून केलेली पार्किंग आणि वाढत्या अस्वच्छतेमुळे उद्योगांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने यावर तत्काळ आणि कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी उद्योजकांनी केली आहे.

"हिंगणा एमआयडीसी ही विदर्भाची आर्थिक संपत्ती आहे. प्रशासकीय उदासीनतेमुळे येथील गुंतवणुकीवर आणि रोजगारावर प्रतिकूल परिणाम होत आहे. आम्हाला केवळ आश्वासने नकोत, तर कायमस्वरूपी कृती हवी आहे.

पी. मोहन
अध्यक्ष,एमआयडीसी इंडस्ट्रिज असोसिएशन

हिंगणा औद्योगिक क्षेत्रात ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढीग आणि मांसविक्रीच्या दुकानांमुळे परिसराचे विद्रूपीकरण झाले आहे. या दुकानांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एमआयडीसी आणि स्थानिक प्रशासनाकडून अधूनमधून अतिक्रमणविरोधी मोहिमा राबवल्या जातात. मात्र, कारवाई झाल्यानंतर काही दिवसांतच परिस्थिती 'जैसे थे' होत असल्याचे उद्योजकांनी म्हटले आहे. उद्योजकांनी पुढील काही प्रमुख मागण्या केल्या आहेत एमआयडीसी प्रशासन, पोलिस आणि महसूल विभागाचा समावेश असलेला कायमस्वरूपी 'अँटी-एनक्रोचमेंट सेल' (अतिक्रमणविरोधी स्वतंत्र कक्ष) स्थापन करावा. एमआयडीसीच्या नकाशाप्रमाणे रस्ते, हरित पट्टे आणि 'नो-वेंडिंग झोन'चे स्पष्ट सीमांकन करून तिथे कुंपण व वृक्षारोपण करावे. अवैध व्यावसायिक उपक्रम आणि भंगार बाजाराविरोधात शून्य सहनशीलता धोरण राबवावे. अवजड वाहनांसाठी स्वतंत्र 'पार्किंग बे' आणि लोडिंग-अनलोडिंग झोन विकसित करावेत. संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही देखरेख आणि पोलिसांची नियमित गस्त करण्याचीही मागणी केली आहे

प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात नवीन गुंतवणूकदार पाठ फिरवण्याची भीती असल्याचेही नमूद केले आहे.

गार्डन क्लबतर्फे १२३ वे वार्षिक फुलांचे प्रदर्शन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : नागपूर गार्डन क्लबतर्फे १२३ वे वार्षिक फुलांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन ११ जानेवारी रोजी कुसुमताई वानखेडे हॉल, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर येथे सकाळी ११ वाजता. होणार आहे.

प्रदर्शनात निसर्गसौंदर्याची नेत्रदीपक मांडणी पाहायला मिळेल. गुलाब, ग्लॅडिओलाय, फुलांची सजावट, इनडोअर रोपे, कॅक्टस व सुक्युलंट्स, बोन्साय रोपे इत्यादींचा यात समावेश असेल. प्रदर्शन सकाळी ११.३० ते रात्री ८ वाजेपर्यंत असेल. कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग आणि बागकामा विषयी प्रेम आणि कुतूहल जागृत करणे हा आहे. या उपक्रमांत फुलांची रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, सर्व निसर्गप्रेमी, बागकाम प्रेमी आणि विद्यार्थ्यांनी या फुलांच्या सोहळ्यात सहभागी व्हावे आणि त्याचा आनंद लुटावा, अशी विनंती केली आहे. पत्रपरिषदेला अध्यक्षा अनुजा परचुरे, उपाध्यक्ष डॉ.राजश्री बापट आणि जॉईंट सेक्रेटरी रेखा देशमुख यांची उपस्थिती होती. ११ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूरच्या आस्था कार्लेकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन होईल,असे पत्रकार परिषदेमध्ये अनुजा परचुरे यांनी सांगितले

'हेल्मेट 'ने वाचविला वृद्धाचा जीव

अवजड वाहनाखाली अडकली दुचाकी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : डोक्यावर 'हेल्मेट' असल्यामुळे एकाचा जीव वाचला असून, पोलिसांनी दुचाकीस्वाराला ट्रकखालून बाहेर काढत तातडीने रुग्णालयात दाखल केले यात नागपूर शहर पोलिसांचे कौतुक होत आहे अर्जुन गंगादास नागराणे (वय ७२ वर्षे, सोनबा नगर नागपूर) असे या नशिबवान दुचाकीस्वाराचे नाव आहे

माहितीनुसार, कापसी पुल चौकी येथून नागपूरकडे येण्याच्या दिशेने अंदाजे सुमारे ५० मीटर अंतरावर मंगळवारी दुपारी १.२० वाजताच्या दरम्यान भंडारा दिशेकडून येणारा ट्रक (क्रमांक एमएच ४० / सीटी ७५७४) तरोडी पुलाच्या दिशेने जात असताना अचानक दुचाकी (क्रमांक एमएच ४९/ बीएक्स १८१३) ट्रकच्या समोरच्या चाकात आली. यावेळी दुचाकी ट्रकमध्ये अडकून पुढे जात असतानाच 'नो एन्ट्री पॉइंट'वरील पोलिस उपनिरीक्षक सोलव, पोलिस कॉन्स्टेबल सुमित, पोलिस कॉन्स्टेबल आकाश यांनी तत्काळ घटनास्थळाकडे धाव घेत ट्रकला जागेवरच थांबवले. आणि ट्रकखाली अडकलेले दुचाकीचालक यांना त्वरित खालून ओढून बाहेर काढले. यावेळी दुचाकीचालक अर्जुन गंगादास नागराणे यांनी डोक्यावर हेल्मेट घातले असल्यानेच त्यांचे प्राण बचावले. वाहतूक पोलिसांनी तेथून जाणाऱ्या ऑटोला थांबवून जवळच्या भवानी हॉस्पिटल येथे दाखल केले.

'समृद्धी'वरील वाहतूक थांबणार

नागपूर, दि. ८ : हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर 'हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' अंतर्गत कि.मी. ९०+५०० ते कि.मी. १५०+३०० (ता. धामणगाव रे., ता. चांदूर रे. व ता. नांदगांव खंडेश्वर जि. अमरावती) येथे गॅन्ट्री उभारण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत ९ ते १३ जानेवारी या कालावधीत १० टप्यात करण्यात येणार आहे. या प्रत्येक टप्यादरम्यान कामाच्या टप्यानजीक संबंधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांकरिता पूर्णतः थांबविण्यात येणार आहे. प्रत्येक टप्यातील काम पूर्ण झाल्यावर द्रूतगती मार्गावरील संबंधित वाहिनीवरील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात येईल, म.रा.र.वि. मंडळाचे जनसंपर्क अधिकारी तुषार अहिरे यांनी कळविले आहे.

'लाल विधान' दीर्घांकाचा विशेष प्रयोग

नागपूर पोलिस आणि हेमेंदू रंगभूमीचे आयोजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : नागपूर पोलिस आणि हेमेंदू रंगभूमीच्या वतीने 'लाल विधान' हा दीर्घांक सादर करण्यात आला.सदर नाट्यप्रयोग पोलिस भवनातील ऑडिटोरियम येथे पार पडला.

कार्यक्रमाला पोलिस महानिरीक्षक (नक्षलविरोधी मोहीम) संदीप पाटील भापोसे, पोलिस अधिकारी अनिल म्हस्के प्रामुख्याने उपस्थित होते मूळ माओवादी चळवळीवर आधारित असलेल्या या नाट्यप्रयोगाचे लेखन प्रवीण खापरे यांनी केले आहे. या चळवळीकडे नेणारी दिशा आणि त्याचा विदारक अंत, ही बाब यातून दर्शविण्यात आली दिग्दर्शन शुभम निकम यांचे होते. कलावंतांमध्ये मित्र -आशीष ठाकरे, मिलिंद तेलतुंबडे-मयूर मस्के, कॉमरेड -धनश्री गंधारवार, कॉमरेड - शुभम माळी, एंजेलिना ओबरान-करुणा मंगदे, डॉ, राजेंद्र प्रसाद- गणेश लाकडे,राजा-आनंद भोयर, कॉमरेड - ईशांत बोपचे, गावकरी श्रद्धा रोकडे, अनु गणवीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेत प्रवीण खापरे यांनी अभिनय साकारला. याशिवाय प्रकाशयोजनाची जबाबदारी शुभम निकम यांनी सांभाळली तसेच, नेपथ्य हर्ष नागभिडे, ईशांत बोपचे, वेशभूषा धनश्री गंधारवार,रंगभूषा श्रद्धा रोकडे आणि पार्श्वसंगीत अजिंक्य थेर यांचे होते.

डॉ. माधवी खोडे मुख्य निवडणूक निरीक्षकपदी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिकांची निवडणूक निर्भय, मुक्त व पारदर्शक होण्यासाठी प्रत्येक महानगरपालिकासाठी राज्य शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे. राज्य निवडणूक आयोगाने नागपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी विभागीय अप्पर आयुक्त डॉ. माधवी खोडे-चावरे यांची मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांना सहाय्य करण्यासाठी चिमूरचे अप्पर जिल्हाधिकारी संतोष थिटे यांची नेमणूक केली आहे. मुख्य निवडणूक निरीक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे

यांनी नागपूर महानगरपालिकाच्या निवडणूक अधिकाऱ्यांशी निवडणूक प्रक्रियेबद्दल चर्चा केली असून निवडणूक निर्भय, मुक्त, व पारदर्शक होण्यासाठी सर्वोपरी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले.

कार्यालय पत्ता : मुख्य निवडणूक निरीक्षक कार्यालय रवी भवन येथील कॉटेज क्रमांक २१ येथे स्थापित करण्यात आले आहे.

माऊझर- काडतुसे जप्त; दोघांना अटक

अजनी पोलिसांची धडक कारवाई; पार्वती नगरात छापा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता काळात अजनी पोलिसांनी लोखंडी माऊझर आणि दोन जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. याप्रकरणी पोलिसांनी दोन सराईत आरोपींना अटक केली.

पोलिस आयुक्त आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर नजर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. अजनी तपास पथक परिसरात गस्तीवर असताना अंमलदार अतुल टिकले यांना पार्वती नगर येथील एका घरात गुन्ह्याच्या उद्देशाने शस्त्र लपवून ठेवल्याची माहिती मिळाली यानंतर पार्वती नगर येथील गल्ली क्र. ३ मधील एका घरावर छापा टाकला. झडतीत लोखंडी माऊझर आणि दोन

जिवंत काडतुसे सापडली. शस्त्राबाबत परवाना विचारला असता आरोपींकडे कोणताही कायदेशीर दस्तऐवज मिळून आला नाही. पुढील कारवाईत सागर ब्रिजमोहन पाल आणि प्रमोद राजेंद्र सुर्यवंशी यांना अटक केली चौकशीत शस्त्र मूळचे प्रमोद सुर्यवंशी याचे असून त्याने ते सागर पालकडे लपवून ठेवले होते. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. ही यशस्वी कारवाई उपायुक्त रश्मिता राव एन., सहाय्यक पोलिस आयुक्त नरेंद्र हिवरे यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीनचंद्र राजकुमार व पोलिस निरीक्षक (गुन्हे) प्रभाकर कवाळे यांच्या नेतृत्वात पार पडली. तपास पथकात पीएसआय सिद्धांत मस्के, मनोज नेवारे, प्रकाश गाडेकर, अतुल टिकले, राहुल शेंडे, अविनाश चंगोले, विपीन पिल्लेवान, रुखसार, हिमांशू आणि अभिषेक यांचा समावेश होता.

'आशा दिवस उत्सव' सिटू तर्फे थाटात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सिआयटीयू) नागपूर जिल्हा तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही आशा दिवस उत्सव मोठ्या थाटामाटात सेवाश्रम येथे संपन्न झाला. वर्षभर आशा वर्कर मोबदला मिळून सुद्धा नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत सेवा देण्याकरता तत्पर असतात. हिंदीमध्ये असलेले कलागुण सेवा देण्याच्या जिम्मेदारीतून नाहीसे झालेले दिसतात. अशा परिस्थितीमध्ये आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सिआयटीयू) करमणुकीचा भाग व त्या महिलांमध्ये असलेले विविध प्रकारचे कलागुण प्रदर्शित करण्याची त्यांची इच्छा पूर्ण करून देण्याचे काम सिटू तर्फे एका मोठ्या मंचावर केले जाते. त्यामधून त्या प्रत्येक महिलेला समाधान मिळते. संघटनेच्या चांगले कलाकार निर्माण करणे हा वार्षिक स्नेहसंमेलन करून त्यामधून मनमोहक डांस, नाटक व गायनसह उत्कृष्ट भोजन व्यवस्था करून संपन्न केले जाते. संघटनेतर्फे जिल्हाध्यक्ष कॉ. राजेंद्र साठे यांच्या प्रेरणेतून जिल्हा महासचिव कॉ. प्रीती मेश्राम यांच्या अथक परिश्रमातून रंजना पौनीकर, लक्ष्मी कोट्टेजवार, सरिता थोटे, मंदा गंधारे यांच्या सहयोगातून संपन्न झाला.

आर्थिक सबळीकरण ... बचत गटांना मोठी संधी

महिलांनो, सज्ज व्हा, येतोय 'उमेद मॉल'

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. ८ : महिलांच्या आर्थिक आणि विकासात्मक सक्षमीकरणाच्या उद्दिष्टाने बचत गटांसाठी बाजारपेठ म्हणून 'उमेद मॉल' उपलब्ध करून देण्यात येणार आहेव्यवसायातील 'दलाल साखळी' संपवून विक्रीचा पूर्ण नफा थेट महिलांच्या हाती पडणार असल्याने त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होईल, असा दावा करण्यात येत असून, यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

विदर्भातील ग्रामीण महिलांना आर्थिक बळ देण्याचा निर्धार करण्यात आला आहेयाअनुषंगाने उपरोक्त निर्णय घेण्यात आला बचत गटातील महिलांनी तयार वस्तूंची विक्री करण्यासाठी नागपूर येथे 'उमेद मॉल' अर्थात जिल्हा विक्री केंद्र उभारण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या शहरात अनेक मोक्याच्या ठिकाणी जागा आहेत. अशा ठिकाणी संबंधित केंद्र उभारण्यात येणार आहे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत हा प्रकल्प राबविला जात असून, यामुळे जिल्ह्यातील हजारो महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळणार, यांत शंका नाही

राज्यातील तब्बल ६० लाख कुटुंबांना या उपक्रमामुळे आर्थिक बळ मिळू शकेल तसेच, व्यवसायाकडे वळलेल्या महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहतील. महिला बचत गटांच्या उत्पादनांना आधुनिक ओळख आणि मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रत्येक 'उमेद मॉल' उभारणीसाठी सुमारे २० कोटींची निधीची तरतूद करण्यात आली आहे.

या मालांना प्राधान्य

मॉलमध्ये उपलब्ध करण्यात येणाऱ्या सर्व वस्तू ग्रामीण महिलांनी हाताने आणि नैसर्गिक पद्धतीने बनवलेल्या असतील. विविध प्रकारचे पापड, लोणची, मसाले, चटण्या, कुरड्या शेवया, सेंद्रिय धान्य,कडधान्ये, तूप, मध, लाकूड, बांबूच्या वस्तू, पर्स, बॅग्ज, हाताने विणलेल्या साड्या, ड्रेस मटेरियल, चादरी, तोरण उपलब्ध राहणार आहे याशिवाय नैसर्गिक साबण, अगरबत्ती, धूप, उटणे,सजावटीच्या वस्तूंचाही समावेश असेल.

खैरी (ढाँलगाव) येथील आरोग्य परिस्थिती नियंत्रणात

अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

कुही, दि. ८ : सावनेर तालुक्यातील खैरी (ढाँलगाव) येथे दूषित पाण्यामुळे साथ पसरल्याच्या चर्चांमध्ये तथ्य नसून परिस्थिती पूर्णपणे प्रशासनाच्या नियंत्रणात आहे. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, गावात 4 ते 7 जानेवारीदरम्यान केवळ 11 पोटदुखीचे रुग्ण आढळले होते. आज (दि. 8) सर्वेक्षणात एकही नवीन रुग्ण आढळलेला नाही, अशी माहिती जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

माध्यमांमध्ये 65रुग्णांचा उल्लेख आहे, ते साथीचे रुग्ण नसून आरोग्य शिबिरात बीपी, शुगर व इतर तपासणीसाठी आलेले लाभार्थी आहेत. फुटलेल्या पाईपलाईनची तातडीने दुरुस्ती करण्यात आली आहे. गावात 24 तांस आरोग्य पथक तैनात असून नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असेही आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत यांनी नागरिकांना पाणी उकळून पिण्याचे व 'आरोग्य पंचसूत्री' पाळण्याचे आवाहन केले आहे. आज अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. इनामदार, बीडीओ मनोजकुमार हरुडकर व आरोग्य पथकाने गावाला भेट देऊन पाहणी केली आहे.

अजिंक्य भारत
आपलं अकोला
अकोला, शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ www.ajinkyabharat.com

शेतातील विद्युत कुंपणाचा धक्का; वृद्धाचा जागीच मृत्यू

मूर्तिजापूर : पिकांच्या संरक्षणासाठी शेताभोवती लावलेल्या जिवंत विद्युत कुंपणाचा जोरदार धक्का बसून एका ६० वर्षीय वृद्धाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना तालुक्यातील निंभा शिवारात गुरुवारी (दि. ८) सकाळी घडली. बळीराम तुरशीराम चिंते (६०) असे मृतकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निंभा येथील अनिल श्रीराम चिंते हे गेल्या १५ वर्षांपासून सर्व्हे नं. २४७ मधील गायरान जमिनीत शेती (वाहिती) करतात. रानडुकरांसारख्या वन्यप्राण्यांपासून पिकांचे नुकसान होऊ नये, यासाठी त्यांनी शेताभोवती तारेचे कुंपण घालून त्यात विद्युत प्रवाह सोडला होता. बळीराम चिंते हे या शेताची रात्रंदिवस रखवाली करीत होते. गुरुवारी सकाळी शेतात काम करत असताना अनावधानाने त्यांचा स्पर्श कुंपणाच्या जिवंत विद्युत तारेला झाला. विजेचा जोरदार धक्का बसल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास नातेवाईक डबा घेऊन शेतात गेले असता, बळीराम हे मृतावस्थेत आढळून आले. घटनेची माहिती मिळताच मूर्तीजापूर ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविला.

अकोल्याचा वीर सुपुत्र शहीद : कुपवाडा चकमकीत नायक वैभव लहाने यांना वीरमरण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : देशाच्या सीमांचे रक्षण करताना अकोला जिल्ह्याचा वीर सुपुत्र नायक वैभव श्रीकृष्ण लहाने यांनी आपल्या प्राणांची आहुती देत सर्वोच्च बलिदान दिले. जम्मूकाश्मीरमधील कुपवाडा सेक्टरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत दि. ७ जानेवारी २०२६ रोजी ते शहीद झाले. त्यांच्या शौर्याने आणि त्यागाने संपूर्ण जिल्हा शोकसागरात बुडाला आहे.

नायक वैभव श्रीकृष्ण लहाने (२४) हे भारतीय सैन्याच्या १२ मराठा लाइट इन्फंट्री या प्रतिष्ठित युनिटमध्ये कार्यरत होते. दहशतवाद्यांशी निडरपणे मुकाबला करत असताना त्यांनी मातृभूमीसाठी आपले प्राण अर्पण केले. देशाच्या संरक्षणासाठी अखेरच्या श्वासापर्यंत लढणाऱ्या या जवानाने पुन्हा एकदा मराठा जवानांची पराक्रमाची परंपरा उजळून काढली.

शहीद वैभव लहाने यांचे मूळ गाव कपिलेश्वर (पो. वडद, ता. अकोला) असून सध्या त्यांचा मुक्काम श्री गजानन नगरी, कौलखेड येथे होता. ते दोन भावंडांपैकी

एक होते. त्यांचे धाकटे बंधू राजू लहाने हे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात () देशसेवेत कार्यरत आहेत. एकाच कुटुंबातील दोन जवान देशासाठी सेवा देत असल्याने लहाने कुटुंबाचा देशाभिमान अधिकच अधोरेखित झाला आहे.

मनमिळाऊ स्वभाव, कर्तव्यनिष्ठा आणि देशप्रेमासाठी ओळखले जाणारे वैभव लहाने सहकाऱ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय होते. देशाच्या सुरक्षेसाठी काहीही करण्याची तयारी ठेवणारा हा जवान अखेर शहिद झाला, मात्र त्याचे बलिदान कायम प्रेरणादायी ठरणार आहे.

शहीद जवानांचे पार्थिव दि. ९ जानेवारी रोजी दुपारी १ वाजेपर्यंत कपिलेश्वर येथे पोहोचणार असून, शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने दिली आहे.

वीर जवान वैभव लहाने यांच्या शहादतीमुळे अकोला जिल्ह्यासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. मात्र, त्यांच्या शौर्याचा अभिमान प्रत्येक भारतीयाच्या मनात सदैव जिवंत राहील.

जय जवान जय भारत!

महत्त्वाचे

रॅलीच्या माध्यमातून मतदार जनजागृती

अकोला : अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून या अनुषंगाने आज दि. ८ जानेवारी २०२६ रोजी अकोला महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांव्दारे मतदान जनजागृती रॅली, काढून शाळापरिसरांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली आहे. या रॅलींच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील सहभाग आणि जबाबदार मतदाराची भूमिका याबाबत जागृत करण्यात येत आहे. आजच्या जनजागृती रॅलीमध्ये महानगरपालिका गुजराती शाळा क्रमांक १, महानगरपालिका सिंधी हिंदी शाळा क्रमांक १, आर्य समाज मंदिर, डीएव्ही कॉन्व्हेंट अकोला तसेच स्वावलंबी विद्यालय अशा ५ शाळांचा समावेश होता. सदर रॅलीची सुरूवात मनपा शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी मतदार जनजागृती हरिश्चंद्र इटकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आली. यावेळी नोडल अधिकारी नईम फरास, मुख्याध्यापक गजेंद्र ढवळे, मुख्याध्यापक युवराज पठाडे सर, हरीश शर्मा सर, राहुल जी ठाकूर, विपुल राणा, यांचे सह सर्व शाळांचे शिक्षक तसेच पालक वर्गाची उपस्थिती होती.

दुचाकीसाठी नवीन ३० सीसी मालिका सुरू

अकोला : प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला येथे अकोला कार्यक्षेत्रातील रहिवाशांसाठी दुचाकी वाहनांसाठी नवीन ३० सीसी नोंदणी मालिका सुरू करण्यात आली आहे. आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक इच्छुक वाहनधारकांना विहित शुल्क भरून राखीव करता येणार आहेत. यासाठी अर्जदारांनी दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला येथे अर्ज सादर करावेत. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास लिलाव पद्धतीने क्रमांक निश्चित करण्यात येईल. लिलावाची यादी त्याच दिवशी सायंकाळी ४ वाजता नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली जाणार असून, पात्र अर्जदारांसाठी दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. पसंतीच्या क्रमांकासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार विहित शुल्क आकारले जाणार असून, राखीव क्रमांकाची वैधता १८० दिवसांची राहील. या कालावधीत वाहन नोंदणी न झाल्यास क्रमांक रद्द होऊन तो पुन्हा सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध होईल. सदर लिलावानंतर उर्वरित आकर्षक व पसंतीचे क्रमांक नागरिकांना सीटीझन पोर्टलद्वारेही उपलब्ध होतील, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी रविंद्र भुयार यांनी दिली.

काऊंटडाऊन सुरू! प्रचाराला वेग; हातात फक्त ५ दिवस

पॅनलमध्ये ताळमेळाचा अभाव; दिग्गज उमेदवारांचा एकला चलो रेचा पवित्रा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : महापालिकेच्या निवडणुकीचा रणसंग्राम आता निर्णायक वळणावर येऊन ठेपला आहे. प्रचारासाठी आता केवळ शेवटचे ५ दिवस शिल्लक राहिल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर प्रचाराची तोफ थंडावणार असून, त्यानंतर केवळ छुप्या प्रचाराला (डोअर टू डोअर) सुरुवात होईल. अवघ्या १३० तासांचा अवधी हातात असल्याने उमेदवारांनी रात्रंदिवस एक केला आहे, मात्र या धावपळीत पॅनलमधील अंतर्गत गटबाजीने पक्षांची डोकेदुखी वाढवली आहे.

निवडणूक जाहीर झाल्यापासून आतापर्यंत ५ दिवसांचा कालावधी उलटला असला तरी, मतदारांपर्यंत पोहोचणे अनेक उमेदवारांना अद्याप शक्य झालेले नाही. मोठ्या प्रभागांमुळे प्रत्येक मतदाराच्या दारापर्यंत पोहोचण्याचे आव्हान मोठे आहे. हातात उरलेल्या या १३०

तासात सभा, पदयात्रा आणि कोपरा सभांचे नियोजन कोलमडताना दिसत आहे. त्यातच थंडीचा कडाका आणि मतदारांची उदासीनता यामुळे उमेदवारांची दमछाक होत आहे. प्रभाग पद्धतीच्या या निवडणुकीत राजकीय पक्षांनी तीन किंवा चार उमेदवारांचे पॅनल मैदानात उतरवले आहे. सुरुवातीला एकच गट, एकच विचार म्हणणारे उमेदवार आता मतदानाचा दिवस जवळ येताच विखुरले गेल्याचे चित्र आहे. पॅनलमधील एखादा उमेदवार जनसंपर्कात कमी असेल किंवा मतदारांमध्ये त्याच्याबद्दल नाराजी असेल, तर त्याचा फटका संपूर्ण पॅनलला बसतो, असे बोलले जात आहे.

कार्यकर्त्यांमध्ये मरगळ

■ निवडणुकीच्या या रणसंग्रामात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील प्रचाराचा फरक प्रकर्षाने जाणवत आहे. भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहीर सभा झाल्याने तेथील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. मात्र, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या मोठ्या नेत्यांच्या सभा अद्याप झालेल्या नाहीत. यामुळे या पक्षांच्या उमेदवारांना प्रचारात एकाकी पडल्यासारखे वाटत असून कार्यकर्त्यांमध्ये मरगळ दिसून येत आहे. राष्ट्रवादी (अजित पवार गट) भाजपसोबत सत्तेत असल्याने त्यांना वरिष्ठांच्या पाठबळाची फारशी चिंता नसल्याचे दिसत आहे.

वैयक्तिक ब्रँडिंगवर भर

■ कमकुवत उमेदवारांमुळे आपण पराभवाच्या खाईत का पडावे? या भावनेतून दिग्गज उमेदवारांनी आता पॅनलचा प्रचार करण्याऐवजी स्वतःच्या वैयक्तिक प्रचारावर आणि स्वतःच्या चिन्हावर भर दिला आहे. अनेक प्रभागांत दिग्गज उमेदवारांनी आपल्या साथीदारांना मागे सारून स्वतंत्रपणे मतदारांच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे.

नवख्या उमेदवारांची कसरत

■ अनेक प्रभागांत दिग्गज उमेदवारांसोबत असे काही उमेदवार दिले गेले आहेत, ज्यांना राजकारणाचा कोणताही गंध नाही. अशा नवख्या उमेदवारांना सोबत घेऊन चालणे दिग्गजांसाठी कठीण जात आहे. त्यांना प्रचाराची पद्धत, मतदारांशी बोलण्याची शैली आणि राजकीय गणिते समजून सांगण्यातच मोठा वेळ खर्ची पडत आहे.

१८ राजकीय पक्षांचे नशीब पणाला; १६ जानेवारीला स्पष्ट होणार चित्र

महासंग्राम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : महानगरपालिका निवडणुकीच्या रणसंग्रामात राष्ट्रीय आणि प्रांतीय पक्षांसह एकूण १८ राजकीय पक्षांनी आपले उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. विशेष म्हणजे, शहर स्तरावरील महानगर विकास समितीनेही आपले स्वतंत्र उमेदवार उभे केल्याने निवडणुकीत चुरस वाढली आहे. निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेत पडलेल्या फुटीमुळे यंदा राजकीय पक्षांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. मात्र, दुसरीकडे जनता दल, राष्ट्रीय जनता दल, अखिल भारतीय गाय सेना आणि रिपाइं (कवाडे गट) या पक्षांनी या निवडणुकीतून माघार घेत आपले उमेदवार दिलेले नाहीत.

यावेळच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टी, एमआयएम, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि आम आदमी पार्टी यांसारखे मोठे पक्ष आमनेसामने आहेत. यामध्ये आम आदमी पक्षाने ६, बसपाने ४, तर प्रहार जनशक्ती पक्ष आणि वेलफेअर पार्टी ऑफ इंडियाने प्रत्येकी ३ उमेदवार दिले आहेत. याशिवाय पिपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक, राष्ट्रीय समाज पक्ष, समाजवादी पक्ष, पिपल्स रिपब्लिकन पार्टी आणि लोकतांत्रिक जनाधार पक्ष यांनी प्रत्येकी एक उमेदवार मैदानात उतरवला आहे. २०१७ च्या निवडणुकीत सक्रिय असलेला लोकजनशक्ती पक्ष यंदा मात्र रिंगणात नाही. आतापर्यंतच्या निवडणुकांचा इतिहास पाहता लहान पक्षांना फारसे यश मिळालेले नसून, त्याऐवजी आघाड्या किंवा समित्यांनीच बाजी मारल्याचे चित्र दिसले आहे. त्यामुळे यावेळच्या निवडणुकीत प्रस्थापित पक्षांना शह देऊन लहान पक्ष महापालिकेत आपले खाते उघडण्यात यशस्वी होतात का, हे १६ जानेवारीला होणाऱ्या निकालानंतरच स्पष्ट होईल.

शालेय वादातून लग्नसमारंभात रक्तरंजित हत्याकांड

दोन आरोपींना जन्मठेप, प्रत्येकी ५ हजार दंड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : शाळेतील किरकोळ वादाचा राग मनात धरून लग्नसमारंभात थेट जीवघेणा हल्ला केल्याच्या खळबळजनक प्रकरणात अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाने दोन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. प्रत्येकी ५ हजार दंड ठोठावण्यात आला असून दंड न भरल्यास तीन महिन्यांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे.

ही घटना १२ डिसेंबर २०२१ रोजी सिव्हिल लाईन्स पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दुबेवाडी येथील मंगलम लॉन येथे घडली. येथे एका कुटुंबाचे लग्नसमारंभ सुरू असताना रात्री सुमारे ९.३० वाजताच्या सुमारास अकोट फॉल्स परिसरातील दोन अल्पवयीन मुले आपल्या मित्रांसह त्रिशिकेश सांजे आणि वैभव भंडारी लग्नात सहभागी झाले होते. दरम्यान, शाळेतील जुन्या व किरकोळ तक्रारीवरून त्यांचा रोहित उर्फ लखन कैलाश कांबळे याच्याशी वाद झाला. उपस्थितांनी वेळीच हस्तक्षेप करत हा वाद शांत केला.

मात्र, काही वेळाने चारही आरोपी पुन्हा घटनास्थळी परतले आणि त्यांनी रोहित उर्फ लखन याच्यावर अचानक हल्ला चढवला. आरोपींनी त्याच्यावर वारंवार चाकूने वार करत गंभीर जखमी केले व तेथून फरार झाले. लग्नात उपस्थित तरुणांनी तातडीने जखमी रोहितला सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलिस निरीक्षक संतोष महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शक्ती कांबळे, पवन यादव व संदीप काटकर यांनी तात्काळ तपास सुरू केला. दोन अल्पवयीन मुलांसह चारही आरोपींना अटक करून सिव्हिल लाईन्स पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणाचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलिस निरीक्षक पंकज कांबळे व संजय टाले यांनी तपास करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयात खटल्याची सविस्तर सुनावणी झाली. सरकारतर्फे विशेष सरकारी वकील श्याम खोटरे यांनी सक्षमपणे बाजू मांडली, तर आरोपींच्या वतीने अली रझा खान, अयुब नौरंगाबादी, तसेच वैभव भंडारी यांच्यासाठी ऋषिकेश सांजे व मुन्ना खान यांनी बचाव पक्ष सादर केला.

सर्व साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल व इतर ठोस पुरावे ग्राह्य धरत न्यायालयाने दोन्ही प्रमुख आरोपींना दोषी ठरवले आणि त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या घटनेत सहभागी असलेल्या उर्वरित दोन अल्पवयीन आरोपींचा खटला सध्या बाल न्यायालयात प्रलंबित आहे. या निकालामुळे पीडित कुटुंबाला काहीअंशी न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत असून, समाजात अशा हिंसक प्रवृत्तींना आळा बसावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

घराघरांत पोहोचणार मतदान चिट्ठी; ६५० कर्मचाऱ्यांची फौज मैदानात!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : महापालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली असून, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात ८ जानेवारी रोजी महत्वपूर्ण बैठक पार पडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृहात आयोजित

या बैठकीत उपायुक्त विजय पारतवार यांनी मतदान केंद्र पर्यवेक्षकांना मतदान चिठ्ठी वितरणासंदर्भात सविस्तर सूचना दिल्या. महापालिकेच्या २० प्रभागांमधील मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी ५० पर्यवेक्षक, ५०० बी.एल.ओ. आणि १५० आशा वर्कर अशा एकूण ६५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, ९ जानेवारी ते १३ जानेवारी २०२६ या कालावधीत मतदान चिठ्ठ्यांचे १०० टक्के वाटप पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विविध माध्यमांतून जनजागृती करण्यासोबतच प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या या चिठ्ठ्यांचे वाटप करताना मतदारांना पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देशही उपायुक्तांनी यावेळी दिले. या बैठकीला निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, छपाई साहित्य नोडल अधिकारी संजय राजनकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनुप चौधरी आणि जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा यांच्यासह सर्व पर्यवेक्षक उपस्थित होते.

स्वीकृत नगरसेवक पदावरून राजकीय 'सेटलमेंट'

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : तिकीट वाटप केल्यानंतर बंडखोरी रोखण्यासाठी मुख्य पक्षांनी स्वीकृत नगरसेवक पदाचे गाजर दाखवून शांत केले. यावेळी स्वीकृत नगरसेवक हे पद राजकीय गणिते जुळवण्यासाठी सर्वात प्रभावी शस्त्र म्हणून वापरण्यात आल्याचे पाहायला मिळाले. राज्य सरकारने वर्षभरापूर्वी घेतलेल्या निर्णयानुसार, आता महापालिकेत प्रत्येक १५ निर्वाचित नगरसेवकांमागे एक स्वीकृत नगरसेवक नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली आहे. अकोला महापालिकेची एकूण सदस्यसंख्या ८० असल्याने या नवीन नियमानुसार किमान ५ स्वीकृत नगरसेवकांची वर्णी लागण्याची शक्यता आहे. मात्र, ही नियुक्ती लोकशाहीच्या निकषांनुसार तज्ज्ञ व्यक्तींच्या अनुभवाचा लाभ शहराला करून देण्यासाठी होण्याऐवजी, पक्षांतर्गत बंडाळी रोखण्यासाठी आणि तिकीट न मिळालेल्या नाराजांना शांत करण्यासाठी वापरण्यात आली आहे. त्यामुळे मुख्य पक्षातील तिकीट नाकारलेल्या इच्छुकांना स्वीकृत नगरसेवक पदाचे आमिष दाखवून शांत करण्यात आले आहे. उमेदवारी न मिळालेल्या सक्षम नेत्यांना 'तुम्ही आता माघार घ्या, सत्ता आल्यावर तुम्हाला स्वीकृत नगरसेवक म्हणून महापालिकेत पाठवू' असे शब्द दिले जात असल्याच्या चर्चा राजकीय कट्ट्यांवर रंगू लागल्या आहेत. यामुळे निवडणूक लढवण्यापूर्वीच 'सेटलमेंट' आणि 'ॲडजस्टमेंट'चे राजकारण अधिक गडद झाले आहे. मुळात स्वीकृत नगरसेवक पदासाठी सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय किंवा प्रशासकीय क्षेत्रातील गाढा अनुभव असलेल्या व्यक्तींची निवड होणे अपेक्षित असते, जेणेकरून शहराच्या विकासात्मक धोरणांमध्ये त्यांच्या ज्ञानाचा उपयोग होईल. परंतु, सध्याचे चित्र पाहता हे पद केवळ राजकीय पुनर्वसनाचे साधन बनले आहे. ज्यांना प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात उतरणे शक्य नाही किंवा ज्यांच्यामुळे पक्षांतर्गत समीकरणे बिघडू शकतात, अशा नेत्यांसाठी हे पद एक सुरक्षित मार्ग ठरत आहे. अकोल्यातील राजकीय समीकरणे पाहता, प्रत्येक मोठा पक्ष आपल्या निष्ठावान पण नाराज कार्यकर्त्यांना या पदाचे गाजर दाखवून निवडणुकीत कामाला लावले आहे.

आयोजन

तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीच्यावतीने पोस्टर प्रदर्शनी

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त भव्य प्रदर्शनी व जनजागृती सप्ताह

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त अकोला पोलीस दलाच्या वतीने दिनांक २ जानेवारी २०२६ ते ८ जानेवारी २०२६ या कालावधीत पोलीस लॉन येथे भव्य प्रदर्शनी व जनजागृती सप्ताह यशस्वीपणे आयोजित करण्यात आला. या सप्ताहाचे आयोजन अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले होते.या सप्ताहांतर्गत नागरिक व विशेषतः विद्यार्थ्यांमध्ये कायदा, सुरक्षा व सामाजिक जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात आले.

या प्रदर्शनीमध्ये अकोला पोलीस दलातील डॉग स्कॉड युनिट, पारपत्र विभाग, मदत क्रमांक ११२, दामिनी पथक, सायबर सेल, शस्त्रांची माहिती, शहर वाहतूक

नियंत्रण शाखेमार्फत रस्ता सुरक्षा अभियान, भरोसा सेल (महिला सहाय्यता मदत कक्ष) तसेच पोलिस बँड पथक यांची सविस्तर माहिती देण्यात आली. प्रत्येक विभागाने प्रत्यक्ष प्रात्यक्षिके व माहिती फलकांच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

तसेच तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी, अकोला यांच्या वतीने अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे यांच्या संकल्पनेतून बालकांचे अधिकार व हक्क याबाबत विशेष पोस्टर प्रदर्शनी आयोजित करण्यात आली. जिल्हा समन्वयक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रदर्शनी साकारण्यात आली. या जनजागृती सप्ताहात अकोला शहर व जिल्ह्यातील १०० हून अधिक शाळांमधील हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून महत्त्वपूर्ण माहिती प्राप्त केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अकोला पोलीस दलातर्फे गोपाल मुकंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. बाल अधिकार पोस्टर प्रदर्शनीदरम्यान तिक्ष्णगत संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार, मार्गदर्शक ॲड. संजय सेंगर उपस्थित होते. बाल अधिकारांबाबत माहिती श्वेता शिरसाट, उमेश शिरसाट, यश साळवे व अंकुश शिरसाट सपना म्हात्रे, करण पळसपगार, भीमा शिरसाठ, भरत ठोबरे, यांनी दिली. यावेळी तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मध्य रेल्वेची विनातिकीट प्रवाशांविरुद्ध धडक कारवाई

३०.७५ लाख प्रवाशांकडून १८३.१६ कोटींचा दंड वसूल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : मध्य रेल्वेने अनधिकृत व विनातिकीट प्रवास रोखण्यासाठी आपली कारवाई अधिक तीव्र केली असून, आर्थिक वर्ष २०२५२६ दरम्यान मोठ्या प्रमाणावर यश मिळवले आहे. प्रवाशांना सुरक्षित, सुरळीत व आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळावा, या उद्देशाने मध्य रेल्वेने नियोजित व व्यापक तिकीट तपासणी मोहिमा राबवल्या आहेत.

आर्थिक वर्ष २०२५२६ (एप्रिल ते डिसेंबर २०२५) या कालावधीत मध्य रेल्वेच्या विशेष तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट किंवा अपूर्ण/अवैध तिकिटासह प्रवास करणाऱ्या तब्बल ३०.७५ लाख प्रवाशांवर कारवाई केली. मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीत ही संख्या २८.०१ लाख होती. त्यामुळे यंदा सुमारे १० टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. या कालावधीत दंडापोटी १८३.१६ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली असून, मागील वर्षीच्या १५१.९९ कोटी रुपयांच्या तुलनेत ही रक्कम २० टक्क्यांपेक्षा अधिक वाढलेली आहे. डिसेंबर २०२५ महिन्यातील आकडेवारीनुसार, मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी ३.२४ लाख विनातिकीट प्रवाशांवर कारवाई केली. डिसेंबर २०२४ मध्ये ही संख्या २.९३ लाख होती. याच महिन्यात दंडापोटी १८.२५ कोटी रुपये वसूल करण्यात आले, जे मागील वर्षीच्या १३.५५ कोटी रुपयांच्या तुलनेत सुमारे ३५ टक्के वाढ दर्शवते. विभागनिहाय तपशील (एप्रिल ते डिसेंबर २०२५): भुसावळ विभाग: ७.५४ लाख प्रकरणांतून ६३.८३ कोटी रुपये मुंबई विभाग: १२.८२ लाख प्रकरणांतून ५५.१२ कोटी रुपये पुणे विभाग: ३.४१ लाख प्रकरणांतून २०.८४ कोटी रुपये नागपूर विभाग: ३.३३ लाख प्रकरणांतून २०.७५ कोटी रुपये सोलापूर विभाग: १.८१ लाख प्रकरणांतून ८.३९ कोटी रुपय मुख्यालय: १.८३ लाख प्रकरणांतून १४.२२ कोटी रुपये मध्य रेल्वेने विनातिकीट प्रवाशांना रोखण्यासाठी स्थानक तपासणी, सापळा तपासण्या, किल्ला तपासण्या, सखोल तपासण्या तसेच मेगा तिकीट तपासणी मोहिमा अशा बहुआयामी धोरणाची अंमलबजावणी केली आहे. ही कारवाई मेल/एक्सप्रेस, स्थानिक, विशेष गाड्या तसेच मुंबई व पुणे विभागातील उपनगरी गाड्यांमध्ये नियमितपणे करण्यात येत आहे.

मध्य रेल्वेने प्रवाशांना आवाहन केले आहे की, अधिकृत विक्रेते, स्थानक बुकिंग काउंटर, वेबसाईटद्वारेच वैध तिकिटे काढून प्रवास करावा.

महत्त्वाचे

पत्रकार संघाच्या दिनदर्शिकेचे पालकमंत्र्यांच्या हस्ते विमोचन

अकोट : ग्रामीण पत्रकार संघ (र.न. ए.के.एल. ६७६५) अंतर्गत अकोट तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या सन २०२६ च्या दिनदर्शिकेचे विमोचन नुकतेच पार पडले. अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री ना. ॲड. आकाश पुंडकर यांच्या हस्ते खामगाव नगर परिषद सभागृहात हा सोहळा संपन्न झाला. यावेळी ग्रामीण पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष गजानन वाघमारे, राज्य सचिव राजेश डांगटे, राज्य सहसचिव तथा प्रतिभा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अविनाश राठोड, राज्य निमंत्रक गोपाल चव्हाण, विभागीय उपाध्यक्ष अहमद शेख, समन्वयक कमलेश राठी, बुलढाणा जिल्हाध्यक्ष प्रमोदबाप्पू देशमुख, अकोट तालुकाध्यक्ष नरेंद्र कोंडे, कार्याध्यक्ष अरुण काकड, संघटक वैभव गुजरकर, राम रोहणकार, सुशील वनकर यांच्यासह ग्रामीण पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री ना. ॲड. आकाश पुंडकर यांनी ग्रामीण पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित करत पत्रकारांच्या कार्याचे कौतुक केले. ग्रामीण भागातील प्रश्न शासनापर्यंत पोहोचविण्यात पत्रकारांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

भाजपच्या मूर्तिजापूर शहराध्यक्षपदी राम जोशी यांची नियुक्ती

मूर्तिजापूर : भारतीय जनता पक्षाच्या मूर्तिजापूर शहराध्यक्षपदी राम जोशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश व जिल्हा नेतृत्वाच्या मान्यतेनंतर ही नियुक्ती अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आली असून, यामुळे शहरातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. राम जोशी हे गेल्या अनेक वर्षांपासून भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून पक्षात सक्रिय आहेत. त्यांना संघटनात्मक कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे. विविध सामाजिक उपक्रम, निवडणूक व्यवस्थापन आणि पक्षवाढीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेऊनच त्यांची शहराध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचे पक्ष सूत्रांनी सांगितले. या नियुक्तीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना राम जोशी म्हणाले, पक्षाने माझ्यावर सोपवलेली जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडेन. मूर्तिजापूर शहरात भाजपची संघटना अधिक बळकट करणे, प्रत्येक प्रभागात कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे उभे करणे आणि केंद्र व राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, हे माझे प्रमुख उद्दिष्ट राहील. या निवडीबद्दल भाजपचे जिल्हा पदाधिकारी, माजी नगरसेवक, युवा मोर्चा तसेच महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी राम जोशी यांचे अभिनंदन केले आहे. आगामी नगरपरिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, भाजप आता अधिक आक्रमकपणे तयारीला लागल्याचे संकेत मिळत आहेत. जोशी यांच्या नेतृत्वाखाली शहरात भाजपची संघटनात्मक पकड अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

लोहारा मुख्य रस्त्याची 'चाळण'; अतिक्रमण आणि सांडपाण्यामुळे नागरिक त्रस्त

प्रशासन सुस्त; खड्डे आणि घाणीमुळे अपघातांसह आजारांचा धोका वाढला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

कळंबी महागाव, दि. ८ : अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील लोहारा येथे 'लोहारा फाटा ते जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रीय शाळे'पर्यंतचा मुख्य रस्ता सध्या समस्यांचे आगार बनला आहे. रस्त्यावर पडलेले मोठे खड्डे, तुंबलेली गटारे आणि वाढते अतिक्रमण यामुळे या मुख्य रस्त्याला अक्षरशः गटाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

संबंधित विभागातील कोणताही अधिकारी या गंभीर समस्येकडे लक्ष देण्यास तयार नसल्याचा आरोप संतप्त नागरिकांकडून केला जात आहे. मुख्य रस्त्यावरील गटारे तुंबल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत आहे. खड्ड्यांमध्ये साचलेल्या या दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे रोगराई पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. सद्यस्थितीत 'हा रस्ता आहे की पानंद?' असा संतप्त सवाल विद्यार्थी आणि वाहनचालक उपस्थित करत आहेत.

लोहारा गावात मुख्य ठिकाणी आठवडी बाजार भरतो, त्यामुळे शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, कर्मचारी, कामगार, व्यावसायिक आणि नागरिकांची या रस्त्यावर सतत वर्दळ असते. मात्र, रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, वाहन चालविताना नेमका कोणता खड्डा चुकवावा? असा प्रश्न चालकांना पडत असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. तसेच साचलेल्या पाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गावातून फाट्याकडे जाण्यासाठी हा एकमेव मुख्य मार्ग असल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाताना मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन रस्ता दुरुस्त करावा, खड्डे बुजवावेत आणि सांडपाण्यासाठी नाल्यांचे योग्य बांधकाम करावे; अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वाहनधारक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांनी दिला आहे.

मान्यात घोणसाचा थरार; सर्पमित्रांच्या सतर्कतेने टळला अनर्थ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मूर्तिजापूर, दि. ८ : तालुक्यातील माना येथे गुरुवारी सकाळी एका शेतात आढळलेल्या विशालकाय सापाने एकच खळबळ उडवून दिली. सुरुवातीला हा साप अजगर असल्याचा अंदाज वर्तविला जात होता, मात्र सर्पमित्रांनी शहानिशा केली असता, तो भारताच्या बिग फोर विषारी सापांपैकी एक असलेला अतिविषारी घोणस (रसेल वायपर) असल्याचे निष्पन्न झाले. सर्पमित्रांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे.

माना येथील संजय मन्हर यांच्या शेतात काम सुरू असताना हा प्रकार घडला. सापाचे आकारमान पाहून उपस्थितांची घाबरगुंडी उडाली. या सापाला अजगर समजून बघ्यांनी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळताच सर्पमित्र मुन्ना श्रीवास आपल्या टीमसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाहणी केली असता, हा साप बिनविषारी अजगर नसून अत्यंत आक्रमक आणि विषारी घोणस असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

सर्पमित्र मुन्ना श्रीवास यांनी तत्काळ उपस्थितांना बाजूला सारत शांत राहण्याचे आवाहन केले. यानंतर त्यांचे सहकारी रिशी श्रीवास व शिवम वानखेडे यांनी अत्यंत शिताफीने आणि कौशल्याने या घोणसाला सुरक्षितरित्या जेरबंद केले. यावेळी मुन्ना श्रीवास यांनी ग्रामस्थांना सापांविषयी माहिती देत, अंधश्रद्धा व भीती दूर करण्याचा प्रयत्न केला.

पकडलेल्या सापाला नंतर नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. सर्पमित्रांच्या या तत्परतेमुळे शेतात काम करणाऱ्या मजुरांवरील आणि ग्रामस्थांवरील संभाव्य संकट टळले. या कामगिरीबद्दल मानावासीयांनी सर्पमित्र टीमचे आभार मानले आहेत.

अकोटमध्ये पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा भव्य सत्कार सोहळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोट, दि. ८ : शहरात ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनानिमित्त अकोट शहर व तालुक्यातील पत्रकार बांधवांचा सत्कार सोहळा छत्रपती शिवबा बहुउद्देशीय सेवा शिक्षण संस्था, अकोट (छत्रपती शिवबा प्रतिष्ठान) यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. संतोष गजानन खवले यांच्या हस्ते शहर व ग्रामीण भागातील पत्रकारांना सन्मानपत्र आणि भेटवस्तू देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहकार क्षेत्रातील व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्व. हिदायत पटेल यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर महापुरूषांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा आणि महत्त्वाचा स्तंभ असून, त्यांच्या कार्याचा गौरव व सन्मान करणे हाच या कार्यक्रमामागील मुख्य हेतू आहे, असे प्रतिपादन ॲड. संतोष खवले यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुरुषोत्तम इंगोले होते. प्रमुख अतिथी म्हणून शहरातील प्रतिष्ठित पत्रकार अहेमद शेख, संतोष विणके, गणेश वाकोळे, नरेंद्र कोंडे, कु. प्रियांका केदार, दामोदर सर, प्रकाश गायकी, नितीन तेलगोटे, पवन बेलसरे, धनु बायवर तसेच युवा प्रतिष्ठानचे वैभव जगताप उपस्थित होते. यावेळी उपस्थित पत्रकार बांधवांनी आपले विचार मांडत आयोजकांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वंश दांदळे, श्रीवेश देशमुख, उमेश गारोळे, गौरव धांडे, अविनाश नाटेकर अमृता खवले, स्टेफी पेरेंजी, स्नेहा झास्कर, पेरेंजी मॅडम, सागर वाघमारे, महेश वाघमारे, महेश वाघ, गणेश नारे, साजिद शेख, पवन मोरे व प्रफुल मते यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण बोन्द्रे यांनी केले, प्रास्ताविक निखिल वानखडे यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन वंश दांदळे यांनी केले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

पातूरमध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

पातूर, दि. ८ : अकोला जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने पातूर तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेसाठी मंगळवारी (दि. ७) स्व. नलिनीताई राऊत वैद्यकीय महाविद्यालयात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया (लेप्रोस्कोपी) शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २३ पात्र लाभार्थ्यांवर यशस्वीरीत्या कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

हे शिबिर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत पवार, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. शिबिराचे संपूर्ण नियोजन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिकारी डॉ. लोखंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या शिबिरात शल्यचिकित्सक (सर्जन) डॉ. सिरसाम यांनी सर्व २३ शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केल्या.

शस्त्रक्रियेदरम्यान आणि त्यानंतर लाभार्थ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये तसेच आरोग्याची काळजी घेतली जावी, यासाठी आरोग्य विभागाने विशेष दक्षता घेतली. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी पातूर तालुक्यातील पातूर, आलेगाव, बाबुळगाव, सस्ती व मळसूर या पाचही प्राथमिक आरोग्य केंद्रांतील वैद्यकीय अधिकारी, औषधी निर्माण अधिकारी, लॅब टेक्निशियन, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक-सेविका, एनएचएम कर्मचारी, परिचारक आणि परिचारिका (जीएनएम) तसेच आशा स्वयंसेविका यांनी उत्कृष्ट सांघिक कार्य केले.आरोग्य यंत्रणेच्या समन्वयातून राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले.

महंमदखान महाराज पालखीचे मूर्तिजापुरात जंगी स्वागत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मूर्तिजापूर, दि. ८ : धर्मसमन्वयाचे प्रतीक असलेल्या महर्षी श्री संत परमहंस महंमदखान महाराज यांच्या प्रेरणेने श्री क्षेत्र गणोरी (ता. भातकुली, जि. अमरावती) येथून श्री क्षेत्र शेगावकडे निघालेल्या पायदळ पालखी व दिंडी सोहळ्याचे मंगळवारी (दि. ०६) मूर्तिजापुरात आगमन झाले. सोहळ्याचे हे सातवे वर्ष असून, बोटाहिरपूर मार्गे ही पालखी भवानी नगर येथे दाखल होताच भाविकांनी तिचे भक्तिभावाने स्वागत केले.

भवानी नगर येथे गणेश जंगले, रामकृष्ण आगाशे, संतोष आगाशे व योगेश आगाशे यांच्या पुढाकाराने वारकरी व भाविकांसाठी विश्रांती आणि महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी स्वागतप्रसंगी नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल साबळे, नगरसेवक पंकज कांबे, नगरसेविका सोनल काळपांडे, शालिनीताई हजारे, समाजसेवक राम हजारे, रोहित नाखले, नारायण कांडलकर, राजेश कांडलकर, कुलदीप श्रीखंडे, दिलीप तायडे, राजेंद्र प्रजापती, पुरुषोत्तम घनमोडे, दिलीप घनमोडे, भास्कर कोराट, उमेश पोळकट, अनिल ढेंगळे, रोहित सोळंके, मिलिंद जामनिक, कार्तिक सोळंके, दिलीप काळे व कैलास गचके उपस्थित होते.

तसेच मालती जंगले, आरती आगाशे, तृप्ती नाखले, ईश्वरी आगाशे, शालिनी पुंडे, अनिता ढेंगळे व रेखा पोळकट यांच्यासह महिलांनी पालखीचे पूजन व आरती केली. यानंतर हरिनाम गजरात पालखी पुढील प्रवासासाठी शेगावकडे रवाना झाली.

आधुनिक युगात आध्यात्मिक कार्यक्रमांची नितांत गरज - केशव महाराज मोरे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : आजच्या इंटरनेट आणि एआयच्या (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधुनिक युगात समाजाला आणि विशेषतः नवीन पिढीला योग्य मार्ग दाखविण्यासाठी आध्यात्मिक कार्यक्रमांची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा समाज आणि तरुणाई दिशाहीन होऊन व्यसने व अनैतिकतेच्या आहारी जाण्याची भीती ह.भ.प. केशव महाराज मोरे यांनी व्यक्त केली.

श्री गजानन महिला भजनी मंडळ (गुरुदत्तनगर, अंबिकानगर, डाबकी रोड) यांच्या वतीने आयोजित श्रीमद् भागवत कथा सप्ताहाची सांगता बुधवारी ह.भ.प. केशव महाराज मोरे (म्हैसपूर) यांच्या काला कीर्तनाने झाली. यावेळी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करताना त्यांनी आधुनिक युगात संयम आणि सदाचाराचे महत्त्व अनेक दृष्टांतांतून पटवून दिले.

महाराज म्हणाले, आजचे युग हे इंटरनेट, मोबाईल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचे आहे. मनुष्याजवळ सर्व सुखसोयींची साधने उपलब्ध आहेत; मात्र या साधनांचा वापर कसा करायचा, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. या आधुनिकतेच्या चकाकणाऱ्या दुनियेत माणुसकी हरवू नये, यासाठी सर्वांनी आणि विशेषकरून नव्या पिढीने भागवत कथा, कीर्तन, रामायण आदी आध्यात्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहिले पाहिजे. हेच कार्यक्रम तुम्हाला जीवन प्रेमाने आणि सदाचाराने कसे जगावे, हे शिकवतील. जीवनातील प्रेमाच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य करताना ते म्हणाले, मनुष्याचे प्रेम सतत बदलत राहते. लहानपणी त्याचे आई-वडिलांवर नितांत प्रेम असते. मोठा झाल्यावर पत्नीवर, मग मुलांवर आणि मुले मोठी झाल्यावर जेव्हा ती त्याची अवहेलना करतात, तेव्हा तो पैशांवर किंवा खुर्चीवर प्रेम करू लागतो. तरीही त्याला जीवनात खरी शांती मिळत नाही. म्हणून मनुष्याने भगवंताला शरण जावे आणि ईश्वरावर निस्सीम प्रेम करावे; तिथेच खरी शांती मिळेल आणि मानवी जीवन सार्थकी लागेल. यासाठी सहकुटुंब आध्यात्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले. काल्याच्या कीर्तनानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

मैत्रीचा ओलावा! दिवंगत मित्रांच्या कुटुंबीयांना मदतीचा हात

२६ वर्षांनंतर अडगाव बु.येथे भरला वर्गमित्रांचा स्नेहमेळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अडगाव बु., दि. ८ : शाळेच्या आठवणी या मनाच्या कोपऱ्यात नेहमीच ताज्या असतात. याच आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि मैत्रीचे बंध अधिक घट्ट करण्यासाठी अडगाव बु. (ता. तेल्हारा) येथील जिल्हा परिषद विद्यालयाच्या सन २००० च्या दहावीच्या बॅचचे स्नेहसंमेलन तब्बल २६ वर्षांनंतर शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात आनंद आणि भावुकतेचा अनोखा संगम पाहायला मिळाला.

जिल्हा परिषद शाळेच्या सभागृहात आयोजित या सोहळ्याला ७० ते ८० माजी विद्यार्थी आणि त्यांना घडवणारे तत्कालीन गुरुजन आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य चारुदत्त मेहरे होते. तब्बल २६ वर्षांनी आपल्या लाडक्या विद्यार्थ्यांना पाहून शिक्षकांचेही मन भरून आले. अनेक वर्षांनी जुन्या सवंगड्यांना पाहताच उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. केवळ व्हॉट्सॲप किंवा सोशल मीडियावर संपर्कात न राहता, प्रत्यक्ष भेटून सुख-दुःख वाटून घेण्याच्या प्रबळ ओढीने हे संमेलन साकार झाले. कार्यक्रमाची सुरुवात विधिवत सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रत्येक माजी विद्यार्थ्याने आपापल्या कुटुंबाचा परिचय करून देत सध्याच्या सामाजिक व व्यावसायिक स्थितीची माहिती दिली. शाळेतील जुन्या गमती-जमती आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यावर गप्पा रंगल्या. या स्नेहसंमेलनाचे सर्वात मोठे आणि संवेदनशील वैशिष्ट्य म्हणजे जपलेली सामाजिक बांधिलकी. या बॅचमधील ज्या वर्गमित्रांचे अकाली निधन झाले आहे, त्यांना यावेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मात्र, मित्र केवळ शोक व्यक्त करून थांबले नाहीत, तर त्यांच्या कुटुंबीयांना भक्कम आधार देण्यासाठी प्रत्येकी ५ हजार रुपयांची रक्कम त्यांच्या नावे बँकेत 'मुदत ठेव' स्वरूपात जमा करण्यात आली. मैत्रीच्या या संवेदनशील उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रकाश पटके, विनोद राखोंडे, नितीन निमकर्डे, प्रवीण अढाऊ, श्रीकांत बावस्कार, जगदीप पांडव, प्रकाश रेळे, प्रशांत बावस्कार, दीपक जळमकार, सतीश नेरकर, प्रफुल्ल देशमुख आदी माजी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. स्नेहभोजनाने आणि 'पुन्हा लवकरच भेटू' या वचनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कुटासा येथे विद्यार्थ्यांची जनजागृती रॅली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

दहीहंडा, दि. ८ : महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त ६ जानेवारी २०२६ रोजी दहीहंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुटासा येथे जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने गावातील श्री. शिवाजी विद्यालय व जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून भव्य जनजागृती रॅली काढण्यात आली.

या रॅलीद्वारे अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, वाढते सायबर गुन्हे, महिलांवरील अत्याचार, वाहतूक नियमांचे पालन तसेच आपत्कालीन मदत क्रमांक ११२ व १०९८ बाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी हातात विविध संदेशांचे फलक घेऊन आणि प्रभावी घोषणा देऊन ग्रामस्थांचे प्रबोधन केले. रॅलीच्या समारोपप्रसंगी कुटासा बसस्थानक परिसरात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्याने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पोलीस विभागाने विद्यार्थ्यांच्या मदतीने राबवलेल्या या समाजप्रबोधनात्मक उपक्रमाचे नागरिक, शिक्षक व पालकांनी कौतुक केले. पोलीस व जनता यांच्यातील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी आणि सुसंवाद वाढवण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

वाशिमच्या मेडिकल कॉलेजचा वनवास संपला

जांभरून परांडे येथील या जमिनीवर शिक्कामोर्तब!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. ८ : गेल्या अनेक दिवसांपासून जागेच्या प्रतीक्षेत असलेल्या वाशिम येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने वाशिम-मालेगाव राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या जांभरून परांडे येथील जमिनीला अधिकृत मंजुरी दिली असून, यामुळे जिल्ह्यात अद्ययावत आरोग्य व्यवस्था आणि वैद्यकीय शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी वाशिम तालुक्यातील मौजे जांभरून परांडे येथील गट क्र. १०० मधील एकूण १३.५९ हेक्टर आर क्षेत्रापैकी १०.८० हेक्टर आर (सुमारे २६.६८ एकर) जमीन मंजूर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ही जमीन भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने पूर्णपणे विनामूल्य (भोगवटा मूल्यरहित) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाला प्रदान करण्यात आली आहे.

यापूर्वी महाविद्यालयासाठी चिवरा (मालेगाव) येथील ७९ एकर आणि शेलू बाजार रोडवरील २७ एकर जमिनीची चाचपणी करण्यात आली होती. मात्र, तांत्रिक बाबी आणि सोयीसुविधांचा विचार करता, अखेर मालेगाव मार्गावरील जांभरून परांडे शेत शिवारातील ई-क्लास जमिनीच्या लोकेशनला शासनाने पसंती दिली आहे. राष्ट्रीय महामार्गाला लागून असल्याने रुग्ण आणि विद्यार्थ्यांसाठी हे ठिकाण अत्यंत सोयीचे ठरणार आहे.

विभागीय आयुक्त, अमरावती आणि जिल्हाधिकारी, वाशिम यांनी सादर केलेल्या प्रस्तावानंतर राज्य शासनाने २ जानेवारी २०२६ रोजी हे अधिकृत पत्र निर्गमित केले. या निर्णयामुळे आता वाशिममध्ये लवकरच प्रशासकीय इमारत, रुग्णालय आणि वसतिगृहाचे बांधकाम सुरू होईल, ज्यामुळे जिल्ह्याच्या आरोग्य आणि शैक्षणिक वैभवात मोठी भर पडणार आहे.

मानोरा तालुक्यात युरियाचा तीव्र तुटवडा; रब्बी पिके संकटात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मानोरा, दि. ८ : तालुक्यात रब्बी हंगामातील पिके सध्या जोमाने बहरली आहेत. मात्र, पिकांच्या वाढीसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या युरिया खताचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. कृषी सेवा केंद्रांसमोर स्टॉक संपलाचे फलक झळकत असल्याने शेतकऱ्यांना रिकाम्या हाती परतावे लागत असून, याचा थेट परिणाम उत्पादनावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

बाजारात युरियाची कमतरता असल्याचे पाहून काही विक्रेते याचा गैरफायदा घेत आहेत. युरिया हवा असेल तर त्यासोबत महागडी कीटकनाशके किंवा अनावश्यक खते घेण्याची (लिंकिंग) सक्ती शेतकऱ्यांवर केली जात आहे. याशिवाय, तुटवड्याचे कारण सांगून काही ठिकाणी चढ्या दराने खताची विक्री होत असल्याच्या तक्रारीही शेतकरी करत आहेत. शासनाने या काळाबाजाराला लगाम लावावा, अशी मागणी जोर धरत आहे. सध्या गहू, हरभरा आणि मका ही पिके वाढीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर आहेत. या काळात पिकांना नत्राची (युरिया) मोठी गरज असते. वेळेवर खत न मिळाल्यास पिके पिवळी पडू लागतात आणि त्यांची वाढ खुंटते. यामुळे एकूण उत्पादनात २० ते ३० टक्क्यांपर्यंत घट येण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. गावागावात युरिया उपलब्ध नसल्याने शेतकरी शहराकडे धाव घेत आहेत. मात्र, तिथेही दुकानांसमोर युरिया उपलब्ध नाही किंवा स्टॉक संपला असे फलक पाहायला मिळत आहेत. गहू पिकाला खत देण्याची वेळ निघून जात असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

पालिकेसाठी निवडणूक ठरली लक्ष्मीप्राप्ती; वसुलीतून जमवले १.२३ कोटी!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. ८ : निवडणुकीच्या निमित्ताने का होईना, पण वाशिम नगरपरिषदेच्या तिजोरीत कोट्यवधींचा महसूल जमा झाला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक असल्याने, इच्छुक उमेदवारांना थकीत कराचा भरणा करणे भाग पडले. यामुळे एकट्या वाशिम नगरपालिकेत निवडणूक प्रक्रियेदरम्यान १.२३ कोटी रुपयांची विक्रमी करवसुली झाली आहे. ना-हरकत प्रमाणपत्राचा अस्त्र म्हणून वापर जिल्ह्यातील चार नगरपरिषदा आणि एका नगरपंचायतीच्या निवडणुकीत उमेदवारी अर्जासोबत मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि इतर शासकीय देणी थकलेली नसल्याचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य होते. या अटीमुळे वर्षानुवर्षे कर न भरणाऱ्या इच्छुकांनी तातडीने पालिकेच्या कर विभागात धाव घेतली. वाशिम नगरपालिकेत एकूण १२३ व्यक्तींनी त्यांच्या थकीत कराचा भरणा केला, ज्यामध्ये बहुतांश उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांचा समावेश होता. करवसुलीसोबतच उमेदवारी अर्ज विक्रीतूनही पालिकेला मोठा आर्थिक लाभ झाला आहे. वाशिम नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी एकूण १८२ उमेदवारी अर्जांची विक्री झाली. एका अर्जाची किंमत १,००० रुपये असल्याने, अर्जांच्या विक्रीतून पालिकेला १ लाख ८२ हजार रुपये प्राप्त झाले.

करवसुलीचा टप्पा १४ कोटींवर निवडणूक काळात झालेल्या या वेगवान वसुलीमुळे वाशिम नगरपरिषदेची एकूण करवसुली ५ जानेवारीपर्यंत १४ कोटी रुपयांच्या घरात पोहोचली आहे. थकबाकीदारांसाठी निवडणूक ही एकप्रकारे प्रशासकीय सक्ती ठरली असली, तरी पालिकेच्या तिजोरीला मात्र यामुळे मोठी बळकटी मिळाली आहे.

समृद्धी महामार्गाचा तिसरा डोळा बसवण्यासाठी लागणार ब्लॉक

गॅन्ट्री उभारणीचे काम; तांत्रिक प्रक्रियेसाठी ५ दिवस वाहतूक थांबणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. ८ : समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. अमरावती जिल्ह्यातील ९० ते १५० किलोमीटर दरम्यान महामार्गावर गॅन्ट्री उभारण्याचे काम ९ जानेवारी ते १३ जानेवारी २०२६ या कालावधीत हाती घेण्यात येणार आहे. या तांत्रिक कामाच्या सुरक्षिततेसाठी ठराविक वेळेत वाहतूक पूर्णतः बंद ठेवली जाणार आहे.

महामार्गावरून जाताना आपल्याला रस्त्याच्या आरपार लोखंडी कमानीसारखा मोठा सांगाडा दिसतो, त्यालाच तांत्रिक भाषेत गॅन्ट्री असे म्हणतात. ही यंत्रणा आधुनिक महामार्गांचा कणा मानली जाते. याचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे:

हाय-टेक देखरेख: या गॅन्ट्रीवर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टमचे सीसीटीव्ही कॅमेरे, वाहनांचा वेग मोजणारे सेन्सर्स आणि स्वयंचलित नंबर प्लेट ओळखणारी यंत्रणा बसवलेली असते. प्रवाशांना दिशा, पुढचे अंतर आणि धोक्याची सूचना देणारे डिजिटल फलक याच लोखंडी सांगाड्यावर आधारलेले असतात. वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर नजर ठेवण्यासाठी आणि हवामानाची माहिती देण्यासाठी ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरते.

गॅन्ट्री उभारताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भक्कम लोखंडी खांब लावून त्यावर अवजड आडवा सांगाडा क्रेनच्या साहाय्याने बसवला जातो. हा सांगाडा रस्त्याच्या पूर्ण रुंदीवर (आरपार) बसवला जात असताना, खालून वाहने जाणे जिवावर बेतू शकते. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी क्रेनने काम सुरू असताना ४५ ते ६० मिनिटांचा ब्लॉक घेणे अनिवार्य असते.

नियोजित कामाचा तपशील

कालावधी: ९ जानेवारी ते १३ जानेवारी २०२६ (१० टप्प्यांत काम). बाधित क्षेत्र: धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर (जि. अमरावती) परिसर.

या तांत्रिक प्रक्रियेदरम्यान वाहनचालकांनी सहकार्य करावे आणि वेळेचे नियोजन करावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने केले आहे.

कृषी समृद्धीचा जागर; बेलमंडळ येथे शेतकरी प्रशिक्षण उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

काजळेश्वर, दि. ८ : शाश्वत शेती आणि आधुनिक पीक पद्धतीची माहिती देण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने बेलमंडळ येथे एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना तूर व्यवस्थापनासह सेंद्रिय शेतीचे तंत्र अवगत करण्यात आले.

तूर व सेंद्रिय शेतीवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळ कृषी अधिकारी गुणवंत ढोकणे होते. त्यांनी तूर पिकाचे एकात्मिक व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण आणि काढणीपश्चात व्यवस्थापनावर सखोल मार्गदर्शन केले. तूर उत्पादन वाढवण्यासाठी

शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. पुरस्कार प्राप्त शेतकरी रवींद्र गायकवाड यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून देताना, घरच्या घरी सेंद्रिय निविष्ठा तयार करण्याच्या पद्धती स्पष्ट केल्या. सेंद्रिय शेतीमुळे खर्च कमी होऊन जमिनीचा पोत सुधारतो, असे त्यांनी नमूद केले.

पारवा येथील प्रयोगशील शेतकरी शिवदास ताठे यांनी त्यांच्या शेतातील यशस्वी प्रयोगांची माहिती दिली. आंबा, फणस, लिंबू लागवडीसह बांधावर शेवगा आणि चिया, कांदा लागवडीतून मिळणाऱ्या आर्थिक फायद्यांचे गणित त्यांनी शेतकऱ्यांसमोर मांडले. सहाय्यक कृषी अधिकारी ज्ञानेश्वर वाळके यांनी कृषी विभागाच्या विविध शासकीय योजना आणि अनुदानाची प्रक्रिया समजावून सांगितली.

या प्रसंगी उपकृषी अधिकारी अनिल भगत, नरेंद्र फुके, मंगेश सोळंके, चंदन राठोड, सरपंच वासनिक, ग्रामपंचायत अधिकारी बलदेव चव्हाण, देवेंद्र घुले, रवींद्र घुले, गोविंद लांडकर व कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रवीण जटाळे यांनी केले. सोपान लाहे, कामेश भाजे आणि प्रदीप शिंदे यांनी यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

आमगव्हान येथे पालखी सोहळ्याने हरिनाम सप्ताहाची सांगता

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

कोंडोली, दि. ८ : येथून जवळच असलेल्या आमगव्हान येथे श्री चंदनशेष महाराज व श्री महादेव संस्थानच्या वतीने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह आणि संगीतमय श्रीमद भागवत कथेची ७ जानेवारी रोजी उत्साहात सांगता झाली. ३१ डिसेंबरपासून सुरू असलेल्या या धार्मिक उत्सवाचा समारोप काल्याचे कीर्तन आणि भव्य पालखी सोहळ्याने करण्यात आला.

गावातून निघाली भव्य पालखी

सांगतेच्या दिवशी सकाळी गावातून भव्य पालखी सोहळा काढण्यात आला. ग्रामस्थांनी घरासमोर आकर्षक रांगोळ्या काढून आणि फटाक्यांची आतिशबाजी करत पालखीचे स्वागत केले. अनेक भाविकांनी वारकऱ्यांसाठी चहा-नाश्त्याची व्यवस्था केली होती. पालखी सोहळ्यात ज्ञानेश्वर लांडे यांनी श्रीमद भागवत ग्रंथ, तर गुणाबाई लांडे यांनी तुळशी वृंदावन डोक्यावर धारण केले होते. कोंडोली येथील ह.भ.प. उमेश महाराज आणि ह.भ.प. गोपाल नोळे यांच्या भजन संचाने पालखीत टाळ-मृदंगाची साथ दिली. सप्ताहभर मंदिराची स्वच्छता आणि रांगोळीची सेवा करणाऱ्या सीताबाई मात्रे, कुसुमबाई दहाके आणि संगीताताई कटारे यांचा संस्थानच्या वतीने साडी-चोळी देऊन विशेष सन्मान करण्यात आला. तसेच, परिसरातील वारकरी आणि सामाजिक-राजकीय क्षेत्रातील मान्यवरांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. ह.भ.प. बबन देव महाराज यांचे काल्याचे कीर्तन झाल्यानंतर दहीहंडी फोडून महाआरती करण्यात आली.

दुपारी ३ वाजता महाप्रसादाला सुरुवात झाली. आमगव्हान, कोंडोली आणि परिसरातील हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

कर्मचाऱ्यांचा संताप | दुपारी ३ वाजेपर्यंत जेवण नाही; नियोजनाचा फज्जा!

बाल सुरक्षा प्रशिक्षणात कर्मचारी उपाशीपोटी परतले

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मानोरा, दि. ८ : बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी आणि कायद्याची जनजागृती करण्यासाठी आयोजित केलेले शासकीय प्रशिक्षण प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. मानोरा येथील पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित या प्रशिक्षणात क्षमतेपेक्षा जास्त गर्दी झाल्याने अनेक कर्मचाऱ्यांना तासनतास बाहेर उभे राहावे लागले, तर जेवणाच्या विलंबाने शेकडो प्रशिक्षणार्थींना उपाशीपोटी घरची वाट धरावी लागली.

बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याची माहिती देण्यासाठी तालुक्यातील मुख्याध्यापक, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना पाचारण करण्यात आले होते. मात्र, केवळ २०० आसनक्षमता असलेल्या वसंतराव नाईक सभागृहात क्षमतेपेक्षा तिप्पट कर्मचारी बोलावले गेल्याने गोंधळ उडाला. अनेक सन्माननीय मुख्याध्यापक आणि महिला कर्मचाऱ्यांना सभागृहाच्या दारात आणि व्हरांड्यात उभे राहून अपमानित व्हावे लागले. प्रशिक्षणाचा मूळ उद्देश बाजूला राहून जागा मिळवण्यासाठीची कसरत चर्चेचा विषय ठरली. प्रशिक्षणाचे नियोजन किती सुमार होते, याचा प्रत्यय जेवणाच्या वेळी आला. वाशीम येथून मागवलेले जेवण दुपारी ३ वाजेपर्यंत कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचलेच नव्हते. सकाळी बनवलेले अन्न अत्यंत उशिरा मिळाल्याने आणि बसण्यासाठी जागा नसल्याने उपस्थित कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. शेवटी, प्रशासनाच्या या अतिथी देवो भव वृत्तीचा निषेध करत अनेक कर्मचाऱ्यांनी न जेवताच तिथून निघून जाणे पसंत केले. बाल सुरक्षा हा संवेदनशील विषय गांभीर्याने पोहोचवणे गरजेचे असताना, केवळ आकड्यांचा खेळ आणि वरवरचे नियोजन यामुळे या प्रशिक्षणाचा फज्जा उडाला आहे. तज्ज्ञ मार्गदर्शक ॲड. पूजा अग्रवाल आणि इतरांनी मार्गदर्शन केले खरे, पण निम्म्याहून अधिक कर्मचाऱ्यांपर्यंत ते पोहोचलेच नाही.

"एवढ्या मोठ्या स्तरावरील प्रशिक्षणासाठी साधे नियोजन करता येत नसेल, तर प्रशासकीय यंत्रणा सक्षम आहे का?" असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

मालेगाव : दुचाकी खरेदीसाठी माहेरून एक लाख रुपये आणण्याचा तगादा लावत विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी मालेगाव पोलिसांनी ६ जानेवारी रोजी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पांगरी कुटे (ता. मालेगाव) येथील रहिवासी असलेल्या या विवाहितेचा विवाह २१ फेब्रुवारी २०१८ रोजी अकोला येथील गणेश रामराव सावळे (३२) याच्याशी झाला होता. लग्नानंतर काही काळ लोटताच, पती व सासरच्या मंडळींनी दुचाकीसाठी १ लाख रुपयांची मागणी सुरू केली. पैसे न आणल्यास तिला उपाशी ठेवणे व मारहाण करणे असे प्रकार सुरू झाले. "परिस्थिती सुधारेल" या आशेने विवाहितेने सहा वर्षे छळ सोसला; मात्र १५ मे २०२४ रोजी आरोपींनी तिला मारहाण करून मुलासह घराबाहेर काढले. अखेर विवाहितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी सासरच्या चार जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास सुरू आहे.

युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

मालेगाव: तालुक्यातील अमानवाडी रेल्वे रुळाजवळ एका ३८ वर्षीय युवकाने सागाच्या झाडाला गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना ७ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. निशान भारत गिरी (रा. सिद्धिविनायक नगर, वाशिम) असे मृतकाचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच जऊळका रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतकाच्या खिशातील आधार कार्डवरून त्याची ओळख पटवण्यात आली. या घटनेचा पंचनामा एएसआय श्रीवास्तव आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी केला असून, आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. जऊळका पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

महत्त्वाचे

नवीन रेशनकार्ड मिळण्यास विलंब; नागरिक त्रस्त

वाशिम: कुटुंब विभाजनानंतर स्वतंत्र रेशनकार्ड मिळवण्यासाठी अनेक नागरिकांनी सेतूमार्फत तहसील कार्यालयाकडे अर्ज केले आहेत. मात्र, या प्रक्रियेला विलंब होत असल्याने लाभार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. धान्य वितरण आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी रेशनकार्ड हा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. पुरवठा विभागाकडून तपासणी व मंजुरीची प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याने अर्जदारांची प्रतीक्षा लांबली आहे. प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढण्याची मागणी नागरिक करत आहेत.

अवैध पार्किंगमुळे पादचाऱ्यांची सुरक्षा धोक्यात

वाशिम: शहरातील मुख्य रस्त्यांच्या कडेला होणाऱ्या बेशिस्त पार्किंगमुळे पादचाऱ्यांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. फुटपाथ आणि रस्त्यांच्या कडेला वाहने उभी केल्यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून चालावे लागते, परिणामी अपघातांचा धोका वाढला आहे. बाजारपेठा, शाळा आणि रुग्णालय परिसरात ही समस्या गंभीर असून वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. प्रशासनाने नो-पार्किंगची कडक अंमलबजावणी करून स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

महावितरणची थकबाकी वाढली; सेवेवर परिणाम

वाशिम : जिल्ह्यातील घरगुती, कृषी व व्यावसायिक ग्राहकांकडील थकबाकीचा आकडा वाढल्याने महावितरणसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. कोट्यवधी रुपयांची थकबाकी जमा झाल्याने देखभाल-दुरुस्तीची कामे आणि नवीन वीजजोडण्यांवर प्रतिकूल परिणाम होत आहे. महावितरणकडून सध्या थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम राबवली जात आहे.

वाशिम-काटा रस्त्याची दुरवस्था

वाशिम: उन्हाळ्यात दुरुस्त केलेल्या वाशिम-काटा रस्त्यावरील डांबर अवघ्या काही महिन्यांतच उखडले आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दुचाकीस्वारांचे अपघात होत आहेत. या मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे.

तीन विद्यार्थ्यांवर मुंबईत हृदय शस्त्रक्रिया

मानोरा : राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील तीन विद्यार्थ्यांच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी त्यांना ५ जानेवारी रोजी मुंबईला रवाना करण्यात आले. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. घुगे, डॉ. सुरेंद्र जगलपुरे, डॉ. ललित हेडा, अनिल खडसे व दिशा राठोड उपस्थित होते. या विद्यार्थ्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च व व्यवस्था राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाद्वारे केली जाणार आहे.

जांभरुनवाडी-पांगरी नवघरे रस्त्याचे डांबरीकरण रखडले

वाशिम : जांभरुनवाडी ते पांगरी नवघरे या रस्त्याचे खडीकरण पूर्ण झाले असले तरी डांबरीकरण अद्याप रखडलेले आहे. यामुळे प्रवाशांना धुळीचा आणि खड्ड्यांचा सामना करावा लागत आहे. शेतकरी, विद्यार्थी आणि नोकरदारांची या मार्गावर मोठी वर्दळ असते. पावसाळ्यात चिखल तर उन्हाळ्यात धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून, प्रशासनाने तातडीने डांबरीकरण पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे.

महत्त्वाचे

व्याज परतावा कागदपत्रे अपलोड करण्यास १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

अकोला : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या व्याज परतावा योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्यास १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ज्या लाभार्थ्यांचे पात्रता प्रमाणपत्र १ जानेवारी २०२५ पूर्वी तयार झाले आहे आणि ज्यांना बँकेकडून कर्ज मंजुरी मिळाली आहे, परंतु काही कारणास्तव महामंडळाच्या पोर्टलवर उर्वरित कागदपत्रे अपलोड करता आलेली नाहीत, अशा लाभार्थ्यांना ही विशेष तात्पुरती मुभा देण्यात आली आहे. या कालावधीत संबंधित लाभार्थ्यांनी बँक कर्ज मंजुरी पत्रासह सर्व आवश्यक कागदपत्रे महामंडळाच्या पोर्टलवर अपलोड करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. ही सुविधा केवळ तात्पुरत्या स्वरूपाची असून, १५ जानेवारीपूर्वी कागदपत्रांची पूर्तता न केल्यास पुढील प्रक्रियेत अडचणी निर्माण होऊ शकतात, असे जिल्हा समन्वयक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ (मर्या.) यांनी स्पष्ट केले आहे.

मूर्तिजापूर नागठाणा फाट्यावर कारची दुचाकीला धडक

मूर्तिजापूर : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील नागठाणा फाट्याजवळ बुधवारी (दि. ७) सायंकाळी भरधाव कारने दुचाकीला धडक दिल्याने भीषण अपघात झाला. यात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून, त्याची प्रकृती चिंताजनक आहे. ज्ञानेश्वर राम सोळंके (रा. दापुरा) असे जखमीचे नाव आहे. ते आपल्या दुचाकीने (एमएच ३०, सीए ४२५१) नागठाण्याकडे जात असताना, अमरावतीकडून येणाऱ्या मारुती सेलेरियो कारने (एमएच २७, ईसी ३३९२) त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात सोळंके यांच्या डोक्याला व पायांना गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने मूर्तीजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे. याप्रकरणी निखील सोळंके यांच्या फिर्यादीवरून मूर्तीजापूर ग्रामीण पोलिसांनी कार चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता व मोटर वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

मसोला बु. शाळा बंदीला ग्रामस्थांचा तीव्र विरोध

मंगरुळपीर : तालुक्यातील मसोला बु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुन्हा बंद करण्याच्या हालचाली प्रशासकीय पातळीवर सुरू झाल्याने गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शाळा कोणत्याही परिस्थितीत बंद करू नका, अशी आक्रमक भूमिका घेत ग्रामस्थांनी प्रशासनाला शिक्षणाचे वाटोळे न करण्याचा इशारा दिला आहे. मसोला बु. हे गाव तसे दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या साधारण गटातील आहे. यापूर्वी येथील जि.प. शाळा बंद करण्यात आल्याने गावातील २० ते २५ विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी १० ते १५ किलोमीटर अंतरावरील दुसऱ्या गावी पायपीट करावी लागत होती. यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले. मात्र, ग्रामस्थांच्या पाठपुराव्याने जुलै महिन्यात ही शाळा पुन्हा सुरू झाली आणि गावकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या. सध्या शाळेत ८ विद्यार्थी शिक्षण घेत असून, २०२६-२७ या आगामी शैक्षणिक सत्रात गावातील सर्व मुले याच शाळेत प्रवेश घेतील, असा ठाम निर्णय पालकांनी घेतला आहे.एकीकडे शासन शिक्षणाचा अधिकार सांगते, तर दुसरीकडे पटसंख्येच्या तांत्रिक कारणास्तव शाळा बंद करण्याचा घाट घालत आहे.

पाच वर्षे 'गायब' असलेले नेते आता मतदारांच्या दारी!

रुसलेल्या मतदारांना मनवण्यासाठी सुरू झाली 'साष्टांग नमस्कार' मोहीम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

आलेगाव, दि. ८ : सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे आदेश दिल्याने राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला आहे. आरक्षणाच्या पेचामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे वेळापत्रक लांबले असले, तरी २१ जानेवारीच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, पातुर तालुक्यात पाच वर्षे गायब असलेल्या लोकप्रतिनिधींना आणि इच्छुक उमेदवारांना अचानक मतदारांचा साक्षात्कार झाला असून, रुसलेल्या मतदारांना मनवण्यासाठी त्यांची अक्षरशः 'काट्यावरची कसरत' सुरू झाली आहे.

निवडणुकीची घोषणा केव्हाही होण्याची शक्यता असल्याने पातुर तालुक्यातील सहाही जिल्हा परिषद सर्कलमधील वातावरण तापू लागले आहे. विशेष म्हणजे, गेल्या पाच वर्षांत ज्यांनी मतदारांकडे पाठ फिरवली होती, तेच चेहरे आता 'राम-राम', 'जय भीम', 'सलाम वालेकुम', 'जय सेवालाल' अशा घोषणा देत मतदारांच्या दारात उभे ठाकले आहेत. सुख असो वा दुःख, आता कार्यक्रमात पहिला चेहरा इच्छुकांचाच दिसत असल्याने नागरिकांमध्येही कुजबूज सुरू झाली आहे. विकासाचा विसर, आश्वासनांचा पाऊस तालुक्यात स्वच्छता, घरकुल, रस्ते, शिक्षण, आरोग्य आणि पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांचा बोजवारा उडालेला असताना, लोकप्रतिनिधींनी या समस्यांकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले होते. आता मात्र निवडणुकीच्या तोंडावर काही चुकले असेल तर माफ करा, पुन्हा संधी द्या,अशी आर्जव करत हेच नेते मतदारांना साकडे घालत आहेत. तूच माझी माय आणि तूच माझा बाप अशी आळवणी करत रुसलेल्या मतदारांचे मन वळवताना इच्छुकांची दमछाक होत आहे.

आरक्षणाचे गणित आणि इच्छुकांची धाकधूक अकोला जिल्हा परिषदेच्या आरक्षणाची मर्यादा ५८ टक्क्यांच्या पुढे गेल्याने अनेक प्रस्थापितांचे गणित बिघडले आहे. त्यातच मतदारांमधील वाढता रोष पाहता, यंदाची निवडणूक सोपी राहिलेली नाही. केवळ तोंडदेखलेपणा करून आणि शेवटच्या क्षणी धावपळ करून विजय मिळवणे कठीण असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पातुर तालुक्यातील इच्छुकांना आपला 'गड' राखण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे.

नागरिक काय म्हणतात?

पाच वर्षे गायब राहून आता केवळ चेहरे दाखवून मते मिळणार नाहीत. उमेदवार समस्या सोडवण्यासाठी कधीच उपलब्ध नसतात. आता विकासाचे गोडवे गात आहेत, पण भविष्यातील ठोस आराखडा कुणाकडेच नाही. मतदार आता सुज्ञ झाला आहे, जुन्या चुकांना माफी मिळणार नाही, कामाचा हिशोब द्यावाच लागेल.

सम्यक संबोधी वाचनालयत सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : येथील रणपिसे नगरातील सम्यक संबोधी सार्वजनिक वाचनालय व सम्यक संबोधी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने (दि. ३) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वा. सु. लबडे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून अजय आठवले उपस्थित होते. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अजय आठवले यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. तसेच त्यांचे विचार आजच्या पिढीसाठी आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात वा. सु. लबडे यांनी सावित्रीबाईंचे स्त्री शिक्षण व समाजप्रबोधनातील योगदान अधोरेखित केले.

कार्यक्रमाला अमोल वानखडे, अशोक इंगळे, परसराम तेलगोटे, योगेश इंगळे, रोहन इंगळे यांच्यासह वाचनालयाचे वाचक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन ग्रंथपाल प्रशांत तेलगोटे यांनी केले, तर आभार राजेश दांडगे यांनी मानले.

रोटरी क्लब अकोटतर्फे पत्रकार दिनी सन्मान सोहळा उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोट, दि. ८ : रोटरी क्लब ऑफ अकोटच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त शहर व तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे अध्यक्ष इंजि. रवि पवार होते. प्रमुख उपस्थिती म्हणून प्रभाकरराव मानकर, ज्येष्ठ पत्रकार संजय आठवले, तसेच डॉ. नवेश मोहता व्यासपीठावर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात इंजि. रवि पवार यांनी नमूद केले की, ''समाजप्रबोधन, लोकशाही बळकटीकरण आणि जनतेचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविण्यात पत्रकारांचे योगदान मोलाचे आहे.'' प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पत्रकार हे समाजाचा आरसा असून त्यांच्या निर्भीड व वस्तुनिष्ठ लेखनामुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतो. पत्रकार दिनाच्या निमित्ताने पत्रकारांच्या कार्याचा गौरव करणे ही रोटरी क्लबची सामाजिक बांधिलकी असल्याचे प्रभाकरराव मानकर यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी विविध वृत्तपत्रांमध्ये कार्यरत असलेल्या पत्रकारांचा गौरव करण्यात आला. यामध्ये राहुल कुलट, सोनू सावजी, राजेश सोळंके, चंचल पितांबरवाले, नितीन तेलगोटे, युवराज मंगळे, अभिषेक पाठक, देवानंद खिरकर, धीरज बेलसरे, विशाल आग्रे आदींचा स्मृतिचिन्ह, पेन, कॅलेंडर व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास रोटरी क्लबचे इंजि. प्रमोद लहाने, दिपक कतोरे, संतोष इस्तापे, चंदुसेठ अग्रवाल, राजकुमार गांधी, उद्धवराव गणगणे, हिमांशु अग्रवाल यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्याम शर्मा यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. नवेश मोहता यांनी मानले.

शिंदे गट आक्रमक! पातूरमध्ये आ. नितीन देशमुखांच्या विरोधात निदर्शने

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

पातूर, दि. ८ : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत आक्षेपार्ह व अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप करत शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ बाळापूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार नितीन देशमुख यांच्या विरोधात अकोला जिल्ह्यात ठिकठिकाणी तीव्र संताप व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर गुरुवारी पातूरमध्ये शिंदे गटाच्या वतीने निदर्शने करण्यात आली.

अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी उमरी प्रभागात शिवसेना (उबाठा) उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत आमदार नितीन देशमुख यांनी भाषण केले होते. या भाषणादरम्यान त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात खालच्या पातळीवर जाऊन टीका केल्याचा आरोप शिवसेना (शिंदे) वतीने करण्यात आला आहे. या वक्तव्याचे पडसाद जिल्ह्यात उमटले असून शिवसैनिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

याचाच निषेध म्हणून गुरुवार, दि. ८ जानेवारी रोजी पातूर शहरातील गजबजलेल्या टी. के. व्ही. चौकात शिवसेना (शिंदे) पातूर तालुक्याच्या वतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी आमदार नितीन देशमुख यांच्या फोटोला काळे फासून जोरदार घोषणाबाजी केली. भविष्यात पुन्हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात अपशब्द वापरल्यास 'शिवसेना स्टाईलने' प्रत्युत्तर दिले जाईल, असा सज्जड इशारा पातूर तालुकाप्रमुख अनंत उर्फ बाळू बागडे यांनी यावेळी दिला. या आंदोलनात उपजिल्हाप्रमुख उमेश भुसारी, तालुकाप्रमुख अनंत बागडे, संदीप उमाळे, दिनेश बोचरे, संतोष लसनकार, शंकर गोळे, मंगेश चव्हाण, राहुल भगत, निलेश बोचरे, विलास देवकर, शाम गाडगे, सचिन शेवलकार, बाळकृष्ण लाहोळे, स्वप्निल पजई, विलास मानकर, डॉ. राज बोरकर, गोपाल तायडे, गौतम उगवे, वाडेगाव शहराध्यक्ष घाटोळे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

लॉयन्स मिडटाउनतर्फे कर्करोगग्रस्तास मदत; अंदुऱ्यात विकासकामांचे लोकार्पण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

अकोला, दि. ८ : लॉयन्स क्लब ऑफ अकोला मिडटाउनचे अध्यक्ष डॉ. मनोज अग्रवाल यांच्या पुढाकारातून कॅन्सर रुग्णांना आर्थिक मदत आणि विविध सामाजिक विकासकामांचे लोकार्पण नुकतेच करण्यात आले. या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी (दि. ८) जिल्हाधिकारी वर्षा मिना यांच्या हस्ते रिधोरा (ता. बाळापूर) येथील कॅन्सर रुग्ण आकाश काशीराम लोकरे यांना औषधोपचारासाठी २४ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी डॉ. मनोज अग्रवाल यांच्यासह कॅबिनेट ऑफिसर सुभाष चांडक, झोन चेअरमन सुनील नेसवाणी, महेश मनवाणी आदी पदाधिकारी उपस्थित होते. याच सेवाकार्याचा भाग म्हणून डॉ. अग्रवाल यांनी अंदूरा (ता. बाळापूर) येथे नवीन मंदिर बांधकामासाठी १० लाख रुपयांची देणगी दिली आहे. तसेच, अंदूरा येथील स्मशानभूमीच्या नूतनीकरणासाठी १७ लाख रुपये खर्च करण्यात आले असून, पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल व मशिनकरिता २५ हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे.

याशिवाय, २०० गरजू नागरिकांना वर्षभर घरपोच जेवणाचा डबा देण्याचा स्तुत्य उपक्रमही सुरू करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या सर्व प्रकल्पांचा संपूर्ण खर्च डॉ. मनोज अग्रवाल यांनी स्वतः उचलला आहे. या विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा रिजन चेअरमन उमाकांत चौधरी यांच्या हस्ते आणि प्रांतपाल अश्विनकुमार बाजोरिया यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमास डिस्ट्रिक्ट लिओ चेअरमन सत्यपाल बाशानी, घनश्याम जोशी यांच्यासह अंदूरा गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांडपाण्याच्या प्रश्नावरून ग्रामस्थ आक्रमक

मुख्य रस्त्यावर ठिय्या आंदोलन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

पातूर, दि. ८ : तालुक्यातील चरणगाव येथील मुख्य रस्त्यावर साचणारे सांडपाणी आणि खड्ड्यांमुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी आज (दि. ८) आक्रमक पवित्रा घेत रस्ता रोको आंदोलन केले. अंबाशी ते चानी मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, सांडपाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर बनल्याने हे आंदोलन करण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून या रस्त्यावर मोठमोठे जीवघेणे खड्डे पडले आहेत. तसेच रस्त्यावर साचलेल्या सांडपाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, गटविकास अधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रारी आणि निवेदने देऊनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी ८ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत रस्त्यावर ठिय्या मांडला. या आंदोलनात अतुल वसतकार, संतोष इंगळे, माजी सरपंच बाळू वसतकार, रमेश इंगळे, शुभम इंगळे, आनंद इंगळे, सुनील इंगळे, अशोकराव देशमुख, अश्विन वाघमारे, गजानन इंगळे, अशोक उपरोट, ज्ञानेश्वर पुरे, गणेश देशमुख, विशाल इंगळे, विजय इंगळे, अंकुश पगारे, बाबाराव देशमुख, बाहुबली वसतकार, मुरलीधर शिरसागर, राजीव शिरसागर, गंगाधर इंगळे, पुरुषोत्तम शेळके, देविदास वसतकर, सोनाजी गावंडे, राजेंद्र इंगळे, कृष्णा इंगळे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते. दरम्यान, आंदोलनाची तीव्रता पाहून ग्रामविकास अधिकारी व्ही. टी. आगळे यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाशी चर्चा करून समस्येवर तातडीने तोडगा काढण्याचे लेखी आश्वासन दिले. या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित केले. चानी पोलीस स्टेशनला या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

दुर्लक्ष | मुख्यमंत्री सडक योजनेच्या कामावर प्रश्नचिन्ह

ईचा फाटाईचा रस्ता वर्षभरातच उखडला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मंगरुळपीर, दि. ८ : तालुक्यातील ईचा फाटा ते ईचा हा रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सन २०२५ मध्ये पूर्ण करण्यात आला होता. शासनाचा मोठा निधी खर्च करून तयार करण्यात आलेला हा रस्ता दीर्घकाळ टिकेल, अशी अपेक्षा होती. मात्र, अवघ्या एका वर्षाच्या कालावधीतच या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, संपूर्ण रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे संबंधित कंत्राटदाराच्या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रस्त्याच्या अत्यंत निकृष्ट दर्जामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. ईचा फाटा ते ईचा या मार्गावरून दररोज शेकडो नागरिक, शेतकरी, शालेय विद्यार्थी आणि नोकरदार प्रवास करतात. सध्या रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, वाहने चालवताना कसरत करावी लागते. खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत असून, दुचाकीस्वार घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे. रुग्ण किंवा गरोदर महिलांना दवाखान्यात नेताना या रस्त्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत असून प्रवास जीवघेणा ठरत आहे.

सदर रस्ता अद्यापही 'दोष दायित्व कालावधीत' येत आहे. नियमानुसार, या कालावधीत रस्ता खराब झाल्यास त्याची दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असते. मात्र, तरीही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेचे संपर्कप्रमुख सिद्धार्थ अशोक सावध यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. संबंधित कंत्राटदाराकडून हा रस्ता तातडीने दुरुस्त करून घ्यावा आणि तो दर्जेदार स्थितीत ग्रामस्थांना उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. प्रशासनाने याची तात्काळ दखल न घेतल्यास ग्रामस्थांसह तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

मूर्तिजापूरात शनिवारी सकल धनगर समाजाचा भव्य सत्कार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मूर्तिजापूर, दि. ८ : शहरातील सकल धनगर समाजाच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक आणि विविध क्षेत्रांत समाजाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या मान्यवरांचा भव्य जाहीर सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम शनिवार, १० जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता तिडके नगर येथील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृहात पार पडणार आहे. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल रामेश्वर साबळे (भाजपा) उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या निवडीमुळे समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या कार्यक्रमात प्रभाग क्रमांक १२ मधून निवडून आलेले नगरसेवक गजानन नाकट, मायाताई राम खंडारे व सरिताताई राहुल पाटील यांचा यथोचित सत्कार करण्यात येईल. तसेच, प्रभाग क्रमांक ११ मधून विजयी झालेल्या आणि 'धनगर वाघीण' म्हणून परिचित असलेल्या पुनमताई रवी माडकर यांचाही विशेष सन्मान केला जाणार आहे.

दरम्यान, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रा. एल. डी. सरोदे यांना नुकताच राज्यस्तरीय 'मूकनायक' पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल त्यांचाही या सोहळ्यात जाहीर गौरव करण्यात येणार आहे. समाजाला प्रथमच एक कणखर व प्रभावी नेतृत्व लाभल्याने हा सत्कार सोहळा ऐतिहासिक ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. तरी या कार्यक्रमाला शहर व तालुक्यातील समाजबांधव, ज्येष्ठ नागरिक, महिला व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सकल धनगर समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा
बुलडाणा, शुक्रवार, दि.९ जानेवारी २०२६

महत्त्वाचे

शेतात जाताना करंट लागून महिलेचा मृत्यू

मोताळा : शेतातील विद्युत तारेला स्पर्श झाल्याने एका महिलेचा करंट लागून जागीच मृत्यू झाला. तालुक्यातील आव्हा शिवारात ६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. तालुक्यातील कोल्ही गवळी येथील कमलबाई डिगंबर भारती (वय ५०) ही महिला गावातील काही महिलांसोबत माकोडी येथील डिगंबर सुरेश बढे यांच्या आव्हा शिवारात असलेल्या शेतात कामाला जात होती. मधमाशांच्या भीतीने महिला दुसऱ्या रस्त्याने शेतात जात होत्या. दरम्यान, मक्याच्या शेतात गेल्या असता तेथे बीज तारेला स्पर्श झाल्याने कमलबाई भारती यांचा घटनास्थळावरच मृत्यू झाला. सुदैवाने सोबतच्या महिला दूर पळाल्याने त्यांचा जीव वाचला. कमलबाई व त्यांचे पती डिगंबर भारती है दोघेही दिव्यांग असून त्यांना मूळबाळ नव्हते. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी धामणगाव बढे पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

मार्गदर्शन शिबिर

बुलडाणा : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या ड्रग अव्हेरनेस अँड वेलनेस नेव्हीगेशन फार ड्रग फ्रि इंडीया योजना २०२५ अंतर्गत दि. ९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता राजर्षी शाहू औषध निर्माण महाविद्यालय, बुलढाणा येथे अंमली पदार्थ विरोधी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नार्कोटिक कंट्रोल ब्यूरोने अंमली पदार्थांच्या सेवनाविरुद्ध तयार केलेल्या या घोषवाक्याच्या अनुषंगाने यावेळी शपथवाचन करण्यात येणार आहे. त्यानंतर अंमली पदार्थ व मनोव्यापारक पदार्थ अधिनियम, १९८५ औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५, अंमली पदार्थांचे सेवन, त्याचे दुष्परिणाम तसेच कायद्यातील तरतुदी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यायाधीश नितीन पाटील राहणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून, अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त (औषधे), गजानन घिरके, केमिस्ट व ड्रगिस्ट संघटनाचे अध्यक्ष गजानन शिंदे तसेच राजर्षी शाहू औषध निर्माण महाविद्यालयाचे प्राचार्य शिरीष जैन उपस्थित राहणार आहे.

रासेयो शिबिराअंतर्गत योग प्रशिक्षणे

खामगाव : स्थानीय श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर घाटपूरी ग्रामीण भागात २८/१२/२०२५ सुरू झालेले आहे. तरी या शिबिराला २९/१२/२०२५ सोमवार पासून ०४/०१/२०२६ सोमवार पर्यंत दररोज सकाळी ६ ते ७.३० या दरम्यान स्वयंसेविकांना योग प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षिका सौ. संगीता खडसने डॉ. वनिता बोदडे कु. वैष्णवी सपकाळ आणि कु. शारदा डोंगरे उपस्थित होत्या. श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. योग प्रशिक्षणाचा लाभ सर्व रासेयो स्वयं सेविकांनी घेतला. या शिबिरामध्ये योग प्रशिक्षणाचे कार्य रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ छाया जाधव यांच्या सक्रिय उपस्थितीत पार पडले.

कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

वान	भाव
ज्वारी	१८५० - २१५१
गहू	२२५० - २३५०
तुर	४००० - ७१५०
हरभरा	३४०० - ५३००
सोयाबीन	३८०० - ५४२५
उडीद	४५०० - ५८००
मुग	५५०० - ५५००
मका	१५०० - २१६६

लाखो भाविक दाखल: विवेकानंद जन्मोत्सवाला प्रारंभ

अजिंक्य भारत / प्रतिनिधी

हिवरा आश्रम दि.८ : विवेकानंद आश्रमात दरवर्षी होणारा विवेकानंद जयंती उत्सव पौष वद्य पंचमी ते सप्तमी या दिवशी दि. ८,९,१० जाणे. रोजी होत आहे. राज्यभर ज्ञात असलेला व प्रबोधन, शिस्त आणि नियोजनामुळे प्रसिध्द झालेला हा महोत्सव निष्काम कर्मयोगी प.पू. शुकदास महाराजांनी १९६५ पासून सुरु केला आहे. स्वामी विवेकानंदांचे तत्वज्ञान आपले जीवनध्येय माणून महाराजांनी व्रतस्थ जीवन अंगीकारले. दीन, दुःखी पीडीतांची सेवा केली. आरोग्य, शिक्षण, कृषी, अपंग पुनर्वसन, अदिवासी कल्याण, पर्यावरण सुरक्षा, महिला सबनीकरणासह अनेक क्षेत्रात विवेकानंद आश्रमाने मोठे कार्य उभे केले आहे. आश्रमात साजरा होणारा हा उत्सव म्हणजे विवेकानंदांच्या नावाने होणारा राज्यातीलच नव्हे तर देशातील एक मोठा उत्सव आहे. या उत्सवासाठी आश्रमाने एक महिन्यापासूनच तयारीला प्रारंभ केला आहे. तीनही दिवस नामवंतांचे व्याख्यान, कीर्तन, प्रवचन आयोजीत केले आहेत. शेवटच्या दिवशी होणा-या दोन लाख भाविकांच्या महाप्रसादाची तयारी सुरु आहे. समित्यांचे गठण त्यासाठी विविध समित्याा स्थापन केल्या आहेत. कार्यकर्त्यांचे निवास, भोजन पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे, सुरक्षा, दिंडी धारकांची नोंदणी महाप्रसादासाठी सेवा देणा-या टॅक्टरचालकांशी संपर्क यासह अडीचशे क्वींटल गहू दळूण ठेवले आहेत. किराणा-बाजारहाट, तसेच आवश्यक वस्तुंची जमवाजमव अंतीम टप्प्यात आली आहे. कामाचे नियोजन करण्यात आले असून जबाबदा-यांचे वाटप करण्यात आले आहे. उत्सवामुळे भरणा-या यात्रेत दुकानदारांना जागा वाटप करणे सुरु आहे. यात्रेचे शेत स्वच्छ करुन दिले असून दुकानदारांसाठी प्रशस्त रस्ते, पिण्याचे पाणी व प्रसाधनगृहाची सुविधा करण्यात आली आहे. निमंत्रीत कलावंत, व्याख्याते, कीर्तनकार, प्रवचनकार यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था आहे. पोलिस यंत्रणा, विद्युत विभाग, अग्नीशमन यांची मदत घेण्यात आली आहे. स्वामी विवेकानंद हे जागतीक तरुणाईचे आदर्श आहेत. त्यांचे धर्म विषयक तत्वज्ञान व सामाजिक सुधारणा विषयीचे मत अत्यंत परखड असून आजच्या पिढीला ते अत्यंत प्रेरणादायी व स्फुर्तीदायक आहेत. त्यांच्या जयंती निमित्य विवेक आणि आनंदाच्या या उत्सवात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन विवेकानंद आश्रमाच्या वतीने करण्यात आले आहे.

पुण्यात बुलडाण्याच्या लेकीचा सन्मान; फुले फेस्टीवलमध्ये डॉ. कांचन शिंदेचा गौरव

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

बुलडाणा दि.८ : सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त पुण्यात आयोजित दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवलमध्ये आद्य क्रांतिकारी स्त्रीवादी लेखिका ताराबाई शिंदे यांच्या नात आणि पुणे महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकारीडॉ. कांचन किशोर शिंदे यांनी सावित्रीबाईंची वेशभूषा साकारत प्रभावी कविता सादरीकरण केले. त्यांच्या या सादरीकरणाने फेस्टिवलम धील उपस्थितांची मने जिंकली.

पुणे येथील एस. एम. जोशी सभागृहात दुसरा आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल २०२६ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. देशभरातून कवी, साहित्यिक, अभ्यासक व फुलेप्रेमी या फेस्टिवलमध्ये सहभागी झाले असून सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विचारमंथनाचे प्रभावी व्यासपीठ म्हणून हा महोत्सव विशेष ठरत आहे. शनिवार ३ जानेवारी रोजी झालेल्या या फेस्टिवलमध्ये डॉ. कांचन किशोर शिंदे यांनी विशेष उपस्थिती नोंदवली. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवलमध्ये त्या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होत्या. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्या साधत डॉ. कांचन शिंदे यांनी सावित्रीबाईं फुले यांची वेशभूषा साकारली. कार्यक्रमाचे आयोजक भिडेवाडाकार कवी प्रा. शि. विजय वडवेराव यांच्याहस्ते डॉ. कांचन शिंदे यांचा सन्मानचिन्ह, भारताचे संविधान आणि सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे ज्या पुणे शहरातून ताराबाई शिंदे यांचे ऐतिहासिक स्त्री-पुरुष तुलना हे ग्रंथप्रकाशन झाले, त्याच पुण्यात बुलढाणा जिल्ह्यातील लेकीचा सन्मान होत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख यावेळी करण्यात आला. फुले विचारांच्या प्रसारासाठी आयोजित या आंतरराष्ट्रीय फेस्टिवलमुळे नव्या पिढीला सामाजिक परिवर्तनाची दिशा मिळत असून समता, शिक्षण व न्यायाच्या मूल्यांची जाणीव अधिक दृढ होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. डॉ. कांचन शिंदे यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे सभागृहात उपस्थित असलेल्या मान्यवरांसह प्रेक्षक भारावून गेले. तसेच यावेळी त्यांनी सावित्रीबाईं फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित कवितेचे भावपूर्ण सादरीकरण करत स्त्री शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

नगराध्यक्षा मीरा भूषण मापारी यांचा आज पदग्रहण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

लोणार दि.८ : नवनिर्वाचित नगराध्यक्षा मीरा भूषण मापारी तथा नवनिर्वाचित नगर सेवक यांचा आज दि. ९ जानेवारी रोजी पदग्रहण प्रदग्रहण समारंभ सकाळी ११ वाजता नगरपालिका प्रांगण येथे होणार आहे.

या सोहळ्याला प्रमुख उपस्तीत मध्ये मा आमदार तथा जिला काँग्रेस चे अध्यक्ष राहुल बोन्द्रे, काँग्रेस चे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस श्याम उमाळकर , काँग्रेस चे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष लक्ष्मण घुमरे, मेहकर लोणार मतदार संघा चे समन्वयक देवानंद पवार, माधुरी पवार आदी मान्यवर सह इतर उपस्थित राहणार आहेत. या पदग्रहण सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शहर काँग्रेस अध्यक्ष शेख समद शेख अहमद , गटनेता न पा सीमा नितीन शिंदे यांनी केले आहे.

मेहकर तालुक्यात शेती अवजारे चोरणाऱ्या टोळीचा हैदोस

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

मेहकर दि.८ : तालुक्यातील डोणगांव पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या लोणी गवळी, आंध्रुड,अंजनी, शेलगांव या व इतर गावातील शेतशिवारांमध्ये गेले पंधरा ते वीस दिवस शेती अवजारे चोरणारी टोळी प्रचंड सक्रिय झालेली आहे. परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील स्पिंकलर सेट, मोटर पंप,स्टार्टर, सोलर पंप,झटका मशीन अशाप्रकारे सदर चोरटे चोरून नेत असून शेतकऱ्यांचे शेत पिकातील नासधूस करीत आहेत. सदर प्रकारांमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे तसेच आर्थिक तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विरोधात डोणगाव पोलीस स्टेशन येथे संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष शेतकरी नेते पांडुरंग पाटील यांच्या नेतृत्वात निषेध आंदोलन करण्यात आले. सदर चोरट्यांवर पोलीस यंत्रणेचा कुठलाही धाक उरला नाही असा आरोप पांडुरंग पाटील यांनी केला. पुढे बोलताना पाटील म्हणाले शेतकरी अगोदरच वातावरणातील अस्थिरतेमुळे अस्मानी संकटाचा सामना करत आहे. अशातच आता चोरट्या टोळीमुळे शेतकऱ्यांवर ऐन रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्याच्या तोंडावर नव्याने शेती अवजारे खरेदीच्या रूपाने सुलतानी संकट उभे ठाकले आहे. पोलीस यंत्रणेने चोरट्या टोळीवर तात्काळ जरब घालून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. परंतु पोलीस स्टेशनमध्ये गेले असता पोलिसांकडून आमच्याकडे पेट्रोलिंग साठी सुद्धा वाहन उपलब्ध नाही तसेच आमच्याकडे तुटपुंजे मनुष्यबळ असल्याचे उत्तर देण्यात येते. अशा अवस्थेत शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आता कोणतीच यंत्रणा नसल्याचा आरोप पाटील यांनी केला. तसेच यावर तात्काळ कठोर कारवाई करून चोरट्यांवर जरब न घातल्यास डोणगाव पोलीस स्टेशन विरोधात गंभीर स्वरूपाचे आंदोलन उभे करण्यात येईल असा इशारा यावेळी निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी लोणी गवळी गावचे माजी सरपंच दीपक शिंदे, राजूभाई गवळी,प्रमोद जागृत, मोहन वानखेडे, बबन पदमने,संदीप लांबाडे,नारायण कष्टे, राहुल खंदारे,गणेश तोंडे, चेतन वानखेडे, बाळकिसन कष्टे, गजानन मानवतकर, गोविंदा पदमने, दिनकर मानवतकर, मगर आधी सहित परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

दे.राजा गटनेतेपदी प्रदीप वाघ बिनविरोध

दे.राजा दि.८ : नगरपरिषदच्या महायुतीच्या गटनेतेपदी नवनिर्वाचित नगरसेवक प्रदीप वाघ यांची एकमताने गटनेते पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. २ जाने. रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर विकास विभागामध्ये नगरपरिषद अध्यक्ष सौ.माधुरी तुषार शिंपणे व महायुतीचे १२ नगरसेवक विजयी झाले तर शिवसेना उबाठा २ नगर सेवक यांनी बिनशर्त प्रदीप वाघ यांना पाठिंबा देत गटनेतेपदी विराजमान केले आहे. प्रदीप वाघ यांनी देऊळगाव राजा नगरपरिषद दहा प्रभागातील २१ उमेदवारा पैकी प्रदीप विठ्ठल वाघ हे सर्वात जास्त मतांनी निवडूनआले आहे. त्यांनी जवळपास ६६९ मताचा लीड प्रभाग क्रमांक तीन मध्ये घेतले आहे.

अंध दिव्यांग व कर्णबधिर विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

बुलडाणा दि.८ : स्थानिक दिव्यांग कल्याण व पुनर्वसन संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या अंध, अपंग आणि कर्णबधिर विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी मंगळवार ३० डिसेंबर २०२५ रोजी खामगाव येथील कर्णबधिर विद्यालय यांनी आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये यश मिळविले. सुरूवातीला दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी इंडोले यांच्याहस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी खामगाव येथील लायन्स क्लबचे अनेक पदाधिकारी कार्यक्रमांमध्ये हजर होते. जिल्हाभरातून अनेक दिव्यांनी शाळा या स्पर्धेमध्ये सहभागी झाल्या होत्या. दिव्यांग विद्यार्थ्यांचे १०० मीटर धावणे, लांब उडी, भराभर चालणे, गोळा फेक, बादलीत बॉल, लगोरी फोड, नृत्या स्पर्धा अशा अनेक स्पर्धांचे आयोजन या निमित्ताने करण्यात आले होते. एक दिवसीय क्रीडा स्पर्धेमध्ये बुलढाणा येथील अपंग विद्यालयाने नऊ गोल्ड मेडल मिळवले, कर्णबधिर विद्यालयाने पाच गोल्ड मेडल मिळवले आणि अंध निवासी विद्यालयाने बारा गोल्ड मेडल मिळवले. त्यामुळे पुढील महिन्यात होणाऱ्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये या खेळाडूंची निवड झाली. या यशाबद्दल अपंग कल्याण व पुनर्वसन संस्थेचे अध्यक्ष डॉ. छाजेड, उपाध्यक्ष कारंजकर, सचिव जयसिंग जयवार, कोषाध्यक्षा सुरेखा जतकर इत्यादी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी क्रीडा शिक्षक मवाळ, साखळीकर, ठाकरे यासोबत अनेकांनी मेहनत घेतली. विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय हे आपले मुख्याध्यापक विजय डव्हळे, रमेश आराख, प्रिया माळी यांना देतात.

डाक विभागात एजंटसाठी अर्ज मागविले

बुलडाणा : भारतीय डाक विभागाकडून डाक जीवन विमा योजनेंतर्गत जिल्ह्यातील टपाल जीवन विमा योजनेसाठी थेट अभिकर्ता व क्षेत्र अधिकारी यांची नेमणूक करण्याकरिता इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रासह दि. २८ जानेवारी २०२६ रोजी उपस्थित राहावे, असे आवाहन डाकघर अधीक्षक गणेश आंभोरे यांनी केले आहे. थेट अभिकर्तासाठी अर्जाचा नमुना बुलडाणा प्रधान डाक घर किंवा डाक अधीक्षक बुलडाणा यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. एजंट भरतीसाठी उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष असावे, शैक्षणिक पात्रता किमान दहावी पास असावी.

अस्वलाच्या हल्ल्यात धोडप येथील शेतकरी गंभीर जखमी

राजेश लोखंडे/ प्रतिनिधी

चिखली दि.८: तालुक्यातील धोडप येथील अल्पभूधारक शेतकरी उत्तम बळीराम परिहार हे त्यांच्या करवंड शिवारातील शेतात गेले असता अचानक दबा धरून बसलेल्या अस्वलाने त्यांच्यावर अचानक हल्ला केल्याची घटना दि. ६ जानेवारी रोजी दुपारी ३ च्या सुमारास घडली.

याबाबत सविस्तर असे की, उत्तम परिहार यांच्याकडे थोडीफार शेती असून यंदा त्यांनी शेतात तूर, हरबरा आणि गव्हाची पेरणी केली असल्याने ते दि. ६ जानेवारी रोजी दुपारी ३ च्या सुमारास शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेले असता दबा धरून बसलेल्या अस्वलाने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या घटनेची माहिती आजुबाजूच्या शेतकरी आणि सरपंच प्रदीप दामोधर कोल्हे यांना मिळताच त्यांनी घटनास्थळावर येऊन अस्वलाला पिटाळून लावले, पण यात उत्तम परिहार हे गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी उत्तम परिहार यांना रूग्ण वाहीकेतून जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी वन विभागाने जंगली प्राण्यांचा कायमचा बंदोबस्त करावा अशी मागणी धोडप, पळसखेड सपकाळ आणि करवंड शिवारातील शेतकऱ्यांनी केली आहे.

लोकोत्सव नगर पालिकेची भव्य शोभायात्रा

जिजाऊ सृष्टीत मराठा सेवासंघातर्फे अभिवादन व दशरात्रोत्सव

अजिंक्य भारत / प्रतिनिधी

सिंदखेडराजा दि.८: क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सिंदखेडराजा शहरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. नगर पालिकेच्या वतीने राजवाडा परिसरात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध पक्षांचे पदाधिकारी, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंतीनिमित्त शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. नगर पालिकेच्या पुढाकाराने दरवर्षीप्रमाणे यंदाही सावित्रीबाई फुले जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. शनिवारी सकाळी राजवाडा परिसरात पार पडलेल्या अभिवादन कार्यक्रमात शहरातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व महाविद्यालयांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अनेक विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित कविता सादर केल्या. तर काही तरुण-तरुणी सावित्रीबाई व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या वेशात सहभागी होऊन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नवनियुक्त नगराध्यक्ष सौरभ तायडे व मुख्याधिकारी आशिष बोबडे यांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पालिकेतील आजी-माजी पदाधिकारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, जिजाऊ सृष्टी येथेही सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला. याच दिवशी मराठा सेवा संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे सावित्री-जिजाऊ दशरात्रोत्सवाची सुरुवात करण्यात आली. दहा दिवस जिजाऊ सृष्टी येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. नगराध्यक्ष सौरभ तायडे, मुख्याधिकारी आशिष बोबडे व नवनियुक्त नगरसेवकांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दशरात्रोत्सवाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी मराठा सेवा संघाचे राज्य संघटक मनोहर तुपकर, जिजाऊ सृष्टीचे व्यवस्थापकीय अध्यक्ष सुभाष कोल्हे, जिल्हाध्यक्ष रवींद्र चेके, संभाजी ब्रिगेडचे राज्य संघटक योगेश पाटील, निवृत्त अधीक्षक अभियंते रविकांत काळवाघे, ॲड. राजेंद्र ठोसरे, ॲड. उर्मिला हाडे, ज्योती जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा जागर करत शिक्षण, समता व सामाजिक परिवर्तनाचा संदेश शहरात प्रभावीपणे पोहोचल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

रायपूर पोलिस स्टेशनमध्ये विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आणि सेवाभावाची प्रेरणा - ठाणेदार सोळंके

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

रायपूर दि.८ : महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाच्या (२ जानेवारी) निमित्ताने रायपूर पोलिस ठाण्याच्या वतीने ''पोलिस राइजिंग डे सप्ताह'' सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी श्री शिवाजी हायस्कूल रायपूर येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून रायपूरचे ठाणेदार निलेश सोळंके उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र पोलीस दलाचा इतिहास, त्याची संघटनात्मक रचना, कार्यपद्धती तसेच जनतेच्या सुरक्षिततेत व कायदा-सुव्यवस्थेच्या संवर्धनात पोलिसांचे अविभाज्य योगदान याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.सोळंके यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सांगितले की, ''पोलिस ही केवळ गुन्हेगारांना पकडणारी यंत्रणा नसून समाजातील शांती, सुव्यवस्था आणि नागरिकांचे संरक्षण राखण्यासाठी सतत तत्पर असणारी सेवा आहे.'' त्यांनी कायदा व न्यायव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी पोलिसांची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पोलिस दलातील विविध शाखांची गुन्हे तपास विभाग, वाहतूक नियंत्रण शाखा, महिला व बालसेवा विभाग, तसेच सायबर गुन्हे प्रतिबंध शाखा ओळख करून देण्यात आली. आपत्ती व्यवस्थापन, प्राथमिक प्रतिसाद प्रणाली, आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवरही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. ठाणेदार सोळंके यांनी शहरातील विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांनी पोलिसांच्या सहकार्याने चालवावयाच्या सुरक्षा मोहिमांविषयीही मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना कायद्याचे पालन करण्याचे, जबाबदार नागरिक बनण्याचे, तसेच कोणत्याही आपत्तीत पोलिस मदतीकडे न घाबरता मदतीसाठी संपर्क करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात शिस्त, प्रामाणिकपणा, निष्ठा, सेवाभाव आणि धैर्य या महाराष्ट्र पोलीस दलाच्या प्रमुख मूल्यांचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना जीवनात या मूल्यांचा अंगीकार करण्याचे सांगितले.

महत्त्वाचे

दोन दुचाकीची धडक; एक जखमी

खामगाव : -खामगाव तालुक्यातील उमरा अटाळी येथील रहिवासी मयुर भास्कर इंगोले (२४) यांनी काल ७ जानेवारी २६ रोजी खामगाव ग्रामीण पोस्टेला फिर्याद दिली. त्यामध्ये नमुद केले आहे की, फिर्यादीचे वडील भास्कर प्रल्हाद इंगोले (५५) हे ३० डिसेंबर २५ रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास दुचाकीने खामगाव येथुन उमरा अटाळीकडे जात असतांना दुचाकी क्र. एमएच-२८-एव्ही-५१२२ चा चालक नारायण सुडोकार रा. जनुना याने दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या वडीलांच्या दुचाकीला धडक देऊन पोबारा केला. चहकेत फिर्यादीच्या वडीलांच्या हातापायाला दुखापत झाली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त दुचाकी चालका विरुध्द कलम २८१, १२५ बी, सहकलम १३४/५७७ मोवाका नुसार गुन्हा दाखल केला आहे.

दोषीवर कठोर कारवाई करावी- भीम आर्मी

खामगाव : भीम आर्मी संघटनेच्या वतीने आज ८ -जानेवारी २६ रोजी मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री यांना उपविभागीय अधिकारी (महसुल) यांचेमार्फत निवेदन देण्यात आले. त्यामध्ये नमुद केले आहे की, मध्यप्रदेशातील ग्वालीयर शहरात काही दिवसांपुर्वी अनिल मिश्रा नामक व्यक्तीने महापुरुषांची प्रतिमा जाळुन व आक्षेपार्ह वक्तव्य करून अवमान केला याप्रकरणी संबंधितावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात केली आहे. निवेदन देतांना भीम आर्मी जिल्हाध्यक्ष प्रकाश धुंदळे, अतुल इंगळे, विवेक गवई आदि उपस्थित होते.

शेलोडी येथील खून प्रकरण

खामगाव : खामगाव तालुक्यातील शेलोडी येथील खळबळजनक रघुनाथ गाडे खून प्रकरणातील दोन आरोपींची जामीनावर सुटका झाली आहे. त्यापैकी एक आरोपी नामे मनोरमा बानाईत हिस सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला. तर दूसरा आरोपी दशरथ बानाईत याची जामीनावर सुटका उच्च न्यायालयाने केली. दोन्ही आरोपींतर्फे सत्र न्यायालय तसेच उच्च न्यायालय येथे ज्येष्ठ विधिज्ञ चंद्रशेखर भाटे, ॲड केतन भाटे, ॲड अमित भाटे आणि ॲड. गणेश भालतडक यांनी काम सांभाळले. जुन्या वैमनस्यातून रघुनाथ गाडे, रा.शेलोडी याचा सुनियोजीतपणे भोसकून निर्गुण खून झाल्या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोस्टें मध्ये गुन्हा नोंदवण्यात आला होता. त्यानंतर गुन्ह्यातील तीन आरोपींनी स्वतः न्यायालयासमोर शरणागती दोन आरोपींची जामीनावर सुटका पत्करली. त्यामुळे प्रकरणाची सर्वत्र चर्चा रंगली होती. आरोपींची जामीनावर सुटका होऊ नये यासाठी फिर्यादी पक्षातर्फे कसून प्रयत्न करण्यात आले होते. उल्लेखनीय बाब अशी की उच्च न्यायालयात सरकार पक्षातर्फे जामीन अर्जास विरोध करण्याकरिता उच्च न्यायालयाचे प्रमुख सरकारी वकील ज्येष्ठ त्याव्यतिरीक्त फिर्यादीने सुध्दा विधिज्ञ देवेंद्र चौहान यांची नियुक्ती झाली होती. खाजगी वकील नेमले होते. त्यामुळे प्रकरणात चुरस निर्माण झाली होती. परंतु आरोपींतर्फे करण्यात आलेला अभ्यासपूर्ण युक्तिवाद स्वीकारून न्यायालयाने आरोपींची जामीनावर सुटका केली.

वाडी येथे चोरी

खामगाव : वाडी येथील सप्तश्रृंगी नगरातील रहिवासी अनिल जिजाबराय एकडे (देशमुख) (६५) हे २० डिसेंबर २५ रोजी बाहेरगावी गेले होते. ६ जानेवारी २६ रोजी मध्यरात्री २ वाजताच्या सुमारास घरी परत आले असता त्यांना घराचा कडीकोंडा व कुलुप तुटलेले दिसले. त्यांनी घरात जाऊन पाहिले असता अज्ञात चोरट्याने सोन्या चांदीचे दागिने लंपास केले.

काँग्रेस नेते धनंजय देशमुखांच्या लढ्याला यश

सुटाळा बु. येथील २५४.४६ हेक्टर जमीन जिगावच्या आरक्षणातून बाहेर

अजिंक्य भारत / प्रतिनिधी

खामगाव दि.८ : औद्योगिकीकरणाच्या नावाखाली वर्षानुवर्षे प्रलंबित राहिलेल्या भूसंपादन प्रक्रियेमुळे अडचणीत सापडलेल्या सुटाळा बु. येथील शेतकऱ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. अतिरिक्त खामगाव औद्योगिक क्षेत्राच्या प्रस्तावित विस्तारासाठी संपादनाच्या छायेखाली असलेली २५४.४६ हेक्टर खासगी जमीन जिगाव उपसा सिंचन प्रकल्पाच्या आरक्षणातून अधिकृतपणे वगळण्यात आल्याची बाब समोर आली आहे.

या निर्णयामुळे संबंधित भूसंपादन प्रस्ताव रद्द होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, काँग्रेस नेते धनंजय देशमुख यांच्या दीर्घकालीन लढ्याला महत्वपूर्ण यश मिळाल्याचे मानले जात आहे. सुटाळा बु. (ता. खामगाव) येथील ही जमीन २९ फेब्रुवारी २००६ रोजीच्या अधिसूचनेनुसार जिगाव उपसा सिंचन प्रकल्पासाठी अंशतः आरक्षित असल्याची नोंद सातबारा उताऱ्यावर होती. मात्र, महसूल व वनविभाग मंत्रालयाच्या शासन निर्णय क्रमांक आरपीए-२०२२/प्र.क्र.०९/२-अ (दि. १८ जानेवारी २०२२) नुसार, जिगाव प्रकल्पासाठी आवश्यक नसलेले क्षेत्र आरक्षणातून वगळण्याचे अधिकार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना देण्यात आले आहेत. या अधिकारानुसार ८ सप्टेंबर २०२२ रोजी कार्यकारी अभियंता, जिगाव उपसा सिंचन विभाग व जिगाव प्रकल्प पुनर्वसन विभाग, खामगाव यांना पत्र पाठवून सुटाळा बु. येथील संबंधित गट क्रमांकांचे आरक्षण रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली होती. दरम्यान, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अंतर्गत अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. या प्रक्रियेत कलम ३२(२) अंतर्गत नोटीस कालावधीत तब्बल ३८ हरकती दाखल झाल्या होत्य. मात्र, जिगाव प्रकल्पाच्या आरक्षणातूनच जमीन वगळण्यात आल्याने सदर भूसंपादनाची गरज अद्याप कायम आहे की नाही, याचा नव्याने विचार करणे अपरिहार्य ठरले आहे. भूसंपादनाची आवश्यकता नसल्यास संबंधित प्रस्ताव रद्द करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरू असून, या घडामोडीमुळे काँग्रेस नेते धनंजय देशमुख यांच्या सातत्यापूर्ण पाठपुराव्याला यश मिळाल्याचे मानले जात आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, खामगाव यांनी ६ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अकोला यांना पत्र पाठविले. आरक्षणामुळे संबंधित भूधारकांच्या जमिनी अनेक वर्षांपासून लागवडीपासून वंचित राहिल्याने शेती उत्पादनावर मोठा विपरीत परिणाम झाला आहे. परिणामी, भविष्यात नुकसानभरपाईसाठी दिवाणी दावे दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासनाचा वेळ व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी या प्रकरणात तातडीने अंतिम निर्णय घेण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. भूसंपादन नोटिशींविरोधात दाखल झालेल्या ३८ हरकतींमधून शेतकऱ्यांमधील तीव्र नाराजी स्पष्ट झाली होती. अवाजवी आणि गरज नसलेल्या भूसंपादनाविरोधात गावकऱ्यांचा विरोध दिवसेंदिवस तीव्र होत चालल्याचे चित्र या प्रक्रियेत दिसून आले.

आर्थिक पिळवणूक करणारी घरपट्टी रद्द करा

नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांची मागणीला तात्काळ सकारात्मक मान्यता

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

मलकापूर दि.८: अवाजवी मालमत्ता कर आकारणीमुळे मलकापूर शहरातील मालमत्ता धारकांची खऱ्या अर्थाने आर्थिक पिळवणूक थांबवण्यासाठी प्रत्येक प्रभागातील दोन जबाबदार युवा कार्यकर्त्यांनी समोर येऊन अन्यायग्रस्त जनतेचे व्यासपीठ अशी अनौपचारिक दबाव संघटना तयार करून जनतेच्या होणाऱ्या या पिळवणुकीला योग्य न्याय देण्यास यशस्वी ठरले आहे

घराची वयोमर्यादा, बांधकाम प्रकार (मातीचे,कच्चे, पक्के, डब्बरचे, टिनाचे आ.सी.सी) निवासी घर, अनिवासी घर, अंडर कंन्स्ट्रक्शन, सामाजिक कल्यानकारी संस्थेचा उपक्रम इमारत तसेच प्रती चौरस मिटर दर याबाबत सर्वे करून नोंद घेणाऱ्या कंत्राटदार कंपनीच्या प्रतिनिधीने घर मालकाला मालमत्तेच्या वस्तुस्थिती बाबत कुठलीही विचारणा केली नाही. म्हणुनच मालमत्तेची वस्तुस्थिती दर्शक मांडणी कंत्राटदार कंपनीच्या प्रतिनिधीने न घेता मनमानी पद्धतीने नोंदी केल्या. परिणामी मागील किंवा लगतच्या वर्षीच्या कर रक्कमेच्या तुलनेत साधारणतः १५ ते २० पटीत रक्कमेत वाढ करणे ही खऱ्या अर्थाने आर्थिक पिळवणुकच आहे. या सर्व बाबी अन्यायग्रस्त जनतेचे व्यासपिठ या संघटनेने कायदेशीर पणे मांडल्या व संघटनेच्या मागण्या विचारात घेवुन मुख्याधिकारी श्री केदारे यांच्या कडून तात्काळ मान्यता देण्यात आली व आक्षेप मुदत वाढीसाठी वेळ वाढवून देण्यात आली आहे. तसेच नगराध्यक्ष आतेकुर रहेमान जवारी यांनीही मलकापूर शहरातील मालमत्ता धारकांवर अन्याय होणार नाही याची पूर्ण खबरदारी घेतो आणि गरज पडल्यास कंत्रातदार कंपनीच्या विरोधात गुन्हा सुद्धा दाखल करण्याचे आश्वासन दिले आहे.

मोकाट प्राण्यांमुळे होणाऱ्या अपघातात नागरिकांचे मृत्यू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

खामगाव दि.८ : नागरी संस्थानकडून नियम आणि निर्देशांचे पालन केले जात नसल्याने निदर्शनास आणून देत, सर्वोच्च न्यायालयाने काल ७ जानेवारी २६ रोजी सांगितले की, देशात केवळ कुत्र्यांच्या चाव्यामुळेच नव्हे तर रस्त्यावरील मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या अपघातामध्येही नागरिकांचे मृत्यू होत आहे. कुत्र्यांवर प्रेम करणाऱ्या व्यक्ती व न्यायालयांच्या आचीच्या आदेशांची कठोर अंमलबजावणीची मागणी करणाऱ्या याचिकांवरील सुनावणी न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता व न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारीया यांच्या खंडपीठासमोर झाली. ७ नोव्हेंबर रोजी दिलेल्या आदेशाआधी अनेक वकील व प्राणी प्रेमींचे म्हणणे ऐकून घेतले गेले नाही असा दावा झाल्याने ही सुनावणी घेतली जात असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले, न्यायमूर्ती मेहता यांनी निदर्शनास आणून दिले की, गेल्या २० दिवसात राजस्थान उच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधिशांचे अपघात झाले आहेत आणि त्यापैकी एक न्यायाधीश अजुनही मणक्यांच्या दुखापतींनी त्रस्त आहेत. कुत्रे व भटक्या प्राण्यांपासून रस्ते मोकळे असले पाहिजे, केवळ कुत्र्यांच्या चावांमुळेच नव्हे तर रस्त्यावर भटक्या प्राण्यांची वर्दळ धोकादायक ठरत असून अपघात होत आहेत. याबाबत दक्षता म्हणून खंडपिठाने काही सुचना दिल्या आहेत.

डोणगाव पत्रकार संघाची कार्यकारिणी गठीत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

डोणगाव दि.८: पत्रकार संघाची नवी कार्यकारिणी जाहीर सचिन गाभणे अध्यक्ष, ॲड. जैनुल आबेद्दीन शेख उपाध्यक्ष तर सुबोध आखाडे सचिवपदी निवड डोणगाव पत्रकार संघाच्या नव्याने गठीत करण्यात आलेल्या कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, अध्यक्षपदी सचिन गाभणे, उपाध्यक्षपदी ॲड. जैनुल आबेद्दीन शेख आणि सचिवपदी सुबोध आखाडे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे डोणगावसह संपूर्ण परिसरातील पत्रकार बांधवांमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पत्रकार संघ ही केवळ एक संघटना नसून, समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडणारी, प्रशासन आणि जनतेमध्ये सेतू निर्माण करणारी एक महत्वाची चळवळ आहे. अशा या महत्वपूर्ण संघटनेची जबाबदारी अनुभवी, अभ्यासू व कार्यतत्पर नेतृत्वाकडे सोपविण्यात आल्याने संघ अधिक सक्षम, संघटित व प्रभावी पद्धतीने कार्य करेल, असा विश्वास पत्रकार व नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. या कार्यकारिणीत व मार्गदर्शक मंडळात दिनोरे सर, अशोकवराव वानखेडे, सुरेशसिंह चव्हाण, सुनील पळसकर, जमील पठाण, जमीर शाह, यासीन बेग, राजेश वाघमारे, सुरेश फिस्के, गजानन वाघमारे गणेश लहाने, आवेज पठाण तसेच विजय खरात यांचा समावेश आहे. सर्व सदस्यांचा पत्रकारितेतील प्रदीर्घ अनुभव संघाच्या कार्याला निश्चितच बळ देणारा ठरेल, अशी भावना व्यक्त होत आहे. नव्या नेतृत्वाखाली पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या व्यावसायिक अडचणींचे निराकरण, पत्रकारांवरील अन्यायाविरोधात ठाम भूमिका, तसेच सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या प्रश्नांवर सक्रिय सहभाग घेण्यात येईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन, प्रशिक्षण व प्रोत्साहन देण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचेही संकेत मिळत आहेत.

प्रा. मुकुंद भारसाकडे यांचे व्याख्यान संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

खामगाव दि. ८ : सम्यक ज्येष्ठ नागरिक संघ शाखा खामगाव यांच्या वतीने ३ जानेवारी २६ रोजी माळी भवन येथे सावित्रीबाई फुले जयंती निमीत्य अकोला येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहु. उत्कृष्ठ प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मुकुंद भारसाकडे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजीत केला होता. अध्यक्षस्थानी माळी सेवा मंडळाचे अध्यक्ष धोंडीरामजी खंडारे होते. यावेळी प्रा. भारसाक डे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. तसेच अकोला येथील मनोविकार व व्यसनमुक्ती तज्ञ डॉ. श्रीकांत वानखडे यांनी व्यसनाधिनतेबाबत सविस्तर मार्गदर्शन करून तरूणांनी व्यसनापासुन दुर राहावे, असे आवाहन केले. तर सौ. सुलोचना सुरेश सिरसाट व सौ. कल्पना देविदास वानखडे यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डी. एस. वानखडे यांनी केले. तर सम्यक संघाचे अध्यक्ष प्रविण पहरकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, कार्यक्रमाचे संचलन श्याम सावदेकर तर आभार प्रदर्शन आनंदराव वानखडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुरेश सिरसाट, नानाभाऊ हिवराळे, अशोक गव्हांदे, भगवंत खंडेराव, बी.टी. इंगळे, दिनेश वानखडे, अशोक वानखडे, डी.जे. सुरवाडे, आर्यन वानखडे आदिंनी परिश्रम घेतले.

उर्वरित अतिवृष्टीच्या मदतीसाठी शेतकऱ्यांची तहसील कार्यालयावर धडक

जळगाव दि.८: तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी खरीप २०२४-२५ चा पिक विमा काढलेला आहे. मात्र पिक विमा कंपनी अजुनही पिक-विमा देण्यास टाळाटाळ करत आहे. खरंतर निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन व इतर पिकांचे प्रचंड असे नुकसान झाले. त्यामुळे शेतकरी हा आर्थिक संकटात आहे.त्यामुळे दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण सुद्धा वाढल्याचे दिसून येते. शेतकरी वारंवार पीक-विमा कंपनी व शासनाकडे पिक-विमा मिळावा यासाठी तक्रारी,आंदोलने करीत आहेत मात्र पिक विमा-कंपनी शेतकऱ्यांच्या खात्यावर पिक विमा टाकायला तयार ही बाब अतिशय निंदनीय आहे. तरी पिक-विमा कंपनी व शासनाने या विषयाला गांभीर्याने घेऊन त्वरित पिक विमा जमा करावा. तसेच अनेक शेतकऱ्यांना तांत्रिक कारणामुळे अजुनही अतिवृष्टीची मदत मिळाली नाही ती अतिवृष्टीची मदत तात्काळ त्यांच्या खात्यामध्ये जमा करावी. प्रधानमंत्री किसान योजनेचे अनेक शेतकऱ्यांचे पैसे विस्कळीत पडलेले आहे ते सुद्धा शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात यावेत. सदर मागण्या शेतकऱ्यांच्या न्याय हक्काच्या असुन रास्त आहे.

महाराष्ट्रात ५९ व्या निरंकारी संत समागमाची पूर्व तयारी उत्साहपूर्वक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

खामगाव दि.८: ९ जानेवारी, २०२६: सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज आणि आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात महाराष्ट्राचा ५९ वा वार्षिक निरंकारी संत समागम भव्यदिव्य स्वरुपात दिनांक २४, २५ व २६ जानेवारी, २०२६ रोजी सांगली ईश्वरपुर रोड, सांगलवाडी, सांगली (महाराष्ट्र) येथील विशाल मैदानांवर आयोजित करण्यात येत आहे. कृष्णा नदीच्या रमणीय काठावर वसलेले, स्वातंत्र्यसैनिक क्रांतिसिंह नाना पाटील यांची कर्मभूमी तसेच कला आणि सांस्कृतिक वारसाने समृद्ध असलेल्या सांगली शहराला या वर्षी प्रथमच महाराष्ट्राचा प्रादेशिक संत समागम आयोजित करण्याचा सन्मान प्राप्त झाला आहे. आध्यात्मिकतेचा आधार घेऊन या समागमामध्ये प्रेम, शांती आणि एकतेचा वैश्विक संदेश दिला जातो जो निःसंशयपणे सर्व मानवजातीच्या कल्याणार्थ आणि प्रेरणादायी असतो. या संत समागमाच्या यशस्वीतेसाठी २८ डिसेंबर २०२५ पासून विधिवत रूपात स्वेच्छा सेवाकार्याचा शुभारंभ करण्यात आला तेव्हापासूनच सांगली परिसर तथा खामगांव व बुलढाणा जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येने निरंकारी सेवादल सदस्य, स्वयंसेवक आणि भाविक भक्त समागम स्थळावर पोहोचून भक्ती, श्रद्धा आणि निष्काम भावनेने विविध सेवांमध्ये आपले योगदान देत आहेत.

क्रीडा

पोलीस व पत्रकारांमध्ये रंगला क्रिकेटचा सामना

मंगेश राजनकार व इरफान शेख ठरले 'मॅन ऑफ दि मॅच'

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

जळगाव जामोद दि.८: दिनांक ७ जानेवारी रोजी शहरातील मोदी ग्राउंड मध्ये आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त व पोलीस वर्धापन दिन निमित्त पोलीस विभाग व पत्रकार यांच्यामध्ये क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते.''कलम आणि वर्दी एकत्र! जळगाव जामोदच्या मोदी मैदानावर पोलीस आणि पत्रकारांमध्ये मैत्रीपूर्ण क्रिकेट सामना पार पडला. या क्रिकेट सामन्यामध्ये पोलीस संघाने पत्रकार संघाचा ९ गडी राखून पराभव केला. यावेळी जळगाव जामोद पोलीस स्टेशनचे ठाणेदार नितीन पाटील यांनी स्वतः उपस्थित राहुन दोन्ही संघाचे मनोधैर्य वाढविले तसेच मॅन ऑफ द मॅच ठरलेल्या पत्रकार मंगेश राजनकार व पोलीस हेड कॉन्स्टेबल इरफान शेख यांना प्रोत्साहन ५०० रुपये बक्षीस दिले. या क्रिकेट सामन्याच्या अंपायरपदी पोलीस सचिन राजपूत व पत्रकार उत्तम वानखडे यांनी काम पाहिले, तर नागेश भटकर यांनी कॉमेंट्री केली. यावेळी पत्रकार कैलास बाप्पू देशमुख, शमीम देशमुख, विनोद वानखडे, जफर खान अमानुल्ला खान, गणेश भड, गजानन सोनटक्के, अश्विन राजपूत, अनिल भगत, सागर झनके, मंगल काकडे, शिवदास सोनोणे, संजय दांडगे, लियाकत खान, राजेंद्र ससाने, मंगेश टाकसाळ, अमोल भगत, मनीष ताडे, किशोर दाताळकर, गणेश गिरे, वैभव वडोदे, विजय वानखडे, संजय बहुरूपी, संतोष कुलथे, इत्यादी पत्रकार बांधव तसेच एपीआय नागेश मोहोळ, पीएसआय नागेश खाडे, पोहेकॉ निलेश पुंडे,पोहेकॉ बाळकृष्ण पवार, पोकॉ सतीश पटोले, मधुकर गाढे, भारत बोंद्रे, अमोल नंदाने, स्वप्निल झुंजारकर, स्वप्निल मस्के, प्रशांत झाल्टे, सुपेश तायडे, समाधान शिंगणे, इत्यादी पोलीस यावेळेस उपस्थित होते .जळगाव जामोद येथे पोलीस आणि पत्रकार यांच्यात झालेला हा सामना नक्कीच कौतुकास्पद आहे. अशा उपक्रमांमुळे दोन्ही क्षेत्रांतील व्यक्तींमध्ये समन्वय आणि मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण होण्यास मदत होते. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात दोन्ही संघांमध्ये हा सामना संपन्न झाला.

पत्रकार दिनानिमित्त संदीपपाल महाराज यांचे प्रेरणादायी कीर्तन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

खामगाव दि.८ : खामगाव तालुका ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने ७ जानेवारी रोजी लाखनवाडा येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये राष्ट्रीय कीर्तनकार संदीपपाल महाराज यांच्या प्रेरणादायी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पत्रकार, अधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात संताराम तायडे यांच्या प्रस्ताविकाने झाली. त्यांनी पत्रकार दिनाचे महत्व स्पष्ट करत कार्यक्रमाची भूमिका मांडली. त्यानंतर कृष्णा चौधरी यांनी सूत्रसंचालन करत कार्यक्रम प्रभावीपणे पुढे नेला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद (बापू) देशमुख होते. कार्यक्रमाचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी चंदनसिंग राजपूत, वनपरिक्षेत्राधिकारी स्वप्निल पवार, नायब तहसीलदार विजय पाटील, नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे, ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार किशोर तावडे, प्रेस क्लब अध्यक्ष किशोरआप्पा भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटक उपविभागीय अधिकारी डॉ रामेश्वर पुरी यांनी मार्गदर्शन करताना पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजातील प्रश्न, शासनाच्या योजना व जनतेचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्वाचे कार्य पत्रकार करीत असल्याचे सांगितले. पत्रकारांनी सत्य, नीतिमत्ता व सामाजिक जबाबदारी जपत निर्भयपणे कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रमोद (बापू) देशमुख यांनी ग्रामीण भागातील पत्रकार अनेक अडचणींवर मात करून समाजासाठी प्रामाणिकपणे कार्य करीत असल्याचे नमूद केले. पत्रकार संघ सदैव पत्रकारांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी राष्ट्रीय कीर्तनकार संदीपपाल महाराज यांनी आपल्या कीर्तनातून पत्रकारितेचे सामाजिक भान, माणुसकी आणि मूल्यांचे महत्व प्रभावीपणे मांडले. संतवचनांच्या आधारे समाजप्रबोधन करत त्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमास तालुक्यातील पत्रकार बांधव, अधिकारी-कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रामीण भागातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

महत्त्वाचे

कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

जालना : कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याने घरातील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अंबड तालुक्यातील नालेवाडी येथे घडली. संदिपान गंगाधर दुफाके (४८) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. नालेवाडी येथील शेतकरी संदिपान गंगाधर दुफाके यांनी अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान, स्टेट बँकेचे व सोसायटीचे असलेले कर्ज याला कंटाळून घरी कुणी नसताना गळफास घेऊन आत्महत्या केली. बाहेर गेलेली पत्नी घरी आल्यानंतर हा प्रकार समोर आला.

पालकत्व विषयावर चर्चासत्र

जालना : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांची भूमिका, आधुनिक काळातील पालकत्वातील आव्हाने, मुलांच्या शैक्षणिक व मानसिक प्रगतीसाठी आवश्यक बाबी यासाठी ३१ जानेवारी रोजी जालना जिल्हाधिकारी कार्यालयात आयआयटी मुंबई येथील तज्ज्ञ हरप्रीत यांचे पालकत्व या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. या चर्चासत्रातून पालकांना मुलांच्या भविष्यासाठी योग्य दिशा देण्यास उपयुक्त मार्गदर्शन मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी हे चर्चासत्र अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे सर्व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले.

ऊसाच्या शेतात उपोषण

जालना : जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी घनसावंगी येथील शेतकरी गजानन उगले यांनी बुधवारपासून चक्क ऊसाच्या शेतात उपोषण सुरू केले आहे. २०२४ मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत अनुदान वाटप करण्यात आलेले नाही. तसेच २०२५ खरीप पीक विमा तात्काळ वाटप करण्यासाठी व इतर प्रलंबित प्रश्नांसाठी, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी उगले यांनी हे आंदोलन सुरू केले आहे. घनसावंगी येथील शेतकरी कैलास पवार यांच्या ऊसाच्या शेतात गजानन उगले यांनी सदरील उपोषण सुरू केले आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न केल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

जगदंबा मातेची यात्रा

अंबड : तालुक्यातील हसनापूर येथील गोदावरीच्या काठावर असणाऱ्या कुलस्वामिनी जगदंबा मातेच्या यात्रेनिमित्त दर्शनासाठी मोठी गर्दी पहायला मिळत आहे. दोन दिवसीय यात्रा महोत्सवात दर्शन सोहळा, नवसाच्या बारा गाड्या ओढणे, केलेला नवस पूर्ण करणे तसेच कुस्तीचा आखाडा रंगला होता. यावेळी विविध दुकाने विक्रेत्यांनी थाटली होती.

शेती व पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. ८ : महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून शेती व पीक कर्जाशी संबंधित कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ करण्याचा शासन निर्णय लागू करण्यात आला आहे. सर्व संबंधित बँकांनी व वित्तीय संस्थांनी शेतकऱ्यांकडून शेती अथवा पीक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे स्विकारतांना या शासन निर्णयानुसार कोणतेही मुद्रांक शुल्क आकारु नये, तसेच शेतकऱ्यांना याबाबत योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली आहे.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ९ (अ) अंतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, रु. २,००,००० (दोन लाख) पर्यंतच्या शेती किंवा पीक कर्जासाठी शेतकऱ्यांकडून करण्यात येणाऱ्या विविध कर्ज दस्तऐवजांवर कोणतेही मुद्रांक शुल्क आकारले जाणार नाही. यामध्ये अभिस्वीकृत, रोख पत करार, हक्कविलेख निक्षेप, हडप, तारण किंवा तारण गहाण, हमीपत्र गहाणखत, प्रतिभूती बंधपत्र, गहाणखताचे सूचनापत्र किंवा घोषणापत्र किंवा यास संलग्न कोणत्याही संलेखांचा/कागदपत्रांचा समावेश आहे. ही सवलत दि. १ जानेवारी २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत लागू राहणार आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील अल्पभूधारक व मध्यम शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी होणार असून, शेती व पीक कर्जाची प्रक्रिया अधिक सुलभ, कमी खर्चिक आणि पारदर्शक होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध होऊन शेती उत्पादन वाढीस चालना मिळेल. सदर शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांना आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सदर निर्णयाची माहिती उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना व जिल्हा अग्रणी बँक, जालना यांनी त्यांचेमार्फत जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ग्रामीण बँका तसेच इतर संबंधित वित्तीय संस्थांना हा निर्णय अवगत करून देण्यात यावा. असेही कळविले आहे.

वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकरीवर्ग हवालदिल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. ८ : घनसावंगी तालुक्यासह परिसरातील गावांमध्ये सध्या शेतशिवार पिकांनी बहरलेले आहेत. ऊस, कापूस, ज्वारी, बाजरी, हरभरा व भाजीपाला पिके जोमात वाढत आहेत. मात्र, वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे पिकांचे नुकसान होत आहे.

रानडुक्कर, नीलगाय, माकड व इतर वन्यप्राणी रात्री-अपरात्री शेतांमध्ये घुसून उभी पिके तुडवत व फस्त करतात. काही ठिकाणी संपूर्ण शेती क्षेत्र उद्ध्वस्त झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे शेतकरी सांगत आहेत. दिवसरात्र काबाडकष्ट करून उभ्या केलेल्या पिकांची अशी नासधूस होत असताना प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. वन्यप्राण्यांच्या भीतीने अनेक शेतकरी रात्रभर शेतात पहारा देत आहेत. मात्र त्यामुळे जीवितहानीची भीती कायम असून महिला व वृद्धांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आधीच महागाई, बियाणे-खते व वीज दरांचा फटका बसलेला असताना आता वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकरी पूर्णतः हवालदिल झाला आहे. वन विभागाने वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, सौर कुंपण, ट्रॅप कॅमेरे व इतर संरक्षणात्मक उपाययोजना त्वरित राबवाव्यात. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र पत्रकार संघटनेच्यावतीने पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जालना वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या मनोज गरदास व ज्ञानेश्वर बुरला यांना सायकल भेट देण्यात आली त्यावेळी घेतलेल्या छायाचित्रात दिपक शेळके, अंकुशराव देशमुख, विनायक दहातोंडे, रमेश खोत, भरत मानकर तसेच रामेश्वर लहामगे, गणेश वाळेकर, गजानन वीर, गणेश चिनके, संतोष लहाने, उमेद भदनेकर आदी दिसत आहेत.

जिजाऊ जन्मोत्सव समितीच्यावतीने विविध स्पर्धांचे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. ८ : मराठा सेवा संघ प्रणित राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव समिती २०२६ यांच्यावतीने जिल्ह्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १० जानेवारी रोजी मराठा सेवा संघ कार्यालयात रांगोळी स्पर्धा तसेच जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा विषय संस्कार, शौर्य आणि स्वराज्य जिजाऊंची त्रिसूत्री असा असून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांचा प्रसार व्हावा, हा या स्पर्धेचा उद्देश आहे. या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना जन्मोत्सव समितीच्यावतीने सहभाग प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतून सहभागी विद्यार्थ्यांची निवड करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या स्पर्धकांची यादी दिनांक १० जानेवारीपर्यंत समितीकडे सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

रांगोळी व वक्तृत्व स्पर्धेत प्रावीण्य मिळविणाऱ्या गुणवंतांचा सत्कार सोहळा दिनांक ११ जानेवारी, रविवार रोजी सायंकाळी ५ वाजता मातोश्री लॉन्स, अंबड रोड, जालना येथे आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता प्रा. एकनाथ शिंदे यांचे राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवनावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जिजाऊ भक्तांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष बबनराव गाडेकर (९६९९०५७३७७), कार्याध्यक्ष सोमीनाथ हराळ (९०४९८१०००७) व सचिव दिनेश भुतेकर (९९७५६३८५५५) यांनी केले आहे. रांगोळी स्पर्धेचे नियोजन शिवमती मंजुश्रीताई झोडगे (९१५६९७०६०८) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

सवलतीच्या कलागुणांसाठी मुदतवाढ

जालना : राज्यभरातील दहावीच्या विद्यार्थ्यांना कलागुणांसाठी दिल्या जाणाऱ्या सवलतीच्या गुणांच्या प्रस्तावांसाठी यंदा विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्य मंडळ) घेतला आहे. त्यानुसार आता शाळांना ३१ जानेवारीपर्यंत कलागुणांचे प्रस्ताव सादर करता येणार आहेत.

राज्य मंडळाचें सचिव दीपक माळी यांनी याबाबत परिपत्रकाद्वारे विभागीय मंडळांना सूचना दिल्या आहेत. शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्रावीण्य मिळवणाऱ्यां लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येतात. या प्रस्ताव कलागुणांसाठीचे विद्यार्थ्यांनी शाळेकडे सादर करण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत तर माध्यमिक शाळांनी संबंधित विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १५ जानेवारी होती. ती वाढवून आता ३१ जानेवारी करण्यात आली आहे.

बालविवाह निर्मूलनासाठी जिल्ह्यात ७३६२ नागरिकांनी घेतली शपथ

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. ८ : बालविवाहाची प्रथा नष्ट करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या बाल विवाह मुक्त भारत मोहिमेला २७ नोव्हेंबर २०२५ रोजी एक वर्ष पूर्ण होईल. बालविवाहमुक्त भारताचे स्वप्न साध्य करण्यासाठी हस्तक्षेपांची गती वाढविण्यासाठी, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये १०० दिवसांची मोहीम (२७ नोव्हेंबर २०२५ ते ८ मार्च २०२६ पर्यंत) हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर अभियान हे प्रत्येक संस्था, आणि विवाहासाठी सेवा पूरविणाऱ्या पर्यंत पोहोचले आहे आणि प्रत्येक राज्यातील बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांनी त्यांची माहिती बाल विवाह मुक्त भारत पोर्टलवर अपलोड केली आहे. याची खात्री करण्यासाठी ही मोहीम एका दृष्टिकोनाने आयोजित केली जात आहे.

सदर कालावधीमध्ये बालविवाह मुक्त भारत अभियान १०० दिवस जिल्हा महिला व बाल विकास विभाग यांच्याकडुन राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जालना जिल्हयात बालविवाहाचे समुळ उच्चाटन व्हावे या अनुषंगाने विहित पातळीवर प्रशासनाकडुन जनजागृती करण्यात येत आहे. बालविवाह थांबविण्याकरीता २४ तास १०९८ ही चाईल्ड हेल्पलाईन सेवा सुरु आहे. तसेच प्रशासनासोबतच प्रत्येक नागरिकांनी देखील बालक-बालिकांचे शारीरिक, मानसिक आरोग्य तसेच बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी बाल विवाह होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. यासाठी सर्व स्तरावरुन सर्वांनी बालविवाह मुक्त भारत करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणुन बालविवाह मुक्त भारत पोर्टल सुरु करण्यात आले आहे व हे सर्व नागरिकांसाठी खुले आहे. तरी बालविवाह मुक्त भारत पोर्टल या पोर्टलवर जाऊन **https://stopchildmarriage.wcd.gov.in** या लिंकवर क्लिक करुन बालविवाह निर्मुलनाबाबत प्रतिज्ञा घ्यावी व प्रतिज्ञा घेतल्या बाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन या मोहिमेमध्ये नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल तसेच जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी केले आहे.

तसेच बालविवाह निर्मुलनाबाबत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, चाईल्ड हेल्पलाईन १०९८, सखी वन स्टॉप सेंटर, महिला व बाल कल्याण जि.प., शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, पंचायत विभाग व पोलीस प्रशासन यांनी आतापर्यंत जिल्हयाभरात ८५७ ठिकाणी विविध स्तरावर कार्यक्रम घेतले असुन ६१५९६ सहभागी झालेले आहेत. आतापर्यंत या मोहिमेमध्ये ७३६२ नागरिकांनी सहभाग नोंदवुन बाल विवाह निर्मुलनाबाबत शपथ घेतली आहे. असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

किराणा किटचे वाटप करून लुई ब्रेल यांना अभिवादन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. ८ : दृष्टिहीनांच्या शिक्षणासाठी आयुष्य वाहून घेणाऱ्या महात्मा लुई ब्रेल यांच्या जयंतीनिमित्त दिव्य ज्योती फाउंडेशनच्या वतीने आर्ट ऑफ गिव्हिंग या सामाजिक उपक्रमाअंतर्गत ३५ मुलींना किराणा किटचे वाटप केले.

ए.एस. क्लब परिसरातील राष्ट्रीय दृष्टिहीन संघ संचलित मुलींच्या तांत्रिक प्रशिक्षण केंद्रात कार्यक्रम झाला. यावेळी केंद्रातील दृष्टिहीन मुलींनी गीत, संगीताचे सादरीकरण केले. या कार्यक्रमात गणेश मुंढे, सचिव ॲड. जोगेंद्रसिंह चौहान, उपाध्यक्ष डॉ. निकेश मदारे, भूषण राऊत, भूषण जैन आदींची उपस्थिती होती. उपाध्यक्ष डॉ. मदारे म्हणाले की, लुई ब्रेल यांनी दृष्टिहीनांसाठी ब्रेल लिपीचा शोध लावला. त्यांचे हे योगदान आजही जगभरातील कोट्यवधी दृष्टिहीनांसाठी प्रेरणादायी आहे. यावेळी ॲड. चौहान म्हणाले की, येत्या काळात दृष्टिहीन महिलांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण, लेखनिक व वाचक सुविधा राबविणार आहे.

अंबड येथे आयोजित एका कार्यक्रमात श्री संताजी दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी घेतलेल्या छायाचित्रात उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, पो.उपअधिक्षक सिध्देश्वर धुमाळ, तहसिलदार विजय चव्हाण, मुख्याधिकारी मनोज उर्किडे, पोनि संतोष घोडके, केदार कुलकर्णी, बळीराम राऊत, सुनील राऊत, नारायण हरणे, रमेश भवर, नारायण दळवी, लक्ष्मण राऊत, सुंदरराव राऊत, भगवान म्हस्के, कृष्णा राऊत, अर्जुन भवर, ईश्वर म्हस्के, रमेश सोनवणे, इंद्रजित गिराम, कैलास हरणे, सोमनाथ राऊत, विनोद मगर, योगेश हरणे आदी दिसत आहेत.

प्रशिक्षण | निवासी उपजिल्हाधिकारी यांची माहिती

डिजीटल जनगणनेतील अद्यावत तंत्रज्ञानामुळे माहिती विश्वसनीय ठरेल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. ८ : भारताची जनगणना ही एकाच टप्प्यात पार पडणार आहे. कोणतेही घर अथवा कुटुंब या जनगणनेतून सुटता कामा नये, या जनगणनेचा मुख्य उद्देश फक्त आकडे गोळा करणे नसून कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची इत्यंभूत माहिती गोळा केली जाणार आहे. आपणास संपुर्ण घर यादी व गटाची संरचना समजावून सांगण्यात येत आहे. तरी डिजीटल जनगणनेतील वापरात येणाऱ्या अद्यावत तंत्रज्ञानामुळे अधिक अचूकता आणि पारदर्शकतेसह जनगणनेला गती मिळुन माहिती अधिक विश्वसनीय ठरेल, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली.

महाराष्ट्र जनगणना संचालनालय व केंद्रीय गृह मंत्रालय यांच्यावतीने दि. ८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते २.३० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पहिले प्रशिक्षण पार पडले. जनगणना संचालनालयाचे अधिकारी प्रविण भगत व अरुण साळेगावकर यांनी संगणकीय सादरीकरण व प्रश्नोत्तराच्या माध्यमातून सुलभ पध्दतीने प्रशिक्षण दिले. यावेळी घनसावंगीचे तहसीलदार रमेश पागोटे यांच्यासह महानगरपालिका अधिकारी, सर्व तहसीलदार, नगर परिषद मुख्याधिकारी, नायब तहसिलदार, सहाय्यक महसुल अधिकारी, मंडळ अधिकारी, नगर रचनाकार व जनगणना लिपिक आदि अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

जनगणना प्रक्रियेच्या पहिल्या टप्यामध्ये घर यादी व घरगणना ही मे ते जून २०२६ मध्ये सुरु होणार असुन त्याबाबत अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या

प्रशिक्षणाचाही प्रारंभ झाला आहे. राष्ट्रीय जनगणनेचा दुसरा टप्पा फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणार आहे. जनगणनेचे काम अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे जनगणना कामाशी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी प्रशिक्षण, आढावा बैठकीस हजर राहणे व प्रत्यक्ष सोपविण्यात आलेली जबाबदारी अचूकपणे पार पाडणे व प्रशिक्षण दिलेल्या सूचनाचे काटेकोर पालन करून कामकाज पार पाडावेत. तरी जनगणना २०२७ जनगणना कामासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अचूक माहिती संकलनासाठी सुयोग्य नियोजन करावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी यावेळी सुचित केले.

जालना जिल्ह्यात अद्यावत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाची माहिती संकलीत केली जाणार आहे. अचूक विश्वासार्ह लोकसंख्येची आकडेवारी मिळविण्यासाठी यावेळी मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करण्यात येणार आहे. संपूर्ण प्रक्रियेच्या देखरेखीसाठी केंद्रीय पोर्टल कार्यान्वित राहणार आहे. त्यामुळे जनगणना संबंधीत सर्व चार्ज अधिकारी कर्मचारी यांनी गट नियोजन, पर्यवेक्षक, प्रगणक यांच्या नियुक्तीबाबत आवश्यक नियोजन तसेच जनगणना प्रक्रियेतील प्रत्येक तरतूद काळजीपूर्वक समजून घेऊन अमंलबजावणी करण्याचे निर्देशही प्रशिक्षणात अधिकाऱ्यांना यावेळी दिले.

उपजीविका प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

जालना, दि. ८ : जालना : प्रधानमंत्री कृषी सिंचन पाणलोट विकास योजना घटक २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे, जल व भूमी व्यवस्थापन (वाल्मी) संभाजीनगर, जलसंधारण विभाग पालघर व सेंटर फॉर अग्रीकल्चर अँड रूरल डेव्हलोपमेंट संस्था जालना यांच्या वतीने साखरे ता.डहाणू जि.पालघर येथे उपजीविका कौशल्य प्रशिक्षण दि. ७ जानेवारी २०२६ रोजी आयोजित केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात बिरसामुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रार्थनेनी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी सचिन थोरवे, पालघर,योगेश पाटील, जिल्हा प्रकल्प समन्व्यक पालघर,भरत गायकवाड, जितेश भोत्रे, प्रदीप बालाजी, यश जाधव, सरपंच रेखा कवटे हे सर्व मान्यवर जलसंधारण विभाग, कृषी विभाग या विभागाचे प्रतिनिधी हजर होते. या प्रशिक्षण दरम्यान वरील सर्व मान्यवरांनी प्रशिक्षनार्थींना अनमोल मार्गदर्शन केले.

सेंटर फॉर ऍग्रीकल्चर अँड रूरल डेव्हलपमेंट या संस्थेचे अध्यक्ष प्रा.सुवर्णा दांडगे, उपाध्यक्ष प्रा.डॉ. रामदास निहाळ,सचिव पुष्कराज तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवीण प्रशिक्षक बाबासाहेब वडवे, सुनील कांबळे,शारदा गायकवाड,सुवर्णा पंढरे यांनी उपजीविका कौशल्ये बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. साखरे गावातील बचत गटातील बहुसंख्य महिला हजर होत्या. हे प्रशिक्षण यशस्वी करणेसाठी स्वाती तांडेल, बचतगट ग्रामसखी साखरे व बचत गटाच्या अध्यक्ष सचिव यांनी विशेष सहकार्य केले.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
अमरावती, शुक्रवार दि. ९ जानेवारी २०२६

थोडक्यात

विरूळपूर्णा येथे बकऱ्यांची चोरी

आसेगाव पूर्णा : नजिकच्या विरूळपूर्णा येथून १५ हजार रूपये किंमतीचा बोकूड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १९ ते २० डिसेंबर दरम्यान घडली. याप्रकरणी मिथून राजकुमार चोपार यांनी ६ जानेवारी रोजी आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे अज्ञात चोराविरूध्द चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

चोरट्यास पोलिसांनी घेतले ताब्यात

आसेगाव : जगन्नाथपूर येथून बकरी चोरी झाल्याची तक्रार सतीश आठवले यांनी ५ जानेवारी रोजी आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्यात केली होती. पोलिसांनी गुन्हा दाखल केल्यानंतर आरोपीला अटक केली.

महिलेला विटेने मारून केले जखमी

शिरखेड : दारूच्या नशेत पतीने पत्नीसोबत वाद घातला. पातला. बीट मारून तिला जखमी केले तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. तळेगाव येथे ही घटना घडली. पीडित महिलेच्या तक्रारीवरून श्यामराव साबळे वय ३९, रा. तळेगाव याच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

किरकोळ वादातून इसमास मारहाण

मोर्शी : किरकोळ झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. मामासोबत झालेल्या भांडणामुळे तिघांनी संगनमत करून एकाला काठी व दगड मारून जखमी केले. तालुक्यातील पाळा गावात ही घटना घडली. या प्रकरणी जखमीचा भाऊ रवींद्र जनार्धन निस्वादे वय ४२, रा. पाळा यांनी मोर्शी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे सुशांत गुलाबराव पाटील वय १९, अनिकेत हेरोडे व श्रावण नांदणे सर्व रा. पाळा यांच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पैशांसाठी महिलेचा शारीरिक छळ

नांदगाव खंडेश्वर : माहेरहून पाच लाख रूपये आण नाही तर फारकती देतो असे म्हणून शारिरीक व मानसिक छळाला कंटाळून पीडित महिलेने सासरच्या मंडळीविरूध्द पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी सदर प्रकरण भरोसा सेलकडेही पाठविले होते. त्या आधारे अभिषेक गजानन सोनाने, गजानन सोनोने व एक महिला सर्व रा. चौसाळा यांच्याविरूध्द नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात हुंडाबळी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

कोंडवर्धा येथे महिलेस धक्काबुक्की

चांदूरबाजार : घराच्या आवारात लाकूडफाटा का टाकला, टिनपत्रेही चोरून नेले असे म्हटल्यानंतर शेजारील इसमाने महिलेसोबत वाद घालून तिला धक्काबुक्की केल्याने ती खाली कोसळून जखमी झाली. कोंडवर्धा गावात ही घटना घडली. ४५ वर्षीय महिलेने याप्रकरणी चांदूरबाजार पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे किसन जानराव वानखडे वय ६०, रा. कोंडवर्धा याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास चांदूर बाजार पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर बाजार पोलीस करीत आहे.

शौचालयास गेलेल्या महिलेचा विनयभंग

मोर्शी : शौचालयास गेलेल्या एका युवतीला वाईट उद्देशाने पकडून विनयभंग केल्याची घटना मोर्शी पोलीस ठाणे हद्दीत ६ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी पीडित तरूणीच्या तक्रारीवरून मोर्शी पोलीस ठाण्यात अजिंक्य नामक युवकाविरूध्द विविध कलमासह ॲट्रासिटी, विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

बहुसदस्यीय प्रभाग पद्धती गुंतागुंतीची

महापालिका रणधुमाळीत चार मते; उमेदवार निवडण्यात मतदारांची कसरत

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि.८ : महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण तापले असतानाच बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे यंदाची निवडणूक अधिकच रंगतदार आणि तितकीच गुंतागुंतीची ठरत आहे. महापालिकेच्या एकूण ८७ जागांसाठी २२ प्रभाग रचना करण्यात आली असून, प्रभाग क्रमांक १ ते २२ मध्ये प्रत्येकी चार सदस्य, तर शेवटच्या दोन प्रभागांमध्ये प्रत्येकी तीन सदस्य निवडले जाणार आहेत. त्यामुळे दोन प्रभाग वगळता उर्वरित सर्व प्रभागांतील मतदारांच्या हातात चार मते असून, याच पार्श्वभूमीवर चार मते, चार होकार ही नवी सामाजिक-राजकीय संकल्पना उद्यास आली आहे.

या निवडणुकीत अमरावतीकरांसाठी एकूण ८७ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. बहुतांश प्रभागांमध्ये काँग्रेस आणि भाजप यांच्यात थेट चुरस

पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी स्थानिक आघाड्या, अपक्ष उमेदवार तसेच छोटे पक्षही निवडणूक रणांगणात उतरल्याने लढत अधिक बहुरंगी बनली आहे. प्रचारासाठी घरोघरी फिरणारे उमेदवार, सभा, कोपरा बैठका आणि वैयक्तिक संपर्क मोहिमा यामुळे शहरातील प्रत्येक गल्ली बोळात राजकीय चर्चा रंगताना दिसत आहेत.

अमरावती महयंदा विशेष लक्षवेधी ठरत आहे. प्रचारासाठी येणाऱ्या प्रत्येक उमेदवाराचे म्हणणे मतदार शांतपणे, लक्षपूर्वक ऐकून घेत आहेत. विकासकामांची यादी, पक्षाचे बळ, उमेदवाराची वैयक्तिक प्रतिमा आणि पुढील पाच वर्षांचे आश्वासन हे सर्व ऐकल्यानंतर मतदारांकडून हमीचा होकार दिला जात आहे. मात्र हा होकार अनेकदा चारही उमेदवारांना दिला जात असल्याने उमेदवारही संभ्रमात आहेत.

कुणाला नाराज करायचे नाही, कुणाशी उघड वाद घालायचा नाही, कुणाचा रोष ओढवून घ्यायचा नाही, अशीच भूमिका सध्या बहुतांश मतदारांनी घेतल्याचे दिसते. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराला तुम्हालाच मत देणार असा शब्द मिळत असला, तरी प्रत्यक्ष मतदानावेळी नेमकी मते कुणाच्या पारड्यात पडणार, याबाबत अनिश्चितता आहे. उमेदवारही मिळालेल्या होकारांची उमेदवारही मिळालेल्या होकारांची मनातल्या मनात बेरीज करत असले, तरी शेवटच्या क्षणापर्यंत काळजी कायम आहे.

बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे मतदारांसाठी पर्याय अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२६ वाढले असले, तरी उमेदवारांसाठी मात्र ही पद्धत अधिक आव्हानात्मक ठरत आहे. त्यामुळे यंदाच्या महापालिका निवडणुकीत चार मते, चार होकार हा नारा किती निर्णायक ठरतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अंतिम गणित महत्वाचे

गल्लीबोळ, वॉर्ड, गजबजलेल्या परिसरामध्ये उमेदवारांची सतत ये-जा सुरू आहे. मात्र, या गदारोळात मतदारांनी एक शांत, पण अत्यंत व्यवहार्य भूमिका स्वीकारल्याचे दिसते. प्रचाराचे दृश्य बदलले असून, उमेदवार समाधानी चेहऱ्याने पुढील घराकडे वळतो, तर मतदार मनातल्या मनात अंतिम गणित मांडत राहतो. प्रत्यक्षात कोणाला मत मिळणार, याचा निर्णय मतदान यंत्रासमोरच होणार असला, तरी प्रचाराच्या टप्प्यावर सर्वांनाच दिला जाणारा होकार हीच बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीची सर्वात ठळक आणि लक्षवेधी बाब ठरत आहे. त्यामुळे कोण जिंकणार, कोण हरणार याचा अंदाजली लावला जात आहे.

भरदिवसा महिलेचे मंगळसूत्र उडविले

दुचाकीवरून आलेला चोरटा पसार

संतोष नगर परिसरातील घटना

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. ८ : परतवाडा शहरातील संतोष नगर परिसरात भरदिवसा झालेल्या चेन स्नॅचिंगच्या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घराजवळ पूजा करत असलेल्या महिलेवर पाळत ठेवून आलेल्या दुचाकीस्वार चोरट्यांनी संधी साधत तिच्या गळ्यातील मंगळसूत्र झटकून पळ काढला. ही घटना ४ जानेवारी रोजी दुपारी सुमारे १.३० वाजता घडली.

या प्रकरणातील फिर्यादी रोहिणी प्रशांत चावरे (वय ५२, रा. संतोष नगर, परतवाडा) या घरासमोरील बेलाच्या झाडाची पूजा करीत होत्या. त्याचवेळी दुचाकीवरून दोन तरुण त्या ठिकाणी आले. काही क्षण थांबून एक तरुण मोबाईलवर

बोलण्याचा बहाणा करत दुचाकीवरून खाली उतरला. त्याच्या संशयास्पद हालचाली लक्षात आल्याने महिलेने कारण विचारले असता, त्याने क्षणाचाही विलंब न करता तिच्या गळ्यावर झडप घालत २८ ग्रॅम वजनाचे, सुमारे १.४० लाख रुपये किंमतीचे मंगळसूत्र हिसकावून घेतले. अचानक घडलेल्या या प्रकाराने महिला घाबरून गेली. चोरटे घटनास्थळा वरून पसार झाल्यानंतर तिने तत्काळ घरी जाऊन कुटुंबीयांना माहिती दिली.

मध्यरात्री मनोरुग्णाने पेटविली मोटरसायकल

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अंजनगाव सुर्जी, दि. ८ : अंजनगाव सुर्जी शहरातील जुन्या वस्ती परिसरात आज पहाटेच्या सुमारास एक धक्कादायक प्रकार घडला असून, एका मनोरुग्ण व्यक्तीने घरासमोर उभी असलेली मोटरसायकल पेटवून दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

ही घटना आज पहाटे सुमारे ३ वाजताच्या सुमारास घडली. शनिवारा रोड, बारगणपुरा येथील रहिवासी सुरेश आवंडकर यांच्या मालकीची बजाज कंपनीची पल्सर (क्र MH-27 DN 1461) ही मोटरसायकल घरासमोर उभी होती. अज्ञात व्यक्तीने या दुचाकीला अचानक आग लावल्याने ती पेटून उठली. मोटरसायकल जळत असल्याचे लक्षात येताच आवंडकर व परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेऊन आग विझवली. मात्र, तोपर्यंत दुचाकीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. सदर प्रकार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, त्यात संबंधित व्यक्ती स्पष्टपणे दिसून येत आहे.प्राथमिक माहितीनुसार, सदर व्यक्ती मनोरुग्ण असल्याचे सांगण्यात येत असून, यापूर्वीही त्याने परिसरात उभ्या असलेल्या काही वाहनांचे नुकसान केल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच अंजनगाव सुर्जी पोलिसांनी तात्काळ कारवाई करून संबंधित व्यक्तीस ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे.

या घटनेमुळे जुन्या वस्ती परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, नागरिकांकडून अशा घटनांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

गुन्हे शाखेचा डायमंड ट्रान्सपोर्टवर छापा

लाखोंचा अवैध गुटखा जप्त, खरा गुटखा किंग मोकाटच !

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती,दि.८ : महाराष्ट्र शासनाने गुटखा व सुगंधीत तंबाखूवर पूर्ण बंदी घातलेली असताना अमरावती शहर अजूनही या विषारी गुटख्याचे केंद्र बनले आहे, हे पुन्हा एकदा उघड झालं आहे. नागपुरी गेट पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ट्रान्सपोर्ट नगर परिसरात असलेल्या डायमंड ट्रान्सपोर्टवर छापा टाकला तब्बल २२ लाख ४३ हजार ६२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधीत्त तंबाखूचा साठा जप्त केला. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असली, तरी शहरात खुलेआम गुटख्याचा खेळ सुरू असून खरा गुटखा किंग मात्र अजूनही मोकाटच असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

महानगरपालिका निवडणूक सुरू असून व्यवसायांवर कडक कारवाईचे आदेश पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी दिले असून, त्याच अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली. ६ जानेवरी रोजी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, वलगाव रोडवरील

ट्रान्सपोर्ट नगरात उभ्या असलेल्या एमएच-15 इइ 1847 क्रमांकाच्या आयशर ट्रकमधून मोठया प्रमाणात प्रतिबंधित गुटखा उतरविला जाणार आहे. त्यानुसार सहायक यांच्या नेतृत्वाखाली सापळा रचून कारवाई केली. तपासादरम्यान ट्रकमध्ये रजनीगंधा, बाबा गोल्ड, गोल्ड अहमदाबाद, रेमझीम आदी शासन ने प्रतिबंधित केलेला सुगंधीत तंबाखू व गुटखा आढळून आला.

अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम दंदे यांनी पंचासमक्ष इंदोर ते अमरावती गुटख्याचा मोकळा हायवे बंधील पालिश, नेर येथील साजिद आणि यवतमाळच्या साईरम यांना चेतरित केला जाणार होत. म्हणजेप, इंदोर-अमरावती यवतमाळ असा गुज्याण कॉरिडॉर नर्षांनुवर्षे खुस जाहे, हे या कारवाईतून रात्र झाले आहे.

कारवाई कोणाच्या इशाऱ्यावर ?

शहरात मात्र जोदार चर्चा आहे की. ही कारवाई एखाद्या छोट्या माशावर जाळे टाकण्यासाठी करण्यत अली असून, यामागे एखाद्या बड्या गुटखा हात असण्यार्च शक्यता नाकारता येत नाही. स्वत:चा रस्ता मोकळा ठेवण्यासाठी प्रतिस्पष्यांवर कारवाई घडवून आणण्याची जुनी मद्धत गुटखा माफियाकडून वापरली जाते, असा आरोप नागरिक आणि सामाजिक कार्यकतं करत आहेत.

संभाजीनगरातून तडीपारास अटक

अमरावती : निवडणूकीच्या अनुषंगाने पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळायला सुरूवात केली आहे. तडीपार आरोपी शहरात राहू नये यासाठी धडक मोहीम राबविल्या जात आहे. नियमांचे उल्लंखन करून संभाजीनगरात तडीपार फिरत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी गस्तीदरम्यान गोलू चव्हाण वय २८, रा. महाजनपुरा याला ताब्यात घेत गुन्हा नोंदविला. खोलापुरी गेट पोलिसांनी ही कारवाई केली.

विकास आ.सुलभा खोडके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

रमाई आवास योजनेच्या दुसरा टप्पा; २८.८४ कोटींचा निधी वितरित

अर्थसंकल्पीय तरतुदीचा लाभ मिळाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मानले आभार

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती,दि.८ : अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील रमाई आवास योजनेच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेच्या दुसऱ्या टप्यातील अनुदान मिळण्याची प्रतीक्षा आता संपली आहे. अमरावतीच्या आमदार सौ.सुलभाताई संजय खोडके यांच्या सातत्यपुर्ण पाठपुराव्याने आता अमरावती महापालिका क्षेत्रात रमाई आवास योजनेच्या कामांना गती देण्यासाठी शासनाकडून २८.८४ कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे गेल्या सहा महिन्यापासून शहरी भागात अर्धवटरीत्या रखडलेल्या रमाई

आवास योजनेच्या कामांना गती मिळणार असल्याने लाभार्थ्यांच्या हक्काच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण होणार आहे. याबद्दल आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना.अजितदादा पवार यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

अमरावती महानगर पालिकेने वर्ष २०२५ मध्ये रमाई आवास योजने अंतर्गत २,००० लाभार्थ्यांचे उद्दिष्टय ठेवून यादीला मंजुरी दिली होती.

या करिता साधारणत: ५० कोटींची आवश्यकता असल्याने अमरावतीच्या आमदार सुलभाताई खोडके यांनी सुरुवातीलाच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडे पाठपुरावा करिता निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. अशातच गेल्या मार्च २०२५ चा अर्थसंकल्प मांडत असतांना राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. अजितदादा पवार यांनी रमाई आवास योजनेकरिता अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली. तसेच रमाई आवास योजनेच्या कामासाठी अमरावती महापालिकेला टप्याटप्याने निधी मिळणार असल्याने त्यापैकी एप्रिल २०२५ मध्ये पहिल्या हप्त्यात अमरावती महानगर पालिकेला रमाई आवास योजनेकरिता २१.१६ कोटींचा निधी वितरित करण्यात आला. सदर निधीतुन लाभार्थ्यांच्या खात्यात आरटीजीएस प्रणाली द्वारे योजनेचा प्रथम हप्ता जमा होताच शहरात रमाई आवास योजनेच्या कामांना गती मिळाली. अमरावती शहरातील लाभार्थ्यांना प्रथम टप्प्यात २१.१६ कोटींचे वाटप झाल्यानंतर ज्यांचे योजनेच्या निकषाप्रमाणे सज्जा -लेंटर पर्यंत बांधकाम झाले आहेत.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
अमरावती, शुक्रवार दि. ९ जानेवारी २०२६

थोडक्यात

जळत्या लाकडाने महिलेला मारहाण

परतवाडा : मुलीला का रागावले या कारणावरून एकाने शेकोटीतील लाकूड उचलून एका महिलेला मारहाण केल्याने यात गंभीर जखमी केले. येथील पंजाबराव ढाब्यानजिक ही घटना घडली. ललिता धुर्वे वय ३०, रा. धोतरखेडा असे जखमी महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून दिनेश उईके याच्याविरूध्द परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास परतवाडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली परतवाडा पोलीस करीत आहे.

ट्रक अपघातात इसम जखमी

अंजनगाव सुर्जी : सातेगाव फाटा ते लखाड मार्गावर ट्रकने अन्य एका ट्रकला धडक दिल्याने ट्रक उलटून अपघात झाला. ५ जानेवारी रोजी ही घटना घडली. याप्रकरणी रवी कटुकाळे रा. भवानीपुरा, अकोट यांच्या तक्रारीवरून अंजनगाव पोलीस ठाण्यात टेलर चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास अंजनगाव पोलीस करीत आहे.

क्षुल्लक कारणावरून महिलेचा छळ

अमरावती : लग्नापासून हुंडा व मुलगीच झाल्याने विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ करून जीवे मारण्याची धमकी देत असल्याने या त्रासाला कंटाळून पीडित महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे बडनेरा पोलीस ठाण्यात आवेज खान, शफीक खान व दोन महिला सर्व रा. बडनेरा व रिध्दपूर यांच्याविरूध्द बडनेरा पोलीस ठाण्यात कौटुंबिक छळाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

घरगुती कारणावरून महिलेला मारहाण

अमरावती : घरगुती कारणावरून पतीसह सासरकडील मंडळी मानसिक व शारीरिक छळ करीत असल्याची तक्रार पीडित महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारे नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात राजीव वाकपाजर, रा. कठोरा व एक महिला रा. धनबाद, झारखंड यांच्याविरूध्द कौटुंबिक छळाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

विद्यार्थिनीचा पाठलाग करून धमकी

अमरावती : एक युवक पाठलाग करून जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच जीवे मारण्याची धमकी देत असल्याने अल्पवयीन विद्यार्थिनीने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. शहरातील एका महाविद्यालया समोर ही घटना घडली. याप्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात वेदांत राजेश कलाने वय २१, रा. भीमनगर याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील गाडगेनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

युवकाला सत्तुरसह घेतले ताब्यात

अमरावती : गुन्हा करण्याच्या हेतुने संशयितरित्या फिरणाऱ्या एका युवकाला पोलिसांनी गस्तीदरम्यान सौदागरपुरा येथून ताब्यात घेतले. यावेळी त्याच्याजवळून सत्तूर जप्त करून गुन्हा दाखल केला.

मोसीन खान युनूस खान वय २८, रा. कमेला ग्राऊंड असे ताब्यात घेतलेल्या युवकाचे नाव आहे. नागपुरी गेट पोलिसांनी ही कारवाई केली.

भांडणात मध्यस्थी करणाऱ्यावर चाकू हल्ला

अमरावती : काही युवक भांडण करीत असताना एका युवकाने मध्यस्थी करून भांडण करू नका असे म्हटल्याने त्यांच्यावर चाकूने हल्ला करून जखमी केले. वहाब पान सेंटरनजिक, धरमकाटा येथे ही घटना घडली.

१० लाख किंमतीच्या अतिरिक्त रेशन धान्य वाटपात 'आयओची' गेली विकेट

जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश, २२३७ क्विंटल गहू, तांदळाचे अतिरिक्त वाटप

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि.८ : तहसीलच्या (ग्रा.) निरीक्षण अधिकारी (आयओ) यांनी सात रेशन दुकानदारांना दोन हजार क्विंटल अतिरिक्त रेशन धान्य वाटप केल्याचे आहे. चौकशीअंती सातही रेशन दुकानांचे प्राधिकार पत्र रद्द करण्यात आले होते. आता अंतरिम अहवाल प्राप्त झाल्यावर (आयओ) चैताली यादव यांना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मंगळवारी निलंबित केले.

प्रकरणात विशिष्ट सात दुकानदारांना २२३७ क्विंटल गहू, ज्वारी, तांदळाचे अतिरिक्त नियतन मंजूर केल्याने शासनाचे ९०.५४ लाखांचे आर्थिक नुकसान केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. याबाबत यादव यांना खुलासा सादर करण्याचे पत्र दिले होते. त्यांनी २९ डिसेंबरला सादर केलेला खुलासा जिल्हाधिकाऱ्यांनी अमान्य केला आहे. या प्रकरणाचा ,एका वृत्तपत्राद्वारा पाठपुरावा करण्यात आला होता.

याची दखल जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली आहे. आता शासनाचे अपर मुख्य सचिवाद्वारा यादव यांचे मुख्यालय निश्चित केल्या जाईल.

जिल्ह्यातील अन्य तालुक्यां - मधील निरीक्षण अधिकारी यांच्याद्वारा झालेले रेशन धान्य वाटपाबाबत आता क्रॉस चेकिंग सुरू झालेले आहे. यामध्ये एका तालुक्यातील आयओ हे दुसऱ्या तालुक्यातील पुरवठा विभागाचे रेकॉर्डची तपासणी करीत आहेत. याबाबतचा अहवाल अप्राप्त असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सांगितले.

दोन तालुक्यांत घोळ असल्याची चर्चा

जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांच्या आदेशाने १४ ही तालुक्यांतील पुरवठा विभागाचे रेकॉर्डची तपासणी होत आहे. यामध्ये दोन तालुक्यांत सावळागोंधळ असल्याची चर्चा रेशन दुकानदारांमध्ये आहे. दरम्यान, क्रॉस चेकिंगमध्ये आणखी कोणते मासे गळाला लागतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या तपासणीचा अहवाल १५ जानेवारीपर्यंत डीएसओ यांना मिळणार आहे.

कर्मचाऱ्याला मारहाण करून ट्रक पळविला

तिवसा ते कुऱ्हा मार्गावरील घटना

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

तिवसा, दि. ८ : कारवाईत जप्त करण्यात आलेला वाळूचा ट्रक तहसील कार्यालयात घेऊन जात असताना तिवसा येथील महसूल कर्मचाऱ्याला मारहाण करून ट्रक पळवून नेण्यात आला. याप्रकरणी कुऱ्हा पोलिसांनी महसूल सहायक राहुल शंकरराव निस्वादे यांच्या तक्रारीवरून ट्रकचालक व मालकासह दोन अज्ञातांविरुद्ध गुन्हा नोंदविला.

चार जानेवारी रोजी रात्री नऊ वाजेदरम्यान तिवसा महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी गस्तीवर असताना अवैध वाळूने भरलेला एमएच ४९ सीडी ८७३७ क्रमांकाचा दहाचाकी ट्रक हा अंजनसिंगी मार्गे कुकडे येत होता. यादरम्यान तहसीलदार डॉ. मयूर कळसे, नायब तहसीलदार आशिष नागरे, महसूल सहायक राहुल निस्वादे, ग्राम महसूल अधिकारी चरणसिंग दुलत, महसूल सेवक सूरज माथूलकर यांनी ट्रकची तपासणी केली. त्यांना ट्रकमध्ये अवैध वाळू मिळून आली. यावेळी ट्रकवर जप्तीची कारवाई करून तिवसा तहसील कार्यालयात घेऊन जात असताना अचानक भरधाव कार ट्रकच्या आडवी झाली आणि कारमधील ट्रक चालक, मालक व दोन अज्ञात व्यक्तींनी श्री. निस्वादे यांची कॉलर पकडून बाहेर काढून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि वाळू रस्त्यावर टाकून ट्रक पळवून नेला.

श्री विवेकानंद विद्यामंदिर येथे सावित्रीबाई फुले जयंती

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

शिरखेड, दि.८ : श्री विवेकानंद विद्यामंदिर, शिरखेड येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त विद्यालयात स्वयंशासित विद्यालयाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात श्री विवेकानंद सेवा संघाचे अध्यक्ष डॉ. धनंजय तट्टे व विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. जे. एम. तट्टे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले.यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. स्वयंशासित विद्यालयात उत्कृष्ट अध्यापनकार्य करून प्राथमिक विभागातून अनुक्रमे आरती परिहार , तेजल तायडे व कार्तिक जामोदकर यांनी प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला तर माध्यमिक विभागातून सुमित पारवे , नैतिक जामोदकर व कु . आरुषी चरोडे यांनी अनुक्रमे प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला . सर्व गुणवंतांना मुख्याध्यापक जय तट्टे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले . जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात अव्वल स्थान प्राप्त करून विद्यालयाचा नावलौकिक वाढविल्याबद्दल कु. निधी बुवाडे व कु. स्वरा शिंदे तसेच त्यांचे मार्गदर्शक शिक्षक श्री. मयुरेश केचे यांचे डॉ. धनंजय तट्टे यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थिनी निधी व स्वरा आता अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात करणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शारीरिक शिक्षक श्री. नितिन जाणे तसेच अतुल तट्टे, भाग्यश्री खानंदे, मयुरेश केचे उपस्थित होते.

सावंगा विठोबा येथे भाविकांसाठी एसटीची बस सेवा

संस्थानचा तीन वर्षांपासूनचा पाठपुरावा; पुढाकाराला यश

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

चांदूर रेल्वे, दि.८ : बुधवार रोजी सकाळी १० वाजता श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान, श्री क्षेत्र सावंगा (विठोबा), ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांच्या सुरक्षित व सुलभ प्रवासाच्या दृष्टीने संस्थानच्या अथक प्रयत्नांना यश आले आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने अमरावती येथून सकाळी ७.३० वाजता व सायंकाळी ५.४५ वाजता, तसेच चांदूर रेल्वे येथून सकाळी ९.०० वाजता व सायंकाळी ७.१५ वाजता सावंगा (विठोबा) करीता नियमित बस सेवा सुरू करण्यात आली आहे.

बस सेवेच्या प्रथम दिवशी सावंगा (विठोबा) नगरीत बस दाखल होताच संस्थानच्या वतीने बसचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी बस चालक शंकर इंदोरे व वाहक वैशाली ताले यांचा शेला, पिस, गलप, पुष्पहार व नारळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या प्रसंगी संस्थानचे विश्वस्त मंडळ, गावकरी मंडळी, भाविक भक्त, कर्मचारी तसेच शाळेतील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांनी चांदूर रेल्वे ते अमरावती या बससेवेचा प्रवास करून औपचारिक शुभारंभ केला.

तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष कार्यालयात भेट घेऊन या बससेवेसाठी आभार व्यक्त करण्यात आले.

सत्यपाल महाराज चिंचोलीकर यांचा हस्ते गिरीश चौधरींचा सत्कार

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अंजनगाव बारी, दि .८ : येथील खंडोबा यात्रा महोत्सव जलका शहापूर, अमरावती, येथे मंदिराच्या व गावच्या वतीने दिनांक ४ जानेवारी रोजी सायंकाळी महाराष्ट्रातील थोर समाज प्रबोधक कीर्तनकार तसेच आपल्या सप्तखंजिरीच्या माध्यमातून महापुरुषांचा ग्रामस्वच्छतेचा संदेश



देणारे सत्यपाल चिंचोलीकर उर्फ सत्यपाल महाराज, आकोट यांचा सत्यपाल वाणी कार्यक्रमाचे आयोजन मोठया उत्साहात करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित लोकांच्या समवेत समाजसेवक गिरीश चौधरी यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी मरणोत्तर देहदान करण्याचा संकल्प केला. समाजसेवक गिरीश चौधरी शेतकरी, कष्टकरी, गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, भाऊसाहेब देशमुख या थोर महात्माना भारतरत्न द्या, व विविध १२ मागण्यांसाठी मुंबई येथे समुद्रात जल समाधी आंदोलन केले होते तसेच ओरथळ तुरुंगात ठेवण्यात आले होते.अन्याय व गोरगरीब जनतेसाठी न्याय हक्कासाठी लढणारे आंदोलन व उपोषण करून जनतेच्या समस्या शासनदरबारी मांडल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

काशीबाई अग्रवाल विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

येवदा, दि. ८ : येथील काशीबाई अग्रवाल विद्यालयात थोर समाजसुधारिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप देशमुख सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्याध्यापक श्री. अथर सर, जेष्ठ शिक्षक श्री. जी. एस. सोनटक्के सर, सविता बोदळे मॅडम, श्री. जी. एल. देशमुख सर व श्री. राहुल देशमुख सर उपस्थित होते.या कार्यक्रमानिमित्त

विद्यार्थ्यांसाठी वेशभूषा स्पर्धा तसेच भाषण स्पर्धा घेण्यात आल्या.

टीटांबा यात्रेदरम्यान पोलिसांवर हल्ला

धारणी पोलिसांकडून 11 आरोपींना अटक

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

धरणी, दि. ८ : टीटांबा यात्रेदरम्यान बंदोबस्तावर असलेल्या पोलिस कर्मचार्यावर जमावाने हल्ला केल्याची गंभीर घटना घडली. या हल्ल्यात पोलिस कॉन्स्टेबल विकास दुर्योधन वाकोडे (ब. नं. २५२) गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी धारणी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ११ आरोपींना अटक केली असून इतर आरोपींचा शोध व तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यात्रेदरम्यान आरोपी शिवा सुभाष काकडेकर (वय २५, रा. मांडवा) यास पोलिस चौकीकडे नेत असताना जमावातील काही युवकांनी अचानक हस्तक्षेप केला. यावेळी काठया व दगडांच्या सहाय्याने पोलिस कॉन्स्टेबल वाकोडे यांच्यावर प्राणघातक हल्ला

करण्यात आला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर त्यांनी धारणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.या प्रकरणात आरोपी शिवा सुभाष काकडेकर याच्यासह ईश्वर बाबूलाल कासडेकर (वय २५, रा. धुळघाट रोड), प्रमोद नंदलाल कासडेकर (वय २७), रमेश रामदेव सावलकर (वय २५, रा. ढाकणा), मुन्ना कुमांसिंग कच्छवार (वय २६, रा. मांडवा), विशाल पन्नालाल दहीकर (वय २३, रा. बिवामल), शंकर शांतू कासडेकर (वय १९, रा. बेरदा), भुरू रवींद्र छगन बिलावेकर (वय २१, रा. वारू), सुनील बबन भिलावेकर (वय २१, रा. मांडवा), आशिष शोभाराम धांडे (वय २६, रा. धुळघाट रोड), अभिषेक राम कासडेकर (वय १८, रा. कालपी) यांच्यासह इतर दहा ते बारा इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम १२१(१), १३२, ११८(१), ११५(२),३५२, ३५१, १८९ (२), १९०, १९१(२), १९१ (३) तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार कलम 135 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घोटाळा नियमबाह्य सशर्त प्रमाणपत्रे वाटल्याने प्रशासकीय यंत्रणेत खळबळ

जातवैधता समितीचा बेकायदेशीर कारभार उघड

मंत्रालयाकडून सखोल चौकशीचे आदेश | अमरावतीसह राज्यातील सर्वच समित्यांचे धाबे दणाणले

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

अमरावती, दि. ८ : जिल्ह्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने कायद्याच्या मर्यादा ओलांडून वितरित केलेल्या हजारो सशर्त जातवैधता प्रमाणपत्रांमुळे जिल्ह्यात आणि प्रशासकीय यंत्रणेत अभूतपूर्व पेच निर्माण झाला आहे. महाराष्ट्र अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी अधिनियम २००० च्या नियमावलीत सशर्त किंवा अटी असलेली प्रमाणपत्रे देण्याची कोणतीही तरतूद नसताना अमरावती समितीसह राज्यातील यंत्रणेने हा पराक्रम केल्याने आता मंत्रालयाने या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे. पुणे येथील आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या आयुक्त मंजिरी मनीलकर यांनी या संपूर्ण गैरप्र काराची अत्यंत अचूक माहिती तातडीने सादर करण्याचे आदेश दिल्याने अमरावती समितीमधील अधिकाऱ्यांची माहिती संकलित करताना मोठी दमछाक होत असून प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत.

जिल्ह्यात जात पडताळणीची प्रक्रिया सुरू असताना केवळ वैध किंवा अवैध असे निकाल देणे अपेक्षित होते मात्र अमरावती

समितीने मधल्या काळात सशर्त प्रमाणपत्रे देण्याचा नवा आणि बेकायदेशीर मार्ग अवलंबला आहे.

राज्यभरात अशा प्रकारच्या सुमारे तीन हजार प्रमाणपत्रांची खैरात वाटली गेल्याचा अंदाज असून यामुळे खऱ्या आदिवासींच्या घटनादत्त हक्कांवर गदा आली आहे. मंत्रालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून आता प्रत्येक फाईलची बारकाईने तपासणी केली जाणार आहे.

या मोठ्या घोटाळ्याविरोधात ट्रायबल फोरम ही संघटना आता पूर्ण ताकदीने मैदानात उतरली आहे. संघटनेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष ॲड. प्रमोद घोडाम यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन अमरावती समितीच्या कारभारावर तीव्र ताशेरे ओढले आहेत. ही सर्व बेकाय देशीर प्रकरणे विहित कालमयदित निकाली काढून खोट्या प्रमाणपत्रधार कांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि त्यांनी आजवर लाटलेले शासकीय लाभ वसूल करून त्यांच्या पदव्या रद्द कराव्यात अशी आक्रमक मागणी करण्यात आली आहे. अमरावती समितीकडून सादर होणारी माहिती जर चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळली तर संबंधित अधि काऱ्यांवर थेट प्रशासकीय बडगा उगारला जाणार आहे. सध्या समिती कार्यालयात कागदपत्रांची जुळवाजुळव करताना मोठी धावपळ सुरू असून प्रत्येक प्रकरणाची सत्यता पडताळ ण्यासाठी मंत्रालयाकडून विशेष पथके तैनात करण्याचे संकेत मिळाले आहेत.

अमरावतीसह राज्यातील पुणे ठाणे पालघर नाशिक नाशिक क्रमांक दोन नंदुरबार धुळे छत्रपती संभाजीनगर किनवट यवतमाळ नागपूर गोंदिया गडचिरोली आणि चंद्रपूर या सर्व समित्यांचा अहवाल आता शासनाकडे सादर होणार आहे. या कारवाईमुळे केवळ लाभार्थीच नव्हे तर नियमबाह्य काम करणारे अधिकारी देखील चौकशीच्या फेऱ्यात अडकले असून लवकरच अमरावती जिल्ह्यात मोठे फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ट्रायबल फोरम या संघटनेने या घोटाळ्याप्रकरणी आक्रमक भूमिका घेतली असून ॲड प्रमोद घोडाम यांच्या नेतृत्वाखाली खोटया लाभार्थ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे नियमबाह्य प्रमाणपत्रे मिळवून शासकीय सेवेत रुजू झालेल्यांच्या पदव्या रद्द कराव्यात आणि त्यांनी आजवर घेतलेले आर्थिक समिती सदस्यांवरही प्रशासकीय बडगा उगारला जाणार असल्याने अमरावतीसह राज्यातील १५ समित्यांचे धाबे दणाणले आहेत

समितीच्या बंद दाराआड फायलींवर स्वाक्षऱ्या

जात पडताळणी कायद्यात सशर्त असा कोणताही शब्द अस्तित्वात नसताना हजारों घुसखोरांना आदिवासीचे अधिकार बहाल करणे हा केवळ तांत्रिक बिघाड नसून तो एक नियोजनबद्ध प्रशासकीय गुन्हेगारीचा प्रकार आहे. अमरावती समितीच्या बंद दाराआड अशा किती फावलीवर स्वाक्षऱ्या झाल्या याचा हिशोब आता मंत्रालयाला द्यावा लागणार आहे.

थोडक्यात

सावळी सदोबा प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी राम पवार

सावळी सदोबा : आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा येथील प्रेस क्लब संघटनेच्या नवनिर्वाचित अध्यक्षपदी पत्रकार राम पवार यांची, तर उपाध्यक्षपदी आसिफ सुमार आणि सचिवपदी सुरेश राठोड यांची अविरोध निवड करण्यात आली. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून ही नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. संस्थेचे माजी अध्यक्ष अविनाश चव्हाण यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचा प्रस्ताव मांडला, ज्याला उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली. निवडीनंतर बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष राम पवार यांनी सदस्यांचे आभार मानले. 'संघाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत, संघटनेच्या माध्यमातून समाजहितासाठी आणि लोकाभिमुख पत्रकारितेसाठी सदैव कटिबद्ध राहीन,' अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी मावळते अध्यक्ष अविनाश चव्हाण यांच्यासह रुपेश खरतडे, दुर्गेश कर्णेवार, प्रमोद कोट्टावार, सुरेश पवार, श्रीकांत देशमुख, रमेश राठोड, धनराज पवार, मोहम्मद सर्वे, जे. बी. पठाण, राहुल राऊत आणि प्रेस क्लबचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दिग्रस येथे पत्रकार दिन उत्साहात

दिग्रस : पत्रकार दिनाचे औचित्य साधून मंगळवारी (दि. ६) 'व्हॉइस ऑफ मीडिया' पत्रकार संघटना (शाखा दिग्रस) च्या वतीने नगरपालिकेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि नवनियुक्त नगरसेवकांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. समाजातील गुणवत्तेला प्रोत्साहन देणे आणि लोकप्रतिनिधींच्या कार्याची दखल घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी नगरपालिका हद्दीतील शाळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तब्बल ४३ विद्यार्थ्यांचा आणि नवनिर्वाचित नगरसेवकांचा शाल, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना सातत्य आणि परिश्रमाचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुकाध्यक्ष धर्मराज गायकवाड, उपाध्यक्ष प्रशांत झोळ, सचिव आजीस शेख, कार्याध्यक्ष सय्यद शोएब, कोषाध्यक्ष साजिद पतलेवाले, संघटक सदानंद जाधव, प्रसिद्धी प्रमुख पृथ्वीराज चव्हाण, सदस्य जुबेर खान, विठ्ठल राठोड, वैभव गव्हाणे, संतोष राठोड आणि किशोर कांबळे या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शिक्षक, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विडूळच्या चिमुकल्यांना व्यंगचित्र कलेचे धडे

विडूळ : येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवी आबादी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती आणि बालिका दिनाचे औचित्य साधून आयोजित एका अभिनव कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी व्यंगचित्र कलेची ओळख करून घेतली. उमरखेड येथील प्रसिद्ध व्यंगचित्रकार प्रभाकर दिघेवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा उत्साहात पार पडली. दिघेवार यांनी विद्यार्थ्यांना वर्तुळ, चौकोन आणि त्रिकोणासारख्या सोप्या आकारांतून मानवी चेहऱ्यांचे हावभाव आणि शरीर रचना कशी करावी, याचे सोप्या भाषेत धडे दिले. "व्यंगचित्रकार हा कमीत कमी रेषांतून समाजातील सत्य मांडणारा कलावंत असतो. यासाठी वाचन, निरीक्षणशक्ती आणि विनोदबुद्धी आवश्यक आहे," असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी मोबाईलचा अतिवापर, भ्रष्टाचार, पर्यावरण आणि व्यसनमुक्ती यांसारख्या सामाजिक विषयांवर कुंचल्यातून मार्मिक फटकारे ओढत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उत्कृष्ट चित्रे काढणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक गोपाल केंद्रे, शिक्षक नागेश मिरासे, सपना महाजन आणि सुवर्णा बाकडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

उदघाटनाचा नारळ फुटला, पण रस्ता कागदावरच!

गणोरी-अंतरगाव पांदण रस्ता रखडला; प्रजासत्ताकदिनी शेतकरी उपोषणाच्या तयारीत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

बाभूळगाव, दि.८ : बाभूळगाव तालुक्यातील गणोरी येथील पांदण रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षांपासून रस्ता रखडले आहे. शेतीच्या वहितीसाठी गणोरी ते अंतरगाव हा रस्ता मंजूर झाला आहे. दोन वर्षांपूर्वी याचे भूमिपूजन झाले. गटविकास अधिकाऱ्यांच्या हस्ते नारळ फोडला. पण काम अजूनही अपूर्णच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रशासनाविरोधात संताप आहे. याप्रकरणाची दखल जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांनी घ्यावी, अशी मागणी गणोरी येथील शेतकरी सिद्धार्थ भितकर यांनी पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

२६ जानेवारी २०२४ ला सदर रस्त्याच्या बांधकामाचे उद्घाटन झाले होते. जेसीबीने फक्त झाडेझुडपे काढली. त्याच रात्री जेसीबी परत गेला. त्यानंतर काम पुढे सरकलेच नाही. रस्ता मोजणी झाली, पण रस्ताच झाला नाही. राजकीय दबावामुळे काम थांबविल्याची चर्चा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर दिसून येत आहे. शेतकऱ्यांचे हाल शेतकऱ्यांना जीव मुठीत धरून जावे लागते. डोक्यावर ओझे वाहून नेण्याची वेळ आली आहे. बैलगाडी शेतात नेणे कठीण झाले आहे. कापूस, सोयाबीन घरी आणायचे कसे? हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावतो आहे. रस्त्याअभावी शेती पडिक पडण्याची भीती आहे.

शासनाचा जीआर काय सांगतो?

शासनाने पांदण रस्ते मोकळेकरण्याचे आदेश दिले आहेत. रस्त्यात अडथळा आणणाऱ्यांवर गुन्हे दाखल होऊ शकतात. असा 'मातोश्री' स्पष्ट 'जीआर' शासनाने काढला आहे. मग गणोरीत कारवाई का होत नाही? प्रशासनाने राजकीय दबाव झुगारणे गरजेचे आहे. तातडीने रस्ता तयार करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी पालकमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी दिला उपोषणाचा इशारा

आता शेतकऱ्यांचा संयम सुटला आहे. प्रशासन दखल घेत नाही. त्यामुळे शेतकरी उपोषणाच्या तयारीत आहेत. येत्या २६ जानेवारीला पीडित शेतकरी बाभूळगाव येथील तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याची माहिती शेतकरी सिद्धार्थ भितकर यांनी दिली आहे.

नेरमध्ये रंगला 'अक्षर-मात्रांचा खेळ'

४१ शिक्षकांनी विद्यार्थी बनून घेतला नाविन्यपूर्ण अध्यापनाचा अनुभव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नेर (परसोपंत), दि. ८ : येथील नगरपरिषद शाळा क्रमांक २ मध्ये 'सिखे' संस्थेच्या टीचर्स लर्निंग सर्कल (TLC) अंतर्गत आयोजित कार्यशाळेत ४१ शिक्षकांनी चक्क विद्यार्थी बनून आनंददायी शिक्षणाचा अनुभव घेतला. "विद्यार्थ्यांचा पाया पक्का करण्यासाठी शिक्षकांनी अध्यापनात नाविन्यपूर्ण प्रयोगांची कास धरणे काळाची गरज आहे," असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी मंगेश देशपांडे यांनी यावेळी केले.

या विशेष सत्रात 'पासवर्ड', 'अक्षर-मात्रांचा खेळ' आणि 'बिंगो' यांसारख्या खेळांच्या माध्यमातून भाषिक कौशल्ये कशी विकसित करावीत, याचे धडे शिक्षकांना देण्यात आले. 'पासवर्ड' ॲक्टिव्हिटीमुळे शब्दसंपत्ती वाढवण्याची युक्ती मिळाली, तर हवेत उडणारे फुगे पकडून शब्द तयार करण्याच्या स्पर्धेने शिक्षकांमध्ये उत्साह संचारला. टीएलसी प्रमुख वर्षा परचुरे यांनी शिक्षकांना अध्यापनात नाविन्य आणण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला प्रशासन अधिकारी गजेंद्र कणसे, केंद्रप्रमुख अरविंद बोबडे, 'सिखे'चे राज्य समन्वयक डॉ. शरदचंद्र पाटील, जिल्हा व्यवस्थापक संभाजी भिसे, सह व्यवस्थापक नितीन पखाले उपस्थित होते. सत्राच्या यशस्वीतेसाठी विकास नागोसे, तितीक्षा डंभे व वैष्णवी शिंबरे यांनी परिश्रम घेतले.

नळाला नाही पाणी, रस्त्यांची मात्र 'नहाणी'

पाण्याच्या टाकीतून लाखो लिटर शुद्ध पाण्याचा अपव्यय

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

पुसद, दि. ८ : नवीन वर्षात पुसद नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचा अनागोंदी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. मोतीनगर परिसरातील पाण्याची टाकी ओव्हरफ्लो झाल्याने लाखो लिटर शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रचंड अपव्यय झाला. विशेष म्हणजे, नवीन वर्षातील ही चौथी घटना असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अर्धा तास पाणी रस्त्यांवरून वाहात होते.

एकीकडे शहरातील अनेक भागांत नागरिक हंडाभर पाण्यासाठी वणवण भटकत असताना, दुसरीकडे पालिकेच्या निष्काळजीपणामुळे रस्ते शुद्ध पाण्याने धुतले जात आहेत. जलसंधारणाचे जनक स्व. सुधाकरराव नाईक यांच्या कर्मभूमीतच 'पाणी वाचवा' मोहिमेला हरताळ फासला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पहाटेच्या वेळी पाणी वाया जात असताना संबंधित जबाबदार कर्मचारी व अधिकारी जागेवर नसल्याचे दिसून आले. 'स्वच्छ पुसद, सुंदर पुसद'मध्ये 'नळाला नाही पाणी, पण रस्त्यांची मात्र रोज नहाणी' अशी विदारक स्थिती निर्माण झाली आहे. या बेजबाबदार कारभारावर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

निलोफर साजिद बेग यांची गटनेतेपदी बिनविरोध निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

आर्णी, दि. ८ : आर्णी नगर परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या गटनेतेपदी नवनिर्वाचित नगरसेविका निलोफर साजिद बेग यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या सर्व नवनियुक्त नगरसेवकांनी एकमताने त्यांच्या नावाला पसंती देत विश्वास व्यक्त केला.

निलोफर बेग या सामाजिक कार्यात सक्रिय असून त्यांच्या निवडीमुळे पक्ष संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. समन्वयाच्या जोरावर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या समस्या प्रभावीपणे सोडवण्यासाठी त्या कार्य करतील, अशी अपेक्षा पक्षाच्या नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी पक्षाचे सर्व नगरसेवक उपस्थित होते.

'नो पार्किंग' फलकाखालीच वाहनांचा ठिय्या!

दिग्रस पंचायत समितीच्या प्रवेशद्वारावरच गराडा पडल्याने नागरिकांची कोंडी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

दिग्रस, दि. ८ : शासकीय कार्यालयात शिस्त आणि नियमांचे पालन करण्याचे धडे देणारे प्रशासनच जेव्हा नियमांची पायमल्ली करते, तेव्हा 'दिव्याखाली अंधार' या म्हणीची प्रचिती आल्यावाचून राहत नाही. असाच काहीसा संतापजनक प्रकार सध्या दिग्रस पंचायत समितीच्या कार्यालयासमोर पाहायला मिळत आहे. पंचायत समितीच्या मुख्य प्रवेशद्वारावर 'येथे वाहने उभी करू नयेत, अन्यथा कायदेशीर कारवाई होईल', असा स्पष्ट इशारा देणारा फलक लावण्यात आला आहे. मात्र, याच फलकाच्या सावलीत आणि 'नो पार्किंग' झोनमध्ये बिनधास्तपणे 'महाराष्ट्र शासन' लिहिलेली शासकीय वाहने आणि कर्मचाऱ्यांच्या दुचाकींचा खच पडलेला दिसत आहे.

दिग्रस पंचायत समितीमध्ये दररोज शेकडो नागरिक आपल्या विविध कामांसाठी येत असतात. कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर गर्दी होऊ नये आणि ये-जा करणाऱ्यांना अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने प्रवेशद्वाराच्या भिंतीवर वाहने उभी न करण्याबाबत सक्त ताकीद दिली आहे. मात्र, या फलकाचा आदर राखणे तर दूरच, उलट खुद्द अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीच या नियमाला केराची टोपली दाखविली आहे. जर एखाद्या सामान्य नागरिकाने चुकून आपली गाडी तिथे उभी केली, तर शिपायांकडून त्याला अपमानित केले जाते किंवा कारवाईचा बडगा उगारला जातो. मात्र, त्याच ठिकाणी तासनतास उभ्या असलेल्या शासकीय वाहनांकडे अधिकारी सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मुख्य प्रवेशद्वारासमोरच वाहनांचा गराडा असल्याने कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना आत जाण्यासाठी वाट शोधावी लागत आहे.

नावात बदल

मी रुबीना फिरोज खान राहणार मोतिनगर दिग्रस तालुका दिग्रस जिल्हा यवतमाळ असे जाहीर करतो की माझ्या शैक्षणिक कागदावर माझे नाव रुबीना परवीन खलील खान असे असुन सध्या माझ्या इतर कागदपत्रावर म्हणजे आधारकार्ड पॅनकार्ड इलेक्शन कार्ड वर रुबीना फिरोज खान आहे.व माझे नाव रुबीना फिरोज खान असेच राहणार आहे.

ढाणकीच्या नगराध्यक्षपदी अर्चना वासमवार आरूढ

खासदार नागेश पाटील आष्टीकर यांची प्रमुख उपस्थिती, राजकारण बाजूला ठेवून विकासाचा ध्यास घेणार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

ढाणकी, दि.८ : ढाणकी नगरपंचायतीच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत विजय संपादन केल्यानंतर, नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. अर्चना सुंदरकांता वासमवार यांनी आज (दि. ८) वाजतगाजत आणि मोठ्या उत्साहात नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला.

पदभार स्वीकारण्यापूर्वी सौ. अर्चना वासमवार यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर नगरपंचायतीच्या प्रवेशद्वारावर (उंबरठ्यावर) नतमस्तक होऊन त्यांनी जनतेप्रती कृतज्ञता व्यक्त करत आपल्या कार्यालयात प्रवेश केला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना सौ. वासमवार म्हणाल्या की, 'सामान्य कुटुंबातून आलेल्या माझ्यासारख्या महिलेला जनतेने जी संधी दिली, त्याबद्दल मी ऋणी आहे. ढाणकी शहरात अनेक समस्या 'आ' वासून उभ्या आहेत. आता निवडणुका संपल्या असून राजकारण बाजूला ठेवून गावच्या विकासाचा ध्यास घेण्याची वेळ आली आहे. विरोधकांनाही सोबत घेऊन आणि सर्वांच्या सहकार्याने शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.' पाण्याचा प्रश्न पोटतिडकीने मांडताना त्या गहिवरून गेल्या होत्या. या सोहळ्याला माजी नगराध्यक्ष सुरेश भैया जयस्वाल, उपनगराध्यक्ष शेख जहिर भाई जमीनदार, मुख्याधिकारी अजय कुरवाडे, माजी बाजार समिती सभापती बाळू पाटील चंद्रे, यवतमाळ जिल्हाध्यक्ष फैजान लाल, शिवसेना (उबाठा) शहराध्यक्ष कांता वासमवार, शिवसेना (शिंदे गट) शहराध्यक्ष संजय सल्लेवाड, दत्त दिगंबर वानखेडे, माजी पं. स. उपसभापती खाजाभाई कुरेशी, संदीप भाऊ ठाकरे, दत्तराव शिंदे यांच्यासह काँग्रेस, एमआयएम आणि शिवसेना (शिंदे गट) पक्षांचे नगरसेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन अविनाश जोशी यांनी केले. या पदग्रहण सोहळ्यासाठी गावातील महिला, सर्वपक्षीय नेते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **'मी एका सामान्य कुटुंबातून आले असून, पाण्यासाठी महिलांची होणारी परवड मी स्वतः अनुभवली आहे. त्यामुळे आता राजकारण बाजूला ठेवून शहराचा पाणीप्रश्न मार्गी लावणे हेच माझे पहिले ध्येय असेल.'**
>
> **-सौ. अर्चना वासमवार,**
> **नगराध्यक्ष, ढाणकी नगरपंचायत.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
तहसिलदार महागांव यांचे कार्यालय, महागांव

Email id- tgp.mahagoan@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०७२३६-२२२२३८
क्रमांक/म.स./जन्म नोंद/कावि/ ३०२ /२०२५ दिनांक : १०/१०/२०२५

प्रति,
१. गट विकास अधिकारी,पंचायत समिती,महागांव
२. ग्रामीण पोलीस निरीक्षक पो.स्टेशन काळी दौ
३. वैद्यकीय अधिकारी काळी दौ
४. मंडळ अधिकारी काळी दौ

विषय :- जन्म नोंद नोंदविणे प्रकरणात अहवाल सादर करणेबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक जमुनों २५२५/ई.ऑ.९९११८१/प्र.क्रं.२२/ कु.क दि.१२ मार्च,२०२५

---ooo---

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये अर्जदार मधुकर भिकु राठोड रा माळवागद यांनी त्यांच्या वडीलाच्या मृत्युची नोद नामे भिकु कनिराम राठोड : दि. ३१/०३/२०२१ रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या मृत्युची नोंद सचिव,ग्रा.पं. माळवागद ता.महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम १३ (३) नुसार सचिव. ग्रा.पं. माळवागद नगरपंचायत,महागांव यांनी त्यांच्या जन्माची नोंद घेण्याबाबत आदेशित करणेबाबतचे प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते कि,सदर अर्जाचे अनुषंगाने अर्जदार यांची वडीलाची / मृत्युची नोंदणी आपले अभिलेख रजिस्टरला पडताळणी करून संबंधीत व्यक्तीची मृत्युची नोंद आहे किंवा नाही. तसेच सदर व्यक्तीचा मृत्युची कुठे व कधी झाला याबाबत चौकशी करून आवश्यक दस्तऐवजासह आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल तात्काळ या कार्यालयात सादर करावा.सदर आपल्या अहवाला अभावी प्रलंबित राहील्यास सर्वस्वी आपली जबाबदारी राहील यांची नोंद घ्यावी.

अभय देविदासराव मस्के
तहसिलदार, महागाव

यवतमाळचा 'लिटल चॅम्प' झळकला छोट्या पडद्यावर!

'मी होणार सुपरस्टार-छोटे उस्ताद ४' मध्ये सहभाग: देशभरातील ३५०० स्पर्धकांमधून अरहनची 'टॉप १२'मध्ये धडक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि.८ : आपल्या जादुई आवाजाने यवतमाळच्या एका १०वर्षांच्या चिमुकल्याने संपूर्ण महाराष्ट्राला भुरळघातली आहे. 'स्टार प्रवाह'या लोकप्रिय वाहिनीवरील 'मी होणार सुपरस्टार-छोटे उस्ताद सीझन-४' या कार्यक्रमात यवतमाळच्या अरहन सुबोध वाळके याने दिमाखदार प्रवेश केला आहे. राज्यभरातून आलेल्या तब्बल ३५०० स्पर्धकांमधून आपल्या गायकीची चुणूक दाखवत अरहनने 'टॉप १२'मध्ये स्थान निश्चित केले आहे.

नुकत्याच प्रसारित झालेल्या एका एपिसोडमध्ये अरहनने 'मन उधाण वाऱ्याचे...'हे गाणे सादर केले. त्याच्या या सुरेल सादरीकरणाने केवळ प्रेक्षकांचीच नाही, तर परीक्षक म्हणून लाभलेले ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकर, गायक आदर्श शिंदे आणि गायिका वैशाली सामंत यांचीही मने जिंकली. अवघ्या १० वर्षांच्या या 'छोट्या उस्तादा'चे सध्या सर्वत्र कौतुक होत आहे. अरहन हा स्थानिक सेंट अलॉयसियस शाळेत पाचव्या वर्गात शिकत आहे. त्याला संगीताचे बाळकडू घरातूनच मिळाले आहे. त्याचे वडील सुबोध वाळके हे गेल्या २५वर्षांपासून संगीत क्षेत्रात कार्यरत असून, त्यांचा 'जिमी स्टुडिओ' प्रसिद्ध आहे. त्यांनी आतापर्यंत आदिवासी गोंडी, मराठी आणि बंजारा भाषेत अनेक गाणी तयार केली आहेत. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत अरहनने वयाच्या चौथ्या वर्षांपासूनच गाणे गुणगुणायला सुरुवात केली होती.

वडिलांचा वारसा, गुरूंचे मार्गदर्शन

अरहनच्या या यशामागे त्याचे वडील सुबोध वाळके यांचे प्रोत्साहन आणि संगीत शिक्षक गौरव मानकर व अतुल शिरे यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे. ३५००स्पर्धकांच्या गर्दीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे सोपे नव्हते, पण अरहनच्या जिद्दीने आणि रियाजाने त्याला 'टॉप १२' मध्ये स्थान मिळवून दिले. यवतमाळच्या या 'सुरेल ताऱ्या'वर सध्या अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अरहनने संगीताचे शास्त्रशुद्ध धडे गौरव मानकर आणि अतुल शिरे या गुरूंकडून गिरवले आहेत. सुरुवातीला त्याने गायलेली गाणी सोशल मीडियावर व्हायरल झाली होती, ज्याला नेटकऱ्यांची मोठी पसंती मिळाली. याच माध्यमातून त्याचा आत्मविश्वास वाढला आणि त्याने या स्पर्धेत भाग घेतला. भविष्यात संगीत क्षेत्रातच करिअर करण्याचा मानस अरहनने बोलून दाखवला आहे.

महत्वाचे

बँक प्रतिनिधीपदी आशिष सोळंके

बाभूळगाव : तालुक्यातील सरूळ येथील ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्थेतून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे प्रतिनिधी म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आशिष भीमसिह सोळंके यांची निवड झाली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाच्या सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली. या निवडीसाठी मतदान घ्यावे लागले. यात आशिष सोळंके आणि विलाससिंग सोळंके यांच्यात थेट लढत झाली. संस्थेच्या १३ सदस्यांनी मतदान केले असता, आशिष सोळंके यांना ७ मते मिळाली तर विलाससिंग यांना ६ मते मिळाली. एका मताच्या फरकाने आशिष सोळंके विजयी ठरले. ते माजी जिल्हा परिषद आरोग्य सभापती भीमसिह सोळंके यांचे सुपुत्र असून प्रगतशील शेतकरी आहेत. यापूर्वी त्यांनी सरूळ ग्रामपंचायतचे उपसरपंचपदही भूषविले आहे. त्यांच्या निवडीबद्दल परिसरातून अभिनंदन होत आहे.

भरधाव ट्रकची ऑटोला धडक

वणी : भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने प्रवाशांनी भरलेल्या ऑटोला जोरदार धडक दिल्याची घटना वांजरी शिवारात घडली. या अपघातात ऑटोमधील प्रवासी जखमी झाले आहेत. फिर्यादी ऑटो चालक संजय भीवसन बोंडे (२५, रा. वांजरी) हे ७ जानेवारी रोजी सकाळी आपल्या ऑटोने (एमएच २९ टी ७६२९) प्रवासी घेऊन जात होते. त्यावेळी आरोपी ट्रक चालक ज्ञानेश्वर अजय सूर्यवंशी (३०, रा. आवाडपूर, ता. कोरपना) याने ट्रक (एमएच ३४ सीक्यू ०९५६) निष्काळजीपणे चालवून ऑटोला धडक दिली. या घटनेप्रकरणी वणी पोलीस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निधन

भागीरथाबाई वाळके

यवतमाळ : समता पर्व प्रतिष्ठानचे सक्रिय सदस्य आणि मार्गदर्शक प्राचार्य चंद्रकांत वाळके यांच्या मातोश्री भागीरथाबाई भानुदास वाळके यांचे आज दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पांढरकवडा येथील मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल समता पर्व प्रतिष्ठान, यवतमाळच्या वतीने शोक व्यक्त करण्यात आला आहे.

आज कोणाला लागणार 'सभापती'पदाची लॉटरी?

यवतमाळ पालिकेत आज निवड; उपाध्यक्ष, स्वीकृत सदस्य आणि विषय समित्यांची निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि.८ : यवतमाळ नगरपरिषदेच्या सत्तेचा दुसरा अंक आज रंगणार आहे. नगराध्यक्षपदी ॲड. प्रियदर्शनी उईके विराजमान झाल्या आहेत. आता सर्वांचे लक्ष सभापती निवडीकडे लागले आहे. आज (शुक्रवारी, ९ जानेवारी) पालिकेत मोठी घडामोड होणार आहे. उपाध्यक्ष, सभापती आणि स्वीकृत सदस्यांची निवड होणार आहे. कोणाच्या गळ्यात कोणती माळ पडणार? याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

यवतमाळ पालिकेत भाजपची एकहाती सत्ता आहे. भाजपने 'शहर विकास आघाडी' स्थापन केली आहे. भाजपचे २८ नगरसेवक निवडून आले आहेत. प्रहार जनशक्तीचे २, शिंदे सेनेचे ७ सदस्य आहेत. काँग्रेसचे १५ नगरसेवक विरोधात आहेत. बसपा १, एमआयएम १ आणि वंचितचे ३ सदस्य आहेत. एक अपक्षही रिंगणात असून सभापती निवडीचा चेंडू माजी मंत्री मदन येरावार यांच्या कोर्टात आहे. माजी मंत्री मदन येरावार अंतिम निर्णय घेतील. भाजपच्या गोटात हालचाली वाढल्या आहेत. उपाध्यक्षपदासाठी जोरदार रस्सीखेच सुरू आहे. ज्येष्ठ नगरसेवक सुभाष राय यांचे नाव चर्चेत आहे. दत्ता कुळकर्णी आणि मुन्ना दुबेही शर्यतीत आहेत. ५ स्वीकृत सदस्यांसाठी ११ अर्ज आले आहेत. यात भाजपच्या ३ जागांसाठी ३ अर्ज आहेत. जगदीश वाधवाणी, अमोल देशमुख यांची नावे पक्की मानली जात आहेत. रेखा कोठेकर यांचेही नाव आघाडीवर आहे. शिवसेनेच्या (शिंदे गट) १ जागेसाठी ६ अर्ज आहेत. काँग्रेसच्या १ जागेसाठी २ अर्ज आले आहेत. काँग्रेसकडून जाकीर भाई आणि संतोष बोरले चर्चेत आहेत. भाजपने एकहाती सत्ता मिळवली आहे. त्यामुळे शिंदे सेनेला सत्तेपासून दूर ठेवले जाईल का? असा प्रश्न राजकीय वर्तुळात विचारला जात आहे. मात्र, सूत्रांनी वेगळी माहिती दिली आहे. शिंदे सेनेला एक सभापतीपद मिळण्याची शक्यता आहे. भाजपच्या गोटात यावर खलबते सुरू आहेत.

प्रहारला मिळणार बक्षीस?

प्रहार जनशक्ती पक्षाने भाजपला साथ दिली. त्यामुळे बिपिन चौधरी यांचे नाव चर्चेत आहे. त्यांना सभापतीपदाची लॉटरी लागू शकते. आज आरोग्य, बांधकाम, नियोजन समित्यांचे सभापती ठरतील. महिला बालकल्याण आणि स्थायी समितीचेही गठन होईल. आजच्या सभेने पालिकेचे चित्र स्पष्ट होणार आहे.

यवतमाळच्या विकासाचा 'मास्टर प्लॅन' तयार

मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून विकासपर्वाला प्रारंभ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि.८ : यवतमाळ पालिकेत विकासाचे नवे पर्व सुरू झाले आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी पदभार स्वीकारला आहे. त्यांनी शहराच्या विकासाचा ध्यास घेतला आहे. यासाठी त्यांनी १०० दिवसांचा 'कृती आराखडा'जाहीर केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना यात असेल. शहराला गतवैभव प्राप्त करून देण्याचा त्यांचा निर्धार आहे.

या आराखड्यात प्रत्येक घटकाचा विचार झाला आहे. उच्चभ्रू वस्त्यांपासून झोपडपट्ट्यांपर्यंत विकास पोहोचेल. पालिकेचा कारभार आता हायटेक होणार आहे. कर भरण्यासाठी 'क्यूआर कोड' प्रणाली येईल. त्यामुळे कर भरणे सोपे होईल. शासकीय योजनांची माहिती सर्वांना मिळेल. यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येईल. केंद्र सरकारच्या योजना तळागाळात पोहोचवल्या जातील. तरुणांच्या हाताला काम मिळणे गरजेचे आहे. यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाईल. स्पर्धा परीक्षेसाठी सुसज्ज अभ्यासिका उभारली जाईल. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शक उपलब्ध करून देऊ. शहरात स्वच्छतेची मोहीम राबवली जाईल. पालिकेतील जुने रेकॉर्ड नष्ट केले जातील. अनावश्यक वस्तूंची विल्हेवाट लावली जाईल. नागरिकांसाठी 'मदत कक्ष'स्थापन केला जाईल. तिथे तत्काळ मार्गदर्शन मिळेल. महिलांच्या सन्मानासाठी विशेष पावले उचलली जातील. त्यांच्यासाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उभारली जातील. मातांसाठी 'हिरकणी कक्ष' सुरू होईल. पत्रकारांसाठीही पालिकेत स्वतंत्र कक्ष असेल. कर्मचारी वर्गाला नवीन तंत्रज्ञान शिकवले जाईल. शहराच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसतील. मुख्य रस्ते सीसीटीव्हीच्या कक्षेत येतील. आरोग्य यंत्रणा सक्षम केली जाईल. पालिकेचे दवाखाने सुसज्ज होतील. रस्ते खड्डेमुक्त आणि दर्जेदार असतील. तक्रार निवारणासाठी 'वार रूम' सुरू होईल. वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवला जाईल. बेकायदेशीर पार्किंगवर कारवाई होईल. शाळांचा दर्जा सुधारण्यावर भर असेल. शाळा 'डिजिटल'करण्याचा मानस आहे. आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील. नागरिकांना शुद्ध पाणी मिळेल. पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन केले आहे. जनतेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवू. सर्वांना सोबत घेऊन शहर विकास साधू, असा ठाम विश्वास नगराध्यक्षांनी व्यक्त केला.

वणीतील तंबाखू तस्करी प्रकरण थेट 'एसपीं'च्या दालनात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

वणी, दि.८: शहरातील पंचशील नगर येथे ८ डिसेंबर २०२४ रोजी पकडण्यात आलेल्या सुगंधित तंबाखू साठा प्रकरणाला आता नवीनच वळण लागले आहे. अन्न व औषध प्रशासनाने गंभीर गुन्हे दाखल करूनही पोलिस प्रशासनाने गुन्ह्यात वापरलेले वाहन अद्याप जप्त न केल्याने तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणात पोलिसांचे तंबाखू माफियाशी 'साटेलोटे' असल्याचा गंभीर आरोप करत युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अजिंक्य शेंडे यांनी थेट यवतमाळ जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली आहे.

जागरूक नागरिकांनी '११२'वर दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी ही कारवाई केली होती. मात्र, घटनेला एक महिना उलटूनही या गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन पोलिसांनी जप्त केलेले नाही. सीसीटीव्ही फूटेज, प्रत्यक्ष साक्षीदार आणि वाहन मालकाची माहिती उपलब्ध असतानाही कारवाई का होत नाही? असा सवाल शेंडे यांनी उपस्थित केला आहे. हा 'अर्थपूर्ण विलंब' मुख्य सूत्रधाराला वाचवण्यासाठीच असल्याचा संशय युवासेनेने व्यक्त केला आहे. या प्रकरणी युवासेनेने एसपींना दिलेल्या निवेदनात तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. संबंधित वाहन तत्काळ जप्त करावे, एफडीएच्या गुन्ह्यानुसार मुख्य तंबाखू माफियाला अटक करावी आणि तपासात जाणीवपूर्वक दिरंगाई करणाऱ्या तपास अधिकाऱ्याला निलंबित करावे. येत्या ४८ तासांत ठोस कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा युवासेनेने दिला आहे.

नालंदा भरणे यांनी स्वीकारली नगराध्यक्षपदाची सूत्रे

आर्णी नगरपरिषदेत पदग्रहण सोहळा उत्साहात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

आर्णी, दि.८ : आर्णी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाचा पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. काँग्रेस पक्षाच्या नालंदा भरणे यांनी अधिकृतपणे नगराध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. त्यांच्या निवडीमुळे आर्णी शहराच्या राजकारणात काँग्रेस पक्षाची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

या सोहळ्याला माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी आमदार ख्वाजा बेग, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आरिज बेग, जितेंद्र मोघे आणि आर्णीचे पहिले नगराध्यक्ष अनिल आडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच माजी सभापती राजीव वीरखडे, प्रदीप वानखेडे, सुनील भारती, नंदकिशोर राठी, यासीन उर्फ लाला फादलानी यांनीही उपस्थित राहून नवनिर्वाचित नगराध्यक्षांना शुभेच्छा दिल्या. पदग्रहणानंतर बोलताना नगराध्यक्ष नालंदा भरणे यांनी शहराच्या मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि रस्ते विकासाला प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. 'पक्षात भेद न ठेवता, सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन शहराच्या विकासासाठी काम करू,' असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी मुख्याधिकारी रवींद्र राऊत, शिवसेनेचे गटनेते पवन चापले, राष्ट्रवादीच्या गटनेत्या निलोफर बेग, काँग्रेसचे गटनेते अमोल मांगूळकर यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेनेच्या गटनेतेपदी पवन चापले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

आर्णी, दि. ८ : आर्णी नगरपरिषदेत शिवसेनेच्या (शिंदे गट) गटनेतेपदी युवा नगरसेवक पवन चापले यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाध्यक्ष राजूदास जाधव यांच्या नेतृत्वात ही निवड प्रक्रिया पार पडली.

शहराच्या विकासासाठी अभ्यासू नेतृत्वाची गरज व्यक्त करत पालकमंत्री राठोड यांनी चापले यांच्या नावाला पाठिंबा दिला. सर्व नगरसेवकांनी याला एकमताने संमती दिली. निवडीनंतर शिवसैनिकांनी फटाके फोडून जल्लोष केला. 'आर्णीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहू,' असा विश्वास नवनिर्वाचित गटनेते पवन चापले यांनी व्यक्त केला. यावेळी उपजिल्हाप्रमुख विष्णू उकंडे, तालुकाध्यक्ष राजेंद्र जाधव, रवी राठोड, निलेश गावंडे, विशाल मनवर, छबुताई चारोळे आदी उपस्थित होते.

उमरखेडमध्ये शनिवारी 'समाजभूषण' पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

सत्यशोधक भाऊसाहेब माने गौरव समितीचा पुढाकार; विविध क्षेत्रांतील आठ दिग्गजांचा सन्मान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

उमरखेड, दि.८ : उमरखेडच्या मातीत सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या आणि विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाने वेगळा ठसा उमटवणाऱ्या आठ सेवाभावी व्यक्तिमत्त्वाचा आणि संस्थांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सत्यशोधक भाऊसाहेब माने यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ येत्या शनिवारी, दि. १०जानेवारी रोजी स्थानिक जिजाऊ सांस्कृतिक भवनात हा भव्य 'समाजभूषण'पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असून, यामुळे उमरखेडच्या सामाजिक क्षेत्रात नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

सत्यशोधक भाऊसाहेब माने गौरव कृती समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सामाजिक दायित्व निभावणाऱ्यांचा यथोचित सन्मान केला जाणार आहे. केवळ स्वत:साठी न जगता समाजासाठी झटणाऱ्या हातांना बळ देणे आणि त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारणे, हा या पुरस्कारामागचा मुख्य उद्देश आहे. १० जानेवारी रोजी होणाऱ्या या कार्यक्रमात क्रीडा, पत्रकारिता, पर्यावरण संवर्धन, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि कृषी अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या भूमिपुत्रांचा गौरव होणार आहे.

डॉ. विजयराव माने यांच्या दूरदृष्टीतून आणि संकल्पनेतून साकारलेला हा उपक्रम आता तालुक्याच्या सांस्कृतिक जडणघडणीचा अविभाज्य भाग बनला आहे. तालुक्यात होऊन गेलेल्या महान नेत्यांच्या आणि समाजसुधारकांच्या स्मृती जागवतानाच, त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या सध्याच्या पिढीला प्रोत्साहन देण्याचे काम या माध्यमातून केले जात आहे. या सोहळ्यासाठी समितीचे अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, सचिव बालाजी वानखेडे, कार्याध्यक्ष अविनाश चंद्रवंशी, शेतकरी कष्टकरी संघाचे अध्यक्ष देवानंद पाटील मोरे, शुभम माने आणि इतर पदाधिकाऱ्यांनी जय्यत तयारी केली आहे. हा सोहळा केवळ सत्कार नसून, ती विचारांची देवाणघेवाण आहे. जुन्या पिढीतील त्यागी नेत्यांच्या नावाशी जोडले गेलेले हे पुरस्कार स्वीकारताना, जबाबदारीची जाणीव अधिक वाढते. या गौरवशाली सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी तालुक्यातील रसिक नागरिक आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या 'रत्नां'चा होणार यथोचित गौरव

यावर्षीच्या पुरस्कारांसाठी निवड समितीने अत्यंत पारदर्शकपणे नावांची घोषणा केली आहे. यामध्ये क्रीडा: सतीश मुंडे, सामाजिक कार्य: माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, पुसद, पत्रकारिता: संभाजी भोयर, पर्यावरण: नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्था, उमरखेड, दिव्यांग उद्योजक: प्रशांत सराफ, शिक्षण: नागेश मिरासे (जि.प. शाळा, विडूळ), महिला सक्षमीकरण: रविता लकडे (पोफाळी), रेशीम शेती: सुशील मुधळेआदींचा समावेश आहे.

स्मृतींचा सुगंध आणि दातृत्वाचा वारसा

हे पुरस्कार तालुक्यातील दिवंगत लोकनेते आणि समाजसुधारकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिले जातात. यामध्ये प्रामुख्याने स्व. जेठमलजी माहेश्वरी, स्व. देवराव पाटील चोंढीकर, स्व. नारायणराव शिलार, स्व. रामचंद्र सिंगलकर, स्व. वामनराव उत्तरवार, स्व. सखाराम नरवाड गुरुजी, स्व. भाई केशवराव देवसरकर आणि स्व. नानासाहेब देशमुख यांच्यासह अनेक दिग्गजांच्या आठवणी जपण्यात आल्या आहेत. त्यांच्या त्यागाचा आणि कार्याचा आदर्श समाजापुढे कायम राहावा, हाच या उपक्रमाचा उदात्त हेतू आहे.